
विवेक पंडित
माणूस
म्हणून
जगण्यासाठी

# माणूस म्हणून जगण्यासाठी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला

## पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.



"....एकूणच साध्य-साधन विवेक पाळून व्यूहरचना कशी रचावी याबद्दलचे दिशादर्शन या पुस्तकात सामावलेले आहे. या लिखाणास वैचारिक अधिष्ठान जसे प्राप्त झाले आहे तसेच ते अनुभवावर आधारित असल्याने, फक्त तात्विक नाही, तर सर्वथा ते व्यवहारावर आधारित आहे. हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे....

....आज ज्या समस्या समाजासमोर आहेत. त्या गांधींच्या वेळी नव्हत्या व नव्या लढाया जुन्या शस्त्रांनी लढता येत नाहीत. त्यासाठी नव्याने समस्या समजावून घेऊन, त्याबाबत चिंतन-मनन करून मार्ग शोधावे लागतील. यासाठी या पुस्तकाचा उपयोग होऊ शकेल असे मला वाटते. कारण अजून आशेला जागा आहे...."

- डॉ.न्यायमूर्ती चन्द्रशेखर धर्माधिकारी

Mayank Communications
मयंक कम्युनिकेशन्स

# स्वप्न माझ्या जीवनाचे

स्वप्न माझ्या जीवनाचे, मूर्त रूपाला दिसू दे।
मानवाची लेकरे ही, मानवा जैसी जगू दे ।।

जाळण्या छोट्या भुकेला, देह विक्रीला नसू दे।
अंतरीची भूक माझ्या, जुलूम जाळाया असू दे ।।


उमलणारे फूल त्यांच्या, पायी निर्माल्य नसू दे।
आजचा हा श्वास माझा, फुलवण्यासाठी फुलू दे ।।

हीन मी सामर्थ्य नाही, तेज ना ऐसे नसू दे।
मीच माझा शक्तिदाता, वादळांना थोपवू दे ।।

संपली जी रात्र माझी, रात्र अंधारी असू दे।
किरण जे येतील आता, झोपड्यामाजी वसू दे ।।

अन्न ना सन्मान ज्याला, प्रेरणा माझी असू दे।
आजचे पाऊल माझे, त्या प्रभूसाठी पडू दे ।।

- विवेक पंडित



विवेक पंडित (माजी आमदार) एक कुशल संघटक आहेत. त्यांनी आपल्या संघटन कौशल्याने हजारो वेठबिगारांना गुलामीतून मुक्त करून संघटित केले. तीस हजार एकर वनजमिनीवरील वहिवाटी आदिवासींच्या नावावर करण्यास त्यांनी शासनास भाग पाडले. राज्यात अत्याचार प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी सुरू होण्याचे श्रेय त्यांना जाते. महाराष्ट्रातील वंचित घटकांतील शाळाबाह्य मुलांसाठी प्राथमिक शिक्षणाचे धोरण शासनाकडून बदलून घेतले. त्यांनी मीरा भाईंदर महानगरपालिका व विरार, नालासोपारा नगरपालिकांतील कंत्राटी सफ़ाई कामगारांना न्याय मिळवून दिला. आगरी व कुणबी शेतकऱ्यांसाठी रिलायन्स व गेल इंडिया यांच्याविरोधात यशस्वी आंदोलन केले. आगरी रेतीव्यवसायिकांसाठी तुरुंगवास भोगून रेती व्यवसायाचा ठेका बंद करण्यास शासनास भाग पाडले. राज्यात मानवी हक्क आयोगाची स्थापना व्हावी म्हणून त्यांनी विशेष परिश्रम घेतले. देशातील अन्य राज्यांत तसेच नेपाळमध्येही वेठबिगार मुक्तीचे कार्य केले. श्रमजिवी संघटना, विधायक संसद यासोबतच राज्याच्या विधिमंडळासोबत कार्य करणारे व अर्थसंकल्पाचे अध्ययन करणारे समर्थन, नॅशनल संऍटर फ़ॉर ऍडव्होकसी स्टडीज, मानवी हक्क अभियान, अभिव्यक्ती समर्थन व श्रमजिवी कामगार संघटन आदि संस्था- संघटनांची त्यांनी निर्मिती केली. भारत सरकारच्या ग्रामीण विकास व कामगार मंत्रालयाच्या विविध समित्यांवर त्यांनी काम केले. वसईतील प्रस्थापित महानगरपालिकेत समाविष्ट होण्याविरोधात २९ गावांचा लढा देत वसईतील अनेक दशकांचा दहशतवाद मोडीत काढला. वसईतून ते विधानसभेवर आमदार म्हणून निवडून आले. लोकशाही मूल्यांवरची श्रद्धा बळकट व्हावी यासाठी रस्त्यावरील संघर्ष ते विधानसभेच्या विविध पटलांवर संसदीय आयुधांचा वापर करत जनतेच्या प्रश्नांना वाचा फ़ोडली

**श्री विवेक पंडित यांची प्रकाशित पुस्तके**

बंधमुक्ती

Handbook of prevention of atrocities

Fearless minds

अखेर सावळ्या जिंकलाच

परिघावरून

**१९८३ साली अशोका फ़ेलोशिपने त्यांना गौरवण्यात आले. १९९० साली अमेरिकेतील ऍडव्होकसी फ़ेलोशिप त्यांना प्रदान करण्यात आली. जगातील अत्यंत प्रतिष्ठेच्या आयझेन हॉवर फ़ेलोशिपने २००० साली त्यांना सन्मानित करण्यात आले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सल्लागार समितीची सदस्य असणाऱ्या ऍंटी स्लेव्हरी सोसायटीने त्यांच्या वेठबिगार मुक्तीच्या अतुलनीय कार्याची दखल घेत ब्रिटिश संसदेच्या नेहरू सभागृहात त्यांना व श्रीमती पंडित यांना १९९९ वर्षीचा आंतरराष्ट्रीय गुलामीविरोधी पुरस्कार देऊन सन्मानित केले.**

विठू माऊली ट्रस्टची स्थापना करून आदिवासी भागातील कुपोषित मुलांना जीवनदान देत ते आजही कुपोषण निर्मूलनासाठी व्यापक उपक्रम राबवीत आहेत.

माणूस म्हणून जगण्यासाठी

लेखक : विवेक पंडित

संपर्क

samarthanmumbai97@gmail.com

Vivek Pandit <pvivek2308@gmail.com>,

समर्थन
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाजवळ
मरीन लाईन्स, मुंबई, 4000020

022-22003060

9823147003

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखककाडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पूनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



या पुस्तकाच्या विनामूल्य ई वितरणाला परवानगी दिल्याबद्दल आम्ही लेखक श्री विवेक पंडित आणि समर्थन चे श्री मॅकँझी डाबरे यांचे आभारी आहोत.

ई प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १२ जानेवारी २०१९ (स्वामी विवेकानंद जयंती)

· विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

· आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता

· हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# माणूस म्हणून जगण्यासाठी

विवेक पंडित

Mayank Communications
मयंक कम्युनिकेशन्स

**माणूस म्हणून जगण्यासाठी**

लेखक:
विवेक पंडित
द्वारा - साने गुरुजी प्रशिक्षण संकुल,
विधायक संसद, उसगाव डोंगरी, पोस्ट - भाताणे, तालुका - वसई,
जिल्हा - ठाणे, पिन कोड - ४०१ २०३
भ्रमणध्वनी - ०९८२३१४७००३
इमेल - pvivek2308@gmail.com

© हक्क लेखकाधिन
या पुस्तकातील कोणताही भाग पुन:मुद्रित, छायांकित करावयाचा झाल्यास लेखकाची पूर्वपरवानगी आवश्यक.

प्रकाशक:
मयंक कम्युनिकेशन्स,
दिवाण मेन्शन-१, बी २/३०९,
अंबाडी रोड, वसई (पश्चिम), जिल्हा ठाणे, पिन कोड - ४०१ २०२
भ्रमणध्वनी: ०९३२४०३२५१३

मुखपृष्ठ संकल्पना: नितीन निगडे
मुखपृष्ठावरील छायाचित्र: विवेक पंडित
मलपृष्ठावरील छायाचित्र: विनायक मळगावकर
मुखपृष्ठ व मांडणी: जयश्री घोसाळकर
अक्षरजुळणी: प्रतिक्षा कोयंडे, महेश राऊत

मुद्रक:
नित्यानंद ग्राफिक्स, वसई (पूर्व)
भ्रमणध्वनी: ०९३२२१०१२८९
इमेल - nityanandgraphix1@gmail.com

प्रथमावृत्ती: मार्च, २००९ (प्रती ५०००)

किंमत: दोनशे पन्नास रुपये

# अनुक्रमणिका


अर्पण पत्र ..........१

आशीर्वचन ..........३

प्रस्तावना ..........९

फिअरलेस माइंडस् या मूळ इंग्रजी पुस्तकाची प्रस्तावना ..........१७

लेखकाचे मनोगत ..........२१

**भाग एक**

मार्गक्रमण ..........२७

सामर्थ्याची नांदी ..........४७

दिशा-निश्चिती ..........५९

संघटक : संघटनेचा कणा ..........७६

अपरिहार्य विरोध ..........९५

हाका उषेच्या ..........१०५

अहिंसक संघर्षाची साधने ..........१२१

आंदोलनाची रणनीती ..........१३५

संघर्षाचे डावपेच ..........१५१

वाटाघाटी ..........१६३

**भाग दोन**

गांधीकन्या रोझा पार्कस् ..........१६९

संपन्न अमेरिकेतील उपाशी अन्नदाते ..........१७५

तुझा रंग पुरेसा आहे ..........१८१

काळ्याचं पोर ..........१८५

धंदा... चॅप्टर कोर्ट ..........१८९

नरबळी ..........१९३

शिक्षणाच्या हक्कासाठी ..........१९७

**भाग तीन**


विधिमंडळ ..........२०९

पोलादी चौकट ..........२२५


न्यायपालिका ..........२४१

प्रसारमाध्यमे ..........२४७

जनसंघटनेची उभारणी ..........२५९

ऋणनिर्देश ..........२७१

# अर्पण पत्र



प्रिय पूज्य साने गुरुजी,

बापुजींच्या आवाहनानुसार 'चले जाव' चळवळीत हजारोंनी सामील व्हावे म्हणून आपण खानदेश पिंजून काढलात. देशाला स्वातंत्र्य मिळाले म्हणजे कोणी उपाशी असणार नाही, कोणी बेघर असणार नाही, सर्व सुखी होतील असा विश्वास लोकांना देत आपण रान पेटविलेत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर झालेला रक्तपात, आपणास परमेश्वरासमान असणाऱ्या बापुजींची हत्या, भाषावार प्रांत रचनेच्या मागणीमुळे विखुरलेले आपले आंतरभारतीचे स्वप्न, जमीनदार, संस्थानिक, राजे-महाराजे, धनिक यांनी आपण मातेसमान मानलेल्या काँग्रेसवर घेतलेला ताबा यामुळे आपण व्यथित होतात. देशाला स्वातंत्र्य मिळाले परंतु पददलितांना दीनदुर्बलांना मात्र या देशातील धनाढ्य गुलामच ठेवतील याची आपणास खात्री पटली. खानदेशमधील स्वातंत्र्यवीरांच्या, शहिदांच्या माता भगिनींना मी तोंड कसे दाखवू या विचाराने आपण अस्वस्थ झालात. त्यातूनच आपण आपली जीवनयात्रा संपविलीत.

गुरुजी, आपण जेवढे संवेदनाक्षम, मातृहृदयी होतात तेवढेच पददलितांच्या, दीनदुर्बलांच्या हक्कांसाठी वज्रकठोर हृदयाचे होतात. पंढरपूरच्या मंदिरात दलितांना प्रवेश मिळावा म्हणून आपण केलेले प्राणांतिक उपोषण असो वा अंमळनेरमधील प्रताप मिलच्या कामगारांसाठी आपण दिलेला लढा असो. प्रसंगी परमेश्वरासमान गांधीजींना 'नाही' म्हणण्याचे सामर्थ्य आपणाकडे होते. याच प्रेरणा घेऊन आम्ही कामाची सुरुवात केली. प्रत्येक संघर्षात, कसोटीच्या क्षणी आपली स्मृती आम्हाला प्रेरित करीत राहिली.

संघटना बांधणीच्या अनुभवावर आधारित हे पुस्तक आमच्यासारख्याच आपल्या धडपडणाऱ्या मुलांसाठी मी लिहिले आहे. दुसऱ्या स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी, आपल्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी मी ते अत्यंत विनम्र भावनेने, कृतज्ञतेने आपणास अर्पण करीत आहे.

**- विवेक पंडित**

# आशीर्वचन

सुश्री विद्युल्लता व श्री. विवेक पंडित, त्यांच्या संस्था व संघटना आणि त्यांच्या कार्याची मला माहिती आहे. त्यांचे कार्य केवळ समर्थनीयच नव्हे तर महनीयही आहे, हे ही मी जाणतो. परंतु मी त्यांच्या 'माणूस म्हणून जगण्यासाठी' या पुस्तकासाठी काही लिहावे असा माझा अधिकार नाही. मी स्वत: कुशल कार्यकर्ता किंवा संघटक कधीच नव्हतो व आजही नाही, माझी मर्यादा मला कळते. पण या पुस्तकाला माझे आशीर्वाद लाभावेत, अशी इच्छा विवेक पंडित यांनी व्यक्त केली. 'आशीर्वाद' देण्यासाठी वयापेक्षा अन्य अधिकाराची गरज नसते आणि वयाच्या ८२व्या वर्षी मी आशीर्वादापुरताच उरलो आहे, हे ही मी जाणतो. म्हणून केवळ 'आशीर्वाद' म्हणून मी हे चार शब्द लिहित आहे.

मी असे मानतो की, लोकशाही प्रक्रियेत जर आपल्या संविधानाला अभिप्रेत असलेली समता व बंधुता ही मूल्ये तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचावयाची असतील, तर सशक्त सामाजिक संस्था ही काळाची गरज आहे. अशा संस्था समाजाची 'श्वसन केंद्रे' असतात. एवढेच नव्हे तर तीच परिवर्तनाची 'प्रक्षेपण केंद्रेही' असतात. आजच्या सामाजिक जीवनाच्या विकासासाठी व मूल्य परिवर्तनासाठी अशा संस्थांची गरज असते. समाज परिवर्तनासाठी त्यात रस असलेली माणसे एकत्र आणण्यासाठी व तसे 'केडर' निर्माण करण्यासाठी अशा संस्था आवश्यकही असतात. हाती घेतलेल्या कार्याविषयी कळवळा व तळमळ हा अशा संस्थेचा प्राण असतो. महात्मा गांधींच्या विधायक संस्थांचे स्वरुप असेच होते किंवा असावे अशी त्यांची भूमिका होती. स्वराज्यात समाज व्यवस्थेचे व कल्याणकारी शासन व्यवस्थेचे कार्य कसे चालावे, याची गांधीप्रणित रचनात्मक संस्था ही प्रतीके होती. या संस्थांची भूमिका दुहेरी असते. गरज असेल तेव्हा शोषण, अन्याय, भ्रष्टाचाराविरुद्ध संघर्ष व इतर वेळी सेवेची कामे असे त्यांचे स्वरुप असते. कारण अशाप्रकारचा संघर्ष करण्याची क्षमता नसेल तर रचनेला अर्थ नसतो व रचना करण्याची विधायक वृत्ती नसेल तर फक्त संघर्ष कुचकामी किंवा नपुंसक ठरतो. गांधी असेही म्हणत की, प्रत्येक हितकारी आंदोलन पाच अवस्थातून जात असते. उदासीनता, उपहास, निंदा, दडपशाही आणि शेवटी आदर.

यापैकी कुठल्या पायरीवर पंडितांची संस्था उभी आहे, याचे फार चांगले विवेचन या पुस्तकात आढळते.

'निष्काम कर्म - निष्काम अथवा नि:स्वार्थ सेवा' हे शब्द आपण त्यांचा अर्थ न समजताच वापरतो. भगवद्गीतेतही 'निष्काम कर्म' हा शब्द आहे. ज्या कर्माचे लक्ष स्वार्थ, स्वहित किंवा फायदा अगर स्वत:साठी नफा हे नसेल व लोकहिताचे साध्य साधण्याचेच असेल ते निष्काम कर्म. निष्काम कर्म म्हणजे निरुद्देशीय कार्य नव्हे, कार्याला प्रयोजन तर हवेच. अशा कार्यात प्रयोजन परायणता असावी, परिणाम-परायणता महत्त्वाची नसावी. ही निष्काम कार्याची मर्यादा आहे. अवांतर हेतू नसलेले असे कार्य 'स्वयंपूर्ण' व 'स्वावलंबी' असावे अशी त्याची दुसरी मर्यादा आहे. 'सेवाकार्य' हे तात्कालिक 'रिलीफ वर्क' अर्थात सहायता कार्य नव्हे. तर ते नित्यकर्म आहे. ज्यायोगे माणसाच्या नैराश्येचे त्याच्या आनंदात परिवर्तन करणे हे अभिप्रेत आहे. समाजात जोवर शोषण, विषमता, अमिरी-गरिबी, उच्च-नीच भावना, अनारोग्य आदि आहे, तोवर समाजसेवेची गरज राहिलच. मागासलेल्या माणसाचे जे शोषण होत आहे व त्यावर आधारित समाज आहे, त्याऐवजी माणसा-माणसामध्ये समतेवर आधारित निरपेक्ष, मानवीय संबंध स्थापन व्हावेत, हा समाजसेवेचा जो उद्देश आहे, त्याची गरज निरंतर राहणार आहे. पण अशा संस्थांचा उद्देश समाज परिवर्तनाचा व संदर्भ परिवर्तनाचाही असावा लागेल. परंतु आताशा 'समाजसेवा' ही फॅशनेबल होऊ पहात आहे, त्यामुळे फॅशनेबल सेवा करणाऱ्या उच्चभ्रू लोकांचा वर्ग अस्तित्वात येत आहे. त्यांच्यासाठी समाजसेवा ही विरंगुळा, फुरसतीचा वेळ घालविण्याचा अगर करमणुकीचा किंवा प्रसिद्धी प्राप्त करण्याचा मार्ग आहे. तर दुसरीकडे सत्तेमार्फत सेवा किंवा सत्ता प्राप्त करून घेण्यासाठी सेवा करू इच्छिणाऱ्या सत्ताधारी व सत्ताकांक्षी लोकांचाही एक वर्ग अस्तित्वात येत आहे. 'सत्ता' हे त्यांचे उद्दिष्ट आहे. तर सेवा हे ते उद्दिष्ट प्राप्त करण्याचे साधन आहे. आपण हे विसरता कामा नये की 'सत्ताधारी' व 'सत्ताकांक्षी' लोक समाज घडवित किंवा सुधारित नसतात, तर ते बिघडवित असतात. समाजकारण हे राजकारण असूच शकत नाही. जात-पात, धर्म-पंथ, अगर राजकीय पक्ष यांची लेबले लावून निखालस मानवसेवा करता येत नाही. उलट त्यामुळे 'सेवाधर्म' दूषित किंवा कलुषित होतो.

जीविका व समाजसेवा यांच्यात काय अनुबंध असावा हे ही तपासून पाहण्याची गरज आहे. आज जीविकावादामुळे संस्थाही जीविकेचे साधन बनत आहेत. त्यामुळे त्यात निहित व गुप्त स्वार्थ अस्तित्वात येत आहेत. ज्यामुळे कार्याची अवनती होते व संस्थेची अधोगती होते. जुन्या परिभाषेत जीविकेसाठी दुसरा शब्द आहे 'वृत्ति'! वृत्तीचा आणि व्यवसायाचा व सेवेचा अनुबंध असला की, जिव्हाळा निर्माण होतो. त्यातून तळमळ व सामाजिक वृत्ती निर्माण होते आणि समाज सेवकाच्या वैयक्तिक जीवनातही परिवर्तन घडून येते आणि त्यात

सामर्थ्य निर्माण होते. समाज सेवकाला आज जे मानधन देण्यात येते त्याचे स्वरुप 'दक्षिणे'चे असते. त्यासाठी कमीत कमी गरजांवर आधारित जीवन समाज सेवक व संघटकाचे असावे लागेल. दक्षिणेवर जगणारे पुजारी आहेत, पण त्यांना दक्षिणा तशी पूजा करता येत नाही. पूजेचा दक्षिणेशी संबंध असू शकत नाही. या वृत्तीखेरीज शोषित, गरीब, पीडित माणसांची सेवा पूजेच्या वृत्तीने करता येणार नाही. म्हणून समाजसेवा हा 'धंदा' होऊ शकत नाही. हा विवेक पाळावाच लागेल. तरच त्यात साध्य-साधन विवेक प्रस्थापित होऊ शकेल. शब्द जरी 'प्रोफेशनल सोशल वर्कर' असा वापरला जात असला तरी त्यामागची भूमिका व्यवसायाची नसून सेवेचीच असावी लागेल. सेवाभावी संस्थांचे दोन प्रकार आहेत. एक व्यक्तिनिष्ठ, जिथे व्यक्तीच्या आकर्षणाने किंवा आश्रयाने माणसे गोळा होतात. त्यात एक व्यक्तीच संस्थेचे अधिष्ठान बनते. त्याचा आदेश अंतिम असतो व त्याच्याभोवतीच कार्य व कार्यकर्ते फिरत असतात. दुसरी मानवनिष्ठ, तत्त्व व विचारनिष्ठ संस्था असते. यात सेवा व त्यामागील विचार मुख्य असतात. कार्याचे अधिष्ठान विचार व सेवेची सहज प्रेरणा हेच असते. त्यामुळे संस्थेत काम करणाऱ्या माणसाच्या जीवनात व मनोवृत्तीत आमूलाग्र परिवर्तन घडून येते. यासाठी विधायक सेवेच्या कार्याची किंवा त्याहून अधिक विधायक वृत्तीची गरज असते. समाजात, जगात, जीवनाच्या विकासाला जी अनुकूल असेल ती विधायक प्रतिभा ! व या प्रतिभेच्या विकासासाठी व संवर्धनासाठी ज्या संस्था असतात त्याच खऱ्या विधायक सेवाभावी संस्था होतात. यांचा आधार परस्पर, सौहार्द व विश्वास हाच असतो. त्याचप्रमाणे कार्यकर्त्यांचे चारित्र्य, मग ते व्यक्तिगत असो की सामाजिक अत्यंत महत्त्वाचे ठरते व त्याची जडण-घडण अशा संस्थांमधूनच होत असते.

जुनी मूल्ये, जुन्या प्रतिष्ठा, गडगडून ढासळत आहेत. संविधानाने मान्य केलेल्या समता, बंधुत्व या मूल्यांवर आधारित मूल्यांची स्थापना होऊ शकली नाही. आज माणूस यंत्राधीन, बाह्यतंत्राधीन होत आहे. पैसा अगर संपत्ती ही फक्त विनियोगाची साधने न राहता त्याद्वारे माणसे विकत घेता येतात व त्यांचे शोषणही करता येते, यावरील विश्वास सर्व क्षेत्रात बळावत आहे. मनी पॉवर, मसल पॉवर, माफिया पॉवरच पॉवरफूल होत आहेत. 'सेन्स व्हल्यू' ऐवजी 'न्यूसन्स व्हॅल्यू'च अधिक मूल्यवान ठरत आहेत. लोकांचा उपद्रवी शक्ती व हिंसा यावरील विश्वास वाढतो आहे. जणू सर्व समाजच कौरवांनी जिंकला आहे. व पांडव खाली मान घालून सर्व बघत आहेत. त्यामुळे दुर्जन सक्रिय होत आहेत तर सज्जन 'निष्क्रीय व नपुसंक'. आणि यात परिवर्तन प्रस्थापितांना व शोषणकर्त्यांना नको आहे. परंतु ज्यांना परिवर्तन हवे आहे असे वाटते, त्यांनाही परिवर्तनाची भीती वाटत आहे. यामुळेच कायदा व न्यायालये व शासन यांनी सर्व करावे अशी भूमिका स्वीकारली जात आहे. खरे तर त्यावेळचे प्रधानमंत्री पी. व्ही. नरसिंहराव यांनी म्हटल्याप्रमाणे लोककल्याणकारी योजना अमलात आणण्यासाठी 'बाय-पास सर्जरी'ची गरज आहे. म्हणजे आजच्या

अधिकारशाहीवर आधारित शासन प्रणालीला बाय-पास म्हणजे बाजूला ठेवून, स्वयंसेवी संस्थांमार्फतच हे कार्य करावे लागेल. त्याखेरीज अन्य पर्याय नाही. आजही आदिवासी क्षेत्रासाठी असलेल्या योजनांचा लाभ आदिवासींना मिळतच नाही. तो पैसा कोठे जातो हे कधीही न सुटणारे कोडेच आहे. त्यांना आजही माणूसपण प्राप्त झालेले नाही. ते दुय्यम नागरिकच मानले जातात. या संदर्भात कायदा व न्यायालयाचे निर्णय वाट मोकळी करून देतात, पण त्या मार्गाने जाण्याची प्रेरणा देऊ शकत नाहीत. म्हणून अंतिमत: त्यांची अंमलबजावणीच होत नाही. मग खरा यक्ष प्रश्न उपस्थित होतो की, 'हू विल वॉच द वॉचमन ?' पहारेकरी नेमून दिल्याने काम भागत नाही, तो झोपला आहे की जागा आहे ? हे बघण्यासाठी निगराणी करावी लागते, हे कार्य समाजसेवी संस्थांनी करावे अशी अपेक्षा आहे. ते कसे करता येईल यासाठी काही यंत्रणा असणे आवश्यक आहे व हेच खऱ्या अर्थाने या पुस्तकाचे प्रयोजन आहे. आणि म्हणूनच या पुस्तकात, संघटनेची बांधणी कशी करावी त्याबद्दलची तत्त्वे व मुद्दे, संघटकाकडे कोणते गुण असावेत, याबाबत उहापोह आहे. संघर्ष करावा लागला तर तो अहिंसकच असावा लागेल, हे स्पष्ट आहे. कारण हिंसा प्रतिहिंसेला जन्म देत असते. त्यामुळे अशा चळवळीची व संस्थेची काही 'पथ्ये' असावी लागतात. ती कुठली असावीत व एकूणच साध्य-साधन विवेक पाळून व्यूहरचना कशी रचावी याबद्दलचे दिशादर्शन या पुस्तकात सामावलेले आहे. या लिखाणास वैचारिक अधिष्ठान जसे प्राप्त झाले आहे तसेच ते अनुभवावर आधारित असल्याने, फक्त तात्विक नाही, तर सर्वथा ते व्यवहारावर आधारित आहे. हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे.

पण खरी वेदना अशी आहे की, स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षानंतरही आदिवासी व कष्टकरी यांचे भोग व शोषण संपलेले नाही. राजकीय स्वातंत्र्य मिळाले, पण गांधीजींना अभिप्रेत असलेले 'स्वराज्य' अजूनही प्रस्थापित झालेले नाही, कष्टकरी, आदिवासी, दलित, पीडित, शोषित वर्गच नव्हे तर सामान्य माणसाचीही आर्थिक, सामाजिक, धार्मिक, गुलामगिरी अजूनही कायम आहे. गुलाम लोकांचा स्वतंत्र देश कसा असू शकेल ? याचा विचारही कुणी करू इच्छित नाही. गांधीनी 'अंत्योदय' पासून सर्वोदयाकडे प्रवास असावा असे सांगितले होते. पण ती वाटचाल कुठेतरी ढेपाळली आहे. किंवा त्यांना अपेक्षित पाठबळ प्राप्त होऊ शकले नाही. समाजात अस्तित्वात असलेल्या सत्ता व संस्था म्हणजे 'धर्मसंस्था', विज्ञानावर आधारित संस्था व राजकीय संस्था, अयशस्वी ठरल्या आहेत, हे कटू सत्य आहे. धर्माची प्रतिज्ञा होती की, माणसाला माणसाच्या निकट आणू. पण धर्मातून अध्यात्म वजा झाले व कर्मकांडावर आधारित संघटित धर्मामुळे वितुष्टच वाढले. विज्ञानाची ही भूमिका होती की, माणसांना एकमेकांच्या समीप आणून, परस्परांसोबत जगणे शिकवू. पण विज्ञानाने देशा-देशांतील अंतर कमी केले, न पेलणारी गती वाढविली, आता अंतर मिनिटे व सेकंदाने मोजले जाते, या प्रक्रियेत देश, प्रदेश व त्यातील माणसे समीप आलीत,

पण ती कुस्ती खेळण्यासाठी की प्रेमाने आलिंगन देण्यासाठी, हे सांगणे कठीण आहे. विज्ञान व मानवीय मूल्ये यांचा अनुबंध आजही दिसून येत नाही. तिसरी सत्ता राजकारणाची! त्यात राष्ट्रकारण, राष्ट्रकल्याण, लोककल्याणाऐवजी सत्ताकारणच अधिक आहे. या सर्वांचे बाजारीकरण होत आहे. त्यात 'अनर्थकारण' शिरले आहे व या तिन्ही सत्तातील दोष समाजसेवी संस्थातही शिरतील का? अशी भीती वाटते आहे. समाजसेवी संस्थातही निवडणुकांचे सत्ताकारण व अर्थकारण शिरू पहात आहे. एरवी अंध विद्यालय, अनाथाश्रम, वृद्धाश्रम यांतही निवडणुका का होतात, हे माझ्यासारख्याला कळत नाही. कारण निवडणुका तर सत्ता प्राप्तीसाठी होत असतात ना? अशावेळी गांधी विचारावर आधारित खऱ्या स्वयंसेवी संस्था हा एकमेव पर्याय उरतो. ज्यात पदाची व सत्तेची आकांक्षा नसते तर मनुष्यसेवेचे व्रतच असते. अन्य बाबी दुय्यम असतात किंवा नसतातच! माझ्यासारख्यांची दुसरी वेदना आहे की, आदिवासी, गिरीजन, वनवासी, दलित व स्त्रिया यांचे शोषण अजूनही संपतच नाही. उलट शोषणाचे नवनवीन मार्ग शोधून काढण्यात येत आहेत व हे संपायला हवे असे समाजातील उच्चभ्रू व बुद्धीजीवी वर्गाला वाटतच नाही. समाज परिवर्तनाची धुरा आजवर मध्यमवर्ग सांभाळीत असे. पण आता मध्यम वर्गच नाही, आहे तो 'त्रिशंकू' वर्ग! याची सहानुभूती दलित, शोषित यांच्याबद्दल आहे, पण इच्छा मात्र कुठल्याही मार्गाने टाटा, बिर्ला, अंबानी होण्याची आहे. हे सारे बदलावे लागले, त्याखेरीज पर्याय नाही. पण हे लक्षात घ्यावे लागेल की आज ज्या समस्या समाजासमोर आहेत. त्या गांधींच्या वेळी नव्हत्या व नव्या लढाया जुन्या शस्त्रांनी लढता येत नाहीत. त्यासाठी नव्याने समस्या समजावून घेऊन, त्याबाबत चिंतन-मनन करून मार्ग शोधावे लागतील. यासाठी या पुस्तकाचा उपयोग होऊ शकेल असे मला वाटते. कारण अजून आशेला जागा आहे. माझ्या देशात आजही सत्ता-संपत्ती पेक्षा त्यागाचीच प्रतिष्ठा आहे. तेथेच वाकून नमस्कार करावासा वाटतो. संस्कृती दोनच प्रकारची असते. एक 'त्यागावर' आधारित तर दुसरी 'भोगावर' आधारित! त्याग संस्कृती सेवाभावी संस्थांचा 'प्राण'आहे. या संस्था प्राणवान व प्राणदायी व्हाव्यात, हीच काळाची गरज आहे.

या सर्व विवेचनातून एक गोष्ट मात्र स्पष्ट व्हावयास हवी की जोवर सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून सामान्य माणसास मुक्ती मिळत नाही, तोवर मुक्तीचा लढा संपलेला नाही, जरी राजकीय स्वातंत्र्य मिळाले असले तरी. पण यासाठी आपल्या निष्ठांचाही विचार करावा लागेल. 'बांधिलकी' हा शब्द वापरून वापरून 'बोथट' झाला आहे. आता गरज आहे 'सामीलकीची'. परिवर्तनवादी किंवा क्रांतीवादी समाजसेवकांची. युवकांना जीवितासाठी कमाई करण्यासाठी साधने शोधण्याऐवजी, जगण्यासाठी प्रयोजनांचा शोध घ्यावा लागेल. त्याला कसा समाज हवा आहे याचे स्पष्ट चित्र अगर 'ब्ल्यू- प्रिन्ट' त्याला स्वत:ला तयार करावा लागेल व दुसऱ्यांचे पंख उधार घेऊन उडता येत नाही, म्हणून

स्वत:च्या पंखातच शक्ती निर्माण करावी लागेल. यासाठी लोकशाही शासनाशी सामान्यपणे सहयोग करून, हितकारी योजना ज्या लोकांसाठी आहेत, त्यांच्यापर्यंत पोचविण्याचा प्रयत्न असेल, पण जेथे शासनकर्त्यांचा, अगर राजनीतीचा कल, अगर भूमिका लोकनीती व लोककल्याणा विरुद्ध वाटेल, तेव्हा संवैधानिक आणि आवश्यकता वाटली तर संवैधानिक मार्गाव्यतिरिक्त शांतीमय साधनांनी त्याचा प्रतिकार करणे हे कर्तव्य मानावे लागेल. या प्रक्रियेत हिंसकवृत्ती व शस्त्रे निषिद्ध मानावी लागतील. सामाजिक, आर्थिक, राजनैतिक संयोजन जीवन केंद्रित ठेवून, मनुष्य त्याची केंद्रित विभूति मानली जाईल. मानवीय मूल्यांच्या विकासासाठी अन्य जीवधारी, वनस्पति व सृष्टी या सर्वांचाच सहविचार अंतर्भूत असेल. एकूण काय की, समाजाच्या सर्वांगीण विकासाचा विचार करावा लागेल. कारण विवेक पंडित किंवा कुठल्याही परिवर्तनवादी समाज सेवकाला असा समाज अपेक्षित आहे. जेथे कुणी कुणाला लुबाडीत नाही, राबवित नाही, कुणी कुणाचे शोषण करीत नाही, जिथे दंडुक्याचे राज्य नाही व दंडुक्याला भिऊन कुणी वागत नाही. जेथे प्रत्येकजण दुसऱ्याची अडचण समजावून घेतो व समाज व्यवस्था बिघडणार नाही याची जाणीव ठेवतो. जेथे समतेवर आधारित सहयोगाची भावना नांदते आणि आपुलकीच्या आधारावर समाजाची उभारणी होते. यासाठी 'अन्त्योदय' हेच जीवनसूत्र असावे लागेल व त्याची सुरुवात आजची विषमतेवर आधारित समाज रचना नाकारण्यापासून होईल. अशा नकारात, अगर नाकारण्यात सकारात्मक शक्ती असते. जी अंतिम ध्येय प्राप्तीसाठी आवश्यक आहे. ज्यांना समाजसेवेत गोडी आहे व ज्यांना माणूसपणच नाकारण्यात आले आहे, त्यांच्या उत्थानासाठी कार्य करण्यात सामीलकीच्या भावनेने सेवाकार्य करण्याची इच्छा आहे, त्यांच्यासाठी हे पुस्तक 'पाथेय' म्हणून उपयोगी पडेल याची मला खात्री आहे. या पुस्तकाचे असे कार्यकर्ते व अन्य सर्व संबंधित खुल्या दिलाने व मोकळ्या हाताने स्वागत करतील अशी अपेक्षा आहे.

शेषम्, स्नेहेन्, पुरयेत्

**डॉ. न्यायमूर्ती चन्द्रशेखर धर्माधिकारी**

डॉ. न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, ज्येष्ठ विधिज्ञ असून ते मुंबई उच्च न्यायालयाचे महनीय न्यायाधीश होते. भारताच्या राष्ट्रपतींनी त्यांना पद्मभूषण किताबाने गौरविलेले आहे. ते गांधीवादी विचारसरणीचे असून स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय सहभागी होते. त्यांनी विविध विषयांवर विपुल लेखन केले आहे.

# प्रस्तावना

विवेक पंडित यांनी लिहिलेल्या 'माणूस म्हणून जगण्यासाठी' या पुस्तकासाठी प्रस्तावना लिहिताना मला अंत:करणापासून आनंद होत आहे. त्यांनी यापूर्वी लिहिलेल्या 'फिअरलेस माइंडस्' या पुस्तकाचा हा भावानुवाद असला तरी त्यात त्यांनी बरीच भर घातली आहे. १९८२ साली मी भारत सरकारच्या कामगार कल्याण विभागाचा संचालक व कामगार मंत्रालयाच्या वेठबिगार पद्धती निर्मूलन विभागाचा सह-सचिव होतो. तेव्हा सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी माझा विवेकजींशी परिचय झाला. विवेक व विद्युल्लता यांनी १९७९ साली दहिसर या वसई तालुक्यातील छोट्याशा खेड्यात विधायक संसदेमार्फत कल्याणाचे काम सुरू केले. तेव्हा वेठबिगार पद्धतीबद्दल ते पूर्णत: अनभिज्ञ होते. युवकांच्या क्रीडा स्पर्धांच्या वेळी त्यांना समाजातील वेठबिगारीचे विदारक वास्तव जाणवले. त्यांनी वेठबिगार मुक्तीसाठी कल्याणकारी विकासात्मक कामाला अथक व कणखर संघर्षाची जोड दिली. त्यासाठी १९८२ मध्ये त्यांनी श्रमजीवी संघटनेची स्थापना केली. सामाजिक न्यायाच्या, समतेच्या या संघर्षाने विकासाची नवी दालने खुली केली. पाणलोट क्षेत्राचा विकास, सामाजिक वनीकरण, विटभट्टीवरील मुलांसाठी शाळा,शेतीतील नवनवे प्रयोग या संघर्षातूनच पुढे आले.

श्रमजीवी संघटनेच्या स्थापनेपासून आजवरचा प्रवास खडतर राहिला. अनेक यातना या काळात संघटनेने भोगल्या. अनेक संकटांशी संघटनेला सामना करावा लागला. समर्पित कार्यकर्त्यांमुळे संघटनेला माघार घ्यावी लागली नाही. संघटनेचा पाया विस्तारतच गेला. संघटनेची रचना गावापर्यंत पोहोचली. ध्येयाने पछाडलेल्या कार्यकर्त्यांनी संघटनेला एकजीव बनविले. त्यांच्या सचोटीमुळे, प्रामाणिकपणामुळे व प्रत्येक लढ्यातील सक्रिय सहभागामुळे स्वातंत्र्याचा अनुभव ते गरिबातल्या गरीब माणसापर्यंत पोहोचवू शकले.

हे पुस्तक स्वातंत्र्य, असंघटितांची संघटना आणि संघटनेच्या माध्यमातून दुर्बलांना

सामर्थ्यवान बनविण्याच्या प्रक्रियेवर आधारित आहे. विकासाची नेमकी व्याख्या समजून घेतल्याशिवाय या प्रक्रियेचे आकलन होणार नाही. रस्ते, पूल, उड्डाणपूल, गगनचुंबी इमारती, दूरसंचार व संपर्काची साधने, वीज निर्मितीचे नेत्रदीपक प्रकल्प, गोल्फ क्लब, झगझगते मॉल्स्, विशेष आर्थिक क्षेत्र यावर विकास तोलला असता भ्रामक चित्र उभे राहते. स्थिरावलेल्या पारंपरिक अर्थव्यवस्थेला धक्के देत आधुनिक अर्थव्यवस्था गती घेत असल्याचे यावरून स्पष्ट होते, यात शंका नाही. खरा विकास या प्रगतीच्या पलीकडे व अधिक मूलभूत असतो. अन्न, आरोग्य, शिक्षण, पाणी, लसीकरण, पोषण, स्वच्छता, वीज या पलीकडे मानवी मनाचा स्वातंत्र्य व सहजतेच्या वातावरणात झालेला विकास म्हणजेच खरा विकास होय. अन्याय-अत्याचाराला मूक संमती असणे, शोषणासमोर गुडघे टेकणे, यथास्थिती मान्य करणे, गुलामीचे जिणे निमूटपणे स्वीकारणे, या व अशा शांततेच्या संस्कृतीचे परिवर्तन हाच विकासाचा मार्ग आहे.

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी तार्किक अथवा बुद्धीवादी, निधर्मी व विज्ञाननिष्ठ भारतीय समाजाचे स्वप्न चितारले होते. मूकसंमती देणाऱ्या तथाकथित शांततेच्या व परावलंबित्वाच्या संस्कृतीचे रुपांतर स्वावलंबन, स्वसामर्थ्य, आत्मविश्वास व आग्रहीपणा असलेल्या संस्कृतीत करणे हा विकासाचा खरा अर्थ आहे.

असहिष्णुता, परस्पर द्वेष, क्रौर्य, फाटाफूट या प्रवृत्तींपासून फारकत घेऊन निर्माण झालेला सहानुभूतीपूर्ण व संवेदनशील समाज हा खरा विकसित समाज आहे. शासनाची तर्कहीन नीती, बुद्धिहीन भेदाभेद, समाजातील द्वैतवाद नष्ट व्हावा. कायद्याची समानता, कायद्याचे सर्वांना संरक्षण, शिक्षणासाठी सर्वांना समान संधी, बालकांना अव्वल दर्जाचे आरोग्य, स्त्री-पुरुषांना रोजगार, कामाचे समान वेतन मिळावे. जात-वर्ग, वर्ण, रंग, उपासना पध्दती, राजकीय विचार या पलीकडे सर्व नागरिकांना विकासाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात. गुलामीच्या शृंखलांतून मुक्ती मिळून स्वातंत्र्याचा आनंद भारतीय नागरिकाला प्राप्त व्हावा हाच खरा विकास. कविवर्य कुसुमाग्रज यांच्याच शब्दात सांगायचे तर,

> सर्वात मधुर स्वर,
> ना मैफिलीतील गाण्यांचा,
> ना खळाळणाऱ्या निर्झराचा,
> ना कोकिळेच्या कुजनाचा,
> सर्वात मधुर स्वर,
> कोठेतरी कुणाच्यातरी हातातील शृंखला खळाखळा तुटण्याचा.

माणसाला जर सन्मानाने, समतेने आणि स्वातंत्र्याच्या वातावरणात जगू दिले तर ते उत्साहाने प्रेरित होऊन आपल्या घरी, कामाच्या ठिकाणी, व्यवसायात अगर इतर कोठेही उत्तम योगदान प्रदान करतील. त्यांच्या कामात दर्जा निर्माण होईल व हा दर्जा कामाची नवी संस्कृती निर्माण करील. यातून उत्पादकता वाढेल, राष्ट्रीय उत्पन्नात निश्चित भर पडेल. मानवी विकासासाठी स्वातंत्र्य ही पूर्वअट आहे. सामाजिक सुरक्षितता, स्वावलंबन आणि सामाजिक एकात्मिकता, विकासाची ध्येये आहेत. व्यक्तीचे स्वातंत्र्य हिरावून घेतले गेल्यास दारिद्र्य, भूक, कुपोषण, निरक्षरता याचे ते शिकार होतील. त्यांना आरोग्याच्या सोयी, निवारा, पिण्याचे पाणी तर मिळणार नाहीच शिवाय त्यांचे राजकीय व नागरी स्वातंत्र्यही हिरावून घेतले जाऊ शकते.

नोबेल पुरस्कार विजेते प्रा. अमर्त्य सेन यांनी आपल्या 'डेव्हलपमेंट अॅज फ्रीडम' या पुस्तकात पुढील निष्कर्ष काढले आहेत. स्वातंत्र्य हे विकासाचे जसे पहिले पाऊल आहे तसेच ते अंतिम साध्यही आहे. आर्थिक सुरक्षिततेसाठी राजकीय स्वातंत्र्य गरजेचे आहे. शिक्षण, आरोग्य, इत्यादी सामाजिक सुविधांमुळे अर्थव्यवस्था गतिमान होत असते. व्यापार उद्योगात, आर्थिक क्षेत्रात निर्माण झालेल्या संधींमुळे व्यक्तिगत सुरक्षितता विकसित होते. यामुळे निर्माण झालेली सार्वजनिक संसाधने सामाजिक विकासाला हातभार लावतात. आर्थिक स्वातंत्र्य हिरावून घेतल्यामुळे सामाजिक स्वातंत्र्यावरही गदा येते. सामाजिक व राजकीय पारतंत्र्य आर्थिक स्वातंत्र्यावर गदा आणते.

संघटनेचा अर्थ काय ? केवळ संख्येने अधिक मनुष्यबळ असणे, उपचार म्हणून स्त्री-पुरुषांचे मेळावे घेणे म्हणजे संघटना नव्हे. संघटना हे साधन आहे, साध्य नाही. सामाजिक बदलाचे किंवा परिवर्तनाचे ते प्रभावी शस्त्र आहे. आजच्यापेक्षा अधिक चांगल्या, उन्नत व उच्च दर्जाच्या समाजाकडे नेणारे ते वाहन आहे. भुकेने व्याकूळ झालेल्या, पाण्याने तहानलेल्या, शोषणाने गांजलेल्या प्रत्येक अस्वस्थ मनाचा, वर्षानुवर्षे पिचलेल्या आवाजांचा तो प्रभावी हुंकार आहे.

संघटना विकासाचा आधार आहे. विकासाच्या प्रक्रियेत संघटनेमुळे व्यक्तीला संधीची नवी क्षितिजे प्राप्त होतात. मानवतेची विभागणी करणाऱ्या संकुचित भिंती संघटनाच उद्ध्वस्त करू शकते. संघटनेमुळे लोकशाहीची पाळेमुळे घट्ट होऊ शकतात. संघटनेच्या अंतर्गत लोकशाही पद्धतीमुळे समाजात पारदर्शकता व उत्तरदायित्त्व निर्माण होण्यास मदत होते. अशा उदात्त ध्येयांप्रती संघटनेची वाटचाल होत असताना अंतर्गत व बाह्य आव्हानांना संघटनेला सामोरे जावे लागते.

निरक्षरता व अज्ञान, शांततेची संस्कृती, परावलंबन, लोकशाही संस्कृतीचा अभाव, मनामनांत जोपासलेली विषमता, स्वबळाची न झालेली जाणीव, दैववादी मनोवृत्ती, रोजगाराची असुरक्षितता अशी काही अंतर्गत आव्हाने सांगता येऊ शकतील. अंतर्गत आव्हानांसोबतच संघटनेला बाह्य आव्हानांना तोंड द्यावे लागते. धनाढ्य वर्गाचा दबाव, कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या सरकारी यंत्रणेचा यथास्थितीवादी दृष्टिकोन, राज्यघटना व मूलभूत अधिकारांबाबत त्यांच्या मनात असलेला अनादर, सामाजिक न्यायाच्या कायद्यातील त्रुटी, त्यांची न होणारी अंमलबजावणी, विविध स्तरांवरील नोकरशाहीचा नकारात्मक दृष्टिकोन, त्यांची दडपशाही, कायद्याच्या व संविधानाच्या चौकटीत कार्य करणाऱ्या संघटकांच्या विरोधात यंत्रणांकडून होणारा बळाचा गैरवापर अशा बाह्य आव्हानांनाही संघटनेला सामोरे जावे लागते.

भारताच्या स्वातंत्र्याचे हे हीरक महोत्सवी वर्ष आहे. आपल्या देशातील विकास समतोल झाला नाही. विषम व असमतोल विकासाची ही उदाहरणे. १५ ते ३५ वयोगटातील २७ कोटी भारतीय नागरिक निरक्षर असून त्यांना लिहिता, वाचता येत नाही. ६ ते १४ वयोगटातील सुमारे ४ कोटी मुलांनी शाळेचे तोंड पाहिलेले नाही. ० ते ६ वयोगटातील शंभरातील सेहेचाळीस मुले या देशात कुपोषित आहेत. १५ ते ४९ वयोगटातील शंभरातील ७४ महिलांना शिक्षणाचा प्रकाश दिसलेला नाही. एक लाख गावातील दोन कोटी घरे पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहेत आणि अशुद्ध पाण्यामुळे ते विविध रोगांचे शिकार आहेत. ग्रामीण भारतात ७१ टक्के घरांना शौचालये नाहीत. एका बाजूला हे चित्र असताना दुसरीकडे एकूण जमिनीपैकी १६ टक्के जमीन केवळ एक टक्के लोकांच्या हातात केंद्रित झालेली आहे. जमिनी कसणारे व जमिनीची मालकी असणारे भिन्न आहेत. दक्षिण भारतात २३ टक्के, पश्चिम भारतात २७ टक्के तर उत्तर-पश्चिम भारतात ३७ टक्के शेतकरी प्रत्यक्ष लागवड करतात परंतु जमिनी त्यांच्या नावे नाहीत.

केरळ वगळता कुळांना देशात कोठेही न्याय मिळालेला नाही. कुळ कायद्यान्वये ज्यांना जमिनीचा हक्क मिळावयास हवा होता, अशा शंभरातील केवळ तीस जणांना तो हक्क प्राप्त झाला आहे. शंभरातील ७० त्यांच्या हक्कापासून वंचित राहिले आहेत. या देशात ३ कोटी वीस लाख कष्टकरी प्रत्यक्ष लागवड करीत असून भूमी सुधार कायद्याने त्यांना दिलासा दिलेला नाही. सुमारे दहा कोटी शेतमजूर भूमिहीन आहेत. कमाल जमीन धारणा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी न झाल्याने भूमिहीनांना फेरवाटपासाठी जमिनी उपलब्ध झालेल्या नाहीत.

संघटित क्षेत्रात रोजगार मर्यादित झाल्याने असंघटित क्षेत्रातील रोजगारात प्रचंड वाढ झाली आहे. सामाजिक सुरक्षिततेची कोणतीही हमी नसल्याने सामाजिक विषमता वाढून गरिबांच्या यातनांमध्ये भरच पडली आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या हजार लोकांपैकी पाच तर शहरी भागात राहणाऱ्या हजार लोकांपैकी एक जण अर्धपोटी झोपतो. शेतकऱ्यांच्या उत्पादनाला उत्पादन खर्चापेक्षाही कमी भाव मिळत असल्याने त्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत चालले आहे. प्रकल्पबाधितांचे योग्य पुनर्वसन होत नाही. देशातील कामगार चळवळी कमी-कमी होत चालल्या असून कामगारांची संघटित शक्ती क्षीण होत आहे, असे हे सामाजिक वातावरण आपणा सर्वांनाच अस्वस्थ करीत आहे.

वाढत चाललेली गरिबी आणि बेरोजगारी कमी करणे, आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांचे जीवनमान उंचावणे, गरिबांसाठीच्या योजना व धोरणे त्यांच्यापर्यंत प्रभावीपणे पोहचविणे व उत्पन्नातील विषमता कमी करणे ही पंचवार्षिक योजनांची उद्दिष्टे भारतीय संविधानाच्या भाग ४ मधील मार्गदर्शक तत्वांना अनुसरून होती. परंतु २४ जुलै १९९१ नंतर जागतिकीकरणाच्या व खाजगीकरणाच्या धोरणानंतर या उद्दिष्टात तडजोड झाली व विषम समाज व्यवस्थेची वाटचाल पुन्हा गतीने सुरू झाली.

विकासाची गंगा गरिबांपर्यंत पोहचेल आणि गरिबांना विकासातील त्यांचा वाटा मिळेल यासाठी गरिबांची संघटना असणे आवश्यक आहे. संघटना गरिबांपर्यंत विकास पोहचविण्याचे साधन आहे. गरिबांमध्ये ते या स्वतंत्र देशाचे स्वतंत्र नागरिक आहेत ही भावना जागृत करून, सामाजिक व आर्थिक अधिकाराचा वाटा घेण्यासाठी त्यांना प्रवृत्त करणे हेच संघटनेचे मुख्य कार्य आहे. त्यांना विकासाची भीक नको तर हक्क हवा आहे, जो त्यांना भारताच्या संविधानाने प्रदान केला आहे. विकास योजनांचे ते लाभार्थी नाहीत तर वाटेकरी आहेत. ही भावना संघटनेमुळे निर्माण करता येते. संघटना गरिबाला नाही म्हणायचे सामर्थ्य देते. संघटनेमुळे गरिबांना अन्याय्य व्यवस्थेविरोधी लढण्याचे बळ मिळते.

विधायक संसद आणि श्रमजीवी संघटनेच्या संस्थापकांनी मानवी हक्कांसाठी आणि गरिबांच्या विकासासाठी अगदी सुरुवातीपासूनच प्रचंड समर्पित वृत्तीने प्रेरित होऊन कार्य केले. संघटना बांधणे हे फावल्यावेळेचे काम नव्हते तर दीर्घकाळ चालणारा, काट्याकुट्यांनी भरलेला तो प्रवास होता, याची पूर्ण कल्पना त्यांना होती. संविधानाने सर्वांना समानता आणि कायद्याने सर्वांना समान संरक्षण प्रदान केले असले तरीही कोट्यावधी वंचितांसाठी ही समानता व संरक्षण म्हणजे केवळ भ्रम आहे याची त्यांना जाणीव होती. प्रशासनाचा कल यथास्थिती राखण्याकडे असल्याने कायदा व सुव्यवस्था ठेवणे हेच त्यांचे प्राधान्य बनते. त्याचप्रमाणे प्रस्थापितांकडून गरिबांना संघटित करण्याचे स्वागत होणार नाही,

ते राज्य घटनेचे पावित्र्य व मूलभूत अधिकारांची अभंगता पायदळी तुडवून संघटनेला चिरडण्याचा प्रयत्न करतील, हे संघटनेच्या संस्थापकांना सुरुवातीलाच उमगले होते. प्रस्थापित समाजामध्ये 'नाही रे' वर्गाला सन्मान नाही याची त्यांना जाणीव होती. संघटनेच्या आव्हानांमुळे आपली सत्ता क्षीण होईल या भीतीने बांडगुळांसारखा फोफावलेला धनिक वर्ग चिडून उठेल हे त्यांनी जाणले. नोकरशाही व्यवस्था गरिबांना कणभरही सहानभूती दाखवित नाही व कायद्याच्या विरोधात बेजबाबदारपणे गरिबांच्या विरोधी ते कार्य करतात हा अनुभव त्यांनी घेतला. अशा परिस्थितीत राजकीय शक्तींनी गरिबांची बाजू घ्यावी अशी अपेक्षा असली तरी त्यांनीही निराशाच केली. लिखित धोरणे व अलिखित कृती यातील दरी, सामाजिक न्यायाच्या अंमलबजावणीबाबत राजकीय इच्छाशक्तीचा अभाव स्पष्ट करते.

'माणूस म्हणून जगण्यासाठी' हे पुस्तक कुशल संघटक असलेल्या विवेक पंडित यांच्या अनुभवाचे सार आहे. व्यवस्थेला आव्हान कसे द्यावे, त्यासाठी रणनीती कशी आखावी याचे विवेचन त्यांनी पुस्तकात केले आहे. संघटनेचे सामर्थ्य किती आहे यापेक्षा ते इतरांना किती जाणवते यावर अवलंबून असते. संघटनेची विरोधकांच्या आव्हानाला तोंड देण्याची आणि निर्णय अमलात आणण्याची क्षमता किती आहे, अन्यायाविरोधात संघटना किती तीव्रतेने कार्य करू शकते, संघटना स्वत:च्या सामर्थ्याची जाणीव किती प्रखरतेने देऊ शकते, गरिबांची गळचेपी करणारे असंख्य घटक दूर करून गरिबांना सामर्थ्यवान कशी बनवू शकते याचे विवेचन या पुस्तकात अत्यंत प्रभावीपणे त्यांनी केले आहे. परिस्थितीचे केवळ विश्लेषण करून भागणार नाही तर त्या परिस्थितीत परिवर्तन करण्याची आवश्यकता आहे. सामर्थ्य देता येत नाही, ते मिळवावे लागते व त्यासाठी प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान द्यावे लागते हे त्यांनी सोदाहरण पटवून दिले आहे.

बापुजींनी अहिंसा, सत्याग्रह व सर्वोदय ही तीन महत्त्वाची सूत्रे आपणास प्रदान केली आहेत. विधायक संसद व श्रमजीवी संघटनेने बापुजींची ही सूत्रे कृतीत उतरविली आहेत. या पुस्तकात श्री. पंडित यांनी त्याबाबत अत्यंत प्रभावीपणे लिहिले आहे. त्यांनी कधीही अन्यायाशी तडजोड केली नाही परंतु त्याचबरोबर समतेवर आधारित न्याय्य समाजासाठी अत्याचार करणाऱ्यांच्या विरोधी हिंसेचे साधनही वापरले नाही. हे पुस्तक विवेक आणि विद्युल्लता यांच्या सुमारे तीन दशकांच्या जीवनाचा एक आरसा आहे. त्यांच्या या दीर्घ प्रवासात त्यांना किती यातना सोसाव्या लागल्या आणि त्यांनी किती जणांचे अश्रू पुसून त्यांच्या जीवनात आनंद दिला, किती निस्तेज चेहऱ्यांना तेज दिले, किती दु:खी, दुर्दैवी, निराधार, उपेक्षित जीवांना त्यांनी सामर्थ्य दिले त्याचे प्रतिबिंब या पुस्तकात आहे. त्यांच्या कार्याकडे पाहताना मला उपनिषदातील काही उक्त्या आठवतात.

उत्तिष्ठत जाग्रत प्राप्यवरान्नि निवोधत
क्षुरस्य धारा निशिता दूरत्यया
दुर्गम् पथस्तत्कवयो वदन्ति

या उक्तीचे श्री. हरि कृष्णदास गोयंदका यांनी केलेले निरुपण असे, ‘हे मनुष्या, तू जन्म जन्मांतरी अज्ञानाच्या निद्रेत आहेस. आता तुला परमात्म्याच्या दयेने मनुष्याचा देह मिळाला आहे. एक क्षणही वाया दवडू नकोस, त्वरित जागा हो. श्रेष्ठ महापुरुषांकडे जाऊन त्यांचा उपदेश व मार्गदर्शन घेऊन आपल्या कल्याणाचा मार्ग शोध व परमात्म्याचे रहस्य समजून घे. परमात्म्याचे तत्त्व खूप गहन आहे. त्याच्या स्वरुपाचे ज्ञान व प्राप्तीचा मार्ग साध्य करण्यासाठी महापुरुषांचे आशीर्वाद व परमेश्वराची कृपा आवश्यक आहे. धारदार तलवारीवरून चालण्यासारखा हा मार्ग खडतर आहे. ज्यांनी हा मार्ग चोखाळला आहे असे महानुभावच त्याचे दिशा दिग्दर्शन करू शकतात.’ याच शब्दात मी प्रत्येक भारतीय नागरिकाला, प्रत्येक संस्थेला, शिक्षकांना, विद्यार्थ्यांना, युवकांना, महिलांना हेच सांगेन की तुम्हाला ग्रहण करता येण्याजोगे या पुस्तकात खूप काही आहे. विवेक पंडित यांच्या कार्यावर आधारित या पुस्तकाची परिणामकारकता व्यक्त करण्यास माझे शब्द अपुरे पडत आहेत.

**- डॉ. लक्ष्मीधर मिश्रा**

डॉ. लक्ष्मीधर मिश्रा हे भारत सरकारच्या श्रम मंत्रालयाचे सचिव होते. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेचे ते आशिया खंडाचे प्रमुख होते. सध्या ते राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे विशेष आयुक्त म्हणून कार्यरत आहेत.

# फिअरलेस माइंडस् या मूळ इंग्रजी पुस्तकाची प्रस्तावना

भारतातील सामाजिक परिवर्तनाची माहिती जाणू इच्छिणाऱ्यांना या पुस्तकातून बरेच काही मिळेल अशी माझी खात्री आहे. समाजात शोषण आहे एवढेच नव्हे त्या शोषणाची व्यवस्था आहे आणि ही व्यवस्था भारतात आणि जगभरात देखील कशारितीने काम करते हे समजून घेण्यासाठी या पुस्तकाचा उपयोग होईल. दुर्बलांच्या जीवनात प्रकाश आणायचा असेल तर संघर्ष करणे आवश्यक आहे. या संघर्षात त्यांचे नेतृत्व करण्यासाठी लागणारे समर्पित जीवन आणि या समर्पित जीवनासाठी आवश्यक असणारी मनोभूमिका या विषयी जाणून घेण्यासाठीही हे पुस्तक उपयुक्त ठरेल.

भारतातील शोषित वर्गाशी ज्यात आदिवासी, दलित व महिला यांचा समावेश आहे आणि त्यांच्यासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांशी मी गेली चार दशके संपर्क ठेवून आहे. एखाद्या क्षेत्रात एकाच प्रकारचे काम वर्षानुवर्षे करणाऱ्यांच्या संवेदना बऱ्याचदा बोथट होऊन जातात. हा अनुभव आपल्याला बऱ्याच क्षेत्रात येतो. सामाजिक क्षेत्रही याला अपवाद नाही असे माझे निरीक्षण आहे. आणि या पार्श्वभूमीवर विवेकचे व्यक्तिमत्व असाधारण आहे असे मला वाटते. पराकोटीची संवेदनशीलता, मानवी मूल्य जपण्याचा आग्रह, कोणत्याही परिणामाला कधीही सामोरे जाण्याची निर्भय वृत्ती आणि या सर्वांच्या जोडीला अतिशय तीक्ष्ण बुद्धी यांचे जगावेगळे रसायन असलेला विवेकच्या तोडीचा माणूस आजपर्यंत मला भेटलेला नाही. मला वाटते या माझ्या विधानात विवेकविषयी मला जे काही म्हणावयाचे आहे ते सगळे सामावलेले आहे. गेल्या वीस वर्षात त्याने महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरच्या हजारो वेठबिगारांना गुलामगिरीतून मुक्त केले. नेपाळामधील वेठबिगारांच्या मुक्ततेच्या प्रक्रियेतही त्याचे मोठे योगदान आहे. शेकडो एकर जमीन त्याने शेतकऱ्यांना परत मिळवून

दिली. तीस हजार एकर वनजमीन त्याने आदिवासींच्या नावे करून दिली. किमान वेतन कायद्याचा आग्रह धरून तो अंमलात आणण्यास सरकारला भाग पाडण्याचे श्रेय नि:संशयपणे त्याच्या नावावर जमा आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी सरकारबरोबर अनेक लढाया तो यशस्वीपणाने लढला आहे.

लेखकाच्या जीवनातील संपन्न अनुभवावर हे पुस्तक आधारित असल्याने ते वैशिष्ट्यपूर्ण झाले आहे. कल्याणकारी कामांनी सुरुवात करून (या सुरुवातीच्या काळाला आम्ही गमतीने शेळ्या-डुकरांचा काळ म्हणतो) विवेक आणि त्याच्या सहकाऱ्यांनी दुर्बलांना त्यांचे हक्क मिळवून देणारी संघर्षशील संघटना बांधली.

एक संघटक म्हणून विवेकला आलेले अनुभव त्यांनी या पुस्तकात चितारले आहेत. गरिबांना संघटनेद्वारे ताकदवान केले म्हणजे त्यांचा अवमान करण्याचे धाडस कोणी करीत नाही आणि अशी ताकद अंगी निर्माण झाल्यावर दुर्बल स्वत:च्या विकासाचा मार्ग शोधू शकतात हे त्याने दाखवून दिले. शोषितांच्या मनात दबलेली चीड संघटीत करून आणि संघटनेच्या माध्यमातून त्या असंतोषाला वाट करून देऊन स्वाभिमान जागृतीचे कार्य त्याने केले. हे काम करीत असताना प्रस्थापित विरोध करणारच हे त्याने गृहित धरले. त्याच्या कामाचे वैशिष्ट आणि यशाचे गमक याच गृहितामध्ये आहे. संघर्षात होणारा विरोध टाळता येत नाही. त्याला सामोरे जावे लागते. संघर्षाला घाबरून चालत नाही कारण संघर्षाशिवाय प्रगतीच शक्य होत नाही.

प्रस्थापितांशी होणारा संघर्ष रोमहर्षक असतो कारण तो झगडणाऱ्यांना आयुष्याचे नवे परिमाण मिळवून देतो, नवा अर्थ देतो. त्याबरोबरच हा संघर्ष धोकादायकही असतो हे विसरून चालणार नाही. संघर्षाच्या प्रत्येक टप्प्यावरील धोके विवेक जाणतो. ही जमेची बाजू आहेच. संघर्षाच्या विजयी फलश्रुतीअंती विरोधकाला आपलेसे करण्याचे कौशल्यही त्याच्या अंगी आहे. या पुस्तकात अशी अनेक उदाहरणे वाचकांना जागोजागी सापडतील. प्रत्येक संघर्ष जिंकता येतोच असे नाही, ही वस्तुस्थिती आहे. विवेकचे वैशिष्ट्य हेच आहे की पराजयातून भविष्यासाठी धडे घेऊन तो पुढे वाटचाल सुरू करतो. संघर्षशील संघटक असलेला विवेक कविमनाचा आहे आणि आनंद साजरा करण्याची त्याला प्रचंड हौस आहे. या पुस्तकात त्याने विजय साजरा करण्याचे महत्त्व सांगितले आहे. तो केवळ डावपेचाचा भाग नाही तर तो त्याच्या स्वभावाचाही भाग आहे. विवेकचे लोकांवर मनापासून प्रेम आहे आणि तो मृदू अंत:करणाचा आहे. संघर्षाच्या ताणतणावाच्या काळातही तो आनंदी राहातो, याचा अनुभव मी वारंवार घेतला आहे.

नेतृत्वाची कसोटी प्रत्यक्ष कृतीच्यावेळी लागते असे विवेकने लिहिले आहे आणि ही कसोटी लावली तर भारतातील आजच्या तरुण पिढीतील नेतृत्वामध्ये तो अग्रणी आहे, असे मी ठाम विश्वासाने म्हणेन. दोन दशकांपूर्वी एका छोट्याशा खेड्यातून काही वेठबिगार मुक्त करून विवेकने आपल्या कार्याचा आरंभ केला. संघटनेचा केवळ भौगोलिक विस्तारच झाला नाही तर त्याबरोबर संघटनेने हाताळलेल्या विषयांचा, प्रश्नांचा आवाकाही वाढला.

मानवी जीवनाच्या मानसिक, भावनिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय पैलूंची विवेकला असलेली जाण असाधारण म्हणावी इतकी सखोल आहे. लोकशाही यंत्रणांच्या विविध स्तरांवर त्याने काम केले आहे. प्रत्येक पातळीवर कराव्या लागणाऱ्या कामाचे स्वरुप आणि त्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये लक्षात घेऊन त्याने कार्यकर्त्यांना त्या दिशेने विकसित करण्याचे काम केले आहे, अजूनही करतो आहे. या कौशल्यांना विवेकने संस्थात्मक रूप दिले. विधिमंडळासोबत प्रभावीपणे काम करणारे 'समर्थन', राज्याच्या अर्थसंकल्पाचे अध्ययन व विश्लेषण करणारे 'अर्थसंकल्प अध्ययन केंद्र' या आणि अशा कितीतरी संस्था त्याने आपले सर्वस्व ओतून उभ्या केल्या. आपल्या अथक परिश्रमातून आणि प्रचंड ऊर्जेतून तो त्याच्या सहकारी कार्यकर्त्यांना दारिद्र्याच्या शृंखला तोडण्यासाठी, अन्यायाला वाचा फोडण्यासाठी कार्य प्रवृत्त करीत असतो. आपण निर्माण केलेल्या संस्था आपल्यामागेही तसेच काम करत राहतील याची काळजी त्याने घेतली आहे.

आपल्या संपर्कात आलेल्या प्रत्येक माणसाला आपलेसे करण्याची लोकविलक्षण क्षमता विवेकमध्ये आहे. असे एक हजार विवेक मिळाले तर भारतच काय सारे जग नव्याने उभे करता येईल असा विचार कितीदा तरी माझ्या मनात येतो. आता नव्याने आलेल्या मानवी क्लोनिंगच्या तंत्रामुळे अशा हजार विवेकांची फौज उभी करण्याची माझा आशा पल्लवीत झाली आहे. परंतु तोवर मला अपेक्षित असलेले काम हे पुस्तक करेल असा माझा विश्वास आहे. हे पुस्तक म्हणजे सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचे एक अप्रतिम हत्यार आहे, असा माझा दावा आहे. अर्थात त्यासाठी हे पुस्तक वाचणे, त्यावर विचार करणे आणि त्या विचारातून प्रेरणा घेऊन कृती करणे आवश्यक आहे. तसे व्हावे या सदिच्छेसह.

शुभास्ते पांथानः ।

**- कॅथी श्रीधर**

कॅथी श्रीधर या अमेरिकेतील नागरी हक्क चळवळीतील प्रमुख कार्यकर्त्या आहेत. त्यांचा भारतातील विविध चळवळींशी संपर्क आहे.

# लेखकाचे मनोगत

मी लिहिलेल्या 'फिअरलेस माइंडस्' या पुस्तकाचा हा भावानुवाद. फिअरलेस माइण्डस् या इंग्रजीत लिहिलेल्या पुस्तकाचे शीर्षक गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांनी लिहिलेल्या 'व्हेअर द माइंड इज विदाउट फिअर' या कवितेवरून मला सुचले. त्या कवितेत त्यांनी स्वातंत्र्याचे वर्णन केलेले आहे. ब्रिटिशांची सत्ता जाऊन आपली सत्ता यावी एवढ्यापुरती त्यांची स्वातंत्र्याची संकल्पना मर्यादित नव्हती. मने जर स्वतंत्र नसतील, मानसिकदृष्ट्या लोक जर गुलामीमध्ये असतील तर त्या स्वातंत्र्याला काही अर्थ नाही असे गुरुदेवांचे म्हणणे होते. ज्या ठिकाणी जग भीतीशून्य असेल अशा जगामध्ये माझ्या देशाला ने आणि माझ्या देशातला प्रत्येकजण निर्भय असू देत, अशी प्रार्थना कवितेच्या अखेरीस त्यांनी परमेश्वराकडे केली आहे.

मी व विद्युल्लताने सुरू केलेली 'श्रमजीवी संघटना' या वर्षी रौप्यमहोत्सव साजरा करीत आहे. संघटनेने खूप काही मिळविले असले तरी अजून बरेच काही करावयाचेही आहे. आम्ही पहिले पाऊल टाकले तेव्हा नव्हता कायद्याचा अभ्यास, ना होती सामाजिक कार्याची पदवी, ना होता संघटना बांधणीचा अनुभव, ना होती साधने, होती केवळ स्वातंत्र्याची तीव्र ऊर्मी. साने गुरुजींची प्रेरणा, त्यातून निर्माण झालेली कोणताही धोका स्वीकारण्याची तयारी व गरिबांबद्दल आंतरिक प्रेम एवढ्याच शिदोरीवर विकासात्मक कल्याणकारी उपक्रमाने सुरुवात केली. वेठबिगारीसारखी गुलामीची अमानुष प्रथा आढळून आल्यावर या कामाने कलाटणी घेतली आणि संघटनेचा प्रवास सुरू झाला. या प्रवासात अनेक संकटे उभी ठाकली. परंतु संघटनेच्या कार्यकर्त्यांसोबत त्यावर मात केली. या वाटचालीत अनंत चुकाही घडल्या. मात्र लोकांचे प्रेम, विश्वास या मौल्यवान गोष्टी साध्य केल्याचे समाधान आम्हाला आहे.

परमेश्वर मंदिरात नाही, तो दु:खितांच्या आसवात आहे यावर दृढश्रद्धा ठेवली. या पंचवीस वर्षात हजारो वेठबिगारांच्या, शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या, अत्याचारपीडित महिलांच्या, कष्टकऱ्यांच्या, अस्पृश्यतेचे बळी ठरलेल्या दलितांच्या, भटक्या-विमुक्तांच्या, सफाई कामगारांच्या, रेती उत्पादकांच्या, शिक्षणापासून वंचित मुलांच्या डोळ्यातील आसवे आम्हाला पुसता आली. ते भीतीग्रस्त चेहरे, चिंताग्रस्त चेहरे आनंदाने फुलताना पाहण्याचे भाग्य आम्हाला लाभले. केशव नानकरसारखा एकेकाळचा गुलामीत खितपत पडलेला वेठबिगार ग्रामपंचायतीत निवडून येताना, गावाच्या राजकारणाची सूत्रे आपल्या हाती घेताना, विधानसभेची निवडणूक लढविताना, संघटनेचा कार्याध्यक्ष म्हणून नेतृत्व करताना, गुलामीविरोधी आंतरराष्ट्रीय पुरस्कार ब्रिटिश संसदेच्या नेहरु सभागृहात आमच्यावतीने स्वीकारताना आम्हाला 'याचि देहि याचि डोळा' पाहता आला.

केशवसारखे संधी मिळताच प्रचंड कर्तृत्व दाखवू शकणारे हजारो नेते परिस्थितीने त्यांना शोषित बनविल्यामुळे गुलामीचे जिणे जगत असतील. जनावरासारखे स्वप्नहीन आयुष्य कंठत असतील, अशी अनमोल नेतृत्वाची संपत्ती आपल्या देशात आहे, त्यांना कुणीतरी हात देण्याची, माणुसकीचे स्वप्न देण्याची, त्यांच्यासाठी अनुकूल, आश्वासक वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता आहे. एकदा का त्यांना त्यांच्या स्वत्वाचा परिचय झाला की आपलेच नव्हे तर साऱ्या समाजाचे नेतृत्वही ते करू शकतील एवढे प्रचंड सामर्थ्य त्यांच्यामध्ये आहे. या देशात माणसाला माणसासारखे जगावयाचे असेल तर त्यानेच उभे राहिले पाहिजे. संघटित झाले पाहिजे. सामर्थ्यवान बनले पाहिजे.

हे आत्मकथन नाही. हा श्रमजीवी संघटनेचा इतिहासही नाही. मात्र संघटक म्हणून आम्ही जे शिकलो ते वाचकांच्या हाती देताना संघटनेच्या लढ्यांचे संदर्भ अविभाज्य ठरतात. एक गोष्ट आम्ही सातत्याने सांभाळली ती म्हणजे प्रत्येक लढा, प्रत्येक संघर्ष हा अहिंसक असला पाहिजे. निरनिराळे डावपेच टाकून आपल्या विरोधकाला नामोहरम करण्याचे सामर्थ्य लढ्यात असले पाहिजे. संत वचनानुसार 'जो जो जयाचा घेतला गुण, तो तो म्या केला गुरू जाण, गुरुशी आले अपारपण, जग सर्व गुरू दिसे'. प्रत्यक्ष संघटना बांधताना असंख्य गुरू अनेक मार्गांनी भेटले आणि त्या प्रत्येकाकडून आम्ही शिकत गेलो.

संघटना कशी करावी, लोकांना पराभूत मानसिकतेतून कसे बाहेर काढावे, त्यासाठी नोकरशाहीबरोबर, राजकीय नेत्यांबरोबर काम कसे करावे, न्यायालयाचा वापर केव्हा करावा, केव्हा करू नये, लोकशाही व्यवस्थांच्या बरोबरीने काम कसे करावे, याबाबतचे जे जे अनुभव आम्हाला आले, ते या ठिकाणी शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

श्रमजीवी संघटना व इतर संघटनांच्या माध्यमांतून जे विविध लढे दिले त्यातून जे शिकलो त्याचे सिद्धांत येथे मांडले आहेत. मी कालांतराने वाचलेल्या त्सून त्सू यांच्या 'आर्ट ऑफ वॉर' व अमेरिकेतील कामगारांचे संघटक सॉल ॲलेन्स्की यांच्या 'रुल्स फॉर रॅडिकल्स' ने या सिद्धांतांना पुष्टी दिली.

महाराष्ट्राप्रमाणेच मध्य प्रदेश, नेपाळ तसेच अन्य देशांमध्येसुद्धा संघटनात्मक काम करण्याचा अनुभव मला मिळाला. या पुस्तकामध्ये जे जे काही आहे ते प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेले आहे. कुठल्याही महाविद्यालयामध्ये, कोणत्याही पुस्तकात न वाचलेले परंतु लोकांच्या सोबत राहून शिकलेले, लोकांनी शिकविलेले असे हे जे शिक्षण आहे ते लोकांपर्यंत जावे, त्यातून लोकांना सामर्थ्य मिळावे, त्यातून जनसंघटनांना बळकटी यावी यासाठी हे लिहिण्याचा मी प्रयत्न केलेला आहे.

हे पुस्तक तीन भागात विभागलेले आहे. पहिल्या भागात संघटना बांधणीची प्रक्रिया विषद केलेली आहे. दुसऱ्या भागात या प्रक्रियेशी संबंधित काही कथा व लढ्यांची माहिती आहे. तर तिसऱ्या भागात लोकशाही राज्यव्यवस्था, प्रसारमाध्यमे व जनसंघटनेच्या उभारणीबद्दल लिहिले आहे.

नव्या युगाच्या उंबरठ्यावर लिहिलेले हे पुस्तक आहे. एकविसाव्या शतकामध्ये गरिबांना अनेक आव्हानांना सामोरे जावयाचे आहे. त्या कष्टकरीवर्गाला मानाचे स्थान मिळवून देण्याकरिता काय करावे लागेल, हे माझ्या अनुभवाधारे सांगण्याचा मी विनम्र प्रयत्न केला आहे. पंचवीस वर्षे संघटक म्हणून जगताना जे सार माझ्या हाती आले ते वाचकांच्या हाती देताना त्यांना गरिबांच्या डोळ्यांतले अश्रू पुसण्याचे सामर्थ्य मिळावे हीच इच्छा.

**- विवेक पंडित**

# भाग १

# मार्गक्रमण

**जडणघडण :**

मी व माझी पत्नी विद्युल्लताने कार्य सुरू केले तेव्हा स्वातंत्र्य मिळून जवळपास तीन दशके लोटली होती. त्या अर्थाने आमची पिढी ही स्वातंत्र्यानंतर जन्मलेली पहिली पिढी होती. स्वातंत्र्य प्रत्यक्ष पाहिलेले नसले तरी स्वातंत्र्य आंदोलनाचे वारे आमच्या बालपणी वाहत होते. स्वातंत्र्यासाठी लढलेल्या स्वातंत्र्यसैनिकांना प्रत्यक्ष भेटण्याची, त्यांच्या प्रेरणा जाणून घेण्याची आणि ते स्वातंत्र्यासाठी कशा पद्धतीने लढले याची माहिती त्यांच्या तोंडून ऐकण्याची संधी आमच्या पिढीला मिळाली होती.

आमच्या पिढीने आणखी एक महत्त्वाचा कालखंड अनुभवला. हा कालखंड आमच्या पिढीच्या संपूर्ण जीवनावर परिणाम घडवणारा ठरला. त्या वेळी मी व विद्युल्लता महाविद्यालयीन शिक्षण घेत होतो. त्याच काळात समाजवादी आंदोलनाशी आमचा संबंध आला. आम्ही राष्ट्र सेवा दलाचे काम करू लागलो. १९७१चे भारत-पाकिस्तान युद्ध, त्यातून झालेली बांगलादेशची निर्मिती, देशाच्या अनेक भागात पडलेले महाभयंकर दुष्काळ यामुळे देशात महागाई प्रचंड वाढली होती. तरुणांमध्ये मोठा असंतोष होता. परिणामी देशात सत्ताधारी काँग्रेस विरोधात मोठ्या प्रमाणावर वातावरण तयार झालेले होते. त्या काळात देशभर निरनिराळी आंदोलने सुरू होती. जॉर्ज फर्नांडिस यांना बंदसम्राट उपाधी मिळाली तोच हा काळ. त्यांनी केंद्र सरकारच्या सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा संप घडवून आणला. देशभरातील रेल्वे कर्मचाऱ्यांनीही संप केला होता. सर्वत्र असंतोष खदखदत होता.

दरम्यानच्या काळात गुजरातमधील विद्यार्थ्यांनी शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचाराच्या विरोधात नवनिर्माण आंदोलन सुरू केले होते. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मोरारजीभाई देसाई यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. लोकनायक जयप्रकाश नारायणसुद्धा या आंदोलनात उतरले.

ते या आंदोलनाचे मुख्य आकर्षण होते. नवनिर्माणासाठीच्या या आंदोलनाचे लोण देशभर पसरले. या सर्व आंदोलनांमध्ये आमची पिढी ओढली गेली. '१९४७ ला मिळाले ते राजकीय स्वातंत्र्य होते, ब्रिटिशांची सत्ता गेली असली तरी लोकांची सत्ता अजूनही आलेली नाही, तेव्हा हा दुसऱ्या स्वातंत्र्याचा लढा आहे. नवनिर्माणाचा हा लढा संपूर्ण क्रांतीचा लढा आहे' असा नारा जयप्रकाश नारायण यांनी दिला. आमच्या दृष्टीने हा 'दुसऱ्या स्वातंत्र्याचा' लढा होता. तरुणाईला ते मोठे आव्हान वाटत होते.

स्वातंत्र्यानंतर जवळपास पंचवीस वर्षे एकाच पक्षाची, काँग्रेसची सत्ता देशावर होती. त्यामुळे देशात निर्माण झालेल्या सर्व समस्यांना काँग्रेस जबाबदार आहे असा एक सार्वत्रिक समज होता. श्रीमती इंदिरा गांधी त्या काळात पंतप्रधान असल्यामुळे देशभरातील वातावरण त्यांच्या विरोधात होते. या असंतोषाला वाट करून द्यायचे कार्य जयप्रकाशजींनी केले.

राजकारण हे त्याज्य नाही, अस्पृश्य नाही, तर दुसऱ्या स्वातंत्र्याच्या लढाईसाठी आपण राजकारणात जातो आहोत ही भावना तरुणांमध्ये जयप्रकाश नारायण यांच्यामुळे मोठ्या प्रमाणावर रुजली, त्या कालखंडाबाबत मला हे सर्वात महत्त्वाचे वाटते. तरुण पिढी करिअर करण्याकरिता, त्यागाचे राजकारण करण्याकरिता, स्वातंत्र्यलढा म्हणून, देश उभारणीचे काम म्हणून राजकारणामध्ये येण्यासाठी तयार झाली. मी व विद्युल्लता या आणीबाणीपूर्व चळवळीमध्ये ओढले गेलो.

ही चळवळ केवळ सत्ताबदलासाठी नव्हती. जयप्रकाशजींनी संपूर्ण क्रांतीचे स्वप्न देशातील तरुणांसमोर चितारले होते. आजही मला आठवते की तो एक मंतरलेला काळ होता, भारलेला काळ होता. विशेषत: आणीबाणी जाहीर झाली त्यावेळचा काळ. आणीबाणीबाबत लिहिण्याची ही जागा नाही. परंतु भारत-पाकिस्तान युद्ध, देशभर पडलेला दुष्काळ, पुकारले गेलेले बंद, याचा स्वाभाविक परिणाम जनमानसावर झालेला होता. वातावरण खूप मोठ्या प्रमाणात सत्ताधाऱ्यांच्या विरोधात होते. त्याच वेळेला श्रीमती इंदिरा गांधींच्या निवडणुकीला श्री. राजनारायण यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्या खटल्यात इंदिरा गांधींचा पराभव झाला. त्यांना सहा वर्षांकरिता निवडणुकीला उभे राहण्यास बंदी घालण्यात आली. इंदिरा गांधींनी २६ जून १९७५ रोजी देशभरात आणीबाणी जाहीर केली. आणीबाणीच्या काळात कविवर्य सुरेश भटांनी म्हटल्याप्रमाणे 'उभा देश झाला आता एक बंदीशाला' असे वातावरण निर्माण झाले.

एकोणीस महिने ही आणीबाणी जारी राहिली. हजारोंच्या संख्येने, आणीबाणीला विरोध करणारे नेते तुरुंगात डांबले गेले. जयप्रकाशजींनी पोलिसांना सरकारचे आदेश मानू नका,

अशी चिथावणी दिल्याचा बनाव रचला गेला. पोलिसांनी बेकायदेशीर आदेश मानण्याचे कारणच नाही असे जयप्रकाशजींचे म्हणणे होते. परंतु जयप्रकाशजींनी पोलिसांना चिथावणी दिल्यामुळे पोलिसांमध्ये व सैनिकांमध्ये असंतोष पसरेल आणि त्याने देशाच्या अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण होईल, असे कारण पुढे करीत आणीबाणी जाहीर केली गेली. आणीबाणी जाहीर होताच सर्वप्रथम वर्तमानपत्रांवर सेन्सॉरशिप लादण्यात आली. त्यामुळे वस्तुस्थिती जाणून घेण्याची साधने बंद झाली. आमच्यासारखे तरुण त्यावेळेला गुप्तपणे बातम्या छापायचे, वाटायचे काम करत होते. हे करीत असताना दुसऱ्या स्वातंत्र्याच्या लढाईमध्ये आपलाही खारीचा वाटा आहे, या जाणिवेने आम्ही भारलो होतो. आणीबाणी जाहीर होताच सुरुवातीच्या काळात कुणाला काहीच कळेनासे झाले. बातम्या पोहोचू शकत नसल्याने अफवांना ऊत आला होता. आणीबाणीच्या विरोधात मुंबईत पहिला आवाज उठला तो महिलांचा. चर्चगेट रेल्वे स्थानकाबाहेर मुंबईतील नऊ महिलांनी रस्ता रोखून सत्याग्रह केला. आणीबाणीच्या विरोधाला तोंड फोडले. विद्युल्लता या नऊ जणींमध्ये सामील होती. सरकारने त्यांना अडीच महिने येरवड्याच्या कारागृहात कोंडले. त्या कारागृहात अहिल्या रांगणेकर, प्रमिला दंडवते आदि लढाऊ नेत्यांचा सहवास विद्युल्लताला लाभला. या अडीच महिन्यांच्या काळात विविध विषयांवरील वाचनामुळे विद्युल्लताची सामाजिक जाणीव व समर्पण वृत्ती अधिक प्रखर झाली. तुरुंगवासानंतर श्रद्धेय एस. एम. जोशी (अण्णा) यांची खाजगी सचिव म्हणून काम करण्याची संधी तिला मिळाली, हे तिचे महत्‌भाग्य.

याच काळात 'इंदिरा इज इंडिया' असा नारा काँग्रेस अध्यक्ष देवकांत बारुआ यांनी दिला. त्यामुळे या असंतोषामध्ये भरच पडली. निरनिराळ्या पक्षांचे, कधीही एकत्र न येणारे नेते तुरुंगामध्ये एकत्र आले. विविध विचारसरणींचे - समाजवादी, साम्यवादी, हिंदुत्ववादी नेतेही त्यामध्ये होते. एकवीस महिने एकत्र तुरुंगात राहिल्यानंतर जेव्हा इंदिराजींनी आणीबाणी उठविण्याचा निर्णय घेतला आणि ताबडतोबीने निवडणुका जाहीर केल्या तेव्हा स्वातंत्र्याचा संकोच अनुभवलेल्या विविध विचारसरणीच्या या नेत्यांना एकत्र येण्याशिवाय पर्याय नव्हता. अशा रीतीने जनता पार्टीची स्थापना केली गेली.

आमच्यासारख्या तरुणांना स्वाभाविकच जनता पार्टी हे आपले राजकीय व्यासपीठ आहे असे वाटू लागले. देशहिताचे कार्य या भावनेने आम्ही जनता पार्टीच्या कामाला लागलो. जनता पार्टीची स्थापना झाली आणि निवडणुका लढविल्या गेल्या त्यावेळेस इंदिरा गांधींचा पराभव होईल असे कुणाला स्वप्नातही वाटले नव्हते. जनतेने मात्र आपल्या पंचवीस वर्षातील असंतोषाला वाट करून दिली होती. शिवाजी पार्कच्या सभा मला अजूनही

आठवतात. आम्ही चादरी घेऊन उभे राहायचो आणि लोक जनता पार्टीसाठी त्या चादरींवर पैसे फेकायचे. सर्वसामान्य लोकही मोठा आशावाद बाळगून या निवडणुकीत सहभागी झाले होते. मोठ्या अपेक्षेने लोकांनी जनता पार्टीला सहाय्य केले. देशात पहिले बिगर काँग्रेसचे सरकार सत्तेवर आले.

लोकांनी खूप मोठ्या अपेक्षा या शासनाकडून बाळगल्या होत्या. आमच्या पिढीसाठी हा खूप मोठा रोमांचकारी अनुभव होता. तरुणांच्या दृष्टीने दुसरे स्वातंत्र्य मिळाले होते. दुसऱ्या स्वातंत्र्याचा अर्थ होता, कोणीही भुकेले असणार नाही, सामान्य लोकांसाठी सत्ता राबविली जाईल. जे नेते 'क्रांतिकारी' म्हणून आम्ही पाहिले होते ते सत्तेवर आले होते. त्यांच्याकडून खूप मोठ्या अपेक्षा होत्या. कदाचित खूप मोठ्या अपेक्षा ठेवल्यामुळे अपेक्षाभंग झाला असण्याची शक्यता आहे.

जवळपास अठ्ठावीस महिने जनता पार्टीचे सरकार सत्तेवर होते. परंतु एका संपूर्ण पिढीचा अपेक्षाभंग या जनता पार्टीच्या राजवटीत झाला. जितक्या जलद विविध विचारसरणींचे नेते एकत्र आले तितक्याच जलद त्यांचे विघटन झाले आणि जनता पार्टीचे सरकार कोसळले.

आपल्या सहभागामुळे सत्ता बदलली तरी व्यवस्थांचे स्वरूप मात्र बदलले नाही या भावनेने जनसामान्यांमध्ये नैराश्य पसरले. आणीबाणीपूर्व सत्तेत नसलेल्या राजकीय पक्षांशी जोडलेल्या लढाऊ जनचळवळी, जनता पक्षाच्या काळात प्रभावहीन झाल्या. या चळवळींचे नेते राजकारणात आले, बदलासाठी चळवळ नव्हे तर सत्ता हाच पर्याय आहे असे त्यांना वाटू लागले. सत्ता हे ईप्सित बनले. जनचळवळी जवळपास बंद पडल्या होत्या. आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना जनचळवळींचा पर्याय राहिला नाही. पुढचा इतिहास लिहिण्याची आवश्यकता नाही. परंतु पुन्हा एकदा इंदिरा गांधींचे सरकार सत्तेवर आले. हे लिहिण्याचे प्रयोजन अशासाठी की, जेव्हा कार्यकर्ता घडतो तेव्हा त्याच्यावर सभोवतालच्या परिस्थितीचा परिणाम होत असतो. माझ्या व विद्युल्लताच्या व्यक्तिमत्त्वावर या सर्व घडामोडींचा परिणाम स्वाभाविकपणे झाला आहे.

त्यानंतर काम करायचे ठरविले तेव्हा ज्या उमेदीने सक्रिय राजकारणात आम्ही उतरलो होतो ती उमेद काही राहिली नव्हती. परंतु एस. एम. जोशींसारख्या नेत्यांचा सहवास त्या काळात आम्हाला मिळाला होता. गरिबांना स्वातंत्र्य मिळवून द्यायचे असेल, तर ग्रामीण भागात जाऊन रचनात्मक काम करण्याची आवश्यकता आहे या त्यांच्या विचाराचा प्रभाव आमच्यावर होता.

**धडपड :**

आम्ही मुंबई सोडण्याचा निर्णय घेतला. ग्रामीण भागात जाऊन गरिबांसाठी काहीतरी करावे यासाठी विरारजवळच्या एका खेड्यात काम करायचे आम्ही निश्चित केले. संस्थात्मक चौकटीत काम करावे असा निर्णय आम्ही घेतला.

या संस्थेला काय नाव द्यायचे असा प्रश्न उभा राहिला. सभा, मंडळ, संघ असे कोणत्याही विचारसरणीशी जोडलेले नाव न घेता आम्ही एका वेगळ्या नावाचा विचार केला. ते नाव होते 'विधायक संसद'. विधायक संसद आमच्यासाठी राजकीय विचार होता. देशाची संसद केंद्रीभूत झाल्यामुळे देशाच्या विकासाचे कार्य तेथे होत नाही. ग्रामीण भागात, गावागावात अजूनही लोकशाही पोहोचलेली नाही. त्या ठिकाणी अजूनही सरंजामी व्यवस्था आहे. ही सरंजामी व्यवस्था मोडीत काढून त्या ठिकाणी लोकशाही रुजल्याशिवाय देशात लोकशाही रुजणार नाही. यासाठी विधायक स्वरुपाची संसद गावामध्ये निर्माण करणे आवश्यक आहे, या कल्पनेमधून 'विधायक संसद' या नावाचा आम्ही विचार केला. राजकीय परिस्थितीमधून आलेल्या नैराश्याला आम्ही वाट करून दिली. गरिबातल्या गरीब माणसासाठी, त्याने संघटित व्हावे यासाठी, राष्ट्र उभारणीचे काम करण्यासाठी आम्ही विधायक संसदेची निर्मिती केली.

विरारजवळचे दहिसर खेडे अशासाठी निवडले की ते माझे आजोळ होते. माझे मामा त्या गावच्या मंदिराचे पुजारी होते. सुट्टीच्या दिवसात मी त्या ठिकाणी जात असे. परिचयाचे खेडे असावे म्हणून आम्ही हे खेडे निवडले. गावाचे सर्वेक्षण केल्यानंतर आमच्या असे लक्षात आले की शाळांमध्ये पहिलीलाच मुलांची गळती होत असे. हा अनुभव आमच्यासाठी धक्कादायकच होता. खेड्यात जरी आम्ही जात होतो तरी खेडे आम्ही अनुभवले नव्हते. मुंबईमध्ये शाळेत प्रवेश मिळविण्यासाठी आटापिटा करावा लागत असताना या गावामध्ये पहिलीतूनच गळती! आम्ही शिक्षणाचे काम करायचे ठरवले. जयप्रकाश नारायण आणि त्यांच्या पत्नी प्रभावती यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'जयप्रभा संस्कार केंद्र' या नावाने एक बालवाडी आम्ही सुरू केली.

साने गुरुजी हे आमचे आराध्य दैवत होते. गुरुजींच्या वाङ्मयातून आम्हाला प्रेरणा मिळाली होती. मी महाविद्यालयात असताना साने गुरुजींचे बंधू आप्पा साने यांच्या घरी जवळपास रोजच जात असे. त्यांच्या तोंडून गुरुजींच्या असंख्य कथा ऐकण्याचे भाग्य मला लाभले. गुरुजींना प्रत्यक्ष पाहण्याची, ऐकण्याची संधी मिळाली नव्हती तरी त्यांचे निकटवर्ती यदुनाथजी थत्ते यांच्या सहवासामुळे ही उणीव भरून निघाली. गुरुजींच्या नावाने साप्ताहिक रुग्णसेवा केंद्र सुरू केले. या साप्ताहिक रुग्णसेवा केंद्रामध्ये कुष्ठरोग्यांची सेवा, पाच

वर्षांच्या आतील मुलांसाठी लसीकरण, गावात खरजेचे प्रमाण अधिक तेव्हा खरूज निर्मूलन, असे निरनिराळ्या प्रकारचे कार्यक्रम आम्ही गावामध्ये राबवायला सुरुवात केली. मुंबईतले डॉक्टर्स स्वयंस्फूर्तीने आमच्याकडे येऊ लागले.

आदिवासींच्या आर्थिक विकासासाठी कोणते कार्यक्रम घ्यावेत याचा आम्ही विचार करू लागलो. जवळपास प्रत्येक आदिवासीच्या घरी शेळ्या असायच्या. पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील नारायणगावच्या श्रीकांत सबनीसांकडून संकरित शेळ्यांची पैदास व शेळ्या सांभाळण्याचे तंत्र आम्ही शिकलो. सहा महिन्यांतच दुर्दैवाने नारायणगावाहून आणलेल्या सानेन जातीच्या बोकडांना पक्षघाताचा झटका आला व 'गरिबाची गाय' हा कार्यक्रम आम्ही सोडून दिला.

त्यानंतर मॅफकोमधून लॅन्डरेस व यॉर्कशायर जातीची डुकराची वीस पिल्ले घेऊन आलो. मॅफकोत जाऊन डुकरे सांभाळण्याचे तंत्रही शिकलो. एक मादी १८ ते २० पिल्लांना जन्म देई. रात्रभर तिचे बाळंतपण आम्हाला करावे लागे. डुकरांना होणाऱ्या जखमांमध्ये पडणारे किडे साफ करणे मोठे जिकरीचे असे. डुकराचे चांगले उत्पन्न संस्थेला मिळू लागले तोच वेठबिगारीचा प्रश्न उभा राहिला. सारा वेळ त्यातच जाऊ लागल्याने डुकरांचा प्रकल्पही मागे पडला.

गावामध्ये आम्ही तरुणांसाठी खास कार्यक्रम सुरू करण्याचा विचार केला. विद्युल्लताने तरुणांचे खेळ, निरनिराळ्या स्पर्धा घेणे अशा प्रकारचे काम सुरू केले. गावामध्ये आम्हाला चांगले सहकार्य मिळाले. विशेषत: गावात असलेले बडे जमीन मालक माझे फार कौतुक करीत. मी जवळपास त्यांच्याकडेच राहत असे. हे जमीन मालक सधन होते. त्यांची मुले माझ्याच वयाची असल्यामुळे आमचे फार चांगले सूत जमत असे. ते गाव मला आवडे. मी कामाला सुरुवात केली तेव्हा सर्व प्रकारचे सहकार्य, विशेषत: जागा, डॉक्टर्स आल्यानंतर त्यांच्या जेवणाची व्यवस्था, दवाखान्याकरिता लागणारे साहित्य, हे सर्व त्या गावच्या जमीन मालकांनी आम्हाला दिले. गावाचा उत्तम सहभाग आम्हाला मिळत होता.

**कलाटणी :**

हे सुरू असताना एक अतिशय धक्कादायक गोष्ट आमच्या लक्षात आली. आम्ही आजूबाजूच्या गावातल्या तरुणांच्या खेळाच्या स्पर्धा घ्यायचे ठरविले. तेव्हा काही तरुण नियमितपणे सरावाला येत नसत. विद्युल्लता त्यांच्यावर रागावली. त्यावेळी त्यांच्याकडून जे उत्तर मिळाले त्यावर आमचा विश्वासच बसेना. त्यांनी सांगितले की त्यांना रात्री काम

करावे लागते. रात्री काम करायला लागते असे ज्यांनी सांगितले ते खरे तर माझ्या फार जवळचे होते. सर्व आदिवासी होते. मी लहानपणी जेव्हा मुंबईहून माझ्या मामाच्या गावी जात असे तेव्हा माझ्या मामांबरोबर मला घ्यायला त्यातलेच काहीजण येत असत. त्यांच्या खांद्यावर बसून मी चार किलोमीटरचे अंतर जात असे. ते कायम माझ्या अवतीभवती असत. स्वाभाविकपणे पुढचा प्रश्न होता की त्यांना रात्रीही का काम करावे लागते ?

त्यांच्यापैकी प्रत्येकाच्या डोक्यावर कर्ज होते आणि ते फेडण्याकरिता त्यांना रात्रीही काम करावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले. किती कर्ज होते ? काहींचे ५०० रुपये, काहींचे १००० रुपये, तर काहींचे २०००, जास्तीतजास्त ३००० रुपये. किती वर्षांपासून हे कर्ज होते ? काहींचे कर्ज दोन वर्षांपासूनचे तर काहींचे त्यांच्या वडिलांपासून चालत आलेले. बहुतेकांनी त्यांच्या लग्नाकरिता कर्ज घेतलेले होते. माहिती घेतली तेव्हा आमच्या लक्षात आले की त्या ठिकाणी आदिवासींची मुले लहान असताना बकऱ्या राखायचे काम करीत. थोडी मोठी झाली की एक वेळच्या जेवणात आणि दोन जोड कपडे देऊन ही मुले बैल चारीत. त्याहीपेक्षा थोडी मोठी झाली की ती नांगरे होत, नांगर हाकायला सुरुवात करीत. या काळात त्यांचा मालक त्यांचे लग्न ठरवी. तो मालकच बस्ता बांधे म्हणजे कपडे, धान्य वगैरेची व्यवस्था करीत असे. हा खर्च त्यावेळेला २००० रुपयांपासून ५००० रुपयांपर्यंत जात असे.

म्हणजे लग्नाआधी एक प्रकारे आपली पत निर्माण करण्याकरिता काम करायचे, डोक्यावर कर्ज घेऊन लग्नाच्या बंधनात अडकतानाच वेठबिगारीच्या बंधनातही अडकायचे ही या ठिकाणी चालत आलेली परंपरागत पद्धत होती. याला 'लगीनगडी' म्हणत. लग्नानंतर पती-पत्नी दोघांनाही कर्ज फेडण्यासाठी मालकाकडे काम करावे लागत असे. वर्षभरात दोन बनियन, कंबरेला गुंडाळायचे दोन रुमाल, महिन्याला सव्वा मण म्हणजे साधारण वीस किलो भात ज्याला अडसडी म्हटले जाई, एवढ्या मोबदल्यात वेळेचा कोणताही हिशोब न ठेवता हे गडी राबत. त्यांना इतरत्र काम करण्यास मज्जाव असे. आम्हाला एक करार मिळाला, त्या करारामध्ये असे स्पष्ट म्हटले होते की, 'हा गडी रात्री-बेरात्री मालक जेथे पाठविल तेथे जाईल, तक्रार करणार नाही आणि जर कर्ज फेडायचे नाकारले तर जामीनदारांना हे कर्ज फेडून द्यावे लागेल.'

आमच्या लक्षात आले की जे कार्यक्रम आम्ही गावाच्या हिताकरिता राबवित होतो त्याचा प्रत्यक्ष लाभ या वेठबिगारांना नव्हे तर त्यांच्या मालकांना होत होता. २६ जानेवारीच्या दरम्यान आम्हाला या गोष्टी समजल्या. आम्ही अस्वस्थ झालो.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले. काय होता या स्वातंत्र्याचा अर्थ ? साता समुद्रापलीकडील इंग्रजांची राजवट जाऊन स्वकीयांची राजवट प्रस्थापित होणे इतका मर्यादित अर्थ होता का स्वातंत्र्याचा ? देशाच्या भौगोलिक सीमा पारतंत्र्यातून मुक्त होणे म्हणजे का स्वातंत्र्य ? अमूर्त असलेली स्वातंत्र्याची मूर्तिमंत संकल्पना भारताच्या संविधानाच्या भाग तीनमध्ये मूलभूत अधिकारांच्या रूपात दिसते. या भूमीवर जन्माला आलेल्या प्रत्येक भारतीय नागरिकाला जन्मत:च जे मूलभूत अधिकार प्राप्त होतात ते स्वातंत्र्य. घटनाकारांनी प्रत्येक भारतीय नागरिकाला संचाराचे स्वातंत्र्य बहाल केले. वेठबिगारी करणारे भारतीय नागरिक मात्र मालकाच्या परवानगीशिवाय कोठेही हिंडू-फिरू शकत नव्हते, अन्यत्र काम करण्यास त्यांना मज्जाव होता. शोषणाविरोधीचा अधिकार भारतमातेच्या सर्व लेकरांना संविधानाने दिला तरी वेठबिगार मात्र अमानवी शोषणाचे बळी ठरून पशुवत जिणे जगत होते. अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य या गुलामांपर्यंत पोहोचले नव्हते. त्यांच्या व्यथा, वेदना, यातना त्यांना व्यक्त करता येतील यावर त्यांचा विश्वास नव्हता. संविधानाने दिलेले संघटनेचे स्वातंत्र्य संविधानाच्या पुस्तकात बंदिस्त होते. स्वतंत्र भारतमातेच्या या लेकरांना स्वकीयांनीच गुलामीत खितपत ठेवले होते. त्यांच्या दारात स्वातंत्र्याची किरणे पोहोचू दिली नाहीत.

स्वातंत्र्यासाठी घराची राखरांगोळी केलेल्या स्वातंत्र्यवीरांनी स्वातंत्र्याचे जे स्वप्न पाहिले होते ते कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांनी आपल्या लेखणीतून साकारले आहे -

फासावर चढताना<br>
संसार जाळताना<br>
रक्त सांडताना<br>
आमचे एक स्वप्न होते :<br>
रंकाच्या माथ्यावरील छपराचे<br>
उघड्या अंगावरील वस्त्राचे<br>
उपाशी पोटातील अन्नाचे<br>
स्वातंत्र्याच्या सफलतेचे.

स्वातंत्र्यवीरांच्या या स्वप्नांची झालेली राखरांगोळी स्वातंत्र्याच्या तीस वर्षांनंतर आम्ही अनुभवीत होतो. कविवर्य वसंत बापट यांनी राष्ट्र सेवा दलाच्या बौद्धिकात बिंबविलेल्या काव्यपंक्ती आम्हाला अस्वस्थ करीत होत्या.

स्वातंत्र्य ? कुठे स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य ?
जोवरी सुखाचा घास नसे सर्वांना
जोवरी न होतील अवघ्या उन्नत माना
तोवरी न मानू स्वतंत्र आपुला देश
तोवरी राहू द्या अंगावरी रणवेश

देशातील दुर्बलांच्या स्वातंत्र्यासाठी, दुसऱ्या स्वातंत्र्याची लढाई लढावीच लागेल या निष्कर्षाप्रत आम्ही आलो.

आम्ही याबाबत त्या वेठबिगारांशी बोलायला सुरुवात केली तेव्हा कालपर्यंत आमच्या जवळ येणारे हे आदिवासी आमच्यापासून दूरदूर जाऊ लागले. आम्ही त्यांच्या घरी गेल्यावर आम्हाला पुढच्या दारात पाहून ते मागच्या दाराने पळून जाऊ लागले. आम्हाला त्यांचा राग येई. त्यांच्यासाठी आम्ही काम करतो आणि ते आम्हाला बघून पळतात का ? २६ जानेवारीला आम्ही झेंडावंदन करण्यासाठी गेलो ते निर्धार करूनच. प्रवासामध्ये मी एक गीत लिहिले.

ही जिद्द आहे मोठी, ही अवघड तशी कसोटी ।
संसदचे कंकण हाती, हे गाव बदलण्यासाठी ।।
एक हजार कर्जासाठी, गडी जीवनभर हो कसती ।
हा हिशोब सांगा कुठला, मजुरांच्या दुनियेवरती ।।
ही जाणीव त्यांना देऊ, अन्याया वाचा फोडू ।
हा जुलूम सहणे नाही, व्हा सज्ज संगरासाठी ।।
करी कंकण हे बांधियले, तर मागे हटणे नाही ।
हे जगणे मरणे आता, हा देश बदलण्यासाठी ।।

झेंडावंदनाच्या कार्यक्रमासाठी गावातल्या जमीन मालकांना बोलाविले होते. हे गाणे ऐकून ते बिथरले. त्या प्रजासत्ताक दिनानंतर एके दिवशी वैतरणा स्टेशनहून गावात जात असताना विद्युल्लता, आमच्यासोबत असलेल्या विषया भावे व मला गावातल्या चारपाच जणांनी बेदम मारहाण केली. त्यांनी गाव सोडून जाण्यासाठी आम्हाला धमकावले. ज्यांच्या घरी मी लहानाचा मोठा झालो ते त्यावेळी आमच्या मदतीला आले नाहीत. माझ्या छोट्या मामांनीही आमच्यावर बहिष्कार टाकला. आम्ही गावात माझ्या आतेभावाकडेच पंचवीस रुपये भाडे देऊन राहत होतो. आमचे सामान त्यांनी बाहेर फेकून दिले. दरवाजाला कुलूप ठोकले.

आम्हाला मारहाण झाली तेव्हा मात्र आमच्यापासून दूर जाणारे आदिवासी आमच्या जवळ आले. त्यांनी त्यांचे कपडे मला दिले, आमच्या जखमांना मलमपट्टी केली. ते आमच्यापासून दूर जाण्याचे कारण त्या दिवशी आम्हाला उमजले. आम्ही कोणत्याही परिस्थितीत त्यांच्याच बाजूने उभे राहू, हा विश्वास त्यांना त्या दिवशी वाटला. आपण काय बोलतो यापेक्षा आपली कृती जास्त महत्त्वाची असते. ज्या वेठबिगारांसाठी आम्हाला काम करायचे होते, त्यांच्या मालकांसोबत आम्ही रहात असू तर त्या वेठबिगारांनी आमच्याजवळ यावे आणि आमचे ऐकावे ही भाबडी अपेक्षा होती. तुम्ही काय सांगता यावर लोक विश्वास ठेवत नाहीत, तुमच्या कृतीवर लोक विश्वास ठेवतात. कृती महत्त्वाची असते हे त्यावेळेला आम्हाला जाणवले. तीन वर्षे मेहनत करून जे साध्य झाले नव्हते ते मालकांनी आम्हाला मारल्यानंतर साध्य झाले. आम्ही नेमके कोणाच्या बाजूने आहोत हे त्यावेळेला स्पष्ट झाले. आमचे जवळचे नातलग आमच्यापासून दूर गेले परंतु ज्यांच्याकरिता आम्हाला काम करावयाचे होते ते मात्र या मारहाणीनंतर आमच्या फार जवळ आले. या वेठबिगारांसाठी आता काय करायचे हा प्रश्न होता.

या आदिवासींना कसे मुक्त करावे याचा विचार आम्ही करू लागलो. हे कर्ज फेडण्याकरिता आम्ही आमच्या काही मित्रांना पत्रे लिहिली, त्यांच्याकडून निधीची अपेक्षा केली. त्याला नाव दिले मित्र-निधी. कर्ज फेडण्यासाठी आम्ही निधी उभा करीत असताना कामगार नेते स्वर्गीय बा. न. राजहंस यांनी आम्हाला सांगितले की, असे काही करण्याची आवश्यकता नाही. वेठबिगारीची पद्धत कायद्याने नष्ट झालेली आहे. कायद्यानेच हे कर्ज नष्ट झाले आहे.

वेठबिगारी निर्मूलनाचा कायदा १९७९ साली झाला होता. म्हणजे जवळपास सहा वर्षे होऊन गेली होती. परंतु हा कायदा आम्हाला शोधूनही कुठे सापडत नव्हता. एके दिवशी, राज्य सरकारच्या पुस्तकालयात, कचऱ्यात तो मला सापडला. आम्ही कायद्याचा अभ्यास केला. सामाजिक न्यायाचा हा कायदा अत्यंत प्रभावी होता.

कायद्यामध्ये वेठबिगारीची अत्यंत स्वयंस्पष्ट व्याख्या देण्यात आली होती. धनकोने ऋणकोला आगाऊ रक्कम देणे, त्या रकमेच्या बदल्यात त्याचेकडून अंगमेहनतीचे काम करवून घेणे, त्यासाठी त्याला किमान वेतन न देणे व त्याला अन्यत्र काम करण्यास मनाई करणे म्हणजे वेठबिगारी करवून घेणे असे स्पष्ट करण्यात आले होते. यासंबंधीचा करार लेखी किंवा तोंडीच असावयास हवा असे बंधन कायद्यात नव्हते. कोणताही करार न करता, रुढी-परंपरेनुसार दोघांनीही गृहित धरून केलेले वा करवून घेतलेले कामही वेठबिगारीच्या व्याख्येत समाविष्ट करण्यात आलेले होते. महत्त्वाचे म्हणजे या कायद्यानुसार केलेला प्रत्येक गुन्हा हा

दखलपात्र अपराध ठरविण्यात आला होता. वेठबिगार मालकाच्या जागेत राहात असेल तर त्याला राहत्या घरातून काढता येणार नाही व काढले तर तो दंडनीय अपराध असेल असेही कायद्याने स्पष्ट केले होते. या कायद्याचे याशिवाय एक वैशिष्ट्य म्हणजे पुराव्याची जबाबदारी धनकोवर म्हणजे मालकावर टाकण्यात आली होती. जिल्हादंडाधिकाऱ्यांवर वेठबिगारांचा शोध घेणे, त्यांना मुक्त करणे इतकेच नव्हे तर वेठबिगार पुन्हा वेठबिगारीत अडकू नये म्हणून त्याचे तात्काळ व दीर्घकालीन पुनर्वसन करणे अशी कायदेशीर जबाबदारी सोपविण्यात आली होती. कायद्याचा प्रसार करण्यासाठी एक भित्तिपत्रक शासनाने प्रकाशित केलेले आम्हाला आढळले. 'तहसीलदारांना कळवा - वेठबिगार मुक्त करा' अशा आशयाचे ते पत्रक होते.

वेठबिगारांनी मुक्ततेसाठी पुढे यावे म्हणून आम्ही प्रयत्न करीत होतो. मात्र कोणीही पुढे येत नव्हते. याच दरम्यान मराठवाड्यातील एकनाथ आव्हाड, दशरथ जाधव व विदर्भातील सदाशिव राठोड आमच्या कार्यात सहभागी झाले. त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक वेठबिगारांना समजावण्याचे काम केले. अखेर एके दिवशी चौघेजण सकाळी सकाळी आमच्याकडे आले. त्यांनी सांगितले की त्यांना मुक्त व्हायचे आहे, त्यांना यापुढे गुलामी करावयाची नाही, वेठबिगारी करावयाची नाही. आम्हाला प्रश्न पडला की यांना मुक्त करायचे म्हणजे नक्की काय करायचे ? कारण राज्यात कायद्याची अंमलबजावणी होत नव्हती. राज्यात औषधालाही वेठबिगार नसल्याचा दावा महाराष्ट्र सरकार करीत होते. या वेठबिगारांना सरकारी अधिकाऱ्यांकडे नेण्यात अर्थ नव्हता. त्यांना मुक्त झाल्याचा विश्वास देणे महत्त्वाचे होते.

गुजरातमधील पशुसंवर्धन, उपसंचालक डॉ. ताम्हाणे अधूनमधून दहिसरला येत. मुंबईमधील मालाड या उपनगरात एका उंच इमारतीत अकराव्या मजल्यावर ते राहत. विद्युल्लताने आणि मी विचार केला की ते सर्वात मोठे अधिकारी आहेत, असे या वेठबिगारांना भासवावयाचे आणि त्यांना मुक्त केल्याचे नाटक करावयाचे. ठरल्याप्रमाणे आम्ही त्या चौघांना घेऊन डॉ. ताम्हाणेंकडे गेलो. ते चौघे पहिल्यांदाच लिफ्टमध्ये शिरत होते. वर गेल्यावर त्यांना आपण किती उंच आलोत ते दाखविले. त्यांना वाटले की हे खरेच फार मोठे अधिकारी आहेत.

डॉ. ताम्हाणे आले. आम्ही वेठबिगारांची कैफियत त्यांच्यासमोर मांडली. ठरल्याप्रमाणे डॉ. ताम्हाणेंनी त्यांना सांगितले, ''आता घरी जा. कामावर जाण्याची अजिबात गरज नाही. तुम्ही मोकळेपणाने तुमच्या कामाला लागा. निर्धास्त होऊन जा.'' ते वेठबिगार या घटनेने भारावले आणि तडक निघाले. येताना लपूनछपून आले होते, जाताना मात्र ताठ मानेने गावाकडे निघाले. गावात त्यांनी सांगायला सुरुवात केली की, ''आम्ही

आजपासून मुक्त आहोत, आम्हाला मोठ्या साहेबांनी मुक्त केले आहे. आम्ही आता कामावर जाणार नाही.''

त्यावेळी असे करण्याचा आम्ही उत्स्फूर्तपणे घेतलेला निर्णय अतिशय महत्त्वाचा होता. ही छोटीशी घटना फार बोलकी आहे. मुक्त व्हायला कायदाच लागतो असे नाही. गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांनी सांगितल्याप्रमाणे तुमचे मन मुक्त असेल तरच तुम्ही मुक्त व्हाल. त्याप्रमाणे ते मुक्त झाले. त्यांची मानसिक मुक्ती फार महत्त्वाची होती.

**संघटनेचा श्रीगणेशा :**

याच दरम्यान मराठवाडा विद्यापीठाच्या 'नामांतराचा लढा' पेटला होता. 'जयभीम के नारे पे, खून बहा तो बहने दो।' असे म्हणत, निळे कफन डोक्याला गुंडाळून शहीद बनण्याकरिता आमच्यासारखे हजारो जेलभरो आंदोलनात सहभागी झाले होते. मी आणि विद्युल्लता पहिल्यांदाच दलितांच्या लढ्यात उतरलो होतो. तुरुंगात असताना धुळ्यामधल्या श्रमिक संघटनेच्या विजय कान्हेरे यांच्याशी माझा परिचय झाला. त्यांच्याकडून त्या भागात आदिवासींचा सावकारीविरोधी लढा ते कसे लढले हे मला समजून घेता आले. आपल्या कामाचे संस्थात्मक रूप बदलून त्याला संघटनात्मक रूप द्यावे लागेल हे तुरुंगातच निश्चित केले. तुरुंगातून बाहेर आल्यावर आम्ही सर्व प्रमुख लोकांनी एकत्र बसून एक संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्या संघटनेला कुठल्याही जातीचा स्पर्श होणार नाही अशा पद्धतीचे नाव दिले, 'श्रमजीवी संघटना'. ऑक्टोबर १९८२ मध्ये आम्ही श्रमजीवी संघटनेची स्थापना केली.

दहिसर गावात वेठबिगार होते फक्त आठ. त्यांच्या लढ्याला गावातील छोट्या शेतकऱ्यांनी आणि मजुरांनी साथ दिली नाही तर अतिशय अल्प लोकांचा हा लढा होईल आणि तो जिंकणे अवघड होईल याची आम्हाला खात्री होती. यासाठी आम्ही गावातील महिलांची बैठक बोलाविली. प्रामुख्याने शेतमजूर महिला बैठकीसाठी आल्या. त्यावेळी किमान वेतन सात रुपये होते परंतु प्रत्यक्षात महिलांना तीन रुपये व पुरुषांना पाच रुपये वेतन मिळत असे. सात रुपये किमान वेतन मिळाले पाहिजे अशी मागणी आम्ही केली. छोटेसे गाव, पण गावाने ते देणे नाकारले. तो कापणीचा हंगाम होता. पुरुषांना आणि महिलांना सात रुपये मजुरी मिळाल्याशिवाय कुणीही कामावर जायचे नाही, असा निर्णय आम्ही घेतला. संप पुकारला. शेतमालकांनी आजूबाजूच्या गावातील मजुरांना अधिक मजुरी देऊन शेतावर आणले. आम्ही गावातील सर्व मजुरांना शेताजवळ घेऊन गेलो, आमच्या संपाचे कारण समजावून सांगितले आणि त्यांना हात जोडून विनंती केली की, तुम्हाला जर पैसे

मिळाले असतील तर घरी जा पण आमचा संप मोडू नका. आमचा संप मोडलात तर तुमच्यात आणि आमच्यात संघर्ष होईल. मालकांकडून घेतलेले पैसे बुडवून आजूबाजूच्या गावातील मजुरांना आम्ही पळवून लावले. सुमारे चौदा दिवस दहिसर गावामध्ये संप चालला. अखेर मालक जेरीला आले, शरण आले. सात रुपये मजुरी देण्यास कबूल झाले. शेतमजुरांच्या या लढ्यामुळे वेठबिगारांच्या लढ्याला बळ मिळाले.

राज्यात वेठबिगार प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी होतच नव्हती. महाराष्ट्रात औषधालाही वेठबिगार नाहीत हा सरकारचा दावा सत्याचा अपलाप करणारा होता. आम्ही महाराष्ट्राच्या विधिमंडळावर एकशेतीस लोकांना घेऊन धडक दिली. तुरुंगात गेलो. त्यावेळी वसंतदादा पाटील मुख्यमंत्री होते. त्यांनी घेतलेली भूमिका आजही आमच्या स्मृतीत कोरली गेली आहे. प्रा. सदानंद वर्दे (अनुकाका) विधान परिषदेत आमदार होते. त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या कानी ही घटना घातली. पोलीस कोठडीतून आम्हाला थेट मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर नेण्यात आले. प्रा. वर्दे, कविवर्य वसंत बापटांसह आधीच पोहोचले होते. आम्ही तेव्हा पंचविशीच्या आतले होतो. आम्हाला पाहून वसंतदादांना आश्चर्य वाटले. वसंतदादांनी आमचे स्वागत केले. ते म्हणाले, ''या लहान वयात तुम्ही कशाच्या बळावर एवढे मोठे कार्य करीत आहात?'' आमच्याऐवजी वर्देंनीच त्यांना उत्तर दिले, ''दादा, स्वातंत्र्यासाठी लढताना तुमच्याकडे जे बळ होते तेच या मुलांकडे आहे. स्वातंत्र्याची ऊर्मी कुणालाही स्वस्थ बसू देत नाही.'' त्यानंतर दुसऱ्याच दिवशी वसंतदादांनी सर्व संबंधितांची बैठक आपल्या दालनात बोलाविली. आमच्या संरक्षणासाठी तत्काळ पोलीस देण्याच्या सूचना दिल्या. वेठबिगारांच्या जमिनी काही मालकांनी बळकावल्या होत्या त्या उभ्या पिकांसह वेठबिगारांना परत देण्याचे आदेश दिले. मालक त्यांच्याच पक्षाचे असतानाही, असे कणखर निर्णय वसंतदादांनी घेतले. तरीही प्रशासन वेठबिगार कायद्याची कडक अंमलबजावणी करावयास तयार नव्हते.

आम्ही विचार केला की प्रशासन आणि शासन हे काम करायला तयार नसेल तर आपण सर्वोच्च न्यायालयात जाण्याची आवश्यकता आहे. त्यावेळी वर्तमानपत्रांमध्ये न्या. पी. एन. भगवती यांचे नाव गाजत होते. ते सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश होते. गरिबांच्या बाजूने ते निर्णय देतात हे आम्ही ऐकलेले होते. परंतु न्या. भगवतींपर्यंत पोहोचायचे कसे हा आमच्यासमोर मोठा प्रश्न होता. खरे म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींना फोन करून भेटता येणे अवघड होते. तरीही टेलिफोन डिरेक्टरीमधून न्या. भगवतींचा नंबर आम्ही मिळविला. मोठी हिंमत करून पब्लिक फोनवरून न्या. भगवतींच्या घरी मी फोन केला. तेही

फोनवर बोलले. मी आमच्या कामाविषयी व आम्हाला येणाऱ्या अडचणींविषयी त्यांना कल्पना दिली. त्यांना भेटण्याची इच्छा असल्याचे सांगितले. न्या. भगवतींनी दुसऱ्या दिवशी संध्याकाळी सात वाजता त्यांच्या घरीच आम्हाला भेटायला बोलावले. आमच्यासाठी हा मोठा सुखद धक्का होता. अतिशय आनंदाने आम्ही त्यांना भेटावयास गेलो. आमचे म्हणणे त्यांनी पूर्णपणे ऐकून घेतले आणि कशा पद्धतीने सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येईल याचे मार्गदर्शन केले. आम्ही वेठबिगारांची यादी बनवायची, ती सर्वोच्च न्यायालयाला द्यायची, सर्वोच्च न्यायालय त्यांचा आयोग येथे पाठविल आणि वेठबिगारांची मुक्तता करील असे ठरले होते.

आम्ही अतिशय उत्साहात त्यांच्या सूचनेप्रमाणे वेठबिगारांची यादी बनवायला सुरुवात केली. हे अत्यंत अवघड काम होते. शेतमालकांना संशय न येता वेठबिगारांची यादी तयार करावी लागणार होती. या कामी दहिसर व कण्हेर येथील मुक्त झालेल्या वेठबिगारांपैकी मनोहर परेड, विष्णू किरकिरा, अनंता वाडू यांच्या सोबत देऊबाई किरकिरा, सोनीबाई धुळे, अशोक कामडी, विष्णू घाटाळ, पांडुरंग भोईर आदींचे दोन गट केले. एकनाथ आव्हाड, सदाशिव राठोड व दशरथ जाधव या गटांमध्ये सामील झाले. त्यांनी अडणे, भाताणे, मेढे, भिनार, दीपिवली, माजिवली, करंजोण, तिल्हेर हा परिसर पिंजून काढला. या परिसरातील कुणाच्यातरी नातेवाईकाच्या घरी जाऊन ते राहत व त्यांना विश्वासात घेऊन त्या त्या गावातील वेठबिगारांची यादी ते बनवित. सुमारे तीनशे वेठबिगारांची यादी अशा पद्धतीने बनविण्यात आली. ज्यावेळी प्रत्यक्ष यादी बनविण्याचे काम आम्ही करायला लागलो त्यावेळी मात्र आमचा विचार बदलला. वेठबिगार एवढे त्रस्त झालेले होते आणि मुक्ततेसाठी आसुसलेले होते की उद्यासाठीही थांबायची त्यांची तयारी नव्हती. अशा वेळेस आपण सर्वोच्च न्यायालयात जावे आणि मग न्यायालय कारवाई करेपर्यंत लोकांना थांबवून ठेवावे हे आम्हाला रुचले नाही. आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाण्याऐवजी संघटना बांधण्याचा निर्णय घेतला.

दरम्यान, आम्ही तत्कालीन कामगार आयुक्त श्री. अजित निंबाळकर या कार्यक्षम अधिकाऱ्याला भेटलो होतो. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहिले होते. जिल्हाधिकारी अवधेशप्रसाद सिन्हांचे आम्हाला पत्र आले. वेठबिगारांच्या मुक्ततेबाबत चर्चा करण्यासाठी त्यांनी आम्हाला भेटायला बोलावले होते. ते पत्र मिळाले तेव्हा आमचा आनंद गगनात मावेनासा झाला. जिल्हाधिकारी आम्हाला पत्र लिहितो याचेच आम्हाला अप्रूप वाटले. जिल्हाधिकाऱ्यांना भेटायचे या कल्पनेनेच आमचे अंग शहारून गेले होते, भीतीही वाटत होती. जिल्हाधिकाऱ्यांबरोबर बोलायला कोणीतरी आपल्यासोबत असावे म्हणून आमचा मित्र प्रवीण पाटकर याला सोबत घेतले. सिन्हांसोबत आमची चर्चा झाली. काय करायचे,

कशा पद्धतीने करायचे, याबाबत बोलणी झाली. आम्ही काही करणार एवढ्यात सिन्हांची बदली झाली. त्यांच्या जागी डॉ. जॉयस शंकरन् आल्या. श्री. रा.वि. भुस्कुटे त्याच वेळी वसईला तहसीलदार म्हणून आले होते. त्यांचे वडील कॉ. वि. म. भुस्कुटे सेनापती बापटांचे सहकारी होते. स्वातंत्र्यासाठी त्यांनी प्रदीर्घ कारावास भोगला होता. स्वत: श्री. रा.वि. भुस्कुटे स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होते. आम्ही त्यांना भेटावयाला गेलो. आमची कैफियत मांडल्यावर त्यांनी ताबडतोब आम्हाला मदत करावयाचे मान्य केले आणि त्यांच्या मदतीने वेठबिगार मुक्तीचा लढा लढावयाचा हे आम्ही ठरविले. पहिली बैठक डॉ. शंकरन् यांच्यासोबत झाली. त्यांनी संपूर्ण सहकार्य करावयाचे मंजूर केले आणि तहसीलदारांना तसे आदेश दिले. त्या एकाच आदेशाची आम्हाला आवश्यकता होती. बाकी सर्व करण्याकरिता श्री. भुस्कुटे समर्थ होते.

तीनशे वेठबिगारांची यादी तयार होती. तीन दिवसांचे शिबीर लावले. मी या वेठबिगारांना शेताशेतावर जाऊन आणले. यात मोठा धोका होता. मालकांनी मला ओळखू नये यासाठी अर्धी विजार व बनियन अशा मजुरांसारख्या वेषातच मी जात होतो. विद्युल्लता व इतर कार्यकर्ते त्यांचे जवाब घेऊन मुक्ततेसाठी त्यांना तहसीलदारांसमोर हजर करीत. हा अनुभव वेठबिगारांना नवीन होता. मजुरांनी किमान वेतन मागावयास सुरुवात केली. मालकांनी किमान वेतन देण्यास नकार दिला. गावागावात गुलामी करण्याचे नाकारण्यात आले. वेठबिगार मालक गोंधळून गेले. स्थानिक काँग्रेस नेत्यांनी शेतकरी कामगार पक्ष आणि त्यांची  मिळून शेतकरी संघटना सुरू केली. वेठबिगारमुक्तीचे काम बंद करण्यासाठी जिल्हाधिकारी व वसईच्या तहसीलदारांवर प्रचंड दबाव आणला. निरनिराळ्या पद्धतीचे अडथळे उभे केले.

तो आवणीचा काळ होता. किमान वेतन मिळेपर्यंत मजुरांनी शेतावर काम करण्याचे नाकारले. गावोगावी संप सुरू झाले. काही ठिकाणी मालकांनी मजुरांना मारहाण करणे सुरू केले. पोलीस केसेस सुरू झाल्या. अचानक उद्‌भवलेल्या या आंदोलनामुळे मालकवर्ग पुरता भांबावून गेला. शेतकरी संघटनेने आमच्या विरोधात सभा घेऊन आम्ही गावात गेल्यास आमचे हातपाय तोडून टाकण्याची धमकी दिली. सरकार मालकांच्या बाजूनेच होते. आम्ही नक्षलवादी आहोत, आम्हाला अटक करण्यात यावी, अशी मागणी शेतकरी संघटना करू लागली.

गावात होणाऱ्या आमच्या सभा उधळून लावण्यासाठी मालकवर्ग प्रयत्न करीत असे. अर्थात याचा फार चांगला परिणाम संघटनेवर झाला. मजूरवर्ग व आदिवासी  हे  मालकांच्या

या दडपशाहीमुळे स्वत:हून संघटित होऊ लागले. मालकाला परस्पर उत्तर देण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आले. ज्या गावातील मालक आम्हाला मारून टाकण्याची धमकी मजुरांना देत त्या गावात लगेचच दुसऱ्या दिवशी आम्ही जात असू. गावाच्या वेशीवरच ढोल-ताशे घेऊन मुलाबाळांसह त्या गावातील आदिवासी व मजूर आम्हाला वाजतगाजत गावात नेण्यासाठी उत्साहाने जमा होत. ज्या मालकाने धमकी दिली असेल त्याच्या घरासमोरून वाजत गाजत, नाचत ते आम्हाला घेऊन जात व पुन्हा तसेच आम्हाला एस.टी.पर्यंत पोहोचवायला येत.

वेठबिगारांनी स्वतंत्र झाले पाहिजे हे समजावून सांगताना आमच्या लक्षात आले की स्वतंत्र, स्वातंत्र्य हे शब्दच त्यांच्या कानावर गेले नव्हते. आपला देश स्वतंत्र झाला आहे आणि १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्यदिन आहे याची त्यांना कल्पनादेखील नव्हती. आम्ही स्वातंत्र्यदिन वेठबिगारांच्या समवेत साजरा करण्याचा निर्णय घेतला. स्वातंत्र्यदिन साजरा करण्यासाठी तेथे गेलो त्यावेळी तिथल्या मालकांनी अक्षरश: धुमाकूळ घातला. आम्हाला स्वातंत्र्यदिन साजरा करू दिला नाही. झेंड्याला वंदन करू दिले नाही. हा आदिवासींचा अपमान होता. पुढच्या वर्षी याच ठिकाणी याच दिवशी झेंडावंदन करण्याचा निर्धार आम्ही जाहीर केला.

आश्चर्य म्हणजे पुढल्या वर्षी १९८४ साली जिल्हाधिकाऱ्यांनी स्वातंत्र्यदिन साजरा करण्यासाठी आम्हाला बंदी करणारा हुकूम आणला. स्वातंत्र्याच्या सदतीस वर्षांनंतर आदिवासींना स्वातंत्र्यदिन साजरा करण्याकरिता मनाई करणारा हा हुकूम धक्कादायक होता. तो बंदीहुकूम मोडण्याचे आम्ही जाहीर केले. त्यावेळेला आमची एकूण ताकद जेमतेम पाचशे माणसांची होती. मात्र तेवढ्या लोकांना सोबत घेऊन पोलिसांच्या चार फळ्या तोडून आम्ही झेंडावंदनाचा हक्क बजावला. सरकारने आमच्यावर गुन्हा दाखल केला. हसतहसत आम्ही तुरुंगात गेलो. न्यायालयात आम्ही जामीन नाकारला. झेंडावंदन करणे हा गुन्हा असेल तर तो आम्ही केलेला आहे व त्यासाठी शिक्षा भोगायला तयार आहोत, असे आम्ही न्यायालयाला सांगितले. आमच्या तीन वर्षांच्या मुलीसह-स्वप्नासह दहा दिवसांचा तुरुंगवास आम्ही आनंदाने भोगला.

हे सर्व घडत असताना एक लक्षात आले की स्वातंत्र्य ही संकल्पना अनुभवावी लागते. ती गाण्यातून येत नाही, भाषणातून सांगता येत नाही. ती कृतीत आणावी लागते. त्याकरिता सोसावे लागते, भोगावे लागते. स्वातंत्र्यासाठी संघर्ष अपरिहार्य आहे. जोपर्यंत लोक मनाने स्वतंत्र होत नाहीत तोपर्यंत त्यांची खऱ्या अर्थाने मुक्ती होऊ शकत नाही, या निष्कर्षावर आम्ही ठाम झालो.

संघटना वाढत होती. आम्हाला चिरडण्यासाठी मालकांनी सर्व प्रयत्न सुरू केले. आम्ही नक्षलवादी आहोत असा प्रचार करून सरकारकडून आम्हाला झोडपण्यासाठी प्रयत्न सुरू होते. या सुरूवातीच्या रणधुमाळीत, आमच्यावर हल्ले होत असताना आम्हाला बळ देण्यासाठी श्रद्धेय अण्णा व अनुकाका धावून आले व त्यांनी सदैव आमची पाठराखण केली. आम्ही आयोजित केलेल्या एका कार्यक्रमास त्यांनी येऊ नये म्हणून अनेक प्रयत्न झाले. आपल्या जवळच्या सहकाऱ्यांचेही न ऐकता ते आले. अत्यंत उत्साहात वाजतगाजत आम्ही त्यांची मिरवणूक काढली. या मिरवणुकीत मालकांनी त्यांचे काही टगे भरधाव मोटारसायकलवरून पाठविले. मालकांची मस्ती किती आहे ते यामुळे या दोन्ही नेत्यांना कळले. समतेची भाषणे करणारे काही नेते अण्णा व अनुकाकांना भेटण्यासाठी व त्यांनी प्रथम मालकांची बाजू ऐकावी यासाठी कार्यक्रमाच्या ठिकाणी आले होते. या दोन्हीही नेत्यांनी मालकांना प्रथम भेटण्यास ठाम नकार दिला. लोकांनी सभेसाठी कारवीचे व्यासपीठ बनविले होते. त्यांनी जंगलातील फुलांचा हार पाहुण्यांच्या गळ्यात घातला. अण्णांना तो एवढा भावला की अण्णांनी सभा संपली तरीही गळ्यातला हार काढला नव्हता.

अण्णांसारख्या हिमालयाप्रमाणे उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या, राष्ट्रपतीपदाची उमेदवारी नाकारणाऱ्या, संयुक्त महाराष्ट्र लढ्याच्या सेनानीने त्या दिवशी जे भाषण केले त्यामुळे आम्हाला सहस्त्र हत्तींचे बळ मिळाले. ते म्हणाले, ''अरे येथे गुलामी असताना देश स्वतंत्र कसा ? विवेक, विद्युत येथे आले. त्यांनी स्वातंत्र्याचे कार्य केले. तुम्ही त्यांना झेंडावंदन करू देत नाही ? ते नक्षलवादी आहेत म्हणून त्यांच्यावर कारवाया करा म्हणून सांगता ? त्या दोघांना मी शिकविले आहे. ते हे करणारच. तुम्हाला त्या दोघांना मारायचे असेल तर खुशाल मारा पण ते त्यांचे काम सोडणार नाहीत. ते नक्षलवादी आहेत असे तुमचे म्हणणे असेल तर पहिला नक्षलवादी हा एस्. एम्. जोशी आहे. विवेक, विद्युतला मारल्यावरही हा लढा संपणार नाही. मी स्वत: येथे येईन आणि लढा पुढे नेईन.'' लोकांना भाषणात चांगला मुद्दा आल्यावर टाळ्या वाजवाव्यात हे तेव्हा कळत नव्हते, ते अनुकाकांनी त्यांना शिकविले. ''हं! आता टाळ्या वाजवा.'' ते लोकांना सांगत. त्यानंतर लोक प्रत्येक वाक्याला टाळ्या वाजवित राहत. अण्णा व अनुकाका यांनी प्रत्यक्ष येऊन थोपटलेली पाठ संघटनेच्या वाटचालीत आम्हाला कायम बळ देणारी ठरली.

**संघटनेचा विस्तार :**

वेठबिगार मुक्त होऊ लागल्यानंतर गावागावात चैतन्याचे वारे वाहू लागले. आजवरच्या असंतोषाचा बांध फुटला. गावोगावी रात्रीच्या सभा होऊ लागल्या. दिवसभर

काम करून थकलेले जीव रात्रभर नृत्य करून बेभान होऊ लागले. गीत प्रधान गौरी नृत्यातून आदिवासी त्यांच्या अनेक दु:खांचे, यातनांचे वर्णन करीत. रात्रभर चालणाऱ्या या आनंदोत्सवांमध्ये अनौपचारिक गप्पा होत. अनेक प्रश्नांची जाण त्यातून आम्हाला झाली. वेठबिगारांसोबत त्या गावातील शेतमजूरही यात सहभागी होत. त्यांनी किमान वेतनाचा प्रश्न पुन्हा एकवार समोर आणला. त्यावेळी किमान वेतन दिवसाला चौदा रुपये होते. मालक मात्र पुरुषांना दहा ते बारा रुपये आणि स्त्रियांना आठ ते दहा रुपये देत असत. अडणे गावातील एका मालकाने त्याच्याकडील शेतमजुरांना प्रत्येकी दोन रुपयाप्रमाणे पंधरा दिवसांचे तीस रुपये कमी दिले होते. मजुरांनी अनेकदा मागूनही त्याने ते देण्यास नकार दिला. यापुढे किमान वेतन न देण्याचे कोणाही मालकाचे धाडस होऊ नये म्हणून किमान वेतनाची थकबाकी वसूल करण्याचा निर्णय आम्ही घेतला. त्या व आजूबाजूच्या गावातील मजुरांनी त्या मालकाच्या दारात ठाण मांडले. दिवसरात्र त्याच्या दारातच बैठक मारली. शाळेत जाताना व शाळा सुटल्यावर मजुरांची मुलेही त्यात सामील होत. गाणी, घोषणा यांनी परिसर दुमदुमून जाई. 'पाटील बावा, पाटील बावा, आम्ही काय रं चिखुल खावा!' ही घोषणा लोकप्रिय झाली. अखेर चौथ्या दिवशी मालक शरण आला व मजुरीची थकबाकी सर्व मजुरांना देण्यात आली. मालकांनी या घटनेची धास्ती घेतली. एका गावात तर मजुराला द्यावयाला एक रुपया कमी पडत असताना व मजुराने तो नंतर दिला तरी चालेल असे सांगितले असतानाही मालकाने मजुराला बोलावून घेऊन तो रुपया परत केला. अशा घटनांची चर्चा गावागावात रंगे. त्यातून मजुरांना बळ मिळे.

वेठबिगार मुक्ती, किमान वेतनापाठोपाठ आदिवासींच्या नावे असलेल्या परंतु बिगर आदिवासींनी बळकावलेल्या जमिनींचा प्रश्न पुढे आला. तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी बिगर आदिवासींनी बळकावलेल्या जमिनी उभ्या पिकांसह आदिवासींना परत देण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले. परंतु प्रांत अधिकारी मालकांच्या बाजूचेच होते. त्यांनी मालकांना पीक कापून नेण्यास सांगितले. दीपिवली गावात मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त मागविण्यात आला. बिगर आदिवासी आदिवासींच्या शेतात पीक कापण्यास उतरले. त्यांना रोखण्याऐवजी ते आदिवासींना पीक कापून देत असल्याचा बचाव प्रांत अधिकाऱ्यांनी घेतला. आता काय करावे हा प्रश्न आमच्या समोर उभा राहिला. पीक कापण्यासाठी सर्व बिगर आदिवासी महिला उतरल्या होत्या. तेव्हा संघटनेच्या महिलांनी कापलेले पीक बांधून आदिवासींच्या घराकडे नेण्याचा निर्णय घेतला. विद्युल्लतासह संघटनेच्या महिला शेतात उतरून पीक बांधू लागल्या. बिगर आदिवासी महिलांच्या हातात

विळे-कोयते होते. त्यांनी विद्युल्लतावर धावून जाण्याचा प्रयत्न केला. तेव्हा मात्र पोलिसांना त्यांना थांबविण्यावाचून पर्याय उरला नाही. अशा तऱ्हेने बळकावलेल्या जमिनी परत मिळविण्याचा सपाटा संघटनेने सुरूच ठेवला.

आदिवासींची वन व महसूल जमिनीवर पिढ्यान्‌पिढ्या वहिवाट (पलाटे) होती. त्या जमिनीवरील ताबा कायम राहावा यासाठी आदिवासींना वनखात्याच्या संरक्षकांना व महसूल अधिकाऱ्यांना दरवर्षी कोंबडे, बकरे, दारू व काही पैसे चारावे लागत. याच काळात हा प्रश्नही समोर आला. वनअधिकाऱ्यांना लाच देणे बंद करण्यात आले. कामण गावातील तलाठ्याने वहिवाटी नावे करून देतो असे सांगून एका आदिवासीकडून गावठी कोंबडे, बीअर व चारशे रुपये रोख घेतले होते. वहिवाट नावे करून देणे त्याच्या हाती नव्हतेच. संघटनेच्या जानू व वेणू मेघवाले यांनी सभासदांना सोबत घेऊन तलाठ्याच्या कार्यालयाचा ताबा घेतला. तलाठ्याला शरण आणला. चारशे रुपये, बीअरची बाटली वसूल केली. त्या आदिवासीने लाल रंगाची व उलट्या पिसाची गावठी कोंबडी तलाठ्याला दिली होती. तशीच कोंबडी परत मिळावी यासाठी त्याने आग्रह धरला. तलाठ्याला बाजारभर फिरवून त्याने लाल रंगाची, उलट्या पिसाची कोंबडी मिळविलीच.

वनजमिनीवरील वहिवाटी नियमानुकूल व्हाव्यात म्हणून लढा सुरू करण्यात आला. वीस वर्षांच्या अथक प्रयत्नानंतर जिल्ह्यातील सात हजार सातशे आदिवासींची तीस हजार एकर वनजमिनीवरील वहिवाट नियमानुकूल झाली. या जमिनीचे एकत्रित मूल्य तीनशे कोटींहून कमी नाही.

संघटना बांधणी करत असताना असे एकामागून एक मुद्दे पुढे येत गेले. आदिवासींच्या जातीचा दाखला, रेशनिंग कार्ड, घरपट्टी,शाळेत शिक्षक न येणे असे विविध प्रकारचे प्रश्न हाती घेत संघटना पुढे जात राहिली.

संघटनेमुळे आदिवासी ताठ मानेने उभा राहिला. संघटनेने गावातील प्रस्थापितांच्या सत्तेला आव्हान देऊन दुर्बलांना बलवान केले. त्यांच्या जीवनाचे निर्णय ते घेऊ लागले. ते सत्तेत स्वाभिमानाने सहभाग घेऊ लागले. काळा सोबत प्रश्नांचे स्वरूप, हितसंबंधही बदलले. एकेकाळच्या वेठबिगार मालकांच्या व कुणबी शेतकऱ्यांच्या जमिनी मातीमोल भावाने सरकार जबरदस्तीने घेऊ लागले तेव्हा सरकारविरोधात शेतकऱ्यांच्या बाजूने संघटनेने दंड थोपटले, शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला. आगरी समाजातील रेती उत्पादकांवर सरकारच्या अन्याय्य धोरणामुळे जेव्हा बेरोजगारीची व उपासमारीची वेळ आली तेव्हा संघटनेने कडवी झुंज दिली आणि रेतीचा लिलाव बंद पाडून रेती उत्पादकांना दिलासा दिला.

संघटनेने नुकताच रौप्यमहोत्सव साजरा केला. गेल्या पंचवीस वर्षांत संघटनेने अनेक यशस्वी लढे दिले व भौगोलिक विस्तारही केला. सहा हजारांहून अधिक वेठबिगार गुलामीतून मुक्त केले. एवढेच नव्हे तर ठाणे जिल्ह्यातून वेठबिगारीच्या अमानुष प्रथेला हद्दपार केले. महिलांच्या लिलावाच्या प्रथेला इतिहासजमा केले. वंचित मुलांच्या प्राथमिक शिक्षणासाठी संपूर्ण राज्याचे शिक्षणाचे धोरण बदलण्यास शासनास भाग पाडले. रोजगार हमी योजनेत जेट्रोफा लागवडीचा समावेश राज्य शासनाने करावा म्हणून यशस्वी लढा दिला.

या प्रकरणामध्ये संघटक म्हणून मी कसा घडलो, कसा विकसित झालो, संघटना कशी वाढत गेली याचा इतिहास काहीशा विस्ताराने मांडला आहे. पुस्तकात यापुढे संघटक म्हणून माझ्या हाती आलेले सार मांडण्यापूर्वी या इतिहासाचा संदर्भ वाचकांना असावा एवढेच या प्रकरणाचे प्रयोजन.

*******

# सामर्थ्याची नांदी

मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय महानगरापासून केवळ सत्तर किलोमीटरवर असलेले दहिसर हे विरार व वैतरणा रेल्वे स्टेशनच्या मध्यावरचे खेडे, देशातल्या इतर कोणत्याही खेड्यापेक्षा वेगळे नव्हते. लहानपणापासून त्या गावात जात असलो तरी त्या गावातले वेठबिगारांचे अस्तित्व मला जाणवले १९८० साली, काम करण्याच्या इराद्याने तेथे गेलो तेव्हा. त्यावेळेला प्रथमच आपल्या खेड्यांची परिस्थिती आम्ही अनुभवली.

मुंबई सोडून ग्रामीण विकासासाठी कार्य करायचा निर्णय घेतला त्यावेळी आपल्याला काय करावे लागेल याची स्पष्ट कल्पना आमच्या मनामध्ये नव्हती. खेडे एकजीव नाही हे पहिल्यांदाच जाणवले. खेड्यामध्ये विघटित झालेला समाज आहे. हा विघटित समाज छोट्यातल्या छोट्या खेड्यातही आहे. दुरून खेडे पाहताना खेड्याची झालेली शकले आपल्या लक्षात येतातच असे नाही. समाजाचे हे विघटन मात्र आपण प्रत्यक्ष खेड्याचे निरीक्षण करतो तेव्हा फार प्रकर्षाने लक्षात येते.

**गावगाड्यातले हितसंबंध :**

छोट्याशा खेड्यामध्येही अनेक प्रकारचे हितसंबंध परस्पर विरोधामध्ये कार्यरत असल्याचे आढळतात. खेडी जातीने विभागलेली आहेत. जाती-जमाती पुंजक्याने वस्ती करून राहताना आपल्याला खेड्यात दिसतात. मॅजिस्ट्रेट त्रिंबक नारायण आत्रे यांनी १९१५ साली लिहिलेल्या 'गावगाडा' या पुस्तकातील गावगाड्याचे चित्रण आजही आपल्या देशातल्या तमाम खेड्यांना लागू पडते. खेड्याचे दोन प्रकार आत्रेंनी सांगितले आहेत. एक काळ्या आईवर वसलेले खेडे आणि दुसरे पांढऱ्या आईवर वसलेले खेडे. पांढऱ्या आईवर वसलेले खेडे म्हणजे ज्याला आपण रूढार्थाने गाव म्हणतो ते. आणि काळ्या आईवर वसलेले खेडे म्हणजे शेतावरची, गावाबाहेरची घरे. वरच्या जातीतला समाज

गावठण करून राहतो आणि कनिष्ठ जातीचे, आदिवासी, भटके-विमुक्त गावापासून दूर जिथे काळी आई आहे त्या ठिकाणी वस्ती करून राहतात.

भारतीय जातिव्यवस्थेचे स्पष्ट प्रतिबिंब खेड्यामध्ये पाहावयास मिळते. जाती व्यवस्थेचा भाग असलेल्या ज्या जाती आहेत त्या गावाच्या अवतीभवती वस्ती करून राहतात. गावाच्या मध्यभागी साधारणपणे सवर्ण समाज आणि गावकुसाच्या बाहेर परंतु गावाला खेटून दलित समाज व बारा बलुतेदार राहताना दिसतात. कुणाची वस्ती कुठे असावी याचेसुद्धा नियम समाजाने ठरविल्याचे आपल्याला स्पष्टपणे दिसते. आदिवासी मात्र या जातिव्यवस्थेचाही घटक नाही. आदिवासी जमाती या कोठेही गावकुसाच्या जवळ राहत नाहीत. त्या डोंगराच्या कडेकपारीला, पायथ्याला राहतात. त्यांची संस्कृती, त्यांच्या परंपरा भिन्न आहेत. खेडे हे एक युनिट नाही. अनेक हितसंबंधांमुळे, वर्णव्यवस्थेमुळे ते विभागलेले आहे.

हितसंबंध केवळ आर्थिकच असतात असे नव्हे. भारतीय समाजव्यवस्थेत तर सामाजिक हितसंबंधांकडे अजिबातच दुर्लक्ष करता येत नाही. आम्ही दहिसरमध्ये काम करायला सुरुवात केली तेव्हा गावातले, म्हणजे सामाजिक स्तरानुसार उंचावर असलेले, प्रस्थापित लोक आम्हाला मदत करीत होते. रुग्णसेवा, बालवाडी यासाठी त्यांचे सर्व प्रकारचे सहाय्य आम्हाला मिळत होते. त्या अर्थाने गावाचा सहभाग होता. प्रस्थापित समाजाच्या आर्थिक हितसंबंधांना किंवा सामाजिक प्रतिष्ठेला बाधा पोहोचली नव्हती तोपर्यंत सहाय्य करण्यासाठी ते तत्पर होते. परंतु आपल्या आर्थिक हितसंबंधांना आणि सामाजिक प्रतिष्ठेला बाधा पोहोचते आहे असे जाणवले त्यावेळी मात्र हा समाज खवळून उठला. वेठबिगारी ही अमानवी, अमानुष प्रथा आहे, शोषण आहे, ही प्रथा बंद करण्यासाठी काही करण्याची आवश्यकता आहे एवढे केवळ बोलल्याने प्रस्थापित समाजच नव्हे तर खुद्द माझे जवळचे नातलगही माझ्यापासून दूर गेले. यावरून हे स्पष्ट आहे की प्रस्थापित समाज आपले हितसंबंध सुरक्षित ठेवून जे काही समाजासाठी करता येईल ते करण्याचा प्रयत्न करील. परंतु सामाजिक प्रतिष्ठेला आणि आर्थिक हितसंबंधांना बाधा येताच तो खवळून उठेल.

शोषण करणारा प्रस्थापित वर्ग सर्व निर्णय एकतर्फी घेत असतो. जात आणि आर्थिक स्तरांतील विषमतेवर आधारलेल्या या शोषणामध्ये आदिवासी, दलित, वेठबिगारांनी कसे वागावे, काय खावे, काय प्यावे, कुठे काम करावे, किती तास काम करावे, मजुरी काय घ्यावी हे तर प्रस्थापित ठरवत होतेच, मात्र त्यांनी शिकावे की नाही, किती शिकावे, आरोग्याच्या कोणत्या सुविधा त्यांना मिळाव्यात, कोणत्या नागरी सुविधा त्यांना मिळाव्यात हे आणि एवढेच नाही तर त्यांनी कुणाला मतदान करावे हे निर्णयही मालकांचेच असत.

गाव आणि त्या गावापासून दूर वसलेल्या आदिवासी पाड्याकडे नजर टाकली तरी आपल्या लक्षात येईल की शाळा, रस्ते, वीज, पाणी, दवाखाने यासारख्या नागरी सुविधा गावापर्यंतच पोहोचलेल्या असतात. पाड्यांपर्यंत त्या पोहोचतच नाहीत. विकासाचा कोणताही निकष पाड्याला लागू होत नाही. 'आहे रे' हा वर्ग गावामध्ये आणि 'नाही रे' वर्ग पाड्यामध्ये असे सरळ चित्र आपल्याला सर्व खेड्यांमध्ये दिसेल.

**शोषितांची मानसिकता :**

परंपरागत सत्ताव्यवस्थेतून 'आहे रे' आणि 'नाही रे' या दोघांचीही मानसिकता बनत असते. केवळ नावातूनही एखाद्या व्यक्तीचा सामाजिक स्तर दाखवून दिला जातो. गावातील सधन शेतकऱ्याच्या मुलाला मजुरांनी छोटे पाटील, छोटे मालक अशी हाक मारायची. मालकाच्या शेंबड्या पोरालासुद्धा म्हातारा मजूर असेच बोलावणार. मात्र मजूर म्हाताराही असेल आणि त्याचे नाव जरी नारायण असेल तरी पाटलाचा पोर त्याला नारायणही बोलावणार नाही, तो त्याला नाऱ्या बोलावेल. सोम्या, दगड्या, एवढेच नाही तर मराठवाड्यामध्ये उकिरड्या, कचऱ्या, धोंड्या अशी नावे मी पाहिली आहेत.

एस.टी.ने प्रवास करतानाही आदिवासी अत्यंत अवघडून, हातपाय जवळ घेऊन अर्ध्याच सीटवर बसलेला असा आम्हाला आढळे. या उलट बिगर आदिवासी छोटा मुलगाही पाय पसरून आरामात त्या सीटवर बसलेला दिसे. आदिवासींची मानसिकता झाली होती की, माझ्या स्पर्शाने दुसऱ्याचे कपडे खराब होतील, त्याचा रंग काळा होईल. मी ज्या समाजात जन्माला आलो त्यामुळे इतरांपेक्षा मी कमी प्रतीचा आहे, कमी प्रतिष्ठेचा आहे. नकळतपणे या लोकांच्या मनावर हे पिढ्यान्‌पिढ्या बिंबविले गेल्यामुळे हे असे प्रकार घडत. आम्हाला आदिवासींना हे सांगावे लागे की तुम्ही असे वागून स्वत:चा अपमान करून घेत आहात.

आदिवासी अस्पृश्य नसले तरीही त्यांना अस्पृश्यतेचीच वागणूक मिळत आली आहे. जमीन मालकाच्या वा कोणत्याही मोठ्या इसमाच्या घरी आदिवासी खुर्चीवर बसणार नाही. गुडघ्यामध्ये पाय घेऊन एका कोपऱ्यात किंवा ओटीच्या खाली तो उभा राहील. आपण परंपरेनुसार खुर्चीवर बसायचे नाही. खुर्चीवर बसल्यानंतर कुणी ऊठ म्हटले तर काय ? अशी खुर्चीवर बसण्याबद्दल त्यांच्या मनात एक प्रकारची भीती असते. आम्ही एक नियमच केला होता की, कोणत्याही कामासाठी आदिवासी व विशेषत: आदिवासी महिला कार्यालयात आल्यास त्यांनी प्रथम खुर्चीत बसलेच पाहिजे. त्या काळी आम्हाला जबरदस्तीने त्यांना खुर्चीत बसवावे लागत असे.

मराठवाड्यामध्ये मी अनेकदा पाहिले की, सतरंजी टाकलेली असतानाही दलित त्या सतरंजीवर न बसता खालीच बसत. त्यांना ओढून सतरंजीवर बसविण्याचा प्रयत्न केला तरीसुद्धा ते त्या सतरंजीवर बसायला तयार होत नसत. शेवटी मी त्यांच्या मांडीवरच सतरंजी टाकीत असे. ''तू सतरंजीवर बसत नसशील तर सतरंजी तुझ्यावर बसेल.'' मानसिकता बदलण्यासाठी असे जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. वेठबिगारांना, शेतमजुरांना मालक शिल्लक राहिलेले शिळे अथवा उष्टे अन्न देत असत. मजूरही विनातक्रार ते खात असत. मजुरांचा स्वाभिमान जागविण्यासाठी 'उपाशी रहा परंतु शिळे आणि उष्टे अन्न खाऊ नका' असे आवाहन संघटनेने केले. या आवाहनाला मजुरांनी प्रचंड प्रतिसाद दिला व नंतर तो संघटनेचा नियमच बनला.

दुर्बलांच्या मनावर जे संस्कार पिढ्यान्‌पिढ्या झालेले आहेत त्या संस्कारांचे परिणाम आपल्याला त्यांच्या वर्तणुकीमध्ये स्पष्टपणे दिसतात. दुर्बलांनी कसे वागावे, कुठे बसावे, कसे जेवावे, काय व कसे बोलावे याबाबत अलिखित नियम असतात. मालक मारणारच हे वेठबिगाराने जसे गृहीत धरलेले असे तसे नवरा मारणारच हे बायकोनेही गृहीत धरलेले असते. समाजाने हे अलिखित नियम त्यांच्या मनावर एवढे बिंबविलेले असतात की त्यांनी हे नियम पाळावेत यासाठी त्यांच्यावर सक्ती करण्याचीही आवश्यकता नसते.

या साऱ्याचा संबंध सत्तेशी आहे. सत्ता म्हणजे खुर्ची किंवा राजकीय सत्ता नव्हे तर दुसऱ्या व्यक्तीवर, दुसऱ्या समूहावर, दुसऱ्या समाजघटकावर गाजविली जाणारी सत्ता. ही सत्ता मानसिकतेतून आलेली असते. ती लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवते. विविध समाजघटकांना ज्या पद्धतीने वागविले गेले, ज्या पद्धतीचे संस्कार पिढ्यान्‌पिढ्या त्यांच्यावर झाले, त्याचे स्पष्ट परिणाम दिसतात. आदिवासी पाडा कित्येक सोयी-सुविधांपासून वंचित असला तरीही आपल्यावर काहीतरी मोठा अन्याय होत आहे असे आदिवासींना वाटत नाही, ही काहीतरी विषम व्यवस्था आहे असे त्यांना जाणवत नाही.

भारतीय समाज इतका गुंतागुंतीचा आहे की शोषक आणि शोषित असा सरळ भेद करणेसुद्धा अनेकदा अवघड होते. जात, वर्ण, वर्ग, लिंग, धर्म, भाषा, प्रांत, राजकीय हितसंबंध अशा निरनिराळ्या निकषांवर भारतीय समाज विभागलेला आहे. आदिवासी, दलितांचे शोषण करणाऱ्या समाजाचेही अनेकदा जातिव्यवस्थेतील वरच्या जातींकडून शोषण होत असल्याचे दिसते. हजारो वर्षे जे संस्कार जातिव्यवस्थेमुळे भारतीय समाजमनावर झालेले आहेत, त्या सर्वांवर मात करून समाजाला समतेसाठी लढण्यास प्रवृत्त करणे हे फार मोठे आव्हान आहे.

समाजातील स्त्री आणि पुरुष विषमतेकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. स्त्री-पुरुषांच्या संदर्भात शोषित आणि शोषक यांची पुनर्व्याख्या करणे आवश्यक ठरते. वेठबिगार शोषित असला तरी घरी गेल्यानंतर कदाचित तो आपल्या बायकोचे शोषण करीत असतो. सर्वात शोषित आदिवासी समाजामध्ये काही रूढी, परंपरा अशा होत्या की, स्त्रियांना गुलामापेक्षाही, जनावरापेक्षाही वाईट वागवले जात असे. म-ठाकूर समाजामध्ये, जर एखादी महिला तिच्या पतीसोबत नांदत नसेल तर तिचा लिलाव करण्याची पद्धत होती. चिठ्ठ्या पाठवून गावोगावचे लोक बोलाविले जात आणि त्या बाईचा लिलाव होई. सर्वात म्हातारा माणूस सर्वात कमी किंमत देणार असेल तर हा लिलाव त्याच्या बाजूने होई. कधी तिला शिक्षा दिली जाई, तिला गरम तव्यावर उभे केले जाई, तिला नग्न करून डोक्यावर दगड देऊन गावातून तिची धिंड काढली जाई. या शोषणाला समाजाची मान्यता होती. 'जात पंचायत' या समाजाने बनविलेल्या संस्थेमार्फत हे शोषण होत असे. शोषणाचे हे संस्थात्मक स्वरूप संपूर्ण समाजाला संघटित करण्यामध्ये अडसर ठरत असते.

या सर्व सामाजिक स्तरांचा विचार गरिबांना संघटित करताना करावा लागतो. आपला समाज सरळ दोन भागात विभागलेला नाही. अत्यंत गुंतागुंतीच्या या समाजात कोण केव्हा उच्च असेल आणि कोण केव्हा नीच, कोण केव्हा शोषित असेल आणि कोण केव्हा शोषक हे सांगता येत नाही. परिस्थितीनुसार ही समीकरणे बदलत जातात. संघटकाने या सर्व समीकरणांचा विचार वेळोवेळी करणे आवश्यक ठरते.

**'नाही' म्हणण्यासाठी :**

अमेरिकेतील कृष्णवर्णीयांच्या वंशभेदाचा लढा डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांच्या नेतृत्वाखाली लढला गेला. मात्र या लढ्याची सुरुवात रोझा पार्कस् या एका अतिसामान्य कृष्णवर्णीय महिलेने केली. बसमध्ये कृष्णवर्णीयांना वेगळे बसावे लागे. बसमध्ये श्वेतवर्णीय उभा राहिल्यास त्या रांगेत बसलेल्या सर्व कृष्णवर्णीयांना उठून उभे राहावे लागे व त्या श्वेतवर्णीयासाठी जागा करून द्यावी लागे. निमूटपणे कृष्णवर्णीय हे सहन करीत होते. रोझा पार्कस्ने या अन्यायाला ठामपणे 'नाही' म्हटले. उठण्यास नकार दिला. या घटनेने अमेरिकेचा इतिहास बदलला.

सत्तेला आव्हान देणे हे सर्वात कठीण काम असते. जोपर्यंत सत्ता आपले सामर्थ्य गाजवीत असते आणि तिला आव्हान दिले जात नाही तोपर्यंत ती अबाधित राहते. जोपर्यंत सत्तेला आव्हान दिले जात नाही तोपर्यंत सर्वत्र शांतता असते. शोषण चालू असतानाही ज्या ठिकाणी शांतता आहे तेथे सत्तेला कोणी आव्हान दिलेले नाही, हे स्पष्ट होते.

नांदेडला मी एका गावामध्ये गेलो होतो. मातंग समाजातील पुरुषांनी गावात सक्तीने हलगी वाजविण्याच्या प्रथेविरोधात आंदोलन सुरू होते. तेथे मातंग समाज वेठबिगारी करीत असे. एके रात्री एक मातंग तरुण भीतभीत माझ्याजवळ आला. त्याचे नाव रामा मोतेवार. तो, त्याची बायको, भाऊ, वडील, आई, मुलगा, सर्वजण ईरण्णा नावाच्या मालकाकडे वेठबिगार होते. अक्षरश: जनावरांसारखे त्यांचे जिणे होते. आजारपणामुळे जरी तो घरी राहिला तरी मालक त्याला मारझोड करीत घेऊन जाई. त्याला शेतावरच राहावे लागे. कधी लपूनछपून तो घरी येई. हे सर्व सांगताना तो ओक्साबोक्शी रडत होता. वेठबिगारीचा फास त्याच्या गळयाभोवती घट्ट आवळला होता आणि काहीही करून मी त्याला सोडवावे, अशी तो मला विनंती करीत होता.

मी त्याला म्हटले, ''ठीक आहे, मी तुला सोडवतो आणि उद्याच सोडवतो.'' त्याचा त्याच्या कानांवर विश्वासच बसेना. मी त्याला म्हटले की, ''आता तू घरी जा आणि उद्या शेतावर जाऊ नकोस.'' असे करण्याची त्याची हिम्मत होत नव्हती. तो तयार होईना. मी त्याला म्हटले ''मी येथेच चार किलोमीटर अंतरावर आहे, काहीही झाले तरी मी आहे. घरी जा, झोप आणि उद्या शेतावर जाऊ नकोस. पुढे काय होईल ते आपण पाहू.'' पुढे काय होणार हे त्यालाही स्पष्ट दिसत होते. मी त्याला पर्याय सांगितला, ''तुला मरायचे असेल तर तू असाच मरत राहा. पण जर रोजचे मरण नको असेल तर असे ठरवून टाक की उद्या मालक येईल आणि तुला ठार मारून टाकेल. पण एकदाच मरशील, अशी तयारी ठेव आणि जा.'' खूप समजावल्यानंतर तो गेला.

सकाळी अपेक्षेप्रमाणे रामाच्या गावातले लोक मला बोलवायला आले. रामाच्या घरासमोर मालक चाबकाने त्याला मारत होता. रामाचा भाऊ हणमंता, त्याचे वडील, सर्व कुटुंब ओक्साबोक्शी रडत होते. आजूबाजूचे, रामाच्याच जातीचे, मातंग हात बांधून हे पाहत होते. एकटा ईरण्णा रामाला मारत होता. आम्ही येत असल्याचे कळल्यानंतर ईरण्णा तेथून निघून गेला, रामा रस्त्यातच पडून होता. पंधरा-वीस मिनिटातच मी त्याच्या गावात पोहोचलो. मी रामाला सोबत घेतले आणि ईरण्णाच्या घरी गेलो.

माझ्याकडे कोणतीही ताकद नव्हती वा अधिकार नव्हते. हिम्मत करून आम्ही त्या ठिकाणी गेलो होतो. मी ईरण्णाला बाहेरूनच जोरात हाक मारली. थोड्या वेळाने ईरण्णा आणि त्याचा भाऊ आला. मी त्याला विचारले, ''का

मारलेस तू याला?'' ईरण्णाचे उत्तर अपेक्षित होते, ''याने कर्ज घेतले आहे माझ्याकडून आणि पळून गेला होता मुंबईला. तिथून मी याला धरून आणला. माझे कर्ज फेडल्याशिवाय याला मी सोडणार नाही. याने पहिल्यांदा माझे कर्ज फेडले पाहिजे.'' ईरण्णा मला हिशोब सांगू लागला.

चौदा-पंधरा वर्षाच्या हणमंताला, रामाच्या छोट्या भावाला मी विचारले, ''ईरण्णाकडे कामाला जाणार का?'' माझ्या प्रश्नाला हणमंताने उत्तर देण्याऐवजी ईरण्णानेच उत्तर दिले, ''याची काय हिम्मत आहे, नाही बोलायची?'' मी ईरण्णाकडे दुर्लक्ष करीत हणमंताला जरा जोरात, दटावून विचारले, ''जाणार का तू ईरण्णाकडे?'' सतत मान खाली घालून असणाऱ्या हणमंताने मान वर केली. मी त्याला म्हटले, ''बघ ईरण्णाकडे.'' त्याने ईरण्णाकडे पाहिले. त्याच्या डोळ्याला डोळा भिडविण्याची हिम्मत केली. पुन्हा मी विचारले, ''जाणार का ईरण्णाकडे कामाला?'' हणमंता त्याच्या अंगातली सर्व शक्ती एकवटून जोरात किंचाळला, ''नाही.'' हणमंताने ज्यावेळेला नाही म्हटले त्यावेळेला ईरण्णाचे अवसान गळून गेले. त्याची ताकद क्षीण झाली. ईरण्णाची मान खाली गेली आणि हणमंता त्या ठिकाणी ताठ मानेने उभा राहिला.

मालक जे सांगेल त्याला हो म्हणावयाचे हेच परंपरेने शिकविले होते. 'नाही' म्हणावयाची ताकद ज्या दिवशी हणमंता आणि रामामध्ये आली त्याच दिवशी ते मुक्त झाले. त्या घडीला हणमंताने आणि रामाने ठरविले की, यापुढे ईरण्णाकडे कामाला जायचे नाही आणि ते गेले नाहीत. पोलीस केस होऊन जिल्हाधिकाऱ्यांनी नंतर त्यांना वेठबिगारीतून मुक्त केले हे महत्त्वाचे असले तरी दुय्यम आहे. आज मी जेव्हा त्या गावात जातो तेव्हा त्या गावात राजकीय सत्ता हणमंता आणि रामाची, मातंग समाजाची आहे. आता ते ईरण्णावर सत्ता गाजवितात.

'नाही' म्हणावयाची ताकद शिक्षणाने येत नाही. पिढ्यान्‌पिढ्यांच्या संस्काराने शोषितांची मानसिकता बनलेली असते. व्यवस्था नाकारली तर सारा सवर्ण समाज बहिष्कार टाकील, आपली शेरडे, शेळ्यामेंढ्या शिवारात चरू देणार नाही, दुकानात सामान खरेदी करू दिले जाणार नाही, पीठ दळून मिळणार नाही, आपली चोहीकडून कोंडी केली जाईल अशी भीती त्यांच्या मनामध्ये असते. या भीतीमुळे शोषणाला 'नाही' म्हणावयाची त्यांची हिम्मत होत नाही. म्हणूनच गावात शांतता आहे हेच सर्वजण सांगतील. सवर्णही, दलितही आणि आदिवासीही. ज्यांच्यावर अन्याय झाला आहे तेही आणि अन्याय करणारेही.

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यामध्ये गोरख निकाळजे नावाचा राज्यशास्त्रातील पदवीधर तरूण होता. गावात म्हारकी आणि मांगकीचे काम तो करीत असे. हातात दुरडी घेऊन त्याला भाकरतुकडा मागावा लागे. त्यातून स्वत:ची सोडवणूक करून घ्यावयाची त्याची इच्छा होती. त्याच्या विनंतीवरूनच त्याला सोडविण्यासाठी मी त्याच्या गावात गेलो होतो.

गावात सवर्ण आणि दलितांसाठी वेगवेगळी विहीर होती. सवर्ण आणि दलितांसाठी मंदिरेही वेगवेगळी होती. मी त्याला सोडविण्यासाठी गावात आलो आहे हे कळताच त्याच्या घरात रडारड सुरू झाली. गोरखची आई आणि बहीण रडून मला सांगू लागल्या की, ‘‘गावात शांतता आहे, गावात कुणीही आमचे शोषण करीत नाही. आमच्या गावात गावकीची प्रथा नाही, म्हारकीची प्रथा नाही, गोरख भाकरतुकडा मागत नाही.’’ गोरखही त्यांनाच सामील झाला होता.

नंतर माझ्या पद्धतीने दरडावल्यावर आणि समजावल्यावर गोरखने भाकरतुकडा मागत असल्याचे कबूल केले आणि पुढे ते सोडूनही दिले.

पिढ्यान्‌पिढ्यांच्या संस्कारांनी बनलेल्या मानसिकतेचा कल व्यवस्था टिकविण्याकडे असतो. आहे त्या परिस्थितीत बदल होऊ शकेल, आहे त्यापेक्षा चांगले जीवन आपण जगू याबद्धलचा विश्वास नसल्याने एक प्रकारची असुरक्षिततेची भावना शोषितांमध्ये असते. परंपरेने निर्माण केलेले हे भय असते. त्यांना चांगले जीवन जगता येईल असा विश्वास देण्याचे काम संघटकाला करावे लागते.

बदल कोणालाही नको असतो. आहे ती व्यवस्था चालू राहण्यामध्ये आपले हित आहे असे शोषक आणि शोषित दोघांनाही वाटते. बदलामध्ये शोषिताला असुरक्षिततेचे भय वाटते तर शोषकाला आपली सत्ता गमावण्याचे. परंपरागत समाजव्यवस्था व त्यातून आलेली शोषितांची पराजित मनोवृत्ती तशीच राहावी याची व्यवस्था शोषकांनी केलेली असते. कर्मकांडे, पुनर्जन्माच्या, पाप-पुण्याच्या कल्पना या सर्व गोष्टी शोषण करीत राहण्यासाठी, सत्ता अबाधित ठेवण्यासाठी निर्माण झाल्या. याशिवाय राजकीय हितसंबंध, राजकीय सत्ता, धर्म, बळ, संपत्ती याद्वारे शोषक शोषितांवर अधिसत्ता गाजविण्याचा प्रयत्न करीत असतो. शोषितांनी आव्हान दिल्याशिवाय सहजासहजी शोषक आपल्या हातातील सत्ता जाऊ देत नाहीत. अनेक कारणांमुळे शोषितही असे आव्हान देण्यास धजावत नाहीत. शोषितांची संघटना बांधताना संघटकाला शोषणाच्या पुढील कारणांचा विचार करावा लागतो.

**अर्थसत्ता :**

अर्थसत्ता अधिसत्ता गाजवत असते. शोषक हा शोषितापेक्षा आर्थिकदृष्ट्या जास्त ताकदवान असतो. समाजातला नेक, इमानदार माणूस नव्हे तर ज्याच्याकडे पैसा, बंगला, गाडी असेल तो प्रतिष्ठित समजला जातो. प्रतिष्ठा मानवी मूल्यांशी नव्हे तर संपत्तीशी जोडलेली असते. गावामध्ये आर्थिक सुबत्ता असलेल्या माणसाकडे प्रतिष्ठा आपोआप येते. प्रशासक, पोलीस जेव्हा त्या गावामध्ये जातात तेव्हा त्यांचे उठणे-बसणे, जेवण-खाणे, संपर्क हे त्या प्रतिष्ठितासोबत असते. तहसीलदार गावामध्ये गरीब मजुराकडे जाऊन बसणार नाही, गावातल्या धनदांडग्याकडे तो जाईल.

स्वाभाविकपणे ज्याच्याकडे पैसा आहे त्याच्याकडे जमीनही जास्त असणार. छोट्या शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा भागविण्याचे काम हा प्रतिष्ठितच करीत असणार. गावातले मजूर मजुरीसाठी त्याच्यावर अवलंबून असणार. किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे संबंध हा कायदा मोडणाऱ्या या प्रतिष्ठितासोबतच अधिक असणार. गरिबांची संघटना करीत असताना या अर्थसत्तेला आव्हान देण्याचे पहिले काम संघटकाला करावे लागते. ज्याच्याकडे सत्ता आहे तो गावाच्या सर्व नाड्या आपल्या हातामध्ये ठेवीत असतो, याचे भान संघटकाला ठेवावे लागते.

**जात :**

आपला सामाजिक पोत हा जातिव्यवस्थेशी निगडित आहे आणि शोषणाशी जातिव्यवस्थेचा थेट संबंध आहे, हे संघटकास विसरता येणार नाही. जाती निर्मूलन व्हावे असे संघटकास कितीही वाटले तरी जातींचे वास्तव स्वीकारणे संघटकाला अपरिहार्य आहे. जातिव्यवस्था केवळ हिंदू धर्माचेच नव्हे तर संपूर्ण भारतीय समाजाचे अविभाज्य अंग आहे.

हिंदू धर्मातून धर्मांतरित होऊन इतर धर्मांत गेल्यानंतरसुद्धा जातिव्यवस्थेने त्या धर्मांतरितांचा पाठलाग सोडलेला नाही. खरे तर हिंदूधर्म वगळता इतर धर्मांमध्ये जातिव्यवस्था नाही. बौद्ध धर्म तर जातिव्यवस्थेच्या विरोधातच. परंतु या सर्व धर्मांमध्ये ज्या मूळ जातीतून लोक धर्मांतरित झाले, त्या जाती आजही तशाच्या तशा टिकून आहेत. अनेक ठिकाणी जातीजातींची मंदिरे, चर्च वेगवेगळी आहेत.

जातिव्यवस्था शोषणावर आधारलेली आहे. अशी व्यवस्था भारतामध्ये आहे, याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. शुद्धता, पावित्र्य, योनिशुचिता मानणारी विवाहसंस्था जातिव्यवस्थेवर आधारीत आहे. त्यामध्येच या सर्व विषमतेचे बीज पेरलेले आहे.

**दैववाद :**

परंपरा व व्यवस्थेमुळे निर्माण झालेली परिस्थिती हताशपणे स्वीकारण्याकडे लोकांचा कल असतो. पाप, पुण्य, पुनर्जन्म, मोक्ष, या व अशा दैववादाच्या संकल्पनांमुळे लोकांचा आत्मविश्वास जागृत होत नाही. संघटना बांधताना कुणीतरी येईल आणि आपले भले करील ही मानसिकता बदलावी लागते. यासाठी ज्यांची संघटना बांधावयाची त्यांना स्वत: प्रयत्न करण्यास उद्युक्त करावे लागते. ते प्रयत्न करीत असताना त्यांना यश मिळावे यासाठी संघटकाला परिश्रम घ्यावे लागतात. यामुळे स्वत:च्या कृतीवरचा त्यांचा विश्वास दृढ होतो.

'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' ही मानसिकता झुगारून 'केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे' हा विचार दृढ करणे हे संघटकासमोरील आव्हान असते. 'हीन मी सामर्थ्य नाही, तेज ना ऐसे नसू दे, मीच माझा शक्तिदाता, वादळांना थोपवू दे' हा विश्वास शोषितांना सातत्याने देत राहावा लागतो.

**मानसिकता :**

परंपरेने शोषित समाजाची, कनिष्ठ स्तरावरील लोकांची पराभूत मानसिकता तयार झालेली असते. मी जिंकूच शकत नाही, मला काही भविष्य नाही, दैवाने जे दिले आहे ते निमूट स्वीकारल्याशिवाय पर्याय नाही असे ते हतबल असतात. आपल्या आयुष्यात काही बदल होईल अशी आशा त्यांना नसते. आपण आदिवासी, दलित असल्याचा न्यूनगंड या शोषित समाजामध्ये तयार झालेला असतो त्याला आव्हान देणे हे फार महत्त्वाचे आहे. मी जिंकू शकतो, मला काही भविष्य असू शकते, माझे जीवन आजच्यापेक्षा उद्या सुखमय होऊ शकते, असे स्वप्न दाखविणे आणि पराभूत मानसिकतेतून शोषिताला बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करणे हे संघटकासमोर मोठे आव्हान असते.

समाजव्यवस्थेचे बळी ठरलेल्यांनाच त्यांच्या परिस्थितीसाठी दूषणे न देता, व्यवस्थेला 'नाही' म्हणण्याचे सामर्थ्य, मानसिक मुक्तीचे बळ देण्याचे कौशल्य संघटकाला विकसित करावे लागते.

**शिक्षेचे भय :**

लोक बंडखोरी करायला किंवा नवा विचार स्वीकारायला तयार होत नाहीत. समाज आपल्याला शिक्षा करील या भीतीपोटी लोक बदलासाठी तयार होत नाहीत. सामाजिक बहिष्कार, हल्ले अशा निरनिराळ्या शिक्षांचा अवलंब समाज अनेकदा करीत असतो. या

शिक्षेला तोंड देण्याची तयारी करवून घेणे यात संघटकाचे कौशल्य असते. शिक्षेचे भय हा संघटना बांधणीमधला फार मोठा अडथळा असतो.

**स्थित्यंतराचे भय :**

स्थित्यंतर म्हणजे एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेमध्ये जाणे. वेठबिगार मुक्तीच्या बाबतीत या स्थित्यंतराचा विचार करावयाचा झाल्यास वेठबिगार या अवस्थेतून मुक्त मजूर या अवस्थेत जाण्याचा काळ. मुक्त झाल्यानंतर आपणास कोठेही जाण्याची मुभा असेल, आपल्यावर कोणाचेही दडपण, सत्ता नसेल याची त्याला जाणीव असते. ते स्वातंत्र्य त्याला हवे असते. परंतु आहे त्या अवस्थेमध्ये, वेठबिगारीमध्ये आपले भले करणारी नसली तरी एक सुरक्षितता आहे असे त्याला वाटते. त्या सुरक्षित वातावरणातून स्वातंत्र्याकडे जाणे याचा अर्थ वेगळ्या अर्थाने असुरक्षिततेकडे जाणे आहे असे त्याला वाटते.

त्याच्या जीवनामध्ये जो बदल होणार असतो तो अदृश्य आणि अमूर्त असतो. एका अर्थाने ते स्वप्न असते. परंतु स्वप्न पाहण्याचीही क्षमता त्याच्याकडे नसते. स्वप्न पूर्ण होताना येणाऱ्या अडथळ्यांमध्ये संघटना तुला साथ देईल हा विश्वास त्याच्या मनामध्ये निर्माण करावा लागतो. संघटना त्याच्या पाठीशी आहे असा विश्वास त्याला दिला तर हा अवघड कालखंड तो सहज पार करू शकतो आणि नव्या जीवनाकडे वाटचाल करू शकतो.

स्थित्यंतराचा कालखंड लढ्यात सर्वात महत्त्वाचा असतो. त्या कालखंडामध्ये शोषितांना असुरक्षितता जाणवू न देता संघटित शक्तीच्या बळावर आपण सुरक्षित वातावरणाकडे जाऊ शकतो, हा विश्वास देणे महत्त्वाचे असते. ज्यांच्या जीवनात बदल घडवून आणावयाचा आहे त्यांच्यासोबत संघटक हा स्थित्यंतराचा काळ कशा पद्धतीने व्यतीत करतो आणि त्यांना कशा पद्धतीने मानसिक सामर्थ्य मिळवून देतो यावर लढ्याचे यश अवलंबून असते.

*******

# दिशा-निश्चिती

एक जण खड्ड्यात पडतो. रात्रभर त्याला खड्ड्यातच राहावे लागते. सकाळी तेथून जाताना दुसरा एकजण त्याला बघतो. त्याच्या मनात करुणा निर्माण होते. तो विचार करतो याला रात्रभर काही खायला मिळाले नसेल, प्यायला मिळाले नसेल, उपाशी दिसतो. असा विचार करून तो त्याची खायची, प्यायची व्यवस्था करतो. पुन्हा येण्याचे आश्वासन देतो. दुसरा येतो, पाहतो. ''अरेरे कसा पडलास तू ?... फार वाईट झाले'' म्हणतो आणि निघून जातो. तिसरा येतो, ''कसा पडलास तू ? घरातून कसा निघालास ? किती वाजता निघालास ? तुझ्या घरी कोण कोण असते ?'' इत्यादी माहिती संकलित करून तो खड्ड्याची लांबी-रुंदी मोजतो, संशोधन करायला लागतो. त्यावर तो अहवाल लिहायला निघून जातो. चौथा येतो. तो त्याच्याकडे पाहतो, त्याला फक्त हात देतो आणि त्याला खड्ड्याबाहेर काढतो.

**सामाजिक बांधीलकी :**

'सामाजिक बांधीलकी' हा शब्द आपण नेहमी वापरतो. आजूबाजूच्या सामाजिक, राजकीय परिस्थितीचा परिणाम, कुटुंबव्यवस्थेचा परिणाम, व्यक्तीवर होत असतो. व्यक्तीला या सर्वातून आलेली समज व त्यातून तिने केलेले सामाजिक परिस्थितीचे विश्लेषण यातून त्या व्यक्तीची समाजाप्रती बांधीलकी बनत असते.

आजूबाजूच्या परिस्थितीने अस्वस्थ झालेले, व्यवस्थेमध्ये काहीतरी दोष आहे, काहीतरी व्यंग आहे, असे जाणवलेले परिस्थती बदलून नवा समाज निर्माण करण्याचे स्वप्न पाहू शकतात. ते कार्यप्रवण झाल्यास त्यांचे स्वप्न कृतीतही उतरवू शकतात. सामाजिक बांधीलकीच ज्यांच्याकडे नाही, समाजाबद्दलची आस्था, समाजाचे ऋण फेडण्याची मानसिक प्रबळ इच्छा ज्यांच्याकडे नाही ते नव्या समाजाचे स्वप्नही पाहू शकणार नाहीत.

**कृतिशीलता** :

सामाजिक कार्याला निरनिराळ्या छटा आहेत. प्रत्येकजण वेगवेगळ्या दृष्टिकोनातून समाजातील दु:ख, दारिद्र्य, वेदना व दैन्य याकडे पाहतो. काहींच्या मनात करुणा निर्माण होते. ज्यांच्या मनात करुणा निर्माण होते ते प्रामुख्याने सेवेचे काम करतात. काहींच्या मनामध्ये सहानुभूती निर्माण होते, ते थोडा वेळ विचार करतात, काहीतरी करावे असे म्हणतात परंतु फार काही करू शकत नाहीत. काहींच्या मनामध्ये या परिस्थितीचे विश्लेषण करावे असे येते. ते खूप विचार करतात, संशोधन करतात आणि अहवालरूपाने त्याचे प्रकाशन करतात. काहींच्या मनामध्ये या परिस्थितीबद्दल चीड निर्माण होते. ज्यांच्या मनामध्ये समाजातील दु:ख, दैन्य बघून चीड निर्माण होते व ही परिस्थिती बदलण्यासाठी जे प्रयत्न करतात अशा हात देणाऱ्या संघटकांसाठी हे पुस्तक आहे. याचा अर्थ आधीचे मार्ग चुकीचे आहेत आणि हाच एक मार्ग बरोबर आहे असाही माझा दावा नाही.

जे दु:खात आहेत, दारिद्र्यात आहेत त्यांना हात देऊन वर काढण्याची गरज आहे. कारुण्य, सहानुभूती या सर्व भावनांचे कृतीमध्ये रूपांतर व्हावे लागते. अधिकारांचा संबंध असतो तेव्हा करुणेचा, दयेचा संबंध येत नाही. अधिकार प्राप्त करून देण्यासाठी काही गोष्टींचे विश्लेषण, संशोधन करावे लागते. आजूबाजूच्या परिस्थितीचे अवलोकन करणे, अधिकार कोणते आहेत? ते का मिळत नाहीत? याचे संशोधन व विश्लेषण करणे आवश्यक असते, मात्र कृतीची जोड मिळाल्याशिवाय त्यास अर्थ प्राप्त होत नाही.

अस्वस्थ असणाराच संघटना बांधू शकतो. शांतपणे केवळ विश्लेषण करणारा संघटक बनू शकत नाही. अस्वस्थ असणे म्हणजे आहे ती परिस्थिती बदलण्यासाठी मला काहीतरी केले पाहिजे याची प्रखर जाणीव असणे.

वास्तव समजून घेतल्याशिवाय 'उद्या' कसा हवा याचा विचार करता येणार नाही. काहीजण स्वप्नामध्ये वावरतात. ते वास्तव समजूनच घेत नाहीत.

एका लहान मुलाला, ''तुला काय व्हायचे आहे?'' असे विचारले असता तो म्हणाला ''मला फुटबॉलपटू व्हायचे आहे.'' कालांतराने तो महाविद्यालयामध्ये गेला. तिथेही त्याने आपली फुटबॉलपटू होण्याची महत्त्वाकांक्षा असल्याचे सांगितले. नोकरीतून निवृत्त झाल्यावर पुढे काय करणार असे विचारले तेव्हाही तो आपल्याला फुटबॉलपटू व्हायचे असल्याचेच म्हणाला. एकाने त्याला विचारले, ''तू फुटबॉल कधी पाहिला तरी आहेस का?'' खेळणे राहिले बाजूला, त्याने फुटबॉलही पाहिलेला नव्हता.

आपण महत्त्वाकांक्षा खूप बाळगली मात्र त्यासाठी काही केले नाही तर आपले स्वप्न हे स्वप्नच राहणार आहे. ते कधीच प्रत्यक्षात उतरणार नाही.

**बदलाची साधने :**

आजच्या परिस्थितीतून उद्याच्या परिस्थितीकडे जायचे असेल, उराशी बाळगलेले उद्याच्या समाजाचे सुंदर स्वप्न प्रत्यक्षात आणण्याचा ध्यास असेल, ज्या उद्यामध्ये आजचे वास्तव नसेल त्या स्वप्नाकडे जाण्यासाठी संघटकास प्रयत्न करावे लागतील. स्वप्नाची पूर्तता करण्यासाठी काहीतरी वाहन पाहिजे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी काहीतरी साधन लागेल, वाहन लागेल, हत्यार लागेल. ही वाहने विविध प्रकारची असू शकतील. परिस्थितीनुरूप वाहने बदलावी लागतात. हत्यारे बदलावी लागतात, साधने बदलावी लागतात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संत तुकडोजी महाराजांनी सांगितले होते, 'घर घर में यही कहना होगा, अब साधन ही बदलना होगा.' स्वातंत्र्यापूर्वी जो शत्रू होता तो आता राहिला नाही. आता गरिबाचा शत्रू घरातलाच आहे. या शत्रूशी लढण्यासाठी साधने बदलावीच लागतील. मनामध्ये व्यवस्थेबद्दल चीड निर्माण झाल्यानंतर, संघटकाला साधनांचा विचार करावा लागतो.

**संघटना : एक साधन**

समाज बदलण्याचा विचार कृतीशिवाय प्रत्यक्षात उतरविता येत नाही. विचारांना सामर्थ्य देण्याची आवश्यकता असते. सामर्थ्य उभे करण्याचे मार्ग अनेक असू शकतील. संघटनेचे वाहन घेऊन अधिकाधिक शक्ती उभी करायची हा त्यातला एक मार्ग आहे. 'आपले म्हणणे केवळ सत्याचे असून भागणार नाही, सत्यामागे संघटनेचे सामर्थ्य उभे केले पाहिजे.' हे श्रद्धेय एस. एम. जोशी यांचे उद्‌गार हा गुरुमंत्रच म्हणावा लागेल.

'जगातल्या कामगारांनो एक व्हा,' असे सांगून कामगार एकत्र येत नाहीत. लोकांना एकत्र आणण्यासाठी दैनंदिन व्यवहारामध्ये प्रकर्षाने जाणवणारा एखादा मुद्दा आपल्याला निवडावा लागतो. अंतिम ध्येय, उद्दिष्ट यासाठी लोक एकत्र येणार नाहीत. ते स्वप्नवत असते. लोकांना ते जाणवत नाही. रोजच्या आयुष्याशी निगडित अनेक मुद्यांची लोकांना काळजी लागून राहिलेली असते. त्या मुद्यांबाबत त्यांना प्रेम असते, राग असतो, चीड असते. हा राग, प्रेम, चीड संघटित करावयाची म्हणजे लोकांना संघटित करावयाचे.

असे रोजचे जाणवणारे मुद्दे लोकांकडे जाऊन शोधावे लागतील. त्या मुद्द्यांची सोडवणूक करीत करीत पराभूत मानसिकतेतून, 'आम्ही जिंकू शकतो' ही भावना

त्यांच्यामध्ये निर्माण करावी लागेल. हळूहळू ध्येयप्राप्तीकडे त्यांना न्यावे लागेल. एखाद्या मुद्यावर त्यांना एकत्र आणायचे, पण तेथेच न थांबता, एका मुद्याकडून दुसऱ्या मुद्याकडे, दुसऱ्या मुद्याकडून तिसऱ्या मुद्याकडे, असे त्यांना न्यावे लागेल.

एखाद्या गावातल्या शाळेत शिक्षक येत नाहीत. मुलांना शाळेत शिकविण्यासाठी शिक्षक नाहीत हा मुद्दा आहे. तेव्हा प्रथमत: जर संघटकाला काही करावयाचे असेल तर शाळेत शिक्षक आणावयाचा आहे. संघटक लोकांना एकत्रित करून ज्या वेळेला त्या शाळेला शिक्षक मिळवून देईल तेव्हा लोकांचा स्वत:वरचा विश्वास वाढेल आणि ते संघटित व्हायला सुरुवात होईल. तो प्रश्न लोकांच्या हाती दिल्यानंतर, त्यासाठी लोकांनी धडपड केल्यानंतर लोकांना यश मिळाले पाहिजे. ज्या वेळेला लोक त्या यशामध्ये भागीदार बनतील तेव्हा संघटना उभी राहायला सुरुवात होईल.

मुद्दा शिक्षकाचा, रेशनिंग कार्डचा, दुकानात धान्य नसल्याचा, जमिनीचा किंवा मजुरीचा असेल पण संघटकास अंतिम उद्दिष्टांचा विसर पडता कामा नये. लोकांना भेडसावणारा व ज्यात थोड्याशा प्रयत्नानंतर यश मिळेल असा कोणताही मुद्दा घेऊन लोकांना संघटित करण्यास सुरुवात करता येईल. त्या मुद्द्यावर मिळालेल्या यशानंतर लोकांना संघटित ठेवून ध्येयपूर्तीसाठी वाटचाल करणे ही संघटनेची प्रक्रिया असावयास हवी.

एक मुद्दा घेतला तो सोडवला, दुसरा मुद्दा घेतला तो सोडवला, परंतु असे करताना लोकांचा त्यात सहभाग घेतला नाही, लोकांना संघटित केले नाही तर ती वेगळ्या अर्थाने दुकानदारी होईल. लोक फक्त प्रश्न सोडवून घेण्यासाठी येतील आणि जातील. त्यातून संघटना उभी राहणार नाही. अंतिम उद्दिष्टपूर्तीकडे जाण्यासाठी या प्रयत्नांना आकार दिला, रचना केली, नियम बनविले तरच प्रयत्नांना संघटनात्मक रूप देता येईल.

**संघटनेला पर्याय :**

संघटनेशिवायही प्रश्न सोडविण्याचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत. त्यापैकी एक मार्ग दानधर्माचा, सेवा प्रकल्प राबविण्याचा असू शकेल. जवळपास प्रत्येक धर्मात दानाचे महत्त्व आहे. ज्यांच्याकडे आहे त्यांनी, ज्यांना गरज आहे त्यांना देणे ही एक नैसर्गिक प्रक्रियाच आहे. मात्र देताना देणाऱ्याचा हात नेहमी वर आणि घेणाऱ्याचा हात नेहमी खाली असतो. त्याच्याकडे अधिक का आले ? याचा विचार घेणारा करीत नाही आणि माझ्याकडे अधिक का आले ? याचा विचार देणारा करीत नाही. या ठिकाणी विचाराला शक्यतो फाटा दिलेला असतो.

दुसरा मार्ग विकासात्मक कामांचा असतो. विकासात्मक कार्यक्रमांमध्ये आरोग्याचे, शिक्षणाचे, ग्रामीण विकासाचे, पाणलोट विकासाचे प्रकल्प राबविले जाऊ शकतात. असे विकासात्मक कार्यक्रम सरकारी यंत्रणेच्या सहाय्याने किंवा स्वतंत्रपणे घडवून आणता येतात. मात्र यामध्ये प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देण्याचा प्रश्नच नसतो. सत्तेला आव्हान द्यावयाचे नसल्याने समाजाचा सहभाग अशा कार्यक्रमांमध्ये चांगला मिळतो.

तिसरा मार्ग संशोधन, अध्ययनाचाही असू शकतो. परिस्थिती कशी आहे? या परिस्थितीला कोण जबाबदार आहे ? ही परिस्थिती का निर्माण झाली ? याबाबतचा अभ्यास संशोधन प्रकल्पाद्वारे केला जाऊ शकतो. अलीकडे सहभागी संशोधनाचे तंत्रही विकसित झालेले आहे. संशोधन तंत्राचा वापर जर योग्य केला गेला, त्याला कृतीची जोड मिळाली तर संघटनावाढीच्या प्रक्रियेत त्याचा उपयोगही होऊ शकतो.

संघटनेला पर्याय म्हणून ज्या मार्गाचा वापर अलीकडे मोठ्या प्रमाणावर होतो तो मार्ग आहे, जनहित याचिकेचा. भारतीय राज्यघटनेने बहाल केलेले अधिकार जनहित याचिकेद्वारे मिळविता येऊ शकतात. काही वेळा हा एक प्रभावी मार्ग ठरू शकतो. मात्र या मार्गाची मर्यादा एवढीच की यामध्ये लोकांचा सहभाग फार मर्यादित असतो. निर्णय देणारे, निर्णयाचा प्रतिवाद करणारे, युक्तिवाद करणारे असे अत्यंत मर्यादित लोक या प्रक्रियेत सहभागी असतात. या मार्गाने यश मिळाले तरी लोक संघटित होण्याची व त्यांना स्वत:च्या ताकदीची जाणीव होण्याची मर्यादित क्षमता या मार्गात आहे.

आपला दबाव किंवा प्रभाव वापरून लोकांचे प्रश्न सोडविण्याचा पाचवा पर्याय असू शकतो. ज्यांच्याकडे ताकद असते असे नेते त्यांचा दबाव किंवा प्रभाव वापरून लोकांचे प्रश्न सोडवून घेत असतात. यामुळे लोकांचे प्रश्न सुटले तरी प्रश्न सोडविण्याची ताकद लोकांमध्ये येत नाही.

सहावा आणि अलीकडे फार लोकप्रिय ठरत असलेला पर्याय आहे धोरणकर्त्यांसोबत काम करण्याचा. ज्याला 'ॲडव्होकसी' म्हटले जाते. धोरणकर्त्यांपर्यंत प्रश्न नेऊन पोहोचविण्याचे, लोकशाहीतील विविध व्यासपीठांचा उपयोग करून लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम संघटनेला पर्याय असू शकते. यामध्येही लोकांचे प्रश्न सुटावयास मदत होत असली तरी लोकांच्या पाठबळाशिवाय हे प्रश्न यशस्वीरीत्या सुटतीलच असे नाही.

स्वत:चे प्रश्न स्वत: सोडविण्यासाठी लोकांकडे हवी असणारी ताकद संघटनेशिवाय इतर पर्यायांमध्ये नाही. या विविध पर्यायांमधून लोकांचे काही प्रश्न सुटले तरी प्रश्न

सोडविण्याची ताकद लोकांना प्राप्त होत नाही. विशेषत: स्वातंत्र्यानंतर प्रश्नांची सोडवणूक करण्यासंदर्भातील लोकांची मानसिकता बदललेली दिसते. स्वातंत्र्यापूर्वी श्रमदानातून शाळा, साफसफाई, रस्ते यांची कामे होत. स्वातंत्र्यानंतर मात्र ही सर्व कामे शासनाची जबाबदारी बनली. आपल्या दारातला कचराही साफ न करण्याकडे लोकांचा कल वाढायला लागला. एखादी गोष्ट मिळविण्यासाठी स्वत: परिश्रम करण्याऐवजी इतर पर्यायांच्या माध्यमातून सहजतेने ती गोष्ट मिळविण्याकडे कल वाढू लागला. संघटनेची प्रक्रिया मात्र याहून भिन्न असते. तुमच्या आयुष्यात तुम्हाला स्वत: बदल करावा लागेल, त्यासाठी जे आहे ते सोबत घ्यावे लागेल, हा विचार संघटनेमध्ये अत्यंत महत्त्वाचा ठरतो. प्रश्न सोडविण्याची ताकद लोकांमध्ये निर्माण होते.

**गरिबांची ताकद :**

गरीब माणसांची संघटना बांधताना त्यांच्या ताकदीचा आपल्याला विचार करावा लागतो. वर वर पाहता कुणालाही गरिबांकडे कुठे ताकद असणार असेच वाटू शकते.

कार्ल मार्क्स म्हणाले होते, 'दे हॅव नथिंग टू लूज, बट द चेन', गरिबांकडे साखळदंडाशिवाय गमावण्यासारखे काहीच नसते. गरिबांना काहीच गमवायचे नसते हीच त्यांची फार मोठी ताकद आहे. वेगळ्या अर्थाने जेव्हा धोका स्वीकारण्याची वेळ येते तेव्हा त्यांच्याकडे गमावण्यासारखे काही नसते. ते कुठल्याही प्रकारचा धोका पत्करायला तत्पर असतात.

गरीब वेळ द्यायला तयार असतात. आपल्या मुलांच्या भवितव्याकरिता आपल्याला काहीतरी करणे आवश्यक आहे हे स्वप्न जर त्यांना दिले तर ते आजची भाकर सोडूनसुद्धा संघटनेकरिता वेळ देतात. एकदा का ते प्रेरित झाले की, मागे-पुढे न पाहता पडेल ते काम करावयाची गरिबांची तयारी असते. विरोधक जितकी दडपशाही करतो त्याला तितक्याच कडवटपणे लोक उत्तरे देतात. अशा अहिंसक प्रतिकारातून लोकांची जिद्द वाढत जाते.

भिवंडी तालुक्यातील वेढे गावात किमान वेतनासाठी संप पुकारला होता. एकही मजूर शेतात कामाला जात नव्हता. संघटनेच्या जाहीर सभेवर पोलिसांनी व तहसीलदारांनी मालकांना साथ देण्याच्या उद्देशाने बंदी आणली. कायद्याची अंमलबजावणी करण्याऐवजी प्रशासन मालकाला साथ देत आहे म्हणून संघटनेची संघटक सचिव, संगीता कोपर्डेने लोकांसोबत बंदीहुकूम मोडून सभा घेतली. सभा संपल्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला व ११ जणांची नावे मागितली. तेव्हा लोकांनी ११ जणांऐवजी सर्वांवर गुन्हा दाखल करा आणि आताच अटक करा असा आग्रह धरला. पोलिसांनाही

माघार घेता आली नाही. अटक करून नेण्यासाठी वाहने मागवण्यात आली. अटकेच्या वेळी काही महिला घराकडे निघाल्या, पोलिसांनी त्यांना अडवले. महिला म्हणाल्या,'' तुम्हाला काय वाटते आम्ही पळून चाललो? अंगावरची पिणारी मुले आमच्या घरी आहेत त्यांना घेऊन तुरुंगात जायला येतो.'' आणि त्या आठ-दहा महिला आपल्या तान्ह्या बाळांना घेऊन तुरुंगात गेल्या.

आपल्याकडे जे आहे ते स्वत:साठी न ठेवता दुसऱ्याला देण्याची संस्कृती गरिबाकडे असते. ही संस्कृती संघटनेसाठी फार महत्त्वाची असते. आपल्याला सर्व काही एकदमच मिळाले पाहिजे, अशी गरिबांची सहसा अपेक्षा नसते. ते थांबावयाला तयार असतात. आपल्याला हवे ते मिळविण्यासाठी काही काळ जावा लागेल, ही समज व सहनशक्ती गरिबांमध्ये मोठ्या प्रमाणात असते.

आयुष्यातला संघर्ष त्यांच्यासाठी नवा नसतो. हालअपेष्टा सहन करण्याची त्यांची मानसिक तयारी असते. त्यांच्या जीवनाचा संघर्ष हा अविभाज्य भागच बनलेला असतो. त्यामुळे संघटनेसाठी परिश्रम करण्यात त्यांना गैर वाटत नाही. त्यातून काहीतरी नवे निर्माण होणार आहे याचा आनंद त्यांना असतो.

त्यांच्या दारिद्र्यामुळे साधनांचा योग्य आणि पुरेपूर वापर कसा करावयाचा याची त्यांना उत्तम जाणीव असते. संघटना बांधणीत हे फार महत्त्वाचे ठरते.

गरिबांचे आपल्या संघटकावर जिवापलीकडे प्रेम असते. संघटकावर त्यांचा गाढा विश्वास असतो. ते त्या विश्वासाला तडा जाऊ देत नाहीत. संघटकाला त्या विश्वासाला जागावे लागते.

**मुद्द्याचा शोध :**

मुद्द्यांवर संघटना बनत जाते आणि मुद्द्यांच्या आधारावर ती टिकते. संघटना बांधणीच्या सुरुवातीच्या काळामध्ये मुद्दा कसा शोधायचा, कोणता मुद्दा घ्यायचा, कोणता मुद्दा घ्यायचा नाही या निर्णयांवर संघटनेचे यश अवलंबून असते. लोकांचे मुद्दे समजून घेतल्याशिवाय संघटना बांधणी करता येत नाही. यासाठी लोकांना काय चिंता आहेत, लोक काय विचार करतात, लोकांना कसली काळजी वाटते, लोकांना कसली भीती वाटते, या सर्वांचा विचार संघटकाला करावा लागतो.

लोकांना त्या त्या वेळेस महत्त्वाचा वाटेल तो तो मुद्दा संघटनेसाठी महत्त्वाचा असू शकतो. उदाहरणार्थ प्राथमिक शिक्षण कितीही महत्त्वाचे आहे असे संघटकास वाटत असले तरी जर ते लोकांना महत्त्वाचे वाटत नसेल तर संघटना बांधणीसाठी प्राथमिक शिक्षण हा मुद्दा

होऊ शकणार नाही. लोकांना कालांतराने प्राथमिक शिक्षणाच्या मुद्द्यांकडे न्यावे लागेल. संघटकाला काय वाटते यापेक्षा लोकांना काय वाटते याचा विचार आधी करावा लागतो. संघटकाच्या मनामध्ये न्यायाबद्दल चाड आणि अन्यायाची चीड असेल तर त्याला मुद्द्याचा शोध लागू शकतो. मुद्द्याचा शोध घेण्यासाठी संघटक किती उत्सुक आहे हेही महत्त्वाचे ठरते.

दहिसर गावामध्ये जेव्हा आम्ही तरुणांकडून स्पर्धांची तयारी करून घेत होतो त्यावेळी काही तरुण सरावासाठी नियमितपणे येत नव्हते. खरे म्हणजे त्यांच्याकडे दुर्लक्ष करूनही आम्ही पुढे जाऊ शकलो असतो. ते खेळायला का येत नाहीत हा प्रश्न जर आम्ही विचारला नसता, तर ते वेठबिगारीत असल्याचे आम्हाला तेव्हाही समजले नसते.

संघटकामध्ये अन्यायाची चीड हवी, त्याच्याकडे ऐकण्याची कला हवी, चौकस बुद्धी हवी, तशी चांगले प्रश्न विचारण्याचीही क्षमता हवी. ज्याप्रमाणे डॉक्टर रोगाचे योग्य निदान करू शकला तरच प्रभावी उपचार करू शकतो तसेच संघटकाचे असते. चांगले बोलण्यापेक्षा चांगले ऐकणे, केवळ बघणे नव्हे तर निरीक्षण करणे आणि योग्य प्रश्न विचारणे कोणत्याही संघटकासाठी अत्यावश्यक असते.

**संवादातून मुद्द्याचा शोध :**

लोकांशी संवाद साधण्याची कला संघटकाकडे असावी लागते. त्यासाठी लोकांची दु:खे त्यांच्या भाषेत संघटकाला ऐकता आली पाहिजेत, ती त्याला समजली पाहिजेत. त्यासाठी संघटकाला ऐकण्याचे कौशल्य विकसित करावे लागते. लोक त्यांच्यासमोर असलेले मुद्दे आपल्यासमोर आणतीलच असे नाही. आपल्याला जो मुद्दा महत्त्वाचा वाटतो तो मुद्दा अनेकदा महत्त्वाचा असतोच असे नाही.

एकदा संघटनेच्या कार्यालयात एक जण त्याला मारहाण झाल्याची तक्रार घेऊन आला. एका शेटने त्याला रस्त्यात गाठून मारहाण केली, म्हणून त्याची तक्रार होती. त्याला पोलिसांनी मदत केली नाही. संघटनेने पोलिसांना सांगून शेटवर कारवाई करावी अशी त्याची अपेक्षा होती. माझा त्याच्याशी झालेला संवाद असा:

मी: कोणी मारहाण केली?

तो: आप्पाशेठने.

मी: आप्पाशेठ काय करतो?

तो: मासे विकत घेतो.

मी: तुला कुठे मारले?

तो: पडघ्याच्या बाजारात.

मी: मारहाणीचे कारण काय?

तो: मी त्याला मासे विकले नाहीत म्हणून.

मी: तू त्याला मासे का विकले नाहीस?

तो: बाजारात किलोला तेरा रुपये भाव असताना तो फक्त पाचच देतो म्हणून.

मी: तू त्याला मासे विकले पाहिजेस असे शेठ का सांगतो?

तो: त्याने जाळयासाठी पैसे दिले होते म्हणून.

वर वर मारहाणीची दिसत असलेली त्याची तक्रार प्रत्यक्षात वेठबिगारीची होती. आप्पाशेठ नावाचा दलाल शहापूर परिसरातील अनेकांना जाळयांसाठी काही पैसे देऊन त्यांच्याकडून कमी दरात मासे खरेदी करत असे व त्यांना अन्यत्र मासे विक्रीस मनाई करीत असे. संघटनेच्या कार्यालयात आलेल्या त्या इसमाला त्याच्यासारखेच आप्पाशेठकडे बांधील असलेले अन्य मच्छीमार एकत्र करण्यास मी सांगितले. चार दिवसात त्याने सुमारे तीनशे लोकांना एकत्र केले. संघटनेने या सर्वांची वेठबिगारीतून मुक्तता केली.

प्रश्न विचारणे ही एक कला आहे कारण प्रश्नांना लोक जी उत्तरे देतात त्यावरून परिस्थितीकडे ते कशा पद्धतीने पाहतात हे लक्षात येते. प्रश्नांची उत्तरे देताना त्यांना जो विचार करावा लागतो त्यातून त्यांच्या मानसिकतेमध्ये बदल घडवून, त्यांना संघटना बांधणीच्या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करता येते. एका वेठबिगाराबरोबर माझा झालेला संवाद असा:

मी: तू कधी हॉटेलमध्ये जाऊन चहा घेतला आहेस का?

तो: नाही.

मी: तू कधी हॉटेलमध्ये जाऊन मिठाई खाल्ली आहेस का?

तो: नाही. हो, कधीतरी सणासुदीला मी मिठाई खाल्ली आहे.

मी: तुझी मुली-मुले, शाळेत जातात का?

तो: शाळेत कशी जातील?

मी: तुला मुले किती?

तो: सहा.

मी: त्यातली किती मेली?

तो: दोन.

मी: तुझी मुले काय करतात?

तो: मुलींची लग्ने झाली आणि दोन मुले काम करतात.

मी: तुझी मुलेसुद्धा वेठबिगार आहेत का?

तो: हो.

मी: सकाळी तू किती वाजता उठतोस?

तो: सूर्योदयाच्या आधी.

मी: त्यानंतर तू काय करतोस?

तो: आदल्या दिवशीचे राहिलेले जेवण असेल ते जेवतो आणि कामाला जातो.

मी: तुला इथे किती मजुरी मिळते?

तो: वर्षाला साधारणपणे चारशे किलो तांदूळ मिळतात.

मी: तुझ्या डोक्यावर कर्ज किती आहे?

तो: मी काही हिशोब ठेवला नाही, मालकाकडेच हिशोब आहे.

मी: तू का हिशोब ठेवत नाहीस?

तो: नाही मालकच ठेवतो.

मी: जो सुटा मजूर आहे त्याला किती मिळतात तुला माहिती आहे?

यावर तो काही बोलला नाही.

मी: तू जर हे काम सोडलेस तर तुला सुटच्या मजुरासारखे जास्त पैसे मिळतील हे तुला माहीत आहे का? हे काम तू सोडायला तयार आहेस का?

तो: नाही.

वरकरणी या प्रश्नांचा संबंध लागत नाही. परंतु मी जाणीवपूर्वक हे साधे साधे प्रश्न त्याला विचारले होते. ज्यामुळे मला परिस्थितीचा अंदाज येईल आणि त्या वेठबिगाराच्या विचारांना दिशा मिळेल.

मी: चारशे किलो तांदळाचे पैसे किती होतात माहिती आहे? एक किलो तांदळाचे पाच रुपये म्हणजे वर्षाला तुला दोन हजार रुपये मिळतात.

तो: बरोबर आहे.

मी: सुटच्या मजुराने वीस दिवस काम केले तर दिवसाला पन्नास रुपयांप्रमाणे त्याला महिन्याला हजार रुपये मिळतात आणि तुला महिनाभर, सुटच्या मजुरापेक्षा जास्त वेळ काम करून

दोनशे रुपयेही मिळत नाहीत. म्हणजे तुझे कमीतकमी आठशे रुपये दरमहा मालकाच्या अंगावर राहतात. वर्षाला नक्क हजार सहाशे रुपये राहतात. तू किती वर्षे काम करत आहेस?

तो: दहा वर्षे.

मी: म्हणजे दहा वर्षांचे शहाण्णव हजार रुपये झाले. तुझ्यावर मालकाचे किती कर्ज आहे?

तो: दोन हजार रुपये.

मी: मालकाचे तुझ्या डोक्यावर कर्ज की तुझे मालकाच्या डोक्यावर कर्ज झाले?

तो: मालकाचे माझ्या डोक्यावर.

मी: मालकाचे कसे? अरे, उलट मालकानेच तुला चौऱ्याण्णव हजार रुपये द्यायला हवेत.

तो: बरोबर आहे, पण तो देणार नाही.

मी: उद्या तू त्याला हा हिशोब सांगशील का?

तो: मी कसा सांगू? तो माझे ऐकणार नाही.

मी: तू मजुरी मागू नकोस. तू जनावरासारखा आहेस. जनावर कसे फक्त मालकाची चाकरी करते, जे खायला मिळेल ते निमूट खाते, तक्रार करीत नाही, हो ना? मग तूही तसेच कर.

तो: पण मी जनावर नाही, माणूस आहे.

मी: मग माणसासारखा वाग, मालकाकडे हिशोब माग, सगळ्या कर्जाचा.

तो: मालक मला मारहाण करील.

मी: माणसासारखे जगायचे असेल तर मारहाण सहन कर, नाहीतर जनावरासारखे मर.

तो: मी मरायला तयार आहे. उद्याच जातो मालकाकडे, हिशोब मागतो. कधीतरी मरायचेच आहे, उपाशी राहून मरीन, पण मालकाची गुलामी करणार नाही.

परिस्थितीचे पूर्ण भान आणून देऊन शोषितांच्या मानसिकतेला आव्हान दिल्यास ते स्वत: विचार करू शकतात आणि स्वत:च्या मुक्तीचा मार्ग स्वीकारू शकतात.

मी देशात, परदेशात, ज्या ज्या ठिकाणी गुलामीची प्रथा आहे त्या त्या ठिकाणी लोकांना जे प्रश्न विचारले त्यातील काही प्रश्नांची उत्तरे मला सर्वत्र सारखीच मिळाली.

प्र: तुला तुझा मालक आवडतो का?

उ: होय!

प्र: तो तुला त्रास देतो का? छळतो का?

उ: नाही!

प्र: तू आनंदी आहेस का?

उ: हो!

म्हणजे वेठबिगाराला दिवसरात्र काम करावे लागत असेल, त्याबद्धल त्याला पूर्ण मोबदला मिळत नसेल, त्याच्यावर कामाची सक्ती असेल, त्याच्या मुलाबाळांना शिक्षण नसेल तरीसुद्धा त्याची मालकाबद्दल तक्रार नसते? त्याचा छळ होतो हे त्याला माहीत नसते? तो आनंदी असतो? वरवर दिसताना आपल्याला यात विरोधाभास वाटतो, विसंगती वाटते. परंतु अनेकदा आपण जे शब्द वापरतो त्याचा अर्थ लोकांना समजत असतोच असे नाही. उदाहरणार्थ: छळ. तुझा मालक तुला छळतो का? वेठबिगार असा विचार करत असतो की मालक त्याच्याकडून जे काम करवून घेतो आहे ते त्याचे कामच आहे, त्याने ते स्वीकारलेले असते. त्यामुळे ही अशा पद्धतीची उत्तरे संघटकास मिळू शकतात.

संघटकासमोर येणाऱ्या गरीब माणसाला त्याचे म्हणणे नीट मांडता येईलच याची खात्री नसते. त्याच्याकडे शब्दांच्याही मर्यादा असतात, कशा पद्धतीने सांगावे याच्या मर्यादा असतात. म्हणून संघटकाने कुणीही व्यक्ती समोर आल्यानंतर घाईगर्दीत त्याला काहीही न विचारता प्रथम शांतपणे बसू द्यावे, त्याला प्यायला पाणी द्यावे, शक्य झाल्यास त्याला चहा द्यावा. त्याला मोकळेपणाने बोलता यावे यासाठी आश्वासक वातावरण निर्माण करणे गरजेचे असते. त्याला विश्वास वाटू द्यावा की या ठिकाणी आपण सांगितलेले ऐकले जाईल.

**माहितीतून मुद्द्याचा शोध :**

माहितीअभावी लोकांना त्यांच्या जीवनावर होणाऱ्या अथवा होऊ घातलेल्या परिणामांची जाणीव नसते. अशी माहिती देऊन त्या मुद्द्याभोवती संघटना उभी करता येते. उदाहरणार्थ - सरकारची अन्याय्य धोरणे, कायदे, शासन निर्णय, इत्यादी. बातम्या व लेखांमधूनही संघटकास मुद्द्यांचा शोध घेता येतो. बातम्यांबद्दलचे संघटकाचे विश्लेषण आणि प्रतिक्रिया फार महत्त्वाच्या ठरतात.

मराठवाड्यामध्ये असताना माझ्या वाचनामध्ये एक बातमी आली. एका गावामध्ये अंबादास सावणे नावाच्या एका कोतवालाचा मंदिराच्या पायथ्याशी खून झाला होता. त्याला सात दिवस होऊन गेले होते. पोलीस अधिक्षकांनी गावात शांतता असल्याचे सांगितले आहे, अशी ती बातमी होती. गावकऱ्यांनी अंबादासच्या नावाने काही मुलांना बक्षिसे द्यावयाचे ठरविल्याचे आणि म्हणूनच गावात जातीयता नसल्याचे आणि आता गावात शांतता असल्याचेही बातमीत म्हटले होते.

ही बातमी जेव्हा मी वाचली तेव्हाच माझ्या मनामध्ये शंकेची पाल चुकचुकली. गावामध्ये शांतता आहे, हे पोलीस अधिक्षकांना सांगण्याचे कारणच काय? ज्याअर्थी ते हे सांगताहेत त्याअर्थी गावामध्ये शांतता नाही. गावामध्ये दडपशाही आहे, हे मी ताडले आणि मी त्या गावामध्ये पोहोचलो.

महाराष्ट्राला काळिमा फासणारी घटना परभणी जिल्ह्यातील पिंपरी-देशमुख गावी घडली होती. १५ ऑगस्टच्या दुसऱ्या दिवशीची रात्र अंबादास सावणेची काळरात्र ठरली. अंबादास दलित कोतवाल होता. पोलीस पाटलाने त्याला वेसकरकी दिली होती. त्याला गावाच्या रक्षणासाठी रात्रीची गस्त घालावी लागे. गस्त घालत असताना अचानक पाऊस आल्याने त्याने गावच्या हनुमान मंदिराच्या बाहेरच्या सज्जाचा आसरा घेतला. मंदिरात भजन चालले होते. मंदिरात भजन करीत असलेले देवभक्त त्याच्यावर जनावरासारखे तुटून पडतील व त्याचा जीव घेतील याची काडीमात्र कल्पना अंबादासला नव्हती.

अंबादास भिंतीपाशी पायरीवर उभा राहिला हाच काय तो त्याचा गुन्हा. झाले, भजनकऱ्यांचे टाळ बंद पडले. परमेश्वर भक्तीसाठी चालणाऱ्या हातांनी टाळाऐवजी मंदिराच्या शीळाच हाती घेतल्या, काठ्या घेतल्या. ''महाराची हिम्मत कशी झाली मंदिराची पायरी चढण्याची,'' असे म्हणत अंबादासच्या अंगावर ते हिंस्त्र श्वापदासारखे तुटून पडले. अंबादास माफी मागत होता, पाय धरीत होता, कुणीतरी वाचवावे म्हणून आक्रोश करीत होता. एकाही ईश्वरभक्ताला 'प्राणिमात्रावर दया करावी' असे वाटले नाही. तो बेशुद्ध पडला तरी मारहाण सुरूच होती. त्याच्या छातीवर व डोक्यावर मोठे दगड घालून त्याचे डोके अक्षरश: ठेचून काढले.

अंबादासच्या हत्येनंतर सारा दलित समाज भयभीत झाला. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला परंतु अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील कलमे लावली नाहीत. अस्पृश्यतेतून खून झाल्याने दडपण्याचा प्रयत्न केला गेला. राजकीय मंडळींच्यामार्फत हे सर्व दडपण्याचा प्रयत्न चाललेला होता. मी थेट अंबादासच्या गावी जाऊन त्याच्या कुटुंबियांची भेट घेतली तेव्हा मला वस्तुस्थिती समजली.

अंबादासच्या भावाला घेऊन मी मंत्रालय गाठले. 'टाइम्स ऑफ इंडिया'ने पहिल्या पानावर हे वृत्त ठळकपणे प्रसिद्ध केले. दिल्लीत प्रसिद्ध झालेल्या या वृत्ताने संसद हादरली. संसदेची दोन्ही सभागृहे सतत चार दिवस बंद पडली. पिंपरी-देशमुखला केंद्रातील व राज्यातील मंत्र्यांच्या भेटी सुरू झाल्या. मानवी हक्क अभियान व श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या दालनात धडक मारली. अंबादासचे मारेकरी खुनाच्या आरोपातून निर्दोष सुटले तरी अत्याचार प्रतिबंधक कायद्याखाली त्यांना सात वर्षांची सजा झाली. अंबादासच्या मृत्यूनंतर राज्यात अत्याचार प्रतिबंधक कायद्याचा अंमल सुरू झाला.

**माहितीची खातरजमा :**

आपल्याकडे आलेली माहिती संघटकाला तपासून पाहावी लागते. एखादी व्यक्ती येऊन एखादी घटना आपल्याला सांगते तेव्हा त्यावर विश्वास ठेवताना त्याच घटनेला अन्य कंगोरे असू शकतात, याचे भान संघटकाला ठेवणे आवश्यक असते. अनेकदा तत्काळ प्रतिसाद देणे आवश्यक असले तरी सारासार विचार करणेही आवश्यक असते.

एकजण सकाळीच माझ्याकडे रडतरडत आला. त्याच्या हातामध्ये बायकोच्या साडीचा जळलेला पदर होता. तो मला सांगू लागला की त्याच्या बायकोला त्याच्या मालकाने जाळले. हे खरोखरच धक्कादायक होते. त्याने मला सांगितले की दोघे मालकाच्या ओटीवर झोपलेले असताना त्याने मध्येच उठून पाहिले तर त्याची बायको गायब झाली होती आणि मग त्याने ती जळताना पाहिली. म्हणून मी ताबडतोब तेथे कार्यकर्ते पाठवून दिले. त्याने जागा दाखवली, काहीतरी जाळले होते. तेवढ्यात त्याची बायकोच शिव्या देत तेथे आली. झाले असे होते की आदल्या रात्री झोपण्यापूर्वी त्याचे त्याच्या मालकाशी भांडण झाले होते. रात्री त्याची बायको कशासाठी तरी उठून गेलेली असताना त्याला जाग आली आणि त्याच वेळी त्याने काहीतरी जळताना पाहिले. त्यावरून त्याला वाटले की मालकाने त्याच्या बायकोला जाळले.

याच्या नेमके उलट एक उदाहरण -

वीटभट्टी मालकाशी भांडण झाल्यामुळे एकाच कुटुंबातील अकरा जण पळून जात असताना, भिवंडीमधील टेंभिवली गावाला लागून असलेल्या जंगलात, मालकाने त्यांना ठार मारून टाकल्याची माहिती मला मिळाली.

माहिती मिळाली तेव्हा घटना घडून एक वर्ष झाले होते. माहिती फारच गंभीर होती. संघटनेचे दोनशे-अडीचशे लोक घेऊन आम्ही त्या जंगलात गेलो. पोलिसांना घेतले, कार्यकारी दंडाधिकारी म्हणजे तहसीलदारांना घेतले आणि जंगलात जी जी हाडे मिळतील ती आम्ही शोधायला सुरुवात केली. वरवर असलेली जमा केली, गाडली गेलेली खणून काढली, झुडुपातली शोधून काढली. एकही पूर्ण सांगाडा आम्हाला मिळाला नव्हता. आम्ही त्या ठिकाणी जवळपास ३५० हाडे शोधून काढली. त्यापैकी ३५ हाडे ही माणसांची निघाली.

मग आम्ही शोध घ्यायला सुरुवात केली. राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे हे प्रकरण तपासासाठी देण्यात आले. तीन वर्षे सतत याचा शोध जारी राहिला. कुणी हरवलेत का म्हणून जिल्हाभर दवंड्या पिटविल्या. पण शोध काही लागला नाही. शेवटी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाचा एक शिपाई, मंगेश पाटील वेश बदलून विटभट्टीवर मजूर म्हणून राहिला. एका कातकरी माणसाला पळून जात असताना ठार मारले होते हे त्याने उघडकीला आणले. एका वीटभट्टी मालकाकडे वसई तालुक्यातील निर्मळ गावातील एक कातकरी कुटुंब मजुरी करीत होते. त्यांचे लहान बाळ आजारी झाल्याने त्या मजुराने मालकाकडे उपचारासाठी काही पैशांची मागणी केली. मालकाने त्या मजुराला पैसे देण्याऐवजी जबरदस्त मारहाण केली. म्हणून अंधाराचा फायदा घेऊन मजूर कुटुंबासह पळून जाऊ लागला. मालकाला हे कळताच त्याने त्याचा पाठलाग केला. मजुराला धरून मारहाण करण्यास सुरुवात केली. मजुराची बायको मुलासह भीतीने वाट मिळेल तेथे पळत सुटली. मारहाणीत मजुराचा मृत्यु झाला. मालक आपणासही मारून टाकील या भीतीने मजुराच्या बायकोने ही हकिकत कोणालाही सांगितली नाही. अखेर कातकऱ्याची हरवलेली बायको, मुले सापडली.

*******

# संघटक : संघटनेचा कणा

महात्मा गांधीजींनी आपल्या आत्मचरित्रात चंपारण्य लढ्याचे वर्णन केलेले आहे. चंपारण्यामधील राजकुमार शुक्ल हे निरक्षर शेतकरी गांधीजी जेथे जेथे जातील तेथे तेथे त्यांचा पाठलाग करीत होते. शुक्ल यांचे गांधीजींकडे एकच मागणे होते की गांधीजींनी त्यांच्या गावी भेट द्यावी. त्यांच्या गावी भेट देणे अवघड होते हे गांधीजींनी वारंवार सांगूनही शुक्ल पिच्छा सोडीत नव्हते. अखेर गांधीजींना माघार घ्यावी लागली. गांधीजींनी त्यांच्या गावाला भेट दिली. या भेटीतूनच स्वातंत्र्य लढ्यातील देदीप्यमान चंपारण्य सत्याग्रहाचा जन्म झाला.

आपल्या भागातील शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी जे जे करावे लागेल ते ते करण्याची त्यांची तयारी होती. गांधीजींचा पिच्छा पुरवून, त्यांना आपल्या गावी आणून, चंपारण्याचा सत्याग्रह करून त्यांनी आपल्या बांधवांना न्याय मिळवून दिला. त्या अर्थाने राजकुमार शुक्ल चंपारण्यातील शेतकऱ्यांचे संघटक होते, नेते होते.

जो सभोवतालच्या दु:खमय परिस्थितीबद्दल अस्वस्थ असतो आणि ती परिस्थिती बदलण्यासाठी कोणत्याही स्वरूपाचा धोका स्वीकारायला तयार असतो, त्यासाठी अथक परिश्रम घेतो तोच नेता बनतो. नेता बनण्यासाठी शिक्षण, विद्यापीठाची पदवी, चांगला चेहरा किंवा गोड बोलण्याचे कौशल्य याची आवश्यकता नसते. नेत्याची कसोटी त्याच्या कृतीतच असते. एखादा उत्तम वक्ता असेल, तो उत्तम लिहितही असेल, त्याचे खूप वाचनही असेल, तो सौंदर्यवानही असेल परंतु लोक व्यथित असताना त्यांच्या व्यथा दूर करण्यासाठी त्यांच्या बाजूने उभा राहत नसेल तर तो नेता होऊ शकणार नाही.

नेता लोकांना प्रेरणा देतो आणि लढ्याच्या वेळी त्यांचे नेतृत्वही करतो. त्याच्या नेतृत्वाची कसोटी तो कृती काय करतो यावरच ठरते. अनेक सामाजिक कार्यकर्त्यांच्या तोंडून मी हे ऐकत होतो की, आपण नेतृत्व करू नये, आपण पडद्यामागे राहावे, नेतृत्व

लोकांना करू द्यावे. त्यामुळे जेव्हा मला नेतृत्व करावे लागले तेव्हा सुरुवातीच्या काळात माझ्या मनात अपराधी भावना निर्माण झाली. परंतु लवकरच माझ्या ध्यानात आले की मला सल्ला देणारे सामाजिक कार्यकर्ते नेतृत्वामुळे निर्माण होणारे धोके टाळण्यासाठी पळवाट शोधत होते. त्यांना केवळ प्रकल्प राबवून सुखा-समाधानाचे आयुष्य जगावयाचे होते. लोकांच्या दु:खात सहभागी होणे व धोका स्वीकारणे टाळायचे होते. लोकांना नेतृत्व करू द्या, लोकांना त्यांचे निर्णय घेऊ द्या, असे म्हणणारे स्वत:ला लोकांपासून वेगळे समजतात.

मी एकदा एका सामाजिक कार्यकर्त्याला पत्रकार परिषदेच्या वेळी भेटलो. नुकत्याच मुक्त झालेल्या वेठबिगारांसाठी त्याने पत्रकार परिषद घेतली होती. परंतु तो स्वत: मात्र पडद्यामागे होता. त्या मुक्त वेठबिगाराला कोणत्याही तयारी शिवाय त्याने पत्रकारांसमोर बसविले होते. पत्रकारांची भाषा व मुक्त वेठबिगाराची भाषा यामुळे संवाद होऊ शकत नव्हता. पत्रकारांच्या हाती काही लागले नाही. त्या मुक्त वेठबिगाराला पत्रकार परिषद संबोधित करावयास लावून आपण त्याला नेतृत्व दिल्याचे तो सामाजिक कार्यकर्ता मला सांगत होता. मला त्या सामाजिक कार्यकर्त्याची कीव आली. पत्रकार परिषद संबोधित केल्याने नेतृत्व येत नाही.

समर्पित भावनेने धोके स्वीकारण्याची तयारी ठेवून लढ्याचे नेतृत्व करावे लागते. धोके स्वीकारण्यासाठी जो तयार असतो तोच लोकांना प्रेरणा देऊ शकतो. जो जबाबदाऱ्या स्वीकारतो, धोके स्वीकारतो, लोकांच्या सुखात आणि दु:खातही सहभागी होतो त्याच्याकडे सहजपणे नेतृत्व जाते. जात, धर्म, पंथ, लिंग अशा नेतृत्वाच्या आड येत नाही.

श्रमजीवी संघटना वेठबिगार मुक्त करीत होती, तो काळ संघटना बांधणीचा सुरुवातीचा काळ होता. आम्हीसुद्धा संघटना बांधणीची प्रक्रिया नव्याने अनुभवित होतो. गावागावात मुक्त वेठबिगार-शेतमजूर विरोधी शेतमालक असे तणावाचे वातावरण असे. एका गावात मालकांनी मजुरांवर बहिष्कार टाकला होता. मजूरही संघटितपणे मुकाबला करीत होते. सत्ता जात असल्याने चिडलेल्या मालकांनी सरकारवर दबाव आणून जिल्हाधिकाऱ्यांना मालकांची बाजू घेण्यास भाग पाडले. मालकांच्या सभेत जिल्हाधिकाऱ्यांनी मला व विद्युल्लताला आरोपीसारखे उभे केले. मुक्त वेठबिगारही सभेस हजर होते. आम्ही बाहेरचे आहोत, आम्हा दोघांमुळे गावात अशांतता निर्माण होते म्हणून आम्ही दोघांनी कोणत्याही गावात जायचे नाही, असा आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी आम्हाला दिला. वेठबिगार सोडविण्याचे काम, किमान वेतन मिळवून देण्याचे काम, तलाठी आणि ग्रामसेवक करतील, आम्ही करण्याची गरज नाही असेही जिल्हाधिकाऱ्यांनी आम्हाला बजावले.

तलाठी व ग्रामसेवकाने हे काम केले असते तर आमची आवश्यकताच नव्हती. मुक्त वेठबिगारांनी स्वत:हून हे जिल्हाधिकाऱ्यांना सांगावे अशी आमची अपेक्षा होती. परंतु तसे काही घडले नाही. ते शांतपणे ऐकत राहिले. आम्हाला जिल्हाधिकाऱ्यांपेक्षाही ज्यांच्यासाठी आम्ही काम करीत होतो त्या मुक्त वेठबिगारांचा प्रचंड राग आला. सभा संपल्यावर आम्ही मुक्त वेठबिगारांना ते शांत का राहिले असे विचारले तेव्हा लक्षात आले की काय बोलावे, कसे बोलावे हे त्यांना ठाऊकच नव्हते.

त्या दिवशी तेथे उपस्थित असलेल्या सर्व मुक्त वेठबिगारांसह प्रत्येक गावात जाऊन मजुरांना संघटित केल्याशिवाय कोणीही आपल्या घरी जायचे नाही व जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश मोडायचे असा निर्णय आम्ही घेतला. सलग सहा दिवस गावेच्या गावे पालथी घातली. जिल्हाधिकाऱ्यांच्या बेकायदेशीर आदेशाला कृतीने उत्तर दिले.

या प्रसंगातून प्रस्थापितांचीही संघटकाकडे पाहण्याची वृत्ती लक्षात येते. असेच अनुभव अनेक ठिकाणी संघटकांना आलेले मी ऐकले आहेत. संघटक निमूटपणे असे आदेश पाळतानाही मी पाहिले आहेत. भारताच्या संविधानाने देशाच्या कोणत्याही भागात संचाराचे स्वातंत्र्य, संघटित होण्याचे स्वातंत्र्य आपणास दिले आहे. याची जाणीव संघटकाने ठेवली व त्या अधिकाराचा वापर करण्याचे ठरविले तर प्रस्थापितांना चोख उत्तर देता येते.

**संघटकापुढील आव्हाने :**

संघटकाला व्यवस्थेला आव्हान देऊन नवे जग निर्माण करायचे असते. संघटकासमोर पहिले आव्हान असते ते प्रस्थापित व्यवस्था बदलण्याचे. व्यवस्थेमध्ये निर्णय घेण्याचे कोणतेही स्वातंत्र्य शोषित समाजाला नसते. शोषिताला मूलभूत अधिकार, विकासाचा न्याय्य वाटा नाकारलेला असतो. या व्यवस्थेला संघटकाला आव्हान द्यावयाचे असते. दुसरे आव्हान हे आजपर्यंत समाजाच्या एकूण रचनेमध्ये ज्यांना नगण्य मानले गेले त्यांना समाजामध्ये स्थान मिळवून देण्याचे असते.

मी गरीब आहे. मी दलित आहे, आदिवासी आहे त्यामुळे मी नीच आहे. ही पराभूत मनोवृत्ती बदलण्याचे तिसरे आव्हान संघटकापुढे असते. या मनोवृत्तीमुळे आलेली भीती, परावलंबित्व झुगारून 'नाही' म्हणण्याची ताकद संघटकाने शोषितांना द्यावयाची असते. संघटित शक्तीच्या द्वारे आमच्या हक्काचा वाटा आम्ही मिळवू शकतो, हा विश्वास जागविण्याचे चौथे आव्हान संघटकाला पेलावयाचे असते.

**संघटकाची भूमिका :**

संघटना बांधणीच्या प्रक्रियेमध्ये संघटक महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत असतो. तो लोकांच्या बरोबरीने राहतो, त्यांचा आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न करतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे संघटक स्वत:ला लोकांपासून वेगळे समजत नाही. आपण लोकांमधला महत्त्वाचा घटक आहोत आणि लोकांना संघटित करण्याची जबाबदारी आपल्या खांद्यावर आलेली आहे असे तो मानतो.

संघटकामधला संघटना बांधणीसाठी एक अत्यंत महत्त्वाचा गुण हा की तो कधीही शोषिताला दोष देत नाही. गरीब गरीबच राहिले कारण त्यांना मुले जास्त आहेत, त्यांना शिकायचे नाही, ते आळशी आहेत, ते दारू पितात अशी दोष देण्याची प्रवृत्ती आपल्याला समाजात दिसून येते. त्याच पद्धतीने एखाद्या महिलेवर बलात्कार झाल्यानंतर महिलेलाच दोष देण्याकडे समाजाचा कल असतो. संघटक मात्र सामाजिक परिस्थितीचे विश्लेषण करून लोकांसमोर ती परिस्थिती मांडण्याचा प्रयत्न करतो.

एका शाळेत शिक्षणावरचा काहीतरी कार्यक्रम होता. त्यावेळी मुलांनी एक गाणे म्हटले –

‘माणसा तुझ्या स्थितीचा तूच अपराधी,
शिकण्यासाठी माणसा तू जागा हो आधी...’

या गाण्यामधून लोकांना दोष दिला जात होता. लोक आळशी आहेत आणि त्यांच्या आळशीपणामुळे विकासाची चाके रुतून पडलेली आहेत, ते वेगाने पुढे जात नाहीत असा त्याचा आशय होता. तेव्हा आता मुक्तीचा मार्ग म्हणून शिक्षण घ्या आणि मेहनत करा, अशा आशयाचे ते गीत होते. त्या ठिकाणी संघटना करणारे एक संघटक होते. त्यांना हे गाणे ऐकून अतिशय चीड आली आणि त्यांनी तिथल्या तिथे एक गाणे तयार केले.

‘माणसा तुझ्या स्थितीचा कोण अपराधी,
त्यांचा माज मोडण्यासाठी शिक्षण घे आधी...’

या नव्या गाण्याचा मथितार्थ असा होता की, तुझ्यावर आलेली जी परिस्थिती आहे त्याला तू दोषी नाहीस. तू उभा राहा आणि तुझ्या हक्काची मागणी कर. या समाजाने हजारो वर्षे तुझ्यापासून पुस्तके दूर ठेवली, तुला वाचू दिले नाही. तुझ्या घामावर ही सारी दुनिया उभी राहिली परंतु तुला खायला मिळाले नाही. तुझ्या मुलांना शिक्षणापासून दूर ठेवले, त्यांना ढोरांच्या पाठी लावले. ही गोष्ट आता समजून घे आणि शिक्षणावर तुझा अधिकार आहे तो अधिकार मागायला उभा राहा.

या दोनही गीतांमध्ये परिस्थिती बदलण्यासाठी शिक्षणाचे महत्त्वच सांगितलेले आहे. परंतु दोहोंच्या पटवून देण्यामध्ये फरक आहे. एका गीतात लोक निरक्षर आहेत त्याचा दोष लोकांना दिलेला आहे तर दुसऱ्या गीतात लोक निरक्षर आहेत त्याचा दोष व्यवस्थेला दिलेला आहे. संघटक कसा विचार करतो हे या उदाहरणावरून स्पष्ट होते. जो लोकांना दोष देत राहतो तो कधीही संघटक बनू शकत नाही.

संघटकाच्या मनात विषम समाजव्यवस्थेबद्दल चीड असते. त्याच्या मनात जर अशी चीड नसेल, अन्यायाबद्दलचा राग नसेल तर तो लोकांच्या मनामध्ये अशी चीड निर्माण करू शकणार नाही.

बदलाकरिता संघटक कटिबद्ध असतो. प्राप्त परिस्थितीमध्ये आपण समाधानी नाही आणि बदल घडवून आणणे सोपे नाही, रस्ता काट्या-कुट्यांचा आहे, त्रास होणार आहे याची जाणीव त्याला असते. तशी त्याची मानसिक तयारी असते.

कविवर्य सुरेश भटांच्याच शब्दात सांगायचे तर –

जन्मले घेऊन जे पायात काटा, त्या भणंगांनीच यात्रेला निघावे

संघटक कोणताही धोका स्वीकारायला तयार असतो. सामाजिक बदलासाठी संघटना उभी करताना स्वाभाविकपणे प्रस्थापितांशी दोन हात होत असतात. (पुष्प)हार कमी मार जास्त अशी परिस्थिती संघटनेमध्ये सुरुवातीच्या काळात असते. संघटनेला आणि संघटकाला कधीही झटपट मान्यता आणि मोठेपणा मिळत नाही. कित्येक वर्षांच्या मेहनतीची आणि जीवाची जोखीम उचलण्याची संघटकाची तयारी असावी लागते. त्या अर्थाने संघटना करणारा संघटक दुसऱ्या स्वातंत्र्याच्या लढाईतला सैनिक असतो.

संघटक हा कायम शोषितांच्या बाजूनेच उभा राहतो. दोघांचेही ऐकून मी न्याय देईन अशी भूमिका घेऊन न्यायाधीश बनण्याकडे अनेकांचा कल असतो. संघटक मात्र नेहमीच गरिबाची, शोषिताचीच बाजू घेतो. ज्यांच्याकडे पैसा आहे ते आपल्या बाजूने व्यवस्था उभी करू शकतात परंतु जो गरीब आहे त्याच्या बाजूने कोणीही उभे राहणार नाही आणि त्याची बाजू मांडण्याचे काम आपले आहे याची प्रखर जाणीव संघटकाला असते. संघटक दोन्ही बाजूने विचार करायला लागला तर गरीब लोक त्याच्यावर विश्वास ठेवणार नाहीत. अनेकदा गरिबाचे चुकत असेल तरीसुद्धा त्याची बाजू समजून घेऊन ती नीट मांडण्याचे काम संघटकाला करावे लागते.

संघटकाचा लोकांच्या शक्तीवर विश्वास असतो. इतर कशाहीपेक्षा लोक महत्त्वाचे आहेत आणि लोकांनी जर ठरविले तर ते आपले जीवन बदलू शकतात, यावर संघटकाचा ठाम विश्वास असतो. हा विश्वास थोडा जरी डळमळीत झाला आणि प्रश्नाच्या सोडवणुकीमध्ये लोकांचा सहभाग राहिला नाही तर संघटना बनत नाही.

मुद्द्यांची सोडवणूक करताना काही गोष्टी फार महत्त्वाच्या ठरतात. संघटक तो मुद्दा कसा पाहतो यावर ते अवलंबून राहते. कोणत्याही मुद्द्याचे योग्य विश्लेषण करणे आवश्यक असते. त्या मुद्द्यावर यश मिळवायचे असेल तर त्या मुद्द्याचे सर्व कंगोरे संघटकाने लक्षात घेणे गरजेचे असते. त्या प्रश्नाच्या कायदेशीर बाजू काय आहेत, प्रशासकीय बाजू काय आहेत, प्रश्न सोडविण्याचे अधिकार कुणाकडे आहेत, कुणाचे हितसंबंध त्यात गुंतलेले आहेत, या सर्व गोष्टी महत्त्वाच्या असतात.

मुद्द्याची सोडवणूक करताना विरोधक कशा पद्धतीने विचार करतो, त्याची मानसिकता काय आहे आणि आपण ज्या लोकांबरोबर काम करणार आहोत त्यांची मानसिकता काय आहे या बाबींना संघटकाला महत्त्व द्यावे लागते. कारण या मानसिकतेवर क्रिया व प्रतिक्रिया अवलंबून असतात.

लोकांच्या आणि विरोधकांच्या मानसिकतेबरोबरच संघटक कसा विचार करतो आणि लोकांची मानसिकता तो कशी समजून घेतो हे सुद्धा महत्त्वाचे असते. संघटना करतानाच लोकांना काही प्रमाणात यशाची जाणीव होणे, आपण जिंकलो आहोत ही भावना निर्माण होणे आणि त्याकरिता काही प्रमाणात संघर्ष निर्माण होणे, हे संघटनेच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असते. अनेकदा संघटक असे संघर्ष टाळतात. संघर्ष टाळण्यासाठी त्यांच्याकडून जी कारणे दिली जातात ती हास्यास्पद असतात.

नेपाळमध्ये ‘कमय्या’ ही वेठबिगारीची पद्धत आहे. त्या कमय्यांच्या मुक्ततेसाठी मी तेथे गेलो होतो. सुमारे चाळीस हजार वेठबिगार त्या ठिकाणी होते. तिथल्या प्रमुख कार्यकर्त्यांना वेठबिगार मुक्त कसे करावेत याचे मला प्रशिक्षण द्यावयाचे होते. ते कसा विचार करतात याची माहिती मी प्रथम करून घेत होतो.

ज्यांना या मुद्द्याभोवती संघटना करावयाची आहे ते निरनिराळे कार्यक्रम करीत होते. बालवाड्या, बचतगट चालावित होते, निरक्षरांना साक्षर करणारे वर्ग चालवित होते आणि त्यांना वेठबिगारांना मुक्त करावयाचे आहे असे ते म्हणत होते. बरेच दिवस ते तसे प्रयत्न करीत होते परंतु प्रत्यक्षात एकाही वेठबिगाराला ते मुक्त करू शकले नव्हते.

माझे त्यांच्याबरोबर झालेले संभाषण असे होते –

मी: आपण आजपर्यंत वेठबिगारांना मुक्त का करू शकला नाहीत?

कार्यकर्ता: कारण आमच्याकडे त्यांना द्यायला पर्यायी रोजगार नाही.

मी: वेठबिगार सोडविण्यासाठी पर्यायी रोजगार आवश्यक आहे का?

कार्यकर्ता: पर्यायी रोजगार नसेल तर ते खातील काय? त्यांच्या कुटुंबाकडे ते कसे पाहतील? त्यांचे पोट कसे भरतील?

मी: तुम्ही वेठबिगारांसाठी हे साक्षरता वर्ग का चालविता?

कार्यकर्ता: त्यांच्यामध्ये जागृती व्हावी म्हणून हे वर्ग आम्ही चालवितो. त्यामुळे त्यांना त्यांच्या आजच्या परिस्थितीची जाणीव होईल.

मी: आजची त्यांची परिस्थिती कशी आहे?

कार्यकर्ता: वेठबिगारांना फार श्रम करावे लागतात. त्याला आणि त्याच्या पत्नीला मिळून चौदा-चौदा तास रोज शेतावर राबावे लागते. मालकाच्या घरातही त्यांना काम करावे लागते आणि याच्या बदल्यात फक्त ५ क्विंटल धान्य त्यांना संपूर्ण वर्षात दिले जाते. ही परिस्थिती फार भयानक आहे. खरे म्हणजे त्या जमीन मालकांचे ते गुलामच आहेत.

मी: ही जी परिस्थिती तू आता सांगितलीस, ती वेठबिगारांना माहिती नाही का?

कार्यकर्ता: हो, निश्चितच त्यांना माहिती आहे.

मी: जर त्यांना परिस्थितीची जाणीव आहे तर तुम्ही कोणत्या परिस्थितीची जाणीव साक्षरता वर्गातून त्यांना करून देणार आहात?

कार्यकर्ता: तुमचे म्हणणे बरोबर आहे. नवीन काहीच नाही.

मी: ही वेठबिगारी असण्यात काय समस्या आहे?

कार्यकर्ता: हा वेठबिगार कर्ज घेतो आणि ते कर्ज फेडण्यासाठी पिढ्यान्‌पिढ्या त्याला आणि त्याच्या कुटुंबाला काम करावे लागते.

मी: म्हणजे वेठबिगाराच्या डोक्यावर कर्ज हीच मोठी समस्या आहे का? मग तुम्ही कोणाकडे तरी पैसे मागून त्या वेठबिगाराच्या

मालकाला देऊन त्यांना कर्जातून मुक्त का करीत नाही?

कार्यकर्ता: नाही, आपण पैसे देऊ नयेत कारण पैसे देऊन सुद्धा चालणार नाही. पैसे देऊन कर्ज फिटेल पण त्यांना पर्यायी रोजगार कोठून मिळणार? आणि म्हणून आपण सर्व वेठबिगारांना मुक्त करू शकत नाही. कारण सर्व वेठबिगारांना आपण काम देऊ शकत नाही.

मी: ठीक आहे. तुम्हाला मनापासून वेठबिगारांना मुक्त करावयाचे आहे का?

कार्यकर्ता: हो निश्चितच, कारण आता ते गुलामीत जीवन जगताहेत.

मी: तुम्ही त्यांना हे सांगाल का की ते मुक्त झाले पाहिजेत?

कार्यकर्ता: हो ना! आताही आम्ही त्यांना हेच सांगतो.

मी: समजा, तुम्ही जे काही सांगता, त्यामुळे प्रेरित होऊन एखादा वेठबिगार तुमच्याकडे आला आणि त्याने गुलामी नाकारायचे ठरविले, तो जर म्हणाला की माझ्या मालकाकडून पळून येतो तर तुम्ही काय कराल?

कार्यकर्ता: असा जर वेठबिगार माझ्याकडे आला तर त्याला घेऊन मी त्याच्या मालकाकडे जाईन आणि त्याला समजावून सांगेन की तुमचा हा मजूर तुमच्याकडून पळून गेलाय. त्यामुळे तुम्ही त्याला मुक्त करा.

मी: मग मालक काय सांगेल?

कार्यकर्ता: मालक तयार होणार नाही कारण मालकाने मजुराला काही हजाराचे कर्ज दिले आहे.

मी: म्हणून काय झाले?

कार्यकर्ता: म्हणूनच तर आपण काही करू शकत नाही; कारण त्याला आपण पैसे देऊ शकत नाही आणि वेठबिगारांना पर्यायी रोजगार देऊ शकत नाही.

मी: मग अशा परिस्थितीत तू त्या गुलामाला मालकाकडेच त्याने परत जावे, त्याच्याकडेच काम करावे असा सल्ला देशील का?

कार्यकर्ता: हो, याच्याशिवाय मी काय करू शकतो?

या संवादातून आपल्या लक्षात येईल की संघटकाला जे काम करावयाचे आहे ते किती अवघड आहे. लोक विचार काय करतात, कसा करतात हे त्यांच्याकडून समजून घेऊन संघटकाने विचार करणे आवश्यक आहे. असा विचार जे करीत नाहीत ते संघटक बनत नाहीत. ज्या कार्यकर्त्याशी मी बोललो तो कार्यकर्ता सवर्णच नाही तर सधनही होता. त्याची विचार करण्याची पद्धत वेठबिगारासारखी नव्हे तर मालकासारखी होती. त्याने ठरविलेल्या त्या कल्पना होत्या.

त्यामुळे एकप्रकारे त्याचे विचार वेठबिगारांवर तो लादत होता. पर्यायी रोजगार उपलब्ध झाला तर हे वेठबिगार कामावर येतील का ? या माझ्या पुढच्या प्रश्नाला त्याचे 'हो' असे उत्तर होते. जर वेठबिगार पर्यायी रोजगारावर येणार असतील तर मुळात ते वेठबिगारच नाहीत. कारण त्यांच्यावर कामाची जबरदस्ती नाही. तेव्हा पर्यायी रोजगार हे त्या कार्यकर्त्याने तयार केलेले एक खूळ होते. त्यांना संघर्ष टाळावयाचा होता. प्रत्यक्षात व्यवस्थेला भिडण्याऐवजी केवळ जाणीव-जागृतीसारखी हलकीफुलकी कामे करण्यामध्ये कोणताही संघर्ष असत नाही. जाणीव-जागृती होत आहे की नाही हे सुद्धा जेथे कळत नव्हते अशा पद्धतीचे काम मला त्या ठिकाणी दिसले.

वेठबिगार वेठबिगारीत का आहे याबद्धलचे स्पष्ट विश्लेषण संघटकाच्या मनामध्ये अनेकदा तयार नसते. त्यांना असे वाटते की गरिबांना त्यांच्या परिस्थितीची जाणीव नसते, ती आम्ही त्यांना करून देतो. हे चुकीचे आहे. ते ज्या परिस्थितीत असतात त्यांना त्या परिस्थितीची जाणीव असते. हे फक्त संघटकाला माहीत नसते म्हणून ही जाणीव वेठबिगारांना नाही असा दावा तो करत असतो. त्यामुळे वेठबिगारांच्या मुक्तीसाठी पर्यायी रोजगार देणे, बचतगट सुरू करणे, साक्षरतेचे वर्ग सुरू करणे असे कार्यक्रम राबविले जातात. मात्र त्यातून वेठबिगारांची मुक्तता होत नाही.

उपाशी, अर्धपोटी वेठबिगारांचे बचतगट निर्माण करून त्यांनी बचत करावयाची आणि त्या बचतीतून पैसे मिळतील त्याने कर्ज फेडावयाचे, अशा आश्चर्यकारक पद्धतीने काही लोक काम करताना नेपाळमध्ये दिसले.

१९९०च्या दरम्यान नांदेडमधील एका गावात मी गेलो होतो. १० वर्षांपेक्षा जास्त काळ काही लोक एका संस्थेच्या माध्यमातून काम करीत होते. आम्हाला अंगणात बसण्यासाठी एक खाटले ठेवले होते. माझ्या बाजूला त्या संस्थेचा प्रमुख बसला. गावातल्या काही लोकांना मी बोलाविले. गेली १२ वर्षे ती संस्था तेथे काम करीत होती. त्यांच्या म्हणण्यानुसार ते लोकांना

अन्यायाच्या विरोधात, अत्याचाराच्या विरोधात संघटित करीत होते. लोकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देत होते. मात्र गावातील दलित, आल्यानंतर माझ्यासमोर खाटेवर बसण्याऐवजी, जमिनीवर अंग आखडून बसले. या ठिकाणी हक्कांसाठी कोणतेही काम झालेले नाही हे लक्षात यायला मला वेळ लागला नाही.

गावातल्या अडचणींबाबत विचारले असता लोकांनी सांगण्याअगोदरच संस्थेच्या प्रमुखाने अडचणी सांगावयाला सुरुवात केली. शाळेत शिक्षक येत नाहीत, ७/१२चा उतारा मागायला गेलो तर तलाठी पैसे घेतो, तलाठी वेळेवर येत नाही, दवाखान्यात डॉक्टर येत नाहीत, गावच्या विहिरीवर दलितांना पाणी भरू दिले जात नाही, किमान वेतन मिळत नाही. मी त्याला सर्व सांगू दिले. मी त्याला विचारले की तुम्ही १२ वर्षे हेच काम करीत आहात का? जे प्रश्न आहेत त्यांची जागृती करण्याचे?

जागृती निर्माण करण्यासाठी ते प्रशिक्षण द्यायचे, शिबिरे घ्यायचे. पण जागृती झाली किंवा नाही याच्याशी त्यांचा संबंध नव्हता. जागृती झाली म्हणून ते सांगत राहिले पण कृतीकडे कधी गेलेच नाहीत. कृती असेल तरच जागृती महत्त्वाची ठरते, निव्वळ जागृतीतून काहीही निष्पन्न होत नाही.

मी त्यांना सांगितले की गेली १२ वर्षे तुम्ही जागृती करता आहात आणि गेली १२ वर्षे प्रश्नही येथेच आहेत. यातला एकही प्रश्न सुटला नसेल तर एक तर प्रश्नांना येथे असू द्या किंवा तुम्ही येथे राहा. तुम्ही असतानासुद्धा हे प्रश्न येथे आहेत याचा अर्थ तुमच्या हातून येथे काहीही काम झालेले नाही.

**लंगड्या सबबी :**

वेठबिगारीच्या मुद्द्यावर काय करायला हवे असे नेपाळमधील संस्थांच्या प्रमुख कार्यकर्त्यांना विचारले असता त्यांनी काय करायला हवे याबाबत काही प्रतिक्रिया दिल्या.

पहिली: वरिष्ठ अधिकाऱ्यांची कार्यशाळा बोलवावी, पोलीस अधिकाऱ्यांना बोलवावे, लोकप्रतिनिधी, संघटना यांना बोलावून या प्रश्नांची सोडवणूक कशी करावयाची याची चर्चा करावी.

दुसरी: हा जरा धोरणात्मक प्रश्न आहे. म्हणून आम्हाला आमच्या संचालक मंडळाची बैठक बोलवावी लागेल.

तिसरी: आम्ही लोकशाही मानतो, म्हणून सर्व सहकाऱ्यांना, आमच्यासोबत काम

करणाऱ्यांना, वरपासून खालपर्यंत सर्वांना यासाठी विश्वासात घ्यावे लागेल.

चौथी: हे वेठबिगार वेठबिगारीतून मुक्त झाल्यानंतर जर पुन्हा वेठबिगारीच करणार असतील तर त्यांना मुक्त करण्यात काय अर्थ आहे ?

पाचवी : हा सामाजिक प्रश्न आहे त्यामुळे बदल हळूहळू होईल.

सहावी: आपण जर यांना मुक्त केले आणि पर्यायी रोजगार नसेल तर त्यांच्यावर भीक मागायची वेळ येईल.

सातवी: सामाजिक आणि आर्थिक सर्वेक्षण करून, परिस्थितीचे विश्लेषण करून, मग नंतर आपण वेठबिगारांच्या बाबतीत विचार करू.

या प्रतिक्रिया किंवा सबबी काल्पनिक नाहीत. निरनिराळ्या ठिकाणी गेलो असता या सबबी मला ऐकावयाला मिळाल्या. थोड्याफार फरकाने अशीच उत्तरे व्यवस्थेला भिडण्यास न धजावणारे कार्यकर्ते सर्वत्र देताना दिसतात.

गुलामांना किंवा वेठबिगारांना मुक्त करावयाचे असेल, किमान वेतन मिळवून द्यावयाचे असेल, ज्यांच्यावर अन्याय, अत्याचार होतोय त्यांना जागृत करून संघटित करावयाचे असेल तर ते प्रस्थापित समाजाचे शत्रुत्व घेण्यासारखे आहे. समाजातील जे धनदांडगे आहेत, शोषण करणारे आहेत त्यांच्या विरोधात जे बोलू शकत नाहीत, संघर्ष करू शकत नाहीत, आहे ती व्यवस्था बदलण्यासाठी ज्यांची मानसिक तयारी झालेली नाही ते या अशा पद्धतीच्या सबबी पुढे करीत असतात. त्यांच्या हातून संघटना उभी राहणे शक्य नाही.

**संघटकाचे व्यक्तिमत्त्व :**

चांगला संघटक हा नेता असावा लागतो. चांगला संघटक हा शिक्षक असावा लागतो. आणि त्याहीपेक्षा चांगला संघटक हा विद्यार्थी असावा लागतो. जेथून जेथून जे जे मिळेल ते शिकण्याची त्याची तयारी असावी लागते. चांगला संघटक हा राजनीती जाणणारा, चांगली रणनीती बनविणारा असावा लागतो. संघटक हा व्यवस्थापक असावा लागतो. तो लोकांना कायम व सहज उपलब्ध असावा लागतो. तो प्रशासक, मित्र, मार्गदर्शक असावा लागतो. असे सर्वकाही संघटकाकडे असणे आवश्यक असते.

लोकांना स्वप्ने देण्याचे महत्त्वाचे काम संघटकाला करावयाचे असते. लोकांमधली आशा जागती ठेवण्याची, निराशेतून आशेकडे नेण्याची क्षमता संघटकाकडे असणे आवश्यक असते. लोकांना आपल्या न्याय्य हक्कांसाठी उभे करण्याचे आणि विकासाची फळे त्यांना मिळवून देण्याकरता त्यांना संघटित करण्याचे कार्य संघटकाला करावे लागते.

लोकांमध्ये ज्या काही उणिवा असतील त्या दूर करून त्यांना त्यांच्या सामर्थ्याची जाणीव संघटकाला करून द्यावी लागते.

संघटकाला निरनिराळ्या प्रकारची माहिती सतत गोळा करीत राहावी लागते. जिथे जिथे जी जी माहिती मिळेल ती ती जमा करणे, साठविणे आणि योग्य ठिकाणी ती पोहोचविणे, लोकांची ताकद त्याद्वारे वाढविणे अशा प्रकारचे लोकांचे क्षितिज विस्तारण्याचे कामही संघटकाला करावे लागते.

परिस्थितीला आव्हान देत लोकांमधील आत्मविश्वास, स्वाभिमान जागृत करण्याबरोबरच लोकांमधली निरनिराळ्या प्रकारची कौशल्ये जाणून घेऊन, त्यानुसार त्या त्या लोकांवर जबाबदाऱ्या देण्याचे कामही संघटकाला करायचे असते. लोकांना तयार करणे, त्यांना बोलते करणे, प्रशिक्षित करणे हे संघटकाचे महत्त्वाचे कार्य ठरते.

आपल्या मागे संघटना तेवढीच प्रभावी राहील या दृष्टीने संघटनेची उभारणी करणे, आपल्या हयातीमध्ये दुसरे नेतृत्व तयार करून त्यांच्याकडे सर्व सूत्रे सोपवणे हे महत्त्वाचे असते. नव्या नेतृत्वामध्ये जर काही अवगुण असतील तर ते काढून टाकण्यासाठी प्रसंगी संघटकाला काही वेळा कटुताही पत्करावी लागते.

नवनवे प्रश्न सातत्याने शोधत राहणे, नव्या प्रश्नांचा मागोवा घेत राहणे, त्या प्रश्नांच्या भोवती लोकांना संघटितपणे गुंफणे, त्या प्रश्नांची सोडवणूक करण्याकरता प्रयत्न करणे, हे सर्व संघटकाला अव्याहतपणे चालू ठेवावे लागते. संघटनेसाठी निधी उभा करणे, संघटित शक्ती राखण्यासाठी लोकांचे आपापसातले वाद मिटवणे, अंतर्गत संघर्ष दूर करणे, हेही संघटकाला सातत्याने करावे लागते.

लोक ज्यावेळी निराश होतील त्यावेळी त्या निराशेतून लोकांना बाहेर काढण्याचे, पराभवातूनसुद्धा उभे राहण्याची ताकद निर्माण करण्याचे, लोकांचे मनोधैर्य खच्ची झाले असल्यास ते उंचावण्याचे काम संघटकाला करावे लागते. संकटात लोकांचे संरक्षण करण्याचे कामही संघटकाला करावे लागते.

**संघटकासाठी गृहीतके :**

जे दिव्य दाहक म्हणुनी असावयाचे
बुद्ध्याची वाण धरिले करी हे सतीचे

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या या उक्तीचा संघटकास विसर पडता कामा नये.

गुरूदेव सिद्धपीठाचा लढा संघटनेला बरेच काही शिकवून गेला. धर्माच्या नावावर योगसाधना करणारे कशा पद्धतीने गुंडगिरीचा आश्रय घेतात याचा अनुभव आम्ही अनेकदा घेतला. १९८८ साली मे महिन्यात संघटनेचे वार्षिक अधिवेशन कुडूस येथे सुरू होते. सुमारे ५००० सभासद अधिवेशनास उपस्थित होते. अधिवेशन सुरू होताच टँकरच्या ट्रॉलीमधून सुमारे तीनशे - चारशेंचा सशस्त्र जमाव अधिवेशनाच्या दिशेने चाल करून आला. बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांनी जोरदार दगडफेक सुरू केली. सुमारे २० सभासद जखमी झाले. संघटनेच्या काही सभासदांनी प्रतिहल्ला करायचा झाल्यास मंडप मोडून लाठ्या-काठ्यांची तयारी केली. परंतु सभासदांना आम्ही प्रतिहल्ला करू दिला नाही. माझ्या संरक्षणासाठी असणाऱ्या पोलिसाचे रिव्हॉल्व्हर काढून घेण्याचा जेव्हा प्रयत्न झाला तेव्हा मात्र गोळीबार करण्यावाचून त्याला पर्याय राहिला नाही. कारण त्याच्या व माझ्या दोघांच्याही जिवास धोका निर्माण झाला होता. गोळीबारात चारजण जखमी होताच बाकीच्या जमावाची पांगापांग झाली. ही घटना घडली त्यावेळी माझे वडील तेथे हजर होते. साहजिकच माझ्यावर पुन्हा असा हल्ला होण्याचा त्यांनी धसका घेतला.

काहीच दिवसात समाजकंटकांनी मला असलेले पोलीस संरक्षण काढण्यात येणार असल्याची आवई उठविली. या संदर्भात एका वर्तमानपत्रात छापून आलेली खोटी बातमी वाचता वाचताच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचे निधन झाले. आम्ही आमच्या जन्मदात्याला व खंबीर पाठीराख्याला मुकलो.

संघटना करताना संघटकाने काही गृहीतके लक्षात ठेवणे आवश्यक असते. जर या गृहीतकांबद्दल कल्पना नसेल तर आलेल्या आपत्तींना तोंड देण्याची संघटकाची मानसिक तयारीही होणार नाही. त्यावेळेला माघार घेण्याची वेळ त्याच्यावर येईल.

पहिले गृहीतक हे, की जे काम संघटक करतो आहे ते काम करण्याची त्याला कोणीही जबरदस्ती केलेली नाही. हे काम त्याने स्वत:हून स्वीकारलेले आहे. त्यासाठी जे सोसावे लागेल त्याबद्दल त्याला तक्रार करता येत नाही. आपण जी भूमिका घेणार आहोत त्याला प्रस्थापित विरोध करणारच हे दुसरे गृहीतक. विरोधक हरतऱ्हेने, आपली सर्व शक्तीपणाला लावून विरोध करणार हे तिसरे गृहीतक आहे. प्रसंगी विरोधक विरोध करील, दम देईल, मारहाण करील, आपली बदनामी करील, आपल्या विरोधात खोटे गुन्हे दाखल करील हे संघटकाला अपेक्षितच असावे लागते.

श्रमजीवी संघटना मुळापासून उखडून टाकण्यासाठी संघटनेच्या सर्व विरोधकांनी एकवटून प्रयत्न केले. संघटनेने आदिवासी भागातील नदीचे पाणी टँकरने उपसून शहरात त्याची विक्री करण्यास विरोध करण्यासाठी मे १९९६ मध्ये आंदोलन केले होते. या आंदोलनाची दोन कारणे होती. पाण्याच्या उपशामुळे शेतीच्या सिंचनाचा प्रश्न उभा राहिला होता. दुसरीकडे आरोग्यास हानिकारक असे दूषित पाणी शहरवासीयांना विकले जात होते. टँकर अडविण्याचे आंदोलन संघटनेने हाती घेतले होते. आंदोलन सुरू असताना एके दिवशी नदीमध्ये एका अज्ञात इसमाचे प्रेत आढळले. तो अज्ञात इसम टँकर क्लीनर होता व त्याचा आंदोलकांनी खून केला असे विरोधकांनी पोलिसांच्या सहकार्याने रंगविले. माझ्यासह संघटनेच्या प्रमुख कार्यकर्त्यांवर खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला. संघटनेचे दोन माजी अध्यक्ष, जानू मेघवाले व वेणू मेघवाले, कार्याध्यक्ष केशव नानकर, माजी सरचिटणीस महादू जाबर, तालुका सचिव संतोष भोईर व बजरंग वळवी, संघटक सचिव पारोमिता गोस्वामी, पंढरीनाथ बर्डे, लक्ष्मण बर्डे, रामू मोकाशी, वसंत पाटील या सर्वांबरोबर माझा वाहनचालक अवधेश सिंह याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. या सर्वांना गुन्हा करण्यासाठी मी चिथावणी दिली, असा आरोप माझ्यावर ठेवण्यात आला.

ही घटना घडली तेव्हा मी एका परिषदेसाठी अमेरिकेला गेलो होतो. पारोमिता व वेणूबाई यांना न्यायालयाने त्वरित अटकपूर्व जामीन दिला. मला अटकपूर्व जामीन मिळू नये म्हणून सर्व प्रयत्न झाले. अखेर मुंबई उच्च न्यायालयाने तीन महिन्यांनी मला अटकपूर्व जामीन मंजूर केला. परंतु सुमारे एक वर्ष मला ठाणे जिल्ह्यात येण्यास मनाई करण्यात आली. माझा पासपोर्ट अजूनही गुन्हे अन्वेषण खात्याकडे जमा आहे. परदेशी जाण्यासाठी दरवेळी मला न्यायालयाची परवानगी घेण्याची वेळखाऊ प्रक्रिया पार पाडावी लागते.

उर्वरित कार्यकर्ते शंभराहून अधिक दिवस तुरुंगात राहिले. दरम्यानच्या काळात विरोधकांनी संघटनेच्या व माझ्या विरोधात बदनामीची जोरदार मोहीम उघडली. गावागावात संघटना संपल्याची आवई उठविली. सर्व विरोधकांनी एकत्र मेळावा घेतला व संघटना संपल्याबद्दल आनंद साजरा केला. संघटनेच्या इतिहासात हा कसोटीचा काळ होता. संघटनेच्या दुसऱ्या फळीने विद्युल्लताच्या साथीने या काळात संघटना दुपटीने वाढविली.

आपले म्हणणे कितीही योग्य असले, न्यायाचे असले, कायद्यानुसार असले तरीही पोलीस अधिकारी, मंत्री, एवढेच नाही तर कधी कधी न्यायालयही आपल्या बाजूने उभे राहणार नाही व आपल्या विरोधी निकाल देऊ शकेल हे चौथे गृहीतक आहे. याची मानसिक तयारी संघटकाने ठेवणे आवश्यक आहे.

आपले मित्र, आपले कुटुंबीयसुद्धा आपल्याला विरोध करतील हे झाले पाचवे गृहीतक. प्रस्थापितांना विरोध करणे त्यांना सहन होणार नाही, जमणार नाही म्हणून ते आपल्याला विरोध करतील हे संघटकाने गृहीत धरणे आवश्यक आहे. संघटना बांधताना जे अडथळे येतात, संकटे येतात त्या प्रत्येक संकटातून संघटक शिकत जातो. प्रत्येक संकटातून सामर्थ्य निर्माण करण्याची एक जिद्द स्वाभाविकपणे त्याच्याकडे येत जाते.

**संघटक का बनावे ?**

संघटकाला गरीब माणसे सन्मान देतात, आपल्या जीवनाचा भाग समजतात याचे मोठे मानसिक समाधान संघटकाला असते. हा त्याच्या जीवनातला अमूल्य ठेवा असतो.

आपल्यासोबत असणारे लोक आपले नेहमीच संरक्षण करतील, हा विश्वास संघटकाने बाळगावा. यासाठी संघटकानेही प्रत्येक गोष्टीत लोकांना विश्वासात घेत राहावे.

मी आणि विद्युल्लता एकदा एका गावात जाण्यासाठी निघालो होतो. संध्याकाळची वेळ होती. आम्हाला उशीर झाला होता. आम्हाला न्यायला एस. टी. स्टॅण्डवर आलेले लोक आमची वाट बघून निघून गेले होते. आम्हाला गावात पोहोचणे आवश्यक होते. आम्ही हिम्मत करून दोघांनीच त्या गावात जायचे ठरविले.

आमच्यासोबत कोणीच नव्हते. चालता चालता अचानक आमच्या कानावर एक आवाज आला. ''त्यांना हात तर लावून बघ, मी त्यांच्याबरोबर आहे.'' अंधारात आम्ही हे शब्द ऐकले. आम्ही अंधारात त्या व्यक्तीला शोधले. रामा झुंजर व इतर मुक्त वेठबिगार आमच्या संरक्षणासाठी आमच्या मागून धावत येत होते. एक जण बंदूक घेऊन आमच्या मागे लागला होता, त्याला आम्हाला मारावयाचे होते. पण या सर्वांनी पाठलाग करून, दगड मारून त्या माणसाला पळवून लावले. त्या रात्री त्या मुक्त वेठबिगारांनी आमचे प्राण वाचविले.

## अशीच आणखी एक घटना :

वेठबिगार मुक्तीनंतर किमान वेतनाचा संघर्ष सुरू झाल्यामुळे मालक खवळणे स्वाभाविकच होते. नोव्हेंबर १९८४ मध्ये मला ठार मारण्याचा कट त्यांनी रचला. महादू जाबर व रा. वि. भुस्कुटे यांना घेऊन मी मोटारसायकल चालवीत होतो. वसई तालुक्यातील अडणे गावातील सभा आटोपून रात्री आठच्या सुमारास आम्ही भाताणे गावाकडे पोहचलो. नाक्यावर शे-दीडशेचा जमाव हातात टयुबलाइटस्, सळया, कुऱ्हाडी घेऊन रस्ता अडवून उभा होता. तो जमाव पाहताच आमच्या काळजात धस्स झाले. आता आपण वाचू शकणार नाही याबद्दल आमची खात्री झाली. सुदैवाने त्या जमावाच्या थोडी अलीकडे आदिवासी पाड्याकडे जाणारी छोटीशी पायवाट होती. मोटारसायकल त्या वाटेने घेऊन मी कसातरी आदिवासी पाड्यात पोहोचलो. जमाव आमच्या पाठी धावत आला. लोड्या काटेला व इतरांना या हल्ल्याची कुणकुण लागल्याने तेही हत्यारांसह पाड्यात जमा झाले. आम्ही तेथे जाताच त्यांनी आम्हाला एका घरात नेऊन कोंडले. मालकांच्या सशस्त्र जमावाला त्यांनी पाड्याच्या तोंडावरच रोखले. जमाव त्यांना हे सांगत होता ''फक्त पंडितला आमच्या ताब्यात द्या, नाहीतर पाडा जाळून टाकू.'' लोकांनी मला त्यांच्या ताब्यात देण्यास नकार दिला. मालकाच्या जमावाने संपूर्ण पाड्याला वेढा घातला. पाडा जाळण्यासाठी रॉकेल मागविले गेले. त्या साऱ्या वेढ्याला संघटनेच्या सभासदांनी आतून वेढा देऊन रोखले. बाहेर कोणालाही पडू दिले नाही. महादूची बहीण, वनिता शौचाला जाण्याच्या निमित्ताने वेढ्याच्या बाहेर पडली व अडणे गावातील चिंतामण सवरला तिने मांडवी आऊट पोस्टला पाठविले परंतु एकही पोलीस आऊट पोस्टला नव्हता.

अखेर पहाटे तीन वाजता दहिसरला जाऊन चिंतामणने विद्युल्लताला ही माहिती दिली. मला ठार मारले आहे असाच तिचा समज झाला. मिळेल त्या वाहनाने विरारला जाऊन पहाटे पाचच्या सुमारास काही पोलीस घेऊन ती भाताण्याला पोहोचली. पोलिसांची गाडी पाहताच जमावाची पांगापांग झाली. गावातील आदिवासींनी स्वतःचा जीव धोक्यात घालून माझा जीव वाचविला होता.

संघटकाचा प्रवास खडतर असला तरी त्या कामाला अनेक सकारात्मक अंगेही आहेत. संघटना बांधणी ही एक आनंददायी प्रक्रिया आहे. लोकांचे आयुष्य बदलत असल्याचे संघटक डोळ्यांनी पाहत असतो. संघटकाचे जीवन लोकांना समर्पित असते. संघटना बनविण्याच्या प्रक्रियेमध्ये लोकांचा आत्मविश्वास जागृत होताना संघटक पाहत असतो.

लोकांना स्वत्व देण्याचे काम संघटक करीत असतो. लोकांचा आत्मविश्वास जागृत झाल्याचे 'याचि देही याचि डोळा' पाहण्याचे समाधान त्याला मिळत असते. आपण केलेल्या संघटनेमुळे लोकांची संघटित शक्ती वाढली, त्यांचा अधिकार वाढला, आपल्या जीवनाचा ताबा त्यांनी स्वत: घेतला, ते स्वत: बदलले आणि समाज बदलण्यासाठी स्वत: उभे राहिले याचे मोठे समाधान संघटकाला असते.

२७ ऑक्टोबर १९९९ रोजी लंडन येथील ब्रिटीश संसदेच्या नेहरु सभागृहात माझ्या व विद्युल्लताच्या वतीने गुलामीविरोधी आंतरराष्ट्रीय पुरस्कार स्वीकारल्यानंतर संघटनेचा कार्याध्यक्ष, मुक्त वेठबिगार केशव नानकर याने केलेले भाषण ऐकताना वेठबिगार मुक्तीच्या लढ्याचा संपूर्ण इतिहास आमच्या मन:चक्षुसमोर उभा राहिला.

एकेकाळचा गुलामीत खितपत पडलेला, जनावरासारखे जिणे जगत असलेला स्वप्नहीन केशव हे भाषण करीत असताना ऐकणे व प्रत्यक्ष पाहणे हा अनुभव केवळ अवर्णनीयच होता. ते क्षण आम्ही हळुवारपणे जपून ठेवले आहेत. त्याचे भाषण असे –

ब्रिटीश संसदेचे सदस्य सन्माननीय नील जेऱ्हाड, श्रीमान अध्यक्ष महोदय व गुलामीविरोधी आंतरराष्ट्रीय संस्थेचे सर्व सहकारी, युनिटॅरीयन युनिव्हर्सलीस्टच्या संचालिका श्रीम. कॅथी श्रीधर, माझे प्रेरणास्थान भाऊ आणि ताई (विवेक व विद्युल्लता पंडित), सन्माननीय अतिथी व माझ्या प्रिय मित्रांनो,

जे हजारो वेठबिगार मुक्त झाले, प्रथमच ज्यांनी स्वातंत्र्य आणि आत्मसन्मान याचा अनुभव घेतला त्या सर्वांचा प्रतिनिधी म्हणून मी आज येथे उपस्थित आहे. मी आमच्या संघर्षात आणि आमच्या यातनांमध्ये सर्वस्व झोकून दिलेल्या भाऊ व ताईंना गुलामीविरोधी आंतरराष्ट्रीय पुरस्कार दिल्याबद्दल संस्थेचे मनापासून आभार मानतो व त्यांना अभिवादन करतो. त्या दोघांनी आम्हाला गुलामीतून मुक्त करून जनावरासारखे जगणे नाकारायला लावून सन्मानाचे जीवन जगण्याचा मार्ग दिला. त्या दोघांमुळेच माणुसकी म्हणजे काय हे आम्ही शिकलो. त्यांनीच आमचा आत्मसन्मान जागा केला.

हजारो मैलांचा प्रवास करून मी आज आपणासमोर उभा आहे व आपल्याशी बोलत आहे. १९८३ सालचा विचार केला तर आज माझाच माझ्यावर विश्वास बसत नाही. हजारो लोकांसमोर भाषण करण्याचा आत्मविश्वास व

क्षमता माझ्यामध्ये आहे. कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याशी मी संवाद साधू शकतो याचा मला अभिमान आहे. त्यांनी जर माझे ऐकले नाही तर आमच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करून ते हक्क मिळविण्यासाठी मी तत्पर आहे. या ही पुढे जाऊन मी मुख्य राजकीय प्रवाहाचाही अनुभव घेतला आहे. अपक्ष उमेदवार म्हणून मी राज्य विधानसभेची निवडणूक लढलो आहे.

माझ्या शेतकरी मित्रांना शेतीची आधुनिक तंत्रे मी शिकवित आहे.माझा भूतकाळ पाहता वर्तमानावर विश्वास ठेवणे मलाच कठीण जाते. हे खरे आहे असे वाटत नाही. परंतु ते स्वप्नही नाही. असंख्य यातना भोगून अथक संघर्ष करून अनेक स्वप्नांना घेऊन हे स्वप्न सत्यात उतरले आहे.

मी सहा-सात वर्षांचा असताना माझ्या वडिलांनी मला गावच्या शाळेत पाठविल्याचे आठवते. मला माझी शाळा खूप आवडत असे. गाणी म्हणणे, नाचणे, खेळणे, बागडणे मला खूप आवडे. परंतु माझ्या वडिलांना काही पैसे हवे होते म्हणून आयुष्यभर ज्याच्याकडे काम केले त्या मालकाकडे त्यांनी पैशाची मागणी केली. मालकाने त्यांना काही पैसे दिले परंतु त्या बदल्यात माझे शिक्षण हिरावून घेतले. ''तुझा मुलगा शाळेत जाऊन काय करणार? तो त्याचे पोट तरी कसे भरणार?'' त्याने माझ्या वडिलांना विचारले. ''त्याला शाळेतून काढ, तो माझी गुरे सांभाळेल, त्या बदल्यात मी त्याला एकवेळचे जेवण देईन'' असे त्याने सांगितले. अशाप्रकारे सात वर्षाचा असताना पहिलीतच मला शिक्षणाला राम राम ठोकावा लागला.

मालकाकडे माझे काम करणे सुरूच होते. माझे लग्न झाल्यावर मी व माझी पत्नी, दोघेही मालकाच्या घरी व शेतावर काम करू लागलो. माझ्याबरोबर लग्न झाल्यानंतर माझी पत्नीसुद्धा माझ्यासारखीच वेठबिगारीत अडकली. पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत पाणी भरणे, भांडी घासणे, कपडे धुणे, लाकूडफाटा आणणे, शेण भरणे अशी कामे आम्ही करू लागलो. शेताची नांगरणी करणे, पेरणी करणे, आवणी करणे, कापणी करणे, भाताची झोडणी करणे अशी कामेही आम्ही करत असू. इतर शेतमजूर बंधनात नसल्याने ते भाग्यवान होते. आमच्यापेक्षा त्यांचे काम कमी असे व मजुरी जास्त असे.

एकदा जास्त मजुरीसाठी मी दुसऱ्या मालकाकडे कामाला गेलो. त्यामुळे माझा मालक खवळला आणि त्याच्या गुंडांना पाठवून मला परत आणले.

त्यांनी मला जबरदस्त मारहाण व अपमानास्पद शिवीगाळ केली. माझ्या मजुरीतून माझ्या कुटुंबाचे एकवेळचे जेवण कसेबसे होत असे. त्यामुळे माझ्यावरील कर्ज वाढत गेले. मी चरकातल्या ऊसासारखा पिळला जात होतो.

त्यामुळे मी हतबल होऊन, निराश होऊन मुका झालो होतो. गुलामीच्या या साखळया तोडाव्यात असे मला वारंवार वाटे. परंतु माझ्यासमोर मार्गच नव्हता. १९८३ साली छोटया शेतकऱ्यांना आणि वेठबिगारांना मुक्त करणाऱ्या श्रमजीवी संघटनेच्या काही कार्यकर्त्यांशी माझी भेट झाली. त्यांनी मला विश्वास व शक्ती दिली. त्यांनी मला अन्यायापुढे झुकू नकोस असे सांगून जुलुमाला 'नाही' म्हणण्यास शिकविले. पिढयान्‌पिढया सुरू असलेल्या आमच्यावरील अत्याचाराला आव्हान देण्याचे त्यांनी आम्हाला शिकविले. मालकांनी आमचा हरतऱ्हेने छळ केला. परंतु आमच्या दु:खात व कठीण प्रसंगात संघटना आमच्या बाजूने उभी राहिली. जेव्हा आमच्या पोटात अन्नाचा कण नसे तेव्हा तेही उपाशी राहत. अशारीतीने आम्ही संघर्ष जारी ठेवला.

आज आमच्या भागात वेठबिगार ठेवण्याची हिम्मत कोणीही करीत नाही. आमच्या गावची ग्रामपंचायत आमच्या ताब्यात आहे हे मी अभिमानाने सांगू इच्छितो. पैशाच्या नव्हे तर संघटनेच्या बळावर मी विधानसभेची निवडणूक लढविली. निवडणुकीत जरी मी हरलो तरी मी ती लढविली याचा मला अभिमान आहे. एकेकाळचा गुलाम, दबलेला, पिचलेला, गरीब माणूस संघटनेचे बळ मिळताच सामर्थ्यवान बनतो व लोकशाहीतील आपले हक्क मिळवू शकतो हे मी दाखवून दिले.

आज मी मुक्त वेठबिगार व छोटया शेतकऱ्यांना घेऊन सामूहिक शेती करीत आहे. एकेकाळचे वेठबिगार मालक शेतीसंदर्भातील सल्ल्यासाठी माझ्याकडे येतात. ही कहाणी केवळ माझी एकटयाची नाही तर ज्यांनी आपले जीवन बदलले अशा हजारोंची ही कथा आहे.

*******

# अपरिहार्य विरोध

परिस्थिती पाहून ज्या प्रतिक्रिया मनामध्ये उमटतात त्या पद्धतीचे कार्य ती ती व्यक्ती स्वीकारते. संघटना बांधणीबद्दल बोलताना निरनिराळ्या प्रकारच्या संघटना गृहीत धरल्या जाऊ शकतात. विकासाचे काम करीत असतानासुद्धा संघटना बांधणी करावी लागते असे काही जण म्हणतात. मात्र येथे जी संघटना अभिप्रेत आहे, त्या जनसंघटनेच्या कामात लोकांचा केवळ सहभाग अभिप्रेत नसतो तर त्यांचे जीवन बदलणारी ती एक प्रक्रिया असते. लोक स्वत: संघटनाबांधणीचा एक भाग असतात. या संघटना बांधणीत प्रस्थापित व्यवस्थेला धक्का देण्याचा प्रयत्न असतो. आर्थिक, सामाजिक हितसंबंध बदलण्याचा प्रश्न असतो.

संघटना जे मुद्दे हातात घेते ते एकतर्फी असत नाहीत. गावात शाळा चालविण्यासाठी, दवाखाना उघडण्यासाठी विरोध नसतो. गावातले सर्वजण त्यासाठी एकत्र येऊ शकतात. परंतु किमान वेतन मागायचा प्रश्न असेल, बळकावलेल्या जमिनी मागण्याचा प्रश्न असेल, तेव्हा सर्वच जण त्यामध्ये सहभागी होणार नाहीत. ज्यांना किमान वेतन मिळत नाही ते सर्वजण एकत्र येणार आणि ज्यांना किमान वेतन द्यावयाचे नाही ते त्यांच्या विरोधात उभे राहणार हे स्पष्ट असते. म्हणजेच संघटना बांधताना फक्त एका बाजूने लोक संघटित होत असतील असे नाही. दोन तट पडण्याची शक्यताच अधिक असते. त्या अर्थाने संघटनेचे मुद्दे हे एकतर्फी नसतात.

**संघटना बांधणीमध्ये विरोधाचे महत्त्व :**

जेव्हा जीवन बदलण्यासाठी संघटना उभी राहते, जेव्हा आर्थिक, सामाजिक हितसंबंधांना बाधा निर्माण होते त्या वेळेला संघटनेला विरोधक हा असणारच. किंबहुना विरोधकाशिवाय संघटना बांधणीची प्रक्रिया सुरूसुद्धा होऊ शकत नाही आणि त्याला गतीही मिळू शकत नाही. विरोधक हा एखादी व्यक्ती, गट असेल, काही वेळेला सरकारही

विरोधक असेल. विरोधकाची ताकद मोठी असेल वा छोटी असेल परंतु तो सर्व प्रकारच्या रणनीती वापरून संघटना बांधणीच्या प्रक्रियेला विरोध करणारच.

संघटकाने विरोध होणार हे गृहीतच धरायचे असते. विरोध झाला तर घाबरून जाण्याचे कारण नसते. विरोधक जेवढा ताकदवान असेल तेवढा विरोध जोरदार होतो. परंतु विरोध जेवढा जोरदार होईल तेवढीच आपल्या सभासदाला संघटित होण्याची संधी सुद्धा जोरदार असते. त्यामुळे विरोध जितका जोरदार असेल तितकेच आपणसुद्धा जोरदार वाढू शकतो, असा अनुभव अनेक ठिकाणच्या संघटकांना आलेला असेल.

संघटकाची आणि संघटनेची धोका स्वीकारण्याची किती तयारी आहे आणि कोणत्या मर्यादेपर्यंत विरोधकाला तोंड देण्याची ताकद आहे, यावर संघटनेने विरोधकापुढे कोणती आणि कशी पावले उचलायची हे अवलंबून असते. अनेकदा विरोध झाल्यानंतर लोक शांत बसतात. शांत बसणे हा रणनीतीचा भाग असू शकतो. परंतु ताकद नाही म्हणून शांत बसण्याचा विचार संघटकाने केला तर ही ताकद कधीही बनणार नाही.

विरोधक विरोध करीत असतानाच संघटनेला ताकद वाढविण्याची संधी प्राप्त होत असते. विरोधकाचे काम आपल्याला विरोध करण्याचे आहे हे अधोरेखितच आहे. विरोधक त्याची सर्व शक्ती पणाला लावून आपल्याला ठेचून काढण्याचा प्रयत्न करील. आपल्याला असंघटित करण्याचा प्रयत्न करील हे गृहीत धरलेले असले पाहिजे.

**धोके स्वीकारण्याची तयारी** :

संघटना बांधणीच्या प्रक्रियेमध्ये विरोध होतो त्याच वेळेस ही समाज पद्धती अशी का आहे ? विरोध का होतो ? कोण करतो ? याचे विश्लेषण करून लोकांना ते त्या त्या वेळेस समजावून सांगणे फार महत्त्वाचे असते.

संघटकाला विरोध सहन करण्यासाठी लोकांची आधीच मानसिक तयारी करून ठेवावी लागते. लोकांना त्यांचे जीवन बदलायचे असेल तर त्यासाठी हाल-अपेष्टा सहन करायची त्यांची तयारी असायला हवी याची स्पष्ट कल्पना संघटकास लोकांना सातत्याने देत राहावी लागते. त्यासाठी निरनिराळ्या कथा, इतिहासाचे दाखले यांचा उपयोग होऊ शकतो. शिबिरांच्या माध्यमातून, खेळांच्या माध्यमातून धोके स्वीकारण्याची तयारी कशा पद्धतीने करावी हे लोकांना सांगता येते. सैन्याच्या बाबतीत नेहमी असे सांगितले जाते की, 'शांततेच्या काळामध्ये तुम्ही जितका जास्त घाम गाळाल तेवढे युद्धकाळामध्ये रक्त कमी सांडेल.' लोकांची अन्यायाविरोधात लढण्याची जी एक ऊर्मी असते ती संघटकाला

शांततेच्या काळात वाढवत न्यावी लागते. आपल्यावर होणाऱ्या हल्ल्यांमुळे आपला विजय होणार, ही भावना संघटकाला लोकांमध्ये निर्माण करावी लागते.

**ध्रुवीकरण :**

विरोधातून ध्रुवीकरणाची प्रक्रिया सुरू होत असते. शोषकांच्या बाजूने कोण आणि शोषितांच्या बाजूने कोण हे त्याच वेळेला स्पष्ट होत असते. शांततेच्या काळात लोक वल्गना करतात. परंतु कसोटीच्या, संघर्षाच्या प्रसंगामध्ये ते नेमके कोणाच्या बाजूने राहणार हे कळते.

वेठबिगारांच्या मुद्द्यावर शेतकरीवर्ग आमच्या विरोधामध्ये उभा राहिला. युवावस्थेत समाजवादी चळवळीचा आमच्यावर प्रभाव होता. समाजवादी नेत्यांची अन्याय, अत्याचार व विषमतेविरोधातली, मानवतेची अनेक भाषणे आम्ही ऐकली होती. प्रत्यक्ष कामाला जेव्हा सुरुवात केली त्यावेळी यातील काही नेते मंडळी ज्यांची शोषणाविरोधातली भाषणे आम्ही ऐकली होती ती आम्हाला साथ देण्याऐवजी वेठबिगार मालकांच्या बाजूने उभी राहिली होती. त्यांच्या भूमिकेचे त्यांनी केलेले समर्थन अत्यंत बेगडी होते.

कविवर्य सुरेश भटांनी म्हटल्याप्रमाणे –

झुंजण्याचा फक्त बोभाटाच झाला,
झुंजणारे घोरती त्वेषात आता.

ज्यावेळेला नक्षलवादी म्हणून आम्हाला उखडण्याचा प्रयत्न केला गेला, त्यावेळी श्रद्धेय एस. एम. जोशी, प्रा. सदानंद वर्दे आमच्या मदतीला धावून आले. परंतु त्यांचे स्थानिक नेते आमच्या विरोधामध्ये आणि वेठबिगारांच्या मालकांच्या बाजूने उभे राहिले.

**विरोधकाची हत्यारे :**

एक तर विरोधक संघटनेवर सरळ हल्ला करील. हा हल्ला हिंसक असू शकतो, प्राणघातक असू शकतो, घाबरविणारा असू शकतो, दहशत पसरविणारा असू शकतो. सामाजिक बहिष्काराच्या माध्यमातूनही कडवा विरोध केला जाऊ शकतो. सामाजिक आणि आर्थिक हितसंबंध, संघटनेमुळे दुखावले जाणार असतील आणि प्रामुख्याने कनिष्ठ जाती, आदिवासी, दलित, संघटित होणार असतील तर विरोधकांकडून सामाजिक बहिष्काराचे हत्यार हमखास उपसले जाते. मात्र शोषित आदिवासीही या हत्यारास कसा पुरून उरू शकतो याचे हे उदाहरण:

वसई तालुक्यातील अडणे गावामध्ये वेठबिगारीच्या प्रश्नावरून आदिवासींना सामाजिक बहिष्काराला तोंड द्यावे लागत होते. गावाने आदिवासींना काम देणे नाकारले होते. दुकानावर सामान देण्याचे बंद करण्यात आले होते. आदिवासींची उपासमार चालू होती. कंदमुळे आणायला रानात जायचे रस्ते बंद केले होते, बांधावर उगवणारी भाजी त्यांनी खावी तर बांधावर जायलाही मज्जाव होता. उपाशी राहू पण पाटलाचे पाय धरायचे नाहीत या इरेला आदिवासीही पेटले होते.

त्याच वेळेला गावातील एका प्रस्थापिताचा मृत्यू झाला. त्या काळी गावामध्ये जर कुणा बिगर आदिवासीचा मृत्यू झाला तर त्या गावातल्या सर्व आदिवासींनी त्याच्या घरी जाऊन पाणी भरायचे, झाडलोट करायची अशी पद्धत होती. सरणासाठीची लाकडेही त्यांनीच न्यायची आणि रचायची. यासाठी कुठलाही मोबदला देण्याची पद्धत नव्हती. परंपरेनुसार त्या दिवशीही आदिवासींना निरोप गेले. मात्र आदिवासींनी स्वयंस्फूर्तीने गावातल्या लोकांना सांगितले की, ''जर तुम्ही आमची सर्व बाजूंनी कोंडी करता तर आज आम्ही तुमचे काम का करावे?''

गावाचे म्हणणे होते की, तुम्ही आदिवासी आमच्याशिवाय जगूच शकत नाही. आदिवासींनी मात्र हे दाखवून दिले की जगणे सोडा, तुम्ही आमच्याशिवाय मरूसुद्धा शकत नाही. शेवटी ते प्रेत गाडण्याचा निर्णय घेतला गेला. दुर्दैवाची गोष्ट अशी की ते सुद्धा त्यांना नीट न जमल्याने चौथ्या दिवशी ते प्रेत कुत्र्याने उकरून बाहेर काढले.

हल्ला, बहिष्कार याशिवाय विरोधक, यंत्रणांच्या व विशेषत: पोलिसांच्या मदतीने विरोध करू शकतो. वस्तुत: पोलिसांनी दुर्बलांच्या हितासाठी, अबलांच्या संरक्षणासाठी काम करणे अपेक्षित असते. तरीसुद्धा आर्थिक आणि सामाजिक हितसंबंधांना बाधा येत असताना पोलीस यंत्रणा ही गरिबांच्या बाजूला उभी राहिल्याचे चित्र मात्र फार क्वचित दिसते. पोलिसांना सोबत घेऊन दडपशाही करण्याकडे विरोधकांचा कल असतो आणि पोलिसांचा पूर्ण वापर निरनिराळ्या पद्धतीने विरोधकांकडून होत असतो.

**विरोधक शासन :**

अनेकदा शासनही संघटनेचा विरोधक असते. सरकारी यंत्रणासुद्धा गरिबांच्या संघटना दडपण्यासाठी निरनिराळ्या पद्धतीचे मार्ग अवलंबत असतात. फक्त महाराष्ट्रात, भारतातच नव्हे तर जगभरामध्ये असे प्रयत्न होताना दिसतात.

भारतामध्ये सामाजिक परिवर्तनासाठी, सामाजिक न्यायासाठी अनेक प्रकारचे कायदे आतापर्यंत झालेले आहेत. बालमजुरी प्रतिबंधक कायदा, किमान वेतनाचा कायदा, समान वेतनाचा कायदा, अत्याचार प्रतिबंधक कायदा, आदिवासींना त्यांच्या जमिनी परत मिळवून देणारा कायदा, शेतकऱ्यांच्या हिताचे भूमी सुधार कायदे किंवा महिलांच्या बाबतीत हुंडाबंदीच्या संदर्भातील कायदा किंवा कौटुंबिक हिंसाचार विरोधातला कायदा, हे आणि अशा पद्धतीचे निरनिराळे कायदे दुर्बल घटकांसाठी धोरणकर्त्यांनी बनविलेले आहेत. शासकीय यंत्रणा या कायद्यांची अंमलबजावणी करताना दिसत नाहीत. संघटितपणे या कायद्यांच्या अंमलबजावणीचा आग्रह जरी धरला तरीसुद्धा मोठ्या प्रमाणात विरोधाला तोंड द्यावे लागते.

हे कायदे शोषणापासून संरक्षण करणारे असले तरी त्यांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा ही शोषण करणाऱ्यांच्याच बाजूने उभी राहते. म्हणजे विरोधकाची बाजू अधिक मजबूत बनते. शोषित व्यक्ती एका बाजूला आणि सारी शासकीय यंत्रणा शोषकाच्या सोबत असे सर्रास दिसते. आपल्या समाजातील जातींची व उच्च-नीचतेची उतरंड यास कारणीभूत आहे. या उतरंडीच्या तळाच्या पायरीवर असणाऱ्या लोकांचे, दुर्बलांचे प्रश्न दडपून टाकण्यासाठी सारे विरोधक एकवटतात. दुर्बल बलवान बनण्याची व आपली शक्ती क्षीण होण्याची भीती त्यांना असते.

जेव्हा लोक हक्क मागतात, अधिकार मागतात, त्या वेळेला सामान्यपणे सरकारी यंत्रणा, कायदा आणि सुव्यवस्थेचे कारण पुढे करते. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल असे म्हणते. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणजे काय ? मजुरांनी किमान वेतन मागितले, आदिवासींनी त्यांचे हक्क मागितले, विस्थापितांनी पुनर्वसन मागितले, यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याचे काय कारण आहे? परंतु कायदा राबवायचा ठरवला तर व्यवस्था बदलाच्या प्रक्रियेस सुरुवात होते. आणि व्यवस्थेत बदल ज्यांना नको असतो त्यांना कायद्याची अंमलबजावणीसुद्धा नको असते.

कायदा आणि सुव्यवस्था याचा खरा अर्थ म्हणजे जी व्यवस्था बदलावी असे कायद्याला अभिप्रेत आहे, ती व्यवस्था बदलण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी करणे. अंमलबजावणीही 'लेटर ॲण्ड स्पिरिट' मध्ये हवी. म्हणजे केवळ कायद्यातल्या शब्दांची अंमलबजावणी नव्हे तर त्या शब्दांच्या मागच्या भावना काय आहेत ते समजून त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक असते. परंतु आपल्याकडील जातिव्यवस्था, समाजव्यवस्था, शोषणव्यवस्था जशीच्या तशी राहावी म्हणून कायद्याची अंमलबजावणी न करण्याकडे अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेचा कल असतो.

नांदेडमध्ये शंकर पवार नावाचा भटक्या विमुक्त समाजातला एक कार्यकर्ता अतिशय चांगले काम करीत होता. त्याने त्या भागातल्या म्हारकी, मांगकीच्या प्रथेला आव्हान दिले होते. देवस्थानांनी बळकावलेल्या त्यांच्या जमिनी सोडविण्यासाठी तो प्रयत्न करीत होता. आश्चर्याची गोष्ट अशी की, पोलीस खात्याने आणि महसूल खात्यानेच नव्हे तर खुद्द जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी सुद्धा त्याच्या विरोधामध्ये प्रतिबंधक कारवाया तर केल्याच पण राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली त्याला अटकही केली.

तो दलितांना, शोषितांना संघटित करून अशांतता निर्माण करतो आणि त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण झालेला आहे असे कारण दिले गेले. या संदर्भामध्ये पुढे मोठे आंदोलन झाले. राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत सल्लागार मंडळासमोर मी स्वत: शंकर पवारची बाजू मांडली आणि जवळपास बावीस दिवसानंतर त्याची मुक्तता झाली.

संघटकाने विरोधकाच्या विरोधाला जुमानण्याचे किंवा घाबरून जाण्याचे काहीच कारण नसते. संघटकाने विरोध होणार आहे हे गृहीतच धरलेले असावे. कोण नेमके कोणाच्या बाजूने आहे ते विरोधामध्ये स्पष्ट होत असते. त्यामुळे विरोधक ज्यावेळेला विरोध करतो ती संघटकाच्या दृष्टीने एक संधी असते, आपण नेमके कोणाच्या बाजूने आहोत ते सिद्ध करण्याची. संघटना उभी करताना अनेक जण दुखाविले जाणार हे स्पष्टच असते. मी न्यायाचे काम करतो आहे, मग मला विरोध का ? अशी भूमिका अनेकजण घेतात. त्यामुळे आपणास विरोध होत असल्याबद्दल त्यांना वाईट वाटते. मात्र संघटकाने विरोध गृहीत धरला असेल तर अशा तक्रारीला वाव राहत नाही.

आपण केवळ संख्येने अधिक असणे म्हणजे ताकद नव्हे, हे लक्षात घेणेही महत्त्वाचे असते. अनेकदा आपण कमीजण असलो तरी प्रभावीपणे संघटना बांधणी करून यश मिळविता येऊ शकते. तर काही वेळेला संघटना मोठी असेल परंतु काय साध्य करायचे आहे याची स्पष्टता नसेल तर हाती काही लागत नाही. संघटक विरोधाचा उपयोग संघटना वाढविण्याची संधी म्हणून कशा पद्धतीने करून घेऊ शकतो याचे हे उदाहरण.

शंकर पवारला राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली अटक झाली परंतु आम्ही त्याचा उपयोग संघटनाबांधणीसाठी करून घेतला. २१ जानेवारीला त्याला अटक झाली. २६ जानेवारी, हा प्रजासत्ताकाचा दिवस जवळच होता. संविधानाने बहाल केलेले अधिकार मिळावेत यासाठी शंकर पवार

संघटनाबांधणी करीत होता आणि प्रजासत्ताक दिनाच्या दरम्यान त्याला अटक होते, हा मोठा विरोधाभास होता.

हा विरोधाभास लोकांसमोर आणून, त्याचा उपयोग करून प्रशासनाला जेरीला आणून संघटना अधिक ताकदवान बनविण्याचे, लोकांच्या जाणिवा अधिक प्रगल्भ करण्याचे आम्ही ठरवले.

शंकर पवारचे गाव जिल्हाधिकारी कचेरीपासून दूर होते. फारशी साधने उपलब्ध नव्हती त्यामुळे जे लोक येतील त्यांनाच सोबत घ्यायचे आम्ही ठरवले. आम्ही मोजून चोवीस लोक त्या दिवशी जिल्हाधिकारी कचेरीकडे गेलो. मूलभूत हक्कांवर गदा आलेली होती, संघटना स्वातंत्र्यावर गदा आलेली होती. म्हणून आम्ही तिरंग्यानेच आमची तोंडे बांधली. प्रजासत्ताकाच्या दिवशी आम्हाला बोलण्याची बंदी केलेली आहे हे आम्हाला दाखवायचे होते. हातही बांधले. आमची मुस्कटदाबी करायचे अधिकार शासनाला कोणी दिले? असा प्रश्न विचारणारी पत्रके वाटली. आम्ही फक्त चोवीस लोकांनी प्रजासत्ताकदिनाच्या कार्यक्रमासाठी जमलेल्या शेकडो लोकांची संवेदना जागविण्याचा प्रयत्न केला. जिल्हाधिकाऱ्यांची गाडी तेथून जात असताना मी अचानक पोलिसांची फळी तोडून जिल्हाधिकाऱ्यांच्या गाडीसमोर आडवा झालो. आनंदाने पोलिसांच्या लाठ्या व लाथाबुक्क्यांचा मार खाल्ला. आणि प्रशासनाची ही दडपशाही आम्ही लोकांसमोर आणू शकलो.

**कल्पक विरोधक :**

विरोधक अनेक पद्धतीने विरोध करू शकतो. अनेकदा विरोधक आक्रमक राहण्याऐवजी युक्तीने आंदोलन रोखू शकतो. पोलिसांकडे कायदा व बळ ही मुख्य साधने असतात. बहुसंख्य वेळा याच साधनांचा ते वापर करतात. काही कल्पक अधिकारी मात्र या पलीकडे जाऊन डावपेचाने परिस्थिती हाताळतात. मात्र असे अधिकारी विरळ आहेत.

जनतेच्या संघर्षामुळे निर्माण होणारी कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती हाताळताना पोलिसांना बरीच कसरत करावी लागते. गुन्हे दाखल करण्याची धमकी देणे किंवा प्रत्यक्ष गुन्हे दाखल करणे किंवा प्रतिबंधात्मक कारवाई करणे किंवा बळाचा वापर करणे इ. मार्ग पोलिसांकडे उपलब्ध असतात. संघटकाकडे कल्पकता असल्यास अनेक डावपेचांच्या आधारे तो संघर्ष करू शकतो. मात्र पोलीसही आपली कल्पकता वापरून उद्‌भवणारा संघर्ष खुबीने टाळू शकतात.

मानवी हक्क अभियानाच्या वतीने देशात असलेल्या वेठबिगारी प्रथेबाबत जनजागरण करण्यासाठी व विशेषत: मराठवाड्यातील जातिप्रथेवर आधारित वेठबिगारी निर्मूलनासाठी जिल्हा प्रशासनाला कार्यप्रवण करण्यासाठी प्रजासत्ताकदिनी सत्याग्रहाचे आयोजन करण्यात आले होते. ध्वजवंदनानंतर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सत्याग्रह करावयाचा असल्यामुळे आदल्या रात्रीच सत्याग्रही विविध जिल्ह्यांत जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी जमणार होते. अन्य सर्व जिल्ह्यांत पोलिसांनी सत्याग्रहाच्या वेळीच कारवाया केल्या. लातूर जिल्ह्यात मात्र पोलिसांनी कल्पकतेने डावपेच टाकून सत्याग्रह हाणून पाडला.

जिल्हा स्तरावर जिल्हा विशेष शाखा पोलीस अधीक्षकांच्या नियंत्रणाखाली कार्य करते. या शाखेचे पोलीस राजकीय घडामोडी तसेच इतर सामाजिक घडामोडींवर लक्ष ठेवून असतात व आपला अहवाल जिल्ह्याला पाठवित असतात. आंदोलनाची गुप्त वार्ता ते त्यांच्या सूत्रांकडून मिळवित असतात. असे पोलीस गणवेशात नसतात. लातूरच्या पोलीस अधिकाऱ्यांनी अशा पोलिसांमार्फत जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनच्या हद्दीतून किती सत्याग्रही जिल्हा मुख्यालयाकडे निघाले आहेत व ते कोठे थांबणार आहेत याची माहिती घेतली. रात्री हे सर्व सत्याग्रही जेथे थांबले होते तेथे गुप्तपणे जाऊन पोलिसांनी खात्री करून घेतली. कार्यकर्त्यांपैकीच एकाकडून सत्याग्रही किती आहेत, ते सकाळी किती वाजता निघणार इ. माहिती गप्पा मारीत काढून घेतली. दुसऱ्या दिवशी पहाटे सहाच्या सुमारास पोलिसांच्या गाड्यांचा ताफा ते राहात असलेल्या जागी पोहोचला. सत्याग्रही व कार्यकर्ते बेसावध होते. कुणी दात घासत होते तर कुणी प्रातर्विधीला गेले होते. पोलिसांनी त्यांच्याशी गोड बोलून त्यांना गाडीत घेतले आणि थेट पोलीस ठाण्यात नेले. तेथे चहापान दिले व साहेब आले की आपण कार्यक्रमाच्या ठिकाणी जाऊ असे सांगून त्यांना तिथेच अडवून ठेवले. काही सत्याग्रही सकाळी येणार होते. आधी मिळवलेल्या माहितीच्या आधारे त्या त्या भागातील जिल्हा विशेष शाखेचे पोलीस त्या त्या रस्त्यावर उभे केले. सत्याग्रहींना घेऊन येणारे वाहन दिसले की ते मूठ आवळून 'झिंदाबाद'करीत. संघटनेचे सभासद एकमेकांना 'झिंदाबाद' ह्या शब्दानेच अभिवादन करतात, त्यामुळे विशेष शाखेचा हा पोलीस, संघटनेचा सभासद आहे असे समजून वाहन थांबविले जाई. हे पोलीस त्यांनाही झेंडावंदनाला जायचे आहे, असे सांगून

त्या वाहनात चढत आणि इतर सत्याग्रही जमले आहेत तेथे आपण जाऊ असे सांगून वाहन पोलीस स्टेशनला घेऊन जात. पोलीस स्टेशनला आल्यावर लोकांना आपली फसगत झाल्याचे लक्षात येई. अभियानाचे एकनाथ आव्हाड, दशरथ जाधव, ओंकार बिरासदार असे एकापेक्षा एक अव्वल कार्यकर्ते अशारीतीने पोलिसांच्या जाळयात अडकले. सत्याग्रह होऊ शकला नाही. तरीही आम्ही पोलिसांनी अलगद टाकलेल्या कल्पक डावपेचाबद्दल त्यांचे खास अभिनंदन केले.

**विरोधकातील बदल :**

संघटकाने आपल्या लोकांची मानसिकता बदलण्याचा जसा प्रयत्न केला पाहिजे, तसाच प्रयत्न अन्याय, अत्याचार करणाऱ्यांची, शोषण करणाऱ्यांची मानसिकता बदलण्यासाठीही करणे आवश्यक आहे. अनेकदा शोषण करणाऱ्यांपैकी काहीजण आपली चूक मान्य करतात आणि बदलायला तयार असतात. अशांचे संघटनेने स्वागत केले पाहिजे.

श्रमजीवी संघटनेने जेव्हा पहिले वेठबिगार मुक्त केले, तेव्हा आम्ही त्या मालकांकडे त्यांची थकबाकी मागितली होती. सर्वांनी नकार दिला. परंतु रघुनाथ ऊर्फ कोंडू पाटील याने थकबाकी द्यायचे मान्य केले. त्याच्या हातून ही चूक नकळत झाल्याचे त्याने स्वीकारले. संघटनेने जाहीरपणे त्याचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला. त्यानेही वेठबिगारांची थकबाकी जाहीरपणे दिली.

असे लोक अनेक ठिकाणी सापडतात. त्यांना पटले तर ते बदलायला तयार असतात. पण अशी संधी संघटकाने त्यांना दिली पाहिजे. मात्र जेथे विरोध असेल तेथे विरोधच केला पाहिजे. बहुतेक वेळा विरोधक, शोषण करणारा आपण मेहेरबानी करीत असल्याच्याच आविर्भावात असतो.

एखाद्या मुद्द्यावरील विरोधक हा कायमचा विरोधक असेल असे गृहीत धरणे चुकीचे ठरू शकेल. मुद्दा, काळ, परिस्थिती बदलल्यावर तो विरोधक संघटनेचा मित्र बनू शकतो.

श्रमजीवी संघटनेच्या वेठबिगार मुक्तीच्या लढ्यात वेठबिगार मालकांच्या शेतकरी संघटनेने तीव्र विरोध केला होता. या शेतकरी संघटनेचे कालांतराने कुणबी सेनेत रूपांतर झाले. ठाणे जिल्ह्यात गेल इंडिया कंपनीची गॅस पाइपलाइन टाकण्याचे काम सुरू झाले. शेतकऱ्यांना अत्यंत अल्प मोबदला

कंपनीने देऊ केला. पोलिसी बळ वापरून मोबदला न देता जबरदस्तीने उभी पिके तुडवून शेतात बुलडोझर लावून कंपनीने अत्याचार चालविला होता. यात आदिवासी, कुणबी, आगरी शेतकरी भरडले जात होते. संघटनेने गेल इंडियाचे काम बंद पाडले. या मुद्द्यावर संघटना व कुणबी सेना एकत्रितपणे लढली व शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळवून दिला.

*******

# हाका उषेच्या

संघटना बांधणे ही अखंड, अव्याहतपणे चालणारी प्रक्रिया आहे. एकदा संघटना केली आणि थांबलो असे होत नाही. या प्रक्रियेमध्ये लोक स्वत:हून आपले मुद्दे सोडवायला पुढे येतील हे संघटकाने पाहिले पाहिजे.

संघटना करायची म्हणजे एका मुद्द्याकडून दुसऱ्या मुद्द्याकडे, दुसऱ्या मुद्द्याकडून तिसऱ्या मुद्द्याकडे, छोट्या मुद्द्याकडून मोठ्या मुद्द्याकडे आणि कठीण मुद्द्याकडून अधिक अवघड मुद्द्याकडे जात राहावयाचे असते. त्या मुद्द्यांची साखळी तयार करावयाची असते. वेठबिगारांचा मुद्दा आल्यानंतर किमान वेतनाचा मुद्दा असतो, किमान वेतनाचा मुद्दा आल्यानंतर शेतीच्या पुनर्स्थापनेचा मुद्दा असतो, बळकावलेली शेती परत घेण्याचा मुद्दा असतो, त्यानंतर मुलांच्या शिक्षणाचा मुद्दा असू शकतो, गावातील विजेचा मुद्दा असू शकतो, रस्त्याचा मुद्दा असू शकतो. असे अनेक मुद्दे एकामागे एक, संघटकाने उचलत राहायचे असतात. यामुळे संघटना प्रवाही राहायला मदत होते. सुरुवातीच्या काळात छोटे छोटे मुद्दे घेतले तरी कालांतराने अवघड मुद्द्यांकडे संघटनेला जावेच लागते. अवघड मुद्दे टाळता येत नाहीत.

ज्यावेळी लोकांच्या प्रश्नांपासून, मुद्द्यांपासून एखादी संघटना दूर जाईल त्यावेळी ती संघटना विघटनाच्या दिशेने वाटचाल करू लागेल. संघटना जोपर्यंत लोकांचे निरनिराळे मुद्दे हाताळत राहते आणि लोकांना त्यात यश मिळवून देते तोपर्यंत संघटनेची प्रक्रियाही गतिमान राहते. या प्रक्रियेमध्येच संघटनेचे यश सामावलेले असते. या प्रक्रियेमध्ये लोकांचा आत्मविश्वास वाढत असतो, अनेकदा नव्या नेतृत्वाची ओळख होत असते, नेतृत्वाचा कसही लागत असतो. आपल्या लोकांमधील, कार्यकर्त्यांमधील कौशल्ये या प्रक्रियेतच ओळखता येतात. कोण रणनीती आखू शकतो, कोण प्रश्नांचे विश्लेषण करू शकतो, कोण प्रश्नांची

मांडणी चांगल्या पद्धतीने करू शकतो, कोणामध्ये विरोधकाला तोंड देण्याची क्षमता आहे हे सर्व या प्रक्रियेत लक्षात येत जाते. त्या दृष्टीने ही प्रक्रिया फार महत्त्वाची असते.

**संघटकाची प्रतिमा :**

संघटना बांधणीच्या प्रक्रियेमध्ये संघटकाची प्रतिमा फार महत्त्वाची ठरते. गरीब, कष्टकरी, शोषित आपल्या अनुभवाच्या आधारे माणसे जोखत असतात. उक्ती आणि कृतीमधले अंतर या लोकांना प्रकर्षाने जाणवते. लोक विश्वास ठेवतात की नाही यावर संघटनेचे, संघटकाचे भवितव्य ठरते. लोकांचा संघटकावर विश्वास नसेल तर लोक त्याच्या जवळ जात नाहीत, त्यांचे दु:ख सांगत नाहीत, त्यांच्या अडचणी सांगत नाहीत. लोकांची दु:खे, अडचणी समजल्याशिवाय संघटकाला मुद्द्याचा शोधसुद्धा घेता येत नाही. यासाठी सर्वात महत्त्वाची ठरते संघटकाची वर्तणूक. संघटक काय बोलतो यापेक्षा तो काय करतो, कसा वागतो हे जास्त महत्त्वाचे असते.

वेठबिगार मुक्त करण्यासाठी प्रयत्न करणारा एखादा संघटक जर वेठबिगार मालकांच्या संपर्कामध्ये जास्त असेल, त्यांच्या घरी त्याचे जाणे-येणे असेल, तर स्वाभाविकपणे वेठबिगार संघटकावर विश्वास ठेवणार नाहीत. सुरुवातीच्या काळामध्ये मजुरांचा विश्वास संपादन करायला आम्हाला तीन वर्षे लागली. कारण आमचे जाणे-येणे वेठबिगारांच्या विरोधकांकडे होते.

संघटकाची प्रतिमा स्पष्ट असणे आवश्यक असते. लोक आपले निरीक्षण करीत असतात हे संघटकाने कायम ध्यानात ठेवले पाहिजे. संघटक काय बोलतो, वेळ आल्यानंतर काय निर्णय घेतो या सर्वांचे निरीक्षण, लोक निरक्षर असले तरी फार बारकाईने करीत असतात. छोट्या-छोट्या मुद्द्यांवर संघटक कसे निर्णय घेतो, कोणाच्या बाजूने घेतो, याचासुद्धा परिणाम संघटनेच्या प्रक्रियेमध्ये जाणवत असतो. संघटक पूर्णपणे त्यांच्या बाजूने आहे, असा विश्वास बसल्याशिवाय लोक संघटना प्रक्रियेमध्ये सामील होत नाहीत. विशेषत: आर्थिक हितसंबंधांचा प्रश्न येतो तेव्हा संघटक नेमकी काय भूमिका घेतो, कशापद्धतीने मुद्द्यांची मांडणी करतो या सर्व गोष्टी महत्त्वाच्या असतात.

'संघटना करणे' याचा अर्थ जोरजोरात क्रांतिकारी भाषणे करणे नव्हे, हे संघटकाला लक्षात घ्यावे लागते. यामुळे लोक संघटनेबरोबर येतातच असे नव्हे. असे अनेक संघटक मी पाहिले आहेत की, ज्यांना भाषण करता येत नाही परंतु लोकांचा त्यांच्यावर गाढविश्वास असतो. त्या बळावर ते मजबूत संघटना उभी करू शकतात.

संघटकाच्या प्रतिमेची एकदा खात्री पटल्यानंतर लोक स्वत:हून त्याच्यावर विश्वास टाकतात. त्या विश्वासाला पात्र ठरत, लोकांचा अधिकाधिक विश्वास संपादन करीत पुढे जात राहण्याची जबाबदारी संघटकाची असते. फाटके कपडे घालून गेलो तर लोक विश्वास ठेवतात, असे मानून मुद्दामहून फाटके कपडे घालणारे संघटक आहेत. आदिवासी भाषेत बोललो, त्यांच्यासारख्या सवयी जोपासल्या तर आदिवासी आपल्यावर विश्वास ठेवतील असाही काहींचा समज असतो. परंतु हे सगळे गैरसमज आहेत. लोक संघटकाचे कपडे पाहत नाहीत, भाषा पाहत नाहीत, सवयी पाहत नाहीत, संघटक लोकांच्या प्रश्नावर कोणती भूमिका घेतो याकडेच लोकांचे लक्ष असते आणि त्याआधारे ते संघटकासोबत जायचे की नाही हे ठरवीत असतात.

विश्वास संपादन करणे ही अतिशय अवघड गोष्ट आहे. माझ्यावर विश्वास ठेवा म्हणून लोक विश्वास ठेवत नाहीत. विश्वास संपादन करावा लागतो आणि फक्त कसोटीच्या वेळीच त्याचा कस लागतो. संघटकाचे बोलणे आणि करणे, उक्ती आणि कृती, कथनी आणि करणी यामध्ये अंतर असता कामा नये. योग्य वेळ आल्यानंतर परिणामांची पर्वा न करता संघटकाने लोकांच्या हिताचा निर्णय घेतला आणि तशी लोकांची खात्री पटली तरच लोकांचा विश्वास संघटक संपादन करू शकतो.

गरिबांना आपण काही दिले म्हणजे आपल्यावर ते खूष होतील आणि आपल्या बाजूने राहतील असा विचार करून 'देण्याकडे' लोकांचा फार ओढा असतो. संघटना वाढीसाठी याचा अजिबात उपयोग होत नाही. उलट लोकांची संघटकाकडे पाहण्याची दृष्टी बदलते. लोकांचा विश्वास संपादन करावयाचा असेल तर त्यांना काही देण्यापेक्षा त्यांच्याकडे जाणे, त्यांच्याशी बोलणे, त्यांच्या सुख-दु:खात समरस होणे, त्यांच्याबरोबरीने खाणे हे फार आवश्यक असते.

संघटनेच्या अगदी सुरुवातीच्या काळात आम्ही आदिवासींसोबत सकाळपासून रात्रीपर्यंत गावोन्‌गाव, पाडेन्‌पाडे पिंजून काढले. भूक लागली तरी बोलायची सोय नव्हती. त्यांच्या झोपड्यात काही खायला तरी असेल का? ही चिंता आम्हाला असायची. तर त्यांच्या घरचे आम्ही काही खाऊ का? हा प्रश्न त्यांना पडायचा. माझा आम्लपित्ताचा विकार या काळात बळावला. एके दिवशी भूक अनावर झाली. जानू मेघवालेच्या घरी एक काकडी दिसली. ती काकडी खाण्यास मागितली. लोकांनी भराभर शेतावर जाऊन काकड्यांचा ढीगच उभा केला. पोटभर काकडी खाल्ली, त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. मालाड येथे आपल्या घरी परत जात असताना डोके प्रचंड दुखू लागले, असह्य वेदना सुरू झाल्या. बोरिवली स्थानकावर खाल्लेल्या सर्व काकड्यांचे पाणी ओकले. तेव्हा काहीसे बरे वाटले.

अडणे गावात मात्र ही कोंडी फोडण्याचा निर्णय आम्ही घेतला. आदिवासींच्या घरात काहीच नसेल तरी तांदळाच्या कण्यातरी असतील याचा अंदाज आला. केशव नानकरला कण्यांची पेज (कणेरी) बनवायला सांगितली. प्रचंड भुकेमुळे दोन-तीन ग्लास कणेरी प्यायलो. भाऊला कणेरी आवडते असा सर्वांचा समज झाला. हे पसरायला वेळ लागला नाही. त्यानंतर जेथे जाऊ तेथे लोक कणेरी देऊ लागले.

मेढे गावात लोकांनी रात्रीची सभा ठेवली होती. प्रत्येकाच्या घरून शिधा जमा करून एकत्र जेवण शिजविले होते. जेवणाच्या वेळी मला व विद्युल्लताला घरात जेवण वाढले. बाकी सारे अंगणात बसले. आम्ही अंगणात सर्वांसोबत जेवतो असे सांगितल्यावर कार्यकर्ते संकोचले. डाळ कमी असल्याने दोघांसाठीच डाळ केली होती व इतरांसाठी भात शिजविताना काढलेल्या पेजेत मीठ-मसाला टाकला होता. हे पाहून गहिवरून आले. आमच्यासाठी केलेली डाळ पेजेत मिसळली व आम्ही दोघे सर्वांसोबत अंगणात जेवलो. आपण उपाशी असतानासुद्धा आपला घास काढून इतरांना देण्याची संस्कृती गरिबांकडे असते. गरिबाच्या घरी कोणी जात नाही, कोणी बसत नाही, त्यांच्या घरी कोणी पाणी पीत नाही, त्यांच्या घरचे कोणी जेवत नाही ही खंत त्यांच्या मनामध्ये असते. ज्यावेळी संघटक गरिबाच्या घरी जातो, त्याच्या बरोबरीने जमिनीवर बसतो, तो जे काही खात असेल ते खातो, त्या वेळी संघटकाबद्धल जे प्रेम, आपुलकी, विश्वास गरिबाच्या मनामध्ये तयार होतो, तो नष्ट करणे विरोधकासाठी फार कठीण असते.

**हितसंबंधांच्या ध्रुवीकरणाची आवश्यकता :**

समाजामध्ये हितसंबंध असणारच. ते नाकारण्यात अर्थ नाही. हे हितसंबंध जपण्याचा प्रयत्न हितसंबंधी करणारच. आपला न्याय्य वाटा मिळविण्याचा प्रयत्न शोषित वर्गाला करावयाचा असतो. त्या लोकांना संघटित करणे हे संघटकाचे काम ठरते. आपणास परिस्थिती बदलायची आहे, असा विचार लोक करीत नाहीत. कारण त्यासाठी आवश्यक ते बळ, आवश्यक ती शक्ती, आवश्यक ते सामर्थ्य आपल्याकडे आहे यावर लोकांचा विश्वास नसतो. आपण संघटित झाल्यास ही ताकद, हे सामर्थ्य आपल्याकडे आहे असा विश्वास देण्याचे काम संघटकाचे आहे. लोकांच्या बाजूने उभे राहताना पूर्णपणे लोकांच्याच बाजूने असावयास लागते. आपण दोन्ही बाजूने राहू आणि थोडसे लोकांना मिळवून देण्याचा प्रयत्न करू, असा संघटकाने विचार केल्यास लोकांच्या पदरात थोडेसे काही पडेलही परंतु ती संघटनेची प्रक्रिया नसेल. शोषण करणारे एका बाजूला आणि शोषित एका बाजूला असे हितसंबंधांचे ध्रुवीकरण झाल्याशिवाय संघटनेची प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही.

**मानसिकतेमध्ये बदल :**

गांधीजींनी 'हिंद स्वराज्य' मध्ये लिहिले होते की, या देशातले लोक सहन करतील तोपर्यंतच ब्रिटिश या देशात राज्य करू शकतील. ज्या दिवशी या देशातले लोक ठरवितील की ब्रिटिशांना हाकलून द्यायचे त्या दिवसापासून ब्रिटिश येथे राज्य करू शकणार नाहीत. हेच सूत्र संघटनेलाही लागू होते. ज्याक्षणी लोक ठरवितील की त्यांना मुक्त व्हायचे आहे त्यावेळी कुणीही त्यांना गुलामीत ठेवू शकणार नाहीत. जेव्हा लोक आहे ती परिस्थिती बदलावयाचे ठरवितील त्यावेळी कोणीही त्यांना रोखू शकणार नाही.

संघटना बांधणीबद्दल बोलताना मानसिकतेमधील बदलाचा उल्लेख वारंवार होत राहतो. मानसिकतेमध्ये बदल हा संघटना बांधणीच्या प्रक्रियेचा अविभाज्य भाग आहे. लोक ज्या पद्धतीने विचार करतात ती पद्धत संघटकाला बदलावी लागते. लोकांची मानसिकता पराभूत असते, आपण जिंकू शकत नाही, असा लोकांचा ठाम विश्वास झालेला असतो. त्यांना आधी यश मिळालेले नसते. त्याचा स्वाभाविक परिणाम म्हणून लोक स्वप्न बघू शकत नाहीत, उद्याचा विचार करू शकत नाहीत.

कविवर्य सुरेश भटांनी संघटकाच्या भूमिकेचे अप्रतिम वर्णन केलेले आहे -

दिले प्रत्येक वस्तीला आम्ही आकाश सोनेरी
जिथे जातो तिथे हाका उषेच्या वाटतो आम्ही

लोकांना स्वप्न वाटण्याचे काम संघटकाला करावयाचे असते. लोकांना स्वप्न बघावयाला शिकविण्यासाठी आणि तुम्ही जिंकू शकता ही भावना त्यांच्यामध्ये निर्माण करण्यासाठी संघटकाला खूप श्रम घ्यावे लागतात.

वाडा तालुक्यातील अंबीस्ते गावातील एका जमिनीच्या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊनही संबंधित आदिवासी केस जिंकण्याची शक्यता नव्हती. कागदोपत्री जमीन त्याच्या हातून गेली असली तरी जमिनीवर त्याचा प्रत्यक्ष कब्जा होता. कब्जा टिकविण्यासाठी त्याला स्वत:ला हिम्मत करण्याची आवश्यकता होती. तो माझ्याकडे आला.

मी: तुला मुले किती?

तो: चार.

मी: आता या चार मुलांचे तू काय करणार आहेस?

तो: ही जमीन गेली की माझे काहीच राहणार नाही.

मी: आता ही केस सर्वोच्च न्यायालयात आहे. एक लाख रुपये आणून दे. मी तुला वकील बघून देतो.

मला याची कल्पना होती की त्याच्याकडे शंभर रुपयेसुद्धा नाहीत.

तो: एवढे पैसे मी कुठून आणू?

मी: मग आता पैसे नाहीत तर मी काय करू?

तो बसून राहिला. मी तास-दोन तास त्याच्याकडे पाहिलेही नाही.

मी: तुझ्याकडे पैसे नाहीत तर मुलाबाळांना तू काय ठेवून जाणार?

तो: काही नाही!

मी: पन्नास रुपये आहेत का तुझ्याकडे?

तो: हो.

मी: पन्नास रुपयांत तुझे काम होऊ शकेल, तेवढी तयारी आहे का तुझी?

तो: हो.

मी: तू आता घरी जाण्यापूर्वी दोन मीटर मांजरपाटचा सफेद कपडा विकत घे. घेशील का?

तो: हो.

मी: एका मडक्याला किती रुपये लागतील?

तो: पाच-दहा रुपयांचे मडके येईल.

मी: मग ते मडके घे, चार बांबू विकत घे आणि घरी जा! मुलांना बोलाव आणि त्यांना सांग की मी मेल्यानंतरची तयारी  करून ठेवली आहे आणि तू शेतामध्ये जा. ऊठ! काय होईल?

तो: मारतील.

मी: किती मारतील?

तो: ठार मारून टाकतील.

मी: मग ठार मरण्याची तयारी तू पन्नास रुपयांमध्ये केलेली आहेस, बस्स झाले दुसरे काय लागणार? पण तुला ठार मारल्यानंतर तुझ्या मुलाबाळांना थोडीशी जागा मिळू शकेल. नाहीतरी तू असा मरणारच आहेस आणि जागाही जाणार आहेच, काही शिल्लक राहाणार नाही. त्यापेक्षा तू म्हातारा झाला आहेस, मरायच्या तयारीत जा आणि शेत अडवून बस!

खरोखरच त्याने तसे केले. त्याच्या विरोधकाने त्याची कब्जेवहिवाट

काढून घेण्यासाठी खूप प्रयत्न केले. त्याला मारहाण केली. परंतु त्याची मानसिक तयारी असल्याने त्याने ते सहन केले. आणि त्याच्या त्या तेरा एकर जमिनीवर त्याचा कब्जा राहू शकला.

अशा पद्धतीने लोकांना लढण्यासाठी उद्युक्त करणारे प्रश्न विचारण्यात आणि त्याद्वारे त्यांच्या मनातील भीती दूर करण्यात संघटकाचे कौशल्य असते.

नांदेडमधील शिंपाळा नावाच्या एका गावात मी एका संस्थेच्या कामाच्या मूल्यमापनासाठी गेलो होतो. त्या ठिकाणी गावातल्या दलित समाजातल्या लोकांशी माझी जी चर्चा झाली ती अशी –

मी: तुम्ही कोणत्या गावातून आलात?

गावकरी: शिंपाळा.

मी: का आलात तुम्ही? कुणाला भेटायला आलात?

गावकरी: तुम्हाला भेटायला.

मी: मला भेटायला का आलात?

गावकरी: आम्हाला काहीतरी द्या.

मी: मी तुम्हाला काय देणार? तुम्हाला पुरेसे काम नाही का?

गावकरी: आम्ही इतरांच्या शेतावर काम करतो. आमची जमीन काढून घेतली.

मी: तुमची जमीन कोणी काढून घेतली?

गावकरी: गावच्या पाटलाने.

मी: तुम्ही काय म्हणता मला कळले नाही. तुमची जमीन त्याने कशी काढून घेतली?

गावकरी: आम्ही पूर्वी गायरान चारत होतो, गायरान लावत होतो. पाटलाची जमीन गायरानाच्या जवळ होती, तेव्हा त्याने गायरानावर ताबा घेतला आणि आम्हाला हाकलून दिले. आम्ही जर आमच्या जमिनीत पुन्हा गेलो तर आम्हाला ठार मारण्याची धमकी पाटलाने दिली आहे.

मी: मग तुम्ही काय केलेत?

गावकरी: काहीच नाही. आम्ही गरीब लोक आहोत, आम्ही काय करणार?

मी: तुम्ही तुमच्या जमिनीत जाऊन तुमच्या जमिनीचा ताबा पुन्हा का घेत नाही?

गावकरी: आम्हाला मारून टाकतील ते. आम्हाला ठार मारतील.

मी: खरे म्हणजे तुम्हाला जमिनीची गरजच नाही.

गावकरी: नाही, आम्हाला जमीन पाहिजे. आम्हाला मुले आहेत, आम्हाला त्यांची पोटे भरायची आहेत.

मी: म्हणून काय झाले ? तुमची जात काय ?

गावकरी: मातंग, मांग .

मी: मग शेती हा काही तुमचा धंदा नाही. तुम्ही खरे म्हणजे पारंपरिक वाद्ये वाजविली पाहिजेत, हलगी वाजविली पाहिजे. तुम्ही पाटलाकडे काम केले पाहिजे, पाटलाच्या शेतावर गेले पाहिजे, तुम्हाला शेती करायची गरज काय ?

गावकरी: आम्ही उपाशी आहोत.

मी: म्हणून काय झाले ? पाटील तुम्हाला दररोज भाकर-तुकडा टाकीत नाही का ? त्याने तुमचे पोट भरत नाही का ?

गावकरी: आमच्या घरी लाईटही नाही.

मी: आता तुम्ही विजेबद्दल बोलायला लागलात. तुम्हाला कोणी सांगितले की तुम्हाला वीज पाहिजे ? तुम्ही जनावरासारखे आहात. जनावराला वीज लागते का ? त्याच्या गोठ्यात वीज नसेल तर ते ओरडते का ?.... तुम्हाला पाटलाचा मार खायची इच्छा नाही, पण तुम्हाला जमीन पाहिजे आहे, कसे शक्य आहे ते ?

गावकरी: आम्हाला आमची जमीन पाहिजे.

मी: तर मग तुम्ही जा आणि जमिनीचा ताबा घ्या.

गावकरी: ते आम्हाला ठार मारतील.

मी: तुम्ही चव्वेचाळीस जण आहात, तुम्हा सर्वांना ते ठार मारतील ? आणि एवढीच जर भीती वाटत असेल तर जमिनीचे विसरून जा. जर जमीन हवी असेल तर मरायला तयार व्हा. जा आणि जमीन मागा. ते जमत नसेल तर पारंपरिक हलग्या वाजवणे चालू करा आणि पाटलाला जमीन नांगरू द्या.

त्यांच्यापैकी एकजण जोरात बोलला, ‘‘नाही आम्ही जनावरे नाही, आम्ही माणसे आहोत.’’

मी: तुम्ही माणसे असाल तर तुम्ही हे सांगितले पाहिजे की आम्ही मेलो तरी बेहत्तर पण आमची जमीन आम्ही सोडणार नाही.

यावर सर्वजण जोरात म्हणाले, ''आता तेच करायची वेळ आलेली आहे. आम्ही आमच्या जमिनीसाठी मरू पण आम्ही आमची जमीन सोडणार नाही. आम्हीसुद्धा माणसे आहोत, आम्हालासुद्धा जगायला साधन पाहिजे.''

दुसऱ्या दिवशी त्या सर्व चव्वेचाळीस जणांनी जमिनीवर कब्जा केला. मालकांनी प्रतिकारही केला, दोन-चार जणांचे हातपाय मोडले. लोकांनी पोलिसात गुन्हा दाखल केला. संघर्ष करावा लागला. आज ती जमीन त्या श्रमिकांच्या ताब्यात आहे.

मानसिकता बदलली तर लोक संघटित होतात आणि आपला हक्क ते मिळवू शकतात. आहे त्या मानसिकतेमध्ये बदल झाला नाही तर लोक संघटित होत नाहीत.

संघटकाला जे सांगावयाचे आहे, जे लोकांनी करावे असे त्याला वाटते, त्याच्या नेमके उलट सांगितले तर कधी कधी त्याचा परिणाम फार चांगला होतो.

मी नेपाळमधल्या एका गावात लोकांना संघटना बांधणी शिकविण्यासाठी गेलो होतो. त्या गावामध्ये दलितांच्या शिक्षणासाठी काहीजण बरीच वर्षे काम करीत होते. तरीसुद्धा अनेक दलित पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवायला तयार नसत. मी त्या गावात गेलो. त्या गावात जो शिक्षक होता तो स्वत: दलित होता. त्याने फार चिडून मला सांगितले की, ''मी फार प्रयत्न करतो तरी लोक मुलांना शाळेत पाठवित नाहीत, यांना शिकायची इच्छाच नाही.''

मी लोकांना बोलावले, त्यांच्याशी बोललो, गावाबद्दल विचारले, गावात कोणकोण आहेत विचारले. नेपाळमध्ये ब्राह्मणांना बाहुन म्हणतात तर क्षत्रियांना क्षेत्री. असे बाहुन आणि क्षेत्री होते. कोण-कोण काय काय काम करतात, कुठे काम करतात वगैरे सगळे विचारले. त्यात लक्षात आले की दलित, धनिकांच्या म्हशी सांभाळण्याचे, त्यांची शेती करण्याचे काम करीत होते. त्यांची मुलेसुद्धा गुरे-ढोरे सांभाळण्याचे काम करीत.

तेव्हा मी त्या शिक्षकाला ओरडलो. मी त्याला विचारले, ''तुला काही कळते का? तुझ्या नोकरीसाठी तुला मुले शाळेत यायला पाहिजेत म्हणून तू मुलांना शाळेत यायला सांगतो आहेस.'' त्याला म्हटले की, ''मुलांनी शाळेत

जाण्याचे काही कारण नाही.'' पालकांना सांगितले की, ''तुमचे म्हणणे बरोबर आहे. तुम्ही मुलांना अजिबात शाळेत पाठवू नका. कारण तुम्ही दलित आहात. दलितांचे काम काय? ढोरेच चारायची आहेत, तर त्याला शिक्षण कशाला लागते? मालकाची चाकरीच करायची आहे तर त्याला शिक्षण कशाला लागते? जे काम आपल्या दैवाने आलेले आहे ते काम तुम्ही चांगले करीत आहात. अजिबात पोरांना शाळेत पाठवू नका. तुमची पोरे शिकली तर मालकांची ढोरे कोण सांभाळणार? तुमचे जे काम चालले आहे ते बरोबर आहे, उत्तम काम करत आहात तुम्ही.''

तेवढ्यात वीसेक वर्षांचा तरूण मुलगा उठून उभा राहिला. तो माझ्यावर ओरडला. म्हणाला, ''तुम्ही ब्राह्मणांच्या बाजूने बोलता, ''मी म्हणालो, ''काय झाले मी ब्राह्मणांच्या बाजूने बोललो तर?'' तो म्हणाला, ''या ब्राह्मणांनी आम्हाला बैल बनवले आहे.'' मी म्हटले, ''का बैल बनवले आहे?'', ''त्यांनीच आम्हाला शिक्षण घेऊ दिले नाही.'' मी म्हटले, ''तुम्हालाच शिकायचे नाही. मग काय झाले बैल बनवले तर?''

तेथे जी सर्व तरूण मुले होती ती चिडून उठली आणि पालकांना त्यांनी दम दिला, ''उद्यापासून एक पोरगा जरी म्हशीवर दिसला आणि शाळेत पाठवला नाही तर आम्ही दंडुके घेऊन तुमच्या पाठी लागू.''

नंतर एक, दीड वर्षाने पुन्हा त्या गावात गेलो तेव्हा एकही मूल शाळेच्या बाहेर राहिले नव्हते. शिक्षणाने हे होते, शिक्षणाने ते होते असे सांगितले असते तर परिणाम शून्य झाला असता. पण ज्या वेळेला आपण त्यांना विचार करायला प्रवृत्त करतो, परिस्थितीचे भान, विश्लेषण करायला लावतो, तुम्ही असेच राहा, बदलू नका असे ज्यावेळेला त्यांना उपरोधाने सांगतो त्यावेळेला ते बदलाच्या तयारीला लागतात.

मात्र हे असे उलट बोलून, चिथावणी देऊन लोकांना उद्युक्त करणे हे कौशल्य आहे. हे अस्त्र फार काळजीपूर्वक वापरायला लागते.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी अमेरिकेतील गुलामी नष्ट केली. ते म्हणाले होते, ''फ्रिडम लाइज् इन द हार्टस् ऑफ द पिपल. व्हेन इट लाइज देअर, इट निडस् नो लॉ, नो कॉन्स्टिट्युशन, नो कोर्ट टु प्रोटेक्ट इट.'' स्वातंत्र्य लोकांच्या अंत:करणामध्ये असते. ते जर तेथे जिवंत असेल तर त्याच्या संरक्षणासाठी कोणत्याही कायद्याची, कोणत्याही राज्यघटनेची किंवा कोणत्याही न्यायालयाची आवश्यकता नसते. ते पुढे म्हणाले

होते की ''व्हेन इट डाइज देअर, नो लॉ, नो कॉन्स्टिट्युशन, नो कोर्ट कॅन सेव्ह इट.'' स्वातंत्र्य जर अंत:करणातच उरले नाही, अंत:करणात गुलामी असेल, स्वातंत्र्याची ज्योत पेटलेली नसेल तर जगातला कोणताही कायदा, कोणतीही राज्यघटना, कोणतेही न्यायालय त्याचे संरक्षण करू शकणार नाही.

संघटना उभी करण्याची ऊर्मी ही एका अर्थाने स्वातंत्र्याची ऊर्मी आहे. ती स्वातंत्र्याची ऊर्मी लोकांच्या अंत:करणामध्ये पेटत ठेवण्याचे काम हे संघटकाला करावे लागते. माणसाची मुक्ती म्हणजे त्याच्या मनाची मुक्ती होय. आश्वासक वातावरण निर्माण करून त्याला मानसिकदृष्ट्या मुक्त करणे आवश्यक असते.

आफ्रिकेतल्या सुदान देशामध्ये आजही माणसांची खरेदी-विक्री होते. तेथील एक संघटना गुलामांना मुक्त करण्यासाठी कार्यरत आहे. या गुलामांच्या डोक्यावर असलेले कर्ज फेडण्यासाठी ही संघटना अमेरिकेतून निधी उभा करते आणि ते पैसे त्या मालकांना देते. ते त्याला 'बाइंग बॅक' म्हणतात. गुलामांना मालकाकडून खरेदी करून मुक्त करण्याची पद्धत ते वापरतात. यात गुलाम शारीरिकदृष्ट्या मुक्त होतही असतील परंतु त्यांच्या मानसिकतेत काहीही बदल होत नाही.

हीच पद्धत भारतामध्येही अनेक ठिकाणी वेगळ्या पद्धतीने अस्तित्वात असलेली मी पाहिली आहे. या प्रक्रियेतील त्रुटी अशी की यात गुलामाला काहीच करावे लागत नाही. कोणीतरी त्याचे कर्ज फेडते आणि तो मुक्त होतो. परंतु मानसिकदृष्ट्या मुक्त झालेला नसल्यामुळे तो एका मालकाकडून मुक्त होऊन दुसऱ्या मालकाकडे जाऊ शकतो. अंत:करणात स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण करण्याकरिता फार परिश्रम घ्यावे लागतात. अशा पद्धतीने खरेदी-विक्री करण्यासाठी केवळ पैसा लागतो. त्यासाठी मेहनत करावी लागत नाही. केवळ वेठबिगारीच्याच नव्हे तर कोणत्याही मुद्द्यावर संघटना बांधताना संघटकाला लोकांना मानसिक गुलामीतून, मानसिक भयातून मुक्त करण्याशिवाय पर्याय नसतो. ज्याला संघटना बांधावयाची आहे त्याने लोकांना मानसिक गुलामीतून मुक्त न करण्याचा धोका स्वीकारू नये. वेळ गेला तरी चालेल, त्रास सहन करावा लागला तरी चालेल, परंतु लोक निर्भय झाले पाहिजेत, त्यांच्या मनातील भीती नाहीशी झाली पाहिजे.

**चीड संघटित करणे :**

अहिंसक मार्गावर चालणारी संघटना बांधण्याकरिता लोकांच्या मनामधील रागाला वाट करून देणे आवश्यक असते. तशी वाट करून दिली नाही तर ते हिंसेकडे वळतील.

हिंसा टाळावयाची असेल तर अहिंसक परंतु चीड व्यक्त करण्याचे मार्ग संघटकाला शोधावे लागतात.

आम्ही एका गावात गेलो असताना तेथील लोकांनी आम्हाला एक घटना सांगितली. एक आदिवासी जोडपे गावातल्या एका प्रस्थापिताकडे गुलाम होते. त्यांच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन मालकाच्या मुलाने त्यांच्या घरात घुसून बाईवर बलात्कार केला. आम्हाला हे समजले तेव्हा घटनेला वर्ष-दीड वर्ष उलटून गेले होते. त्यावेळेला आमचेही कायद्याचे ज्ञान मर्यादितच होते. आम्हाला वाटले आता गुन्हा दाखल करता येणार नाही.

परंतु या अन्यायाबद्दल लोकांच्या मनामध्ये चीड होती. ती चीड संघटित करणे आम्हाला महत्त्वाचे वाटले. त्यांच्या मनातील रागाला वाट करून देणे महत्त्वाचे होते. त्यावेळेला जे जमलेले होते त्या सर्वांनी निघायचे आणि ज्याने बलात्कार केला त्याच्या तोंडावर थुंकायचे असा निर्णय आम्ही घेतला. जमावाला बघून तो मुलगा आणि त्या घरातले सर्वजण पळून गेले. आता काय करायचे? आम्ही ठरवले की त्याच्या घरासमोर थुंकायचे आणि आम्ही सर्वजण त्याच्या घरासमोर थुंकलो.

कृती साधी होती पण त्यातून रागाला वाट मिळाली. चीड संघटित झाली. अशा पद्धतीचा अन्याय आम्ही यापुढे सहन करणार नाही, असा संदेश प्रस्थापितांना मिळाला. त्याच्या घरावर थुंकण्यातही आदिवासींचे मोठे यश होते. ज्याच्या समोर बोलायची हिम्मत कोणी करणार नाही अशा मालकाच्या दारात जाऊन थुंकायचे हीच मोठी जीत होती.

**आव्हान स्वीकारणे :**

संघटना बांधणीच्या प्रक्रियेत अनेकदा विरोधक संघटनेसमोर आव्हाने उभी करीत असतो. अशा आव्हानांचा मुकाबला संघटनेला करावाच लागतो.

संघटना बांधणीच्या सुरुवातीच्या काळात जिल्हाधिकाऱ्यांनी एकदा मला व विद्युल्लताला कोणत्याही गावात जायचे नाही, असे आदेश दिले. हे आदेश संघटना बांधण्याच्या संविधानिक अधिकाराविरोधात होते. संघटनेने सरकारला विनंती-अर्ज करण्याऐवजी आदेश मोडण्याचा निर्णय घेतला. जिल्हाधिकाऱ्यांचे आव्हान स्वीकारले. जिल्हाधिकाऱ्यांची बंदी मोडून आम्ही गावात येणार म्हणून लोकांच्या उत्साहाला उधाण येई. आम्ही ज्या ज्या गावात जाऊ तेथे प्रत्येक ठिकाणी आमचे जंगी स्वागत होई. लोक ढोल-ताशे

वाजवून, मालकांच्या घरासमोरून नाचत-गात आमच्या मिरवणुका काढून आनंद साजरा करीत. या घटनेनंतर गावा-गावामध्ये संघटनेची पाळेमुळे घट्ट रोवली गेली.

नृत्य हे आदिवासी संस्कृतीचे अविभाज्य अंग आहे. वेठबिगार मुक्तीनंतर लगेचच आनंद साजरा करण्यासाठी संघटनेने नाच मेळावा घेण्याचे ठरविले. संघटनेचे एक हितचिंतक श्री. सचिनवाला यांनी शिरवली गावातील त्यांच्या जागेत नाच मेळाव्याची सर्व व्यवस्था करण्याची तयारी दर्शविली. नाच मेळाव्याच्या आदल्या दिवशी भयभीत होऊन त्यांनी नाच मेळाव्यासाठी जागा बदलावी अशी विनंती केली. संघटनेच्या नाच मेळाव्याला त्यांनी जागा दिली तर त्यांना गावात पाय ठेवू दिला जाणार नाही, अशी धमकी त्यांना देण्यात आली होती. त्या गावातील एका पुढाऱ्याने त्यांना ही धमकी दिली होती. त्या पुढाऱ्याचे हे आव्हान संघटनेने स्वीकारले. श्री. सचिनवाला यांच्या जागेकडून संघटनेचे लोक वाजत-गात पुढाऱ्याच्या घरापर्यंत गेले. त्याच्या घराशेजारील शाळेच्या पटांगणात रात्रभर विजयोत्सव साजरा केला. त्या पुढाऱ्याच्या गावातच नाही तर त्याच्या दारातच संघटनेने नाच मेळावा घेतला.

सातत्याने नव्या आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता ठेवली तरच संघटना प्रवाही व गतिमान राहते.

**विचारपूर्वक स्वीकारलेला धोका :**

संघटकाची, संघटनेची धोका स्वीकारण्याची तयारी असलीच पाहिजे. फक्त हा धोका स्वीकारणे म्हणजे आगीत धावून जाणे किंवा आत्महत्या करणे नव्हे. धोका तर स्वीकारावा लागेल पण तो स्वीकारताना बचावाचीही पूर्ण तयारी करावी लागते. ज्याला आपण विचारपूर्वक स्वीकारलेला धोका किंवा 'कॅल्क्युलेटेड रिस्क' असे म्हणतो.

छत्रपती शिवरायांनी अफजल खानाला भेटीला बोलावून किंवा शाहिस्ते खानावर हल्ला करून धोकाच पत्करलेला होता. मात्र बचावाची संपूर्ण तयारीही त्यांनी केलेली होती. बचावाची तयारी ठेवणे अशासाठीही आवश्यक असते की, गरिबांना ते जिंकू शकतात यावर अजून विश्वास बसलेला नसतो. आपण कायम पराभूत राहू असाच त्यांचा समज असतो. त्यामुळे धोका स्वीकारल्याशिवाय जिंकता येणार नाही पण धोका स्वीकारल्यानंतर जिंकताही येईल, हा विश्वास त्यांना येणे आवश्यक असते.

**आनंदोत्सवांचे संघटना वाढीत महत्त्व :**

विरोधाचा मुकाबला केल्यानंतर आनंद साजरा करण्यालाही महत्त्व असते. असा आनंद साजरा करण्याने लोकांना झुंजण्याचे अधिक बळ मिळते. यश त्या त्या वेळी साजरे करणे आवश्यक असते. त्यासाठी पैसाच लागतो असे नाही. लोकांना आनंदोत्सव साजरा करण्याची आवड असते. शक्य असेल त्या पद्धतीने आनंद साजरा करणे, उत्सव साजरा करणे, नाचणे, गाणे, लोकांचे कौतुक करणे हे संघटना बनविण्याच्या दृष्टीने गरजेचे असते.

जे कार्यकर्ते धोका स्वीकारतात, संघटनेसाठी तुरुंगात जातात, हल्ले सहन करतात, त्यासाठी आपल्या घरादाराची राख-रांगोळी करायलाही त्यांची तयारी असते, अशा कार्यकर्त्यांना अधिकाधिक सन्मान दिला गेला पाहिजे. ज्यावेळी खोटा गुन्हा दाखल होऊन कार्यकर्ता तुरुंगात जातो त्यावेळी त्याचे मनोधैर्य खच्ची होऊ शकते. त्याच्या कुटुंबियांचेही मनोधैर्य खच्ची होऊ शकते. हे नैसर्गिक आहे. परंतु कार्यकर्त्याने तुरुंगात जाणे म्हणजे त्याने संघटनेसाठी केलेले समर्पण आहे, बलिदान आहे अशी भावना ठेवून जेव्हा या कार्यकर्त्याचा सन्मान केला जातो तेव्हा त्याला आलेले नैराश्य निघून जाते. त्याच्या कुटुंबियांना त्याचा अभिमान वाटायला लागतो. हा आपला नेता आहे, आपला कार्यकर्ता आहे ही भावना लोकांमध्ये निर्माण होते. संकटाचा मुकाबला करणाऱ्याचे स्वागत करणे, कौतुक करणे, अभिनंदन करणे ही संघटनेची संस्कृती असावयास हवी.

**सहवेदना :**

मुद्द्यांवर आधारित संघटना बांधण्याचा विचार करताना आपण एका व्यापक सामाजिक परिस्थितीचे घटक आहोत याची जाणीव लोकांना करून देणे आवश्यक असते. जेथे जेथे अन्याय असेल त्या त्या ठिकाणी आपण जायला पाहिजे ही भावना संघटकाने लोकांमध्ये निर्माण करणे आवश्यक असते. सहवेदनेच्या भावनेमुळे संघटनेला नैतिक अधिष्ठान प्राप्त होते.

नेल्सन मंडेलांचा आणि ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचा तसा काय संबंध होता? किंवा ठाणे जिल्ह्यातील आदिवासींनी नेल्सन मंडेलांना पाठिंबा दिल्याने त्यांना काय फरक पडणार होता? परंतु आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेसचा लढा चालू होता आणि नेल्सन मंडेला तुरूंगामध्ये होते त्यावेळी त्याची माहिती श्रमजीवी संघटनेच्या आदिवासींना दिली गेली. आदिवासींनी त्यांच्या भाषेत, नेल्सन मंडेलांवर गाणी लिहिली. ते कसे सव्वीस वर्षे तुरूंगात आहेत, कशा पद्धतीने ते लढले याचे वर्णन गाण्यात केले. एक-एक रूपया काढून आफ्रिकन

नॅशनल काँग्रेसला १२,२५०/- रूपये संघटनेने पाठविले. हा बंधुभाव आहे. ही 'सॉलिडॅरिटी' आहे. जगातल्या लोकांशी आमचे संबंध आहेत. आम्ही फक्त आमचे काम करीत नाही. आम्ही वेठबिगार असू, आज आम्हाला किमान वेतन मिळत नसेल, पण जगामध्ये आमच्यासारखे जे हजारो-लाखो लोक आहेत त्यांच्याशी आमचे काहीतरी नाते आहे.

परभणीतील पिंपरी-देशमुखमध्ये अंबादास सावणेला ठार मारले गेले. तो दलित होता. त्याचा आदिवासींशी काय संबंध? परंतु त्याच्यावरील अन्यायाला वाचा फोडली तेव्हा इथले आदिवासी हजारोंच्या संख्येने पिंपरी-देशमुख गावात गेले आणि त्या गावात जाऊन त्यांनी हे सांगितले की, अंबादासशी आमचे नाते आहे.

ज्याला दोन वेळ पोटभर अन्न मिळत नाही तो ठाण्यातला आदिवासी लातूरला भूकंप झाला त्यावेळी तेथे गेला. दोनशे पन्नास लोकांचा एक गट असे सहा गट तीन महिने सातत्याने तेथे जात राहिले. त्यांनी त्या ठिकाणी भारतीय सैन्याच्या बरोबरीने ढिगारे उपसण्याचे, गाडलेली भांडीकुंडी, प्रेते बाहेर काढण्याचे काम केले.

कारगिल युद्धात शहीद झालेल्या हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रम १५ ऑगस्ट १९९९ रोजी संघटनेने घेतला. एक लाख रुपयांचा निधी उभा करून तो जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आला.उदगीर येथील शहीद कॅप्टन कुलकर्णी यांच्या माता-पित्यांना खास निमंत्रित केले गेले. त्यांचा भावपूर्ण सन्मान केला गेला. उपस्थित हजारो सभासदांनी त्यांच्याशी हस्तांदोलन करून आपली संवेदना व्यक्त केली.

*******

# अहिंसक संघर्षाची साधने

लाला लजपतराय यांच्या टीकेला उत्तर देताना 'मॉडर्न रिव्ह्यू'च्या जुलै १९१६ च्या अंकात गांधीजींनी अहिंसेबद्दल लिहिले होते की ''मी कोणत्याही दोषी व्यक्तीला दुखावणार नाही अगर तिच्याविषयी तिरस्काराची भावना ठेवणार नाही, ज्यामुळे तिला मानसिक यातना भोगाव्या लागतील. परंतु याचा अर्थ असा नव्हे की मी विशुद्ध भावनेने केलेल्या माझ्या कोणत्याही नैसर्गिक कृत्यामुळे त्याला झालेल्या त्रासाला मी जबाबदार असेन.'' दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहींनी केलेल्या अहिंसक प्रतिकाराचे त्यांनी समर्थन केले होते. ते म्हणाले होते की, ''त्यांची कृती सरकारच्या आदेशाचा भंग करणारी, ते नाकारणारी आणि त्यासाठी गरज पडलीच तर सरकारकडून मरणाची तयारी स्वीकारणारी होती. आत्मक्लेश ही अहिंसेची पूर्व अट आहे. दोषी व्यक्तीच्या विरोधात जाणीवपूर्वक वेदनादायी कृत्य करणे म्हणजे अहिंसा नव्हे. आपल्या प्राणाची पर्वा न करता विरोधकांचे जीवन आणि सन्मान शाबूत राखणे अहिंसेत अभिप्रेत आहे.''

**अहिंसेचे महत्त्व :**

सामाजिक व्यवस्थेत हिंसा मूलत: भिनलेली आहे. प्रत्येक व्यक्ती व्यवस्थेत सहभागी असते व व्यवस्थेने बाधितही होत असते. वर्ण, जात, धर्म, वंश आणि लिंग यातील भेद हिंसेस कारणीभूत असतात. सत्ता हिंसेला प्रवृत्त करते आणि गणवेशातील दले (पोलीस दल, सैन्य दल, इ.) लोकांच्या चळवळी दाबून टाकण्यासाठी सरकारच्या वतीने हिंसा करतात, हे सत्य नाकारता येणार नाही. तरीही हिंसेचा सामना करताना सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी अहिंसक संघर्षाशिवाय पर्याय नाही हेही तितकेच खरे आहे.

भारतीय राज्यघटना अहिंसक संघर्षाची प्रेरणा आहे. लोकांच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी अहिंसक संघर्षाचे अनेकविध आणि सृजनशील पर्याय असू

शकतात. यंत्रणा उलथवून टाकणे हा संघर्षाचा उद्देश नसतो. संघर्षाचा उद्देश यंत्रणा शोषितांच्या हितरक्षणासाठी कार्यप्रवण करणे हा असतो. लोकांच्या संख्येचे बळ हेच जनसंघटनेचे सामर्थ्य असते. अहिंसक संघर्षाद्वारे या सामर्थ्याला धार येते. हिंसेचे उद्दिष्ट विरोधकाला नष्ट करण्याचे असते. त्यात सृजनशीलता नसते. अहिंसक संघर्षातून विध्वंसाऐवजी न्याय व समतावादी समाजाची निर्मिती होत असते.

प्रत्येकजण बदलू शकतो यावर गांधीजींचा विश्वास होता. अन्यायाविरोधातला लढा विरोधकांच्या जीविताचे अगर सन्मानाचे हनन करून लढता येणार नाही असे ते म्हणत. त्यामुळे एखाद्याला त्याचे जीवन नाकारून त्याच्यातील संभाव्य बदल आपण नाकारीत असतो असे त्यांचे म्हणणे होते.

**संघर्षाची आखणी :**

संघर्षाची आखणी करताना अनेक आघाड्यांवर एकत्र किंवा टप्प्याटप्प्याने लढावे लागते. यामुळे विरोधक गोंधळून जाऊ शकतो. कायम एकाच मार्गाचा अवलंब केल्यास संघटकाचे, संघटनेचे पुढचे पाऊल काय असेल ते विरोधक जाणू शकतो. त्या दृष्टीने तो बचावाची वा आक्रमणाची तयारी करू शकतो. म्हणूनच केवळ न्यायालयीन आदेशावर अवलंबून राहणे, केवळ रस्त्यावर येऊन आंदोलने करणे अगर केवळ विधिमंडळाच्या कामकाजावर अवलंबून राहणे योग्य ठरत नाही. या आयुधांचा वापर कधी एक साथ तर कधी टप्प्याटप्प्याने करीत विजयश्री खेचून आणता येते.

संघर्षाची तीव्रताही टप्प्याटप्प्याने वाढवीत न्यावी लागते. स्थानिक पातळीवरील संघर्षाला केव्हा व्यापक स्वरूपही द्यावे लागते. कमी तीव्रतेच्या आंदोलनाने सुरुवात करून आवश्यकतेनुसार आंदोलनाची धार वाढविता येते. यामुळे अधिक तीक्ष्ण आयुधे प्रभावी वापरासाठी शिल्लक ठेवता येतात.

लोकशाही राज्यव्यवस्थेत उपलब्ध असलेल्या यंत्रणा हे अहिंसक संघर्षातील एक साधन असते. त्याचप्रमाणे अहिंसक संघर्षासाठी राज्यव्यवस्थेच्या परिघाबाहेरील साधने उपलब्ध आहेत.

**लोकशाही राज्यव्यवस्थेने उपलब्ध करून दिलेली साधने :**

१) **नोकरशाहीच्या उतरंडीतील उत्तरदायित्व :**
दुय्यम अधिकारी वरिष्ठ अधिकाऱ्याला उत्तरदायी असतो. वरिष्ठ अधिकारी कनिष्ठ अधिकाऱ्याचा गोपनीय अहवाल लिहीत असतो. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्याचा आदेश दुय्यम अधिकारी क्वचितच नाकारीत असतो.

२) **प्रशासनाचे मंत्रिमंडळाला असलेले उत्तरदायित्व :**

प्रशासन मंत्रिमंडळाला, संबंधित मंत्र्याला उत्तरदायी असते. संबंधित खात्याचा सचिव हा त्या खात्याच्या प्रशासनाचा प्रमुख असतो. तो संबंधित खात्याच्या मंत्र्याला उत्तरदायी असतो. मुख्य सचिव राज्याच्या प्रशासनाचा प्रमुख असतो व तो मुख्यमंत्र्याला उत्तरदायी असतो.

३) **मंत्रिमंडळाचे विधिमंडळाला असलेले उत्तरदायित्व :**

मंत्रिमंडळ विधिमंडळाच्या विश्वासावर काम करते. ते व्यक्तिश: व सामूहिकरीत्या विधिमंडळाला उत्तरदायी असते.

४) **शासनाचे न्यायव्यवस्थेला असलेले उत्तरदायित्व :**

उच्च व सर्वोच्च न्यायालय नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या भंगाविषयी शासनाला प्रश्न विचारू शकते. शासनाच्या गैरव्यवहाराबाबत अगर गैरकृत्याबाबतही न्यायालयाकडे दाद मागता येऊ शकते.

५) **निम्न न्यायिक संस्था :**

मानवी हक्क आयोग, महिला आयोग, अल्पसंख्याक आयोग, अनुसूचित जाती-जमाती आयोग, माहिती आयोग, लोक आयुक्त इ. सांविधानिक यंत्रणांकडे नागरिकांना शासनाविरुद्ध दाद मागता येते.

६) **राज्यपाल वा राष्ट्रपती :**

राज्याचे प्रमुख म्हणून राज्यपाल अगर राष्ट्राचे प्रमुख म्हणून राष्ट्रपतींकडेही शासनाविरुद्ध दाद मागता येते.

**राज्यव्यवस्थेच्या परिघाबाहेर उपलब्ध असलेली साधने :**

१) **निवेदन :**

अहिंसक संघर्षात अनेकविध मार्गांचा अवलंब करावा लागतो. चांगला मसुदा असणारे निवेदन हेसुद्धा संघर्षाचे महत्त्वाचे साधन ठरू शकते. आपले म्हणणे प्रभावीपणे मांडणे आवश्यक असते. निवेदनामधील अनावश्यक मजकूर निवेदनाची तीव्रता कमी करतो. निवेदन थोडक्यात, मुद्देसूद व मागणीचा आधार स्पष्ट करणारे असावे. नेमका प्रश्न काय आहे व तो सोडविण्याचे अधिकार कोणाकडे आहेत याची माहिती घेऊनच निवेदन तयार करावे लागते. शक्यतो एका निवेदनात एकच मुद्दा असणे हितावह असते. अन्यथा निवेदनाचे उत्तर देताना महत्त्वाच्या मुद्द्यांना जाणीवपूर्वक बगल दिली जाऊ शकते.

निवेदनाच्या प्रती वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठवून कनिष्ठ अधिकाऱ्यावर दबाव आणता येतो. विधिमंडळाचा वापर प्रश्न सोडविण्यासाठी करावयाचा असल्यास संबंधित मंत्र्याच्या नावे दिलेल्या निवेदनाचा उपयोग होतो.

२) **प्रतिनिधी मंडळ :**

प्रश्न समजून घेण्यासाठी, विरोधकांचे म्हणणे समजून घेण्यासाठी आणि प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी प्रतिनिधी मंडळाने विरोधकाची भेट घेऊन चर्चा करणे हे सुद्धा अहिंसक संघर्षातील महत्त्वाचे साधन ठरू शकते. काही वेळा अशा चर्चेतून प्रश्नांची सोडवणूक होऊ शकते. सोडवणूक झाली नाही तरी विरोधकाचे म्हणणे जाणून घेण्यासाठी अशा चर्चेचा उपयोग होतो.

३) **मोर्चा** :

विरोधकाला चर्चेसाठी भाग पाडण्यासाठी मोर्चाचे आयोजन केले जाऊ शकते. लोकांना संघटित करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे हा सुद्धा मोर्चाचा उद्देश असू शकतो. मोर्चा हे विरोधकांसमोर केलेले शक्तिप्रदर्शन असते. लोकांची शक्ती नसेल तर मोर्चा प्रभावहीन ठरून उद्दिष्ट साध्य होत नाही.

मोर्चा काढताना जिल्हा दंडाधिकाऱ्याचा जमावबंदी आदेश आहे किंवा कसे याची माहिती घेऊन आखणी करावी लागते. मोर्चा सुरू होण्याचे ठिकाण, पोहोचण्याचे ठिकाण, जाण्याचा मार्ग, रस्त्यावरील वाहतूक, लोकांवरील नियंत्रण, फलक, पत्रके, घोषणा, इत्यादींचा विचार मोर्चाच्या पूर्वतयारीच्या वेळी करावा लागतो. मोर्चा पोहोचल्यानंतर शिष्टमंडळ चर्चा करीत असताना, मोर्चेकऱ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी नृत्य, गाणी, पथनाट्य यासोबतच पुरेसे वक्ते असतील व शिष्टमंडळ परत येईपर्यंत काही ना काही कार्यक्रम सुरू राहतील याची खात्री करावी लागते. जमावबंदी असल्यास व ती मोडून मोर्चा काढावयाचा असल्यास अटक केल्यानंतर काय करावे याचा विचार आधीच करून ठेवावा लागतो.

ज्यांचा प्रश्न आहे त्यांचे प्रतिनिधी शिष्टमंडळात असणे अनिवार्य आहे. शिष्टमंडळात विरोधकांशी कोण बोलणार, कोण निर्णय घेणार, याची पूर्वतयारी करावी लागते. वाटाघाटीच्या वेळी अनेक जण बोलू लागल्यास व आपसातील मतभेद विरोधकासमोर आल्यास विरोधक त्याचा फायदा घेऊ शकतो.

संपूर्ण मोर्चाच्या बाबतीत निर्णय कोणी घ्यावा हे आधीच निश्चित करणे महत्त्वाचे असते. लोकशाहीचा अतिरेक करून नेतृत्व करणाऱ्यांनी मोर्चाच्या वेळी चर्चा करून, वाद

घातल्याने गोंधळ होऊ शकतो. मोर्चाचे नेतृत्व करणाऱ्याचे मोर्चावर नियंत्रण असावे लागते. घोषणा कोणत्या व कशा द्याव्यात, गाणी कोणती व कशी म्हणावीत, गोंधळ निर्माण झाल्यास काय करावे, मोर्चात नसलेल्या लोकांशी कसे वागावे, शिस्त कशी राखावी याचे प्रशिक्षण स्वयंसेवकांना देणे आवश्यक असते.

### ४) घेराव :

घेराव कधीही कायदेशीर असू शकत नाही. एखाद्या व्यक्तीला संचारापासून वंचित ठेवणे गुन्हा आहे. त्यामुळे घेराव घातल्यास भारतीय दंड संहिता कलम ३४१ व ३४२ नुसार पोलीस कारवाई करू शकतात. मुंबई पोलीस अधिनियम कलम ६८ प्रमाणे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून अटक करून कलम ६९ नुसार पोलीसच मुक्त करू शकतात. त्यावेळी न्यायालयात नेण्याची अगर जामीन देण्याची गरज नसते.

विरोधकाला तात्काळ निर्णय घ्यायला भाग पाडण्यासाठी या शस्त्राचा वापर होतो. त्यामुळे ज्याला घेराव घातला जाणार आहे तो निर्णय घेण्यास सक्षम आहे किंवा कसे याची खातरजमा करून न घेतल्यास ते शस्त्र कुचकामी ठरते. डावपेचाचा वापर करून घेराव कायद्याच्या चौकटीत बसविता येऊ शकतो.

भ्रष्ट ग्रामसेवकावर तत्काळ कारवाई करावी म्हणून श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी गटविकास अधिकाऱ्याला घेराव घालून अडकवून ठेवले. पोलीस कारवाईसाठी आले तेव्हा सोमवार हा जनतेच्या भेटीचा वार आहे, जनतेने किती संख्येने यावे व किती वेळ बसावे याचे काही नियम नाहीत, असा पवित्रा घेऊन संघटनेने पोलिसांना हतबल केले.

संघटकाने कल्पकता दाखविल्यास कायद्याच्या पळवाटांचा आधार घेता येतो.

गंभीर गुन्ह्यासाठी तुरूंगवास भोगल्यानंतर, प्रतिष्ठा मिळविण्यासाठी वसईतील एका लोकप्रतिनिधीने शासकीय यंत्रणेचा वापर करण्याचे ठरविले. त्यासाठी आदिवासींना योजनांची माहिती देणे व सरपंचाना चेक वाटप करणे असा कार्यक्रम गटविकास अधिकाऱ्यामार्फत आखण्यात आला. या लोकप्रतिनिधीच्या हस्ते चेक वाटप होणार होते. याची माहिती मिळताच संघटनेने गटविकास अधिकाऱ्याकडून कार्यक्रमाचे रीतसर निमंत्रण मिळविले. निमंत्रणपत्रिकेवर प्रत्येक ग्रामसेवकाने १० आदिवासी आणलेच पाहिजेत अशी सूचना होती. तिचा फायदा घेऊन गटविकास अधिकाऱ्याला हवे तेवढे आदिवासी आणण्याचे वचन संघटनेने दिले.

सभागृहाची क्षमता दोनशे लोक बसण्याची होती. संघटनेचे दोन हजारहून अधिक सभासद आल्याने सभागृहच नव्हे तर पंचायत समितीचे संपूर्ण कार्यालयच संघटनेच्या सभासदांनी व्यापून गेले. येण्या-जाण्याची वाट बंद झाली. अधिकारी व तो लोकप्रतिनिधी कार्यालयात अडकून पडले. पोलिसांकडे तक्रार केली गेली. परंतु आलेल्या प्रत्येकाकडे कार्यक्रमाचे निमंत्रण असल्याने पोलिसांना काहीच करता आले नाही. संघटनेच्या कार्यकर्त्यांनी व्यासपीठाचा ताबा घेतला. संघटनेच्या घोषणा व गाण्यांनी परिसर दुमदुमला. पंचायत समितीला कार्यक्रम रद्द तर करावा लागलाच पण त्या लोकप्रतिनिधीला संघटनेच्या संरक्षणातच तेथून काढता पाय घ्यावा लागला.

**५) धरणे :**

लोकांची संख्या कमी असल्यास व अधिक काळ आंदोलन चालणार असल्यास या शस्त्राचा वापर करता येतो. धरणे धरण्यामध्ये लोकजागृतीला महत्त्वाचे स्थान असते. यासाठी धरणे धरण्याची जागा अधिकाधिक लोकांचे लक्ष जाईल अशी निवडणे व आपल्या मागण्यांच्या माहितीचे ठळक फलक असणे, पत्रके वाटणे महत्त्वाचे असते.

**६) रास्ता रोको :**

घेरावाप्रमाणेच रास्ता रोको हेही कायदेशीर साधन नाही. अधिक लोकांचा, प्रलंबित प्रश्न असल्यास लक्ष वेधण्यासाठी या शस्त्राचा वापर करता येतो. रास्ता रोकोच्या वेळी हिंसा अगर गैरमार्गाचा वापर होऊ नये म्हणून जमावावर नियंत्रण ठेवणारे नेतृत्व व स्वयंसेवक महत्त्वाची भूमिका बजावितात. संघटक कल्पकतेने रास्ता रोको करून कायद्याच्या कचाट्यातून लोकांना बाहेर काढू शकतात.

महामार्गावर पडलेले खड्डे दुरुस्त करण्यासाठी श्रमजीवी संघटनेने अभिनव मार्गाने रास्ता रोको केला. एकदा त्या खड्ड्यांमध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम करून हजारो लोकांनी रस्ता रोखून ठेवला तर एकदा 'पाणी अडवा पाणी जिरवा' असा कार्यक्रम करून महामार्गावर मातीचा बांध घातला.

**७) सत्याग्रह :**

पन्नास हजार रेती उत्पादकांचे उदरनिर्वाहाचे साधन काढून घेऊन सरकारने एका माफियाला रेतीचा ठेका दिला. सर्व मार्गांचा अवलंब करूनही सरकार निर्णय बदलत नव्हते, तेव्हा संघटनेने रास्ता रोको करून कायदेभंग केला. पोलिसांनी अटक केल्यानंतर

न्यायालयासमोर सत्याग्रहींनी जामीन देण्यास नकार दिला व सरकारचा निर्णय बदलेपर्यंत सत्याग्रही तुरुंगात राहिले.

महात्मा गांधीजींनी सत्याग्रहाचे शस्त्र आपल्या हाती दिले आहे. स्वातंत्र्य आंदोलनात गांधीजींनी अत्यंत प्रभावीपणे सत्याग्रहाचा वापर केला. दक्षिण आफ्रिकेत त्यांनी सत्याग्रहाची सुरुवात केली. हे शस्त्र अत्यंत काळजीपूर्वक व विचारपूर्वक वापरण्याची आवश्यकता असते. अनेक अस्त्रांचा अवलंब करूनही विरोधक दाद देत नसेल तरच सत्याग्रहाचा वापर करावा. सत्याग्रहाला पोलिसांच्या परवानगीची गरज नसते. सत्याग्रहामध्ये आपण सविनय कायदेभंग करीत असतो. त्याच्या परिणामाची जबाबदारी स्वीकारायला तयार असतो. पोलीस कायदेभंगाबाबत जी कारवाई करतात त्याबाबत सत्याग्रही पोलिसांना दोष देत नाहीत.

आदिवासींवर अत्याचार केलेल्या एका लोकप्रतिनिधीची शासनाने विधिमंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीवर नेमणूक केल्यानंतर श्रमजीवी संघटनेने मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावर सत्याग्रह केला होता. या सत्याग्रहाच्या वेळी पोलीस बळाचा वापर करणार हे गृहीत धरून त्याला अहिंसक मार्गाने प्रतिकार कसा करावा याचे प्रशिक्षण देण्यासाठी सत्याग्रहाच्या दोन दिवस अगोदर संघटनेच्या कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण घेतले होते. ज्या निवडक ६० सत्याग्रहींची निवड करण्यात आली होती, त्यांचे दोन समान गट केले. प्रत्येक गटाने सत्याग्रहींची व पोलिसांची भूमिका पार पाडावयाची होती. प्रशिक्षण सभागृहाला मंत्रालय समजून प्रत्यक्ष भूमिका वठविल्या गेल्या. पोलिसांची भूमिका वठविणाऱ्यांच्या हातात, पोलिसांच्या हातात जशा लाठ्या असतात तशा लाठ्या दिल्या गेल्या. त्यावेळी पोलीस किती मारू शकतील याचा अंदाज आला. पोलिसांना सत्याग्रहींना उचलता येऊ नये म्हणून हातात हात घालून कडे करून कसे बसून राहायचे याचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यामुळे जशी तालीम झाली तसाच्या तसाच सत्याग्रह झाला. सुमारे ४० मिनिटे सत्याग्रहींनी मार खाल्ला. पोलीस थकले परंतु सत्याग्रही अढळ राहिले.

सत्याग्रहाच्या अनुभवामुळे त्यात सहभागी होणाऱ्यांच्या मनातील पोलिसांची, अटकेची, कारागृहाची, पोलिसांच्या माराची भीती निघून जाते. ते निर्भय बनतात.

**८) उपोषण :**

आत्मक्लेशाद्वारे विरोधकावर नैतिक दबाव आणणे हा उपोषणाचा उद्देश असतो. संघर्षाचे अन्य मार्ग वापरून झाल्यानंतरच या मार्गाचा अवलंब करणे हिताचे असते. उपोषणाचे विविध प्रकार प्रचलित आहेत.

समाजाचे व विरोधकांचे लक्ष प्रश्नांकडे वेधण्यासाठी लाक्षणिक उपोषणाचा अवलंब केला जातो. लाक्षणिक उपोषण विशिष्ट कालमर्यादेचे असते. अनेकजण या उपोषणात सहभागी होऊ शकतात. दीर्घकाळासाठी साखळी उपोषण करता येते.

बेमुदत उपोषणाला मुदतीचे बंधन नसते, परंतु ते प्राणांतिक असेलच असे नव्हे. नैतिक दबाव टाकू शकणाऱ्या व्यक्तीने केलेले बेमुदत उपोषण सफल होऊ शकते. शक्यतोवर टिकाव धरू शकणाऱ्या व्यक्तीने बेमुदत उपोषणास बसणे हितकारक असते. प्रकृती ढासळल्याने उपोषणकर्त्याला उपोषण सोडावे लागले तर विरोधकांवरील दबाव संपतो. बेमुदत उपोषणाच्या वेळी प्रश्न सोडविण्यासाठी परिश्रम करणारी, संघर्षाची तीव्रता वाढवीत नेण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करणारी कार्यकर्त्यांची फळी असावी लागते.

एखादी व्यक्ती अगर मोजकीच मंडळी प्राणांतिक उपोषण करू शकतात. आत्मदहन, जलसमर्पण अगर प्राणांतिक उपोषण ही संघर्षाची परिसीमा असते. यात सफलता मिळाली नाही व प्राणही गेला नाही तर सर्व मार्ग बंद होतात. संघर्षाची सर्व आयुधे कुचकामी ठरतात. प्रचंड नैतिक सामर्थ्य असणाऱ्या आंदोलनकर्त्यानेच नैतिकतेला प्रतिसाद देणाऱ्या विरोधकांसमोरच या मार्गांचा अवलंब करावा. प्राणार्पण करण्याचा निर्णय जाहीर करून, छोट्या-मोठ्या तडजोडींवर उपोषणाची सांगता झाल्यास लोकांमध्ये नैराश्याची आणि नेत्याकडून फसवणूक झाल्याची भावना निर्माण होते. भविष्यात प्राणार्पणाच्या धमकीची चेष्टा होऊ शकते.

प्राणांतिक उपोषणात मोठ्या संख्येने लोकांना सहभागी होता येत नसल्याने विजय प्राप्त झालाच तर तो लोकांच्या सामर्थ्याऐवजी व्यक्तीच्या सामर्थ्यावर प्राप्त झाल्याची भावना निर्माण होऊ शकते. त्यामुळे लोकांचा आपल्या सामर्थ्यावरील विश्वास कमी होतो व नेत्याच्या सामर्थ्यावर विश्वास वाढतो. संघटना बांधणी करणाऱ्या संघटकांनी संघर्षाचा कोणताही मार्ग शिल्लक राहिलेला नाही याची खात्री करूनच प्राणार्पण करण्याच्या तयारीनेच प्राणांतिक उपोषणाचा अथवा अन्य टोकाच्या मार्गाचा अवलंब करणे हिताचे असते.

**पंचनामा तंत्र :**

संघटक कल्पक असल्यास मोर्चा, धरणे, घेराव, उपोषण या पारंपरिक साधनांपुढे त्याला जाता येते. आपल्या कल्पनाशक्ती आधारे तो नवी साधने निर्माण करू शकतो. श्रमजीवी संघटनेने अलीकडे अशाच एका साधनाची, तंत्राची निर्मिती केली. या नव्या पंचनामा तंत्राचा हा परिचय आणि या तंत्राने घडविलेला बदल.

भ्रष्टाचार, दफ्तर दिरंगाईपुढे आपण हतबल असल्याची भावना सर्वसामान्यांमध्ये रुजलेली असते. मात्र मनात आणले तर सर्वसामान्य माणसेही व्यवस्थेला क्रियाशील करण्यासाठी बदल घडवून आणू शकतात. श्रमजीवी संघटनेने अलीकडेच अंमलात आणलेले पंचनामा तंत्र सामाजिक, राजकीय कार्यकर्ते व पत्रकार यांनाही प्राप्त परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी व शासनयंत्रणेला जरब बसविण्यासाठी उपयोगी ठरावे असे आहे. सोशल ऑडिट म्हणजेच सामाजिक लेखापरीक्षणाला शासनाचीही कागदोपत्री मान्यता आहे. पंचनाम्याचे तंत्र हा त्याचाच एक भाग आहे.

शासनाच्या शाळा, आदिवासींच्या शासकीय आश्रमशाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, पोलीस ठाणी, पोलीस निवासस्थाने, पशुवैद्यकीय दवाखाने, सार्वजनिक बांधकाम खात्याची कामे, लघुपाटबंधाऱ्यांची कामे अशा अनेक कामांवर शासनाचा कोट्यावधीचा निधी खर्ची पडत असतो. मात्र नागरिकांना दर्जेदार सेवा अभावानेच मिळतात. सामान्यपणे लोकांच्या नजरेस पडणारा, लोकांच्या संपर्कात असणारा जनसेवक, जसे पोलीस हवालदार, तलाठी नागरिकांच्या रोषाचा बळी ठरतो. मात्र अनेकदा तेही शासकीय इच्छाशक्ती अभावी हतबल असतात हे आपल्या लक्षात येत नाही.

राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे विशेष प्रतिनिधी डॉ. लक्ष्मीधर मिश्रा कुपोषणासंदर्भात पाहणी करण्यासाठी ठाणे जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना मी त्यांच्यासोबत मोखाडा ग्रामीण रुग्णालयास भेट दिली होती. ग्रामीण रुग्णालयाची इमारत दयनीय अवस्थेत होती. डॉ. मिश्रांनी त्यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना तेथील वैद्यकीय अधिक्षकाची भीतीने गाळण उडाली होती. मी त्यांना एका बाजूस घेऊन या परिस्थितीचे खरे कारण मला सांगण्यास सांगितले. त्यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याबरोबर केलेला पत्रव्यवहार मला दाखविला. सार्वजनिक बांधकाम खात्याला निधी देऊन तीन वर्षे होऊन गेली होती तरी इमारतीची दुरुस्ती झालेली नव्हती. शस्त्रक्रियागृह बांधून चार वर्षे उलटली होती मात्र विद्युतीकरण न झाल्याने ते वापरलेच गेले नव्हते. जिल्हाधिकाऱ्यांकडे या संदर्भात बैठक झाली असता जिल्हा शल्यचिकित्सकाला इमारतीच्या दुरुस्तीची उत्तरे द्यावी लागत होती. मी हस्तक्षेप करून या संदर्भात जिल्हा शल्यचिकित्सकाऐवजी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिक्षक अभियंत्याला याचा जाब विचारावा असे सुचविल्यानंतर उत्तरदायित्वाला दिशा मिळाली.

याच दरम्यान आणखी एक घटना घडली. अंबरनाथ येथील एका जमीन प्रकरणी तेथील तहसीलदाराने आदिवासींच्या विरोधात बेकायदेशीर आदेश दिला होता. त्यासंदर्भात

विचारण्यासाठी माझा परिचय न देता मी तहसीलदारांकडे गेलो. त्यांना काही प्रश्न विचारले. त्यांना त्याचा राग आला. ''मला प्रश्न विचारणारे तुम्ही कोण ?'' या त्यांच्या प्रश्नावर मला केशवसुतांच्या ''आम्ही कोण म्हणूनी काय पुसता दाताड वेंगाडूनी'' या कवितेचे स्मरण झाले. आपण सरकारी नोकर नाही, आपण मालक नाही तर जनतेचे नोकर आहोत याची जाणीव या तहसीलदाराला नाही, त्याच्याप्रमाणे ती इतरही जनसेवकांना नाही हे मला तीव्रतेने जाणवले.

मोखाड्याचे व अंबरनाथचे उदाहरण लक्षात घेऊन शासकीय यंत्रणांचा पंचनामा करण्याची योजना संघटनेने तयार केली. केवळ आरोप केल्याने सरकारी पक्ष बचावात जातो व त्यातून फलनिष्पत्ती होत नाही. म्हणून प्रत्यक्ष जागेवर जाऊन तेथील परिस्थितीचा जसाच्या तसा वस्तुनिष्ठ पंचनामा प्रतिष्ठित व्यक्तींसमोर, त्या आस्थापनेच्या प्रमुखासोबत करायचा, त्यावर आस्थापनेच्या प्रमुखाचीही सही घ्यायची व पंचांच्याही सह्या घ्यायच्या असे धोरण आखले. पंचनाम्यामध्ये परिस्थितीवर भाष्य करावयाचे नाही वा प्रतिक्रिया द्यायची नाही ही स्वत:साठीच पूर्वअट ठरविली.

आम्ही शासकीय रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, पोलीस ठाणी, पोलीस निवासस्थाने, शासकीय आश्रमशाळा यांचे पंचनामे केले. शासकीय आश्रमशाळा, जनावरांचे कोंडवाडे बनून राहिल्याचे चित्र पंचनाम्यातून स्पष्ट झाले. संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान व हागणदारी मुक्ती योजना यांच्या जाहिरातींवर कोट्यावधींचा खर्च करणाऱ्या शासनाला आश्रमशाळांतील मुलांसाठी व विशेषत: मुलींसाठी शौचालयाची व्यवस्था करता आलेली नाही. वयात आलेल्या मुलींनाही उघड्यावर आंघोळ करावी लागते, प्रातर्विधी उरकावे लागतात असे शासनासाठी लाजिरवाणे असणारे चित्र या पंचनाम्यांतून उघड झाले.

आश्रमशाळांसाठी केल्या जाणाऱ्या खरेदीत भ्रष्टाचाराला राजमान्यता मिळाल्याचेही पंचनाम्यांतून स्पष्ट झाले. किडे नाहीत असे धान्याचे एकही पोते एकाही आश्रमशाळेतील धान्याच्या कोठारात सापडले नाही. निकृष्ट दर्जाचे खाद्य तेल, साबण, खोबरेल तेल व दंतमंजन बाजारभावापेक्षा अधिक भावाने खरेदी केल्याचे व ही सर्व खरेदी संपूर्ण राज्यासाठी एकाच ठिकाणाहून झाल्याचे लक्षात आले. हिरव्या भाजीपाल्यासाठी, मांसाहारासाठी दिलेले पैसे सर्वत्र हडप होत असल्याचे आढळले. पंचवीस वर्षापूर्वीच्या आश्रमशाळांना अजूनही स्वत:च्या इमारती नसल्याचे, ज्यांनी आश्रमशाळांमध्ये राहणे बंधनकारक आहे अशा अधिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकांना निवासस्थाने नसल्याचे, तीच अवस्था

प्राथमिक आरोग्य केंद्र व रुग्णालयांची असल्याचे, मे मध्ये दुरुस्त केलेली निवासस्थाने पहिल्याच पावसामध्ये, जूनमध्ये गळू लागल्याचे, चित्र पंचनाम्यांमधून दिसले.

मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील १९४८ साली स्थापन झालेल्या मनोर पोलीस ठाण्याला स्वत:ची इमारत नसल्याचे, आरोपीला ठेवण्यासाठी कोठडी नसल्याचे आढळले. छतावरील कौले काढून एकदा एक आरोपी फरार झाला म्हणून दोन पोलिसांना निलंबित केल्याचीही माहिती मिळाली. पोलीस ठाण्याच्या मागची जीर्णजर्जर अवस्थेतील पोलीस निवासस्थाने १९०३ साली बांधल्याचे कळले. त्याची डागडुजी करायला गृह खात्याकडे पैसा नसल्याचे, शासनाने १९९७ साली पोलीस ठाणे व निवासस्थाने यासाठी सुमारे ३ एकर जमीन दिली असली तरी ११ वर्षांनंतरही बांधकामाचा पत्ता नसल्याचे लक्षात आले.

बहुसंख्य रुग्णालयातील शस्त्रक्रियागृह बंद असल्याचे, संपूर्ण ठाणे ग्रामीणला एकच भूलतज्ज्ञ असल्याचे, डिस्पोजेबल निडल्सचा पुरवठा प्राथमिक आरोग्य केंद्रांना होत नसल्याचे, अत्यावश्यक औषधांऐवजी आरोग्य संचालकाच्या व आरोग्य मंत्र्यांच्या पसंतीची, मुदत संपत आलेली औषधे खरेदी केली जात असल्याचे व ती न वापरता पडून राहत असल्याचे विदारक चित्र या पंचनाम्यांतून आढळून आले.

''असा पंचनामा करण्याचा अधिकार संघटनेला कुणी दिला'' असा प्रश्न ठाणे जिल्हा परिषदेत उपस्थित झाला व त्यावर सुमारे तासभर गदारोळ झाला. आमच्यावर गुन्हे दाखल करण्याचीही मागणी झाली. त्याला न जुमानता, जबाबदार नागरिक म्हणून आम्हाला हे अधिकार आहेत आणि आम्ही ते बजावणार, आमच्यावर गुन्हे दाखल कराच असे खुले आव्हान आम्ही जिल्हा परिषदेला दिले व पंचनाम्यांचे सत्र सुरूच ठेवले.

या पंचनाम्यांचे पुस्तक 'समर्थन' तर्फे प्रकाशित करून ते अधिवेशनादरम्यान सर्व विधिमंडळ सदस्यांना वितरीत करण्यात आले. त्याचा अत्यंत प्रभावी परिणाम झाला. पारदर्शकता आणि सुव्यवस्थापन याची नारेबाजी करणारे शासन तोंडघशी पडले.

जव्हार येथील पोलीस निवासस्थानाचा एक पंचनामा नमुन्या दाखल या ठिकाणी उद्धृत करीत आहे.

''आम्ही खालील सह्या करणारे पंच दिनांक २८/८/२००८ रोजी जव्हार येथील पोलीस निवासस्थानाच्या समोर उभे राहून संध्याकाळी ५.३० वाजता पंचनामा करीत आहोत की,

मान. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग जव्हार यांनी मान. कार्यकारी अभियंता, ठाणे यांना दिलेल्या पत्राची प्रत पंचांना देण्यात आली. पत्राची प्रत पंचांच्या व्यतिरिक्त येथे उपस्थित असलेले श्री. बी. जे. महाले, कार्यकारी अभियंता, यांच्याजवळही आहे. समोर ३ इमारती दिसत असून त्यात ३० गाळे असल्याचे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले. सदरचे बांधकाम मार्च २००५ मध्ये पूर्ण झाले असल्याचे त्यांच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे, असे ते सांगत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने विद्युतमंडळाला ३ लाख ५० हजार रुपये भरणा केल्याचे पत्रात लिहिले आहे, असे ते सांगत आहेत. परंतु विद्युत मंडळाने वीज जोडणी न केल्याने बांधकाम पूर्ण झाल्यानंतरही ३ वर्षे इमारत, पोलीस विभागास हस्तांतरीत करता आली नाही, असे ते सांगत आहेत. २००५ नंतर बांधकाम पूर्ण झाल्यानंतर विद्युतीकरणासाठी अगर स्थापत्य बांधकामासाठी शासनाकडे निधीची मागणी करण्यात आली नाही. मात्र श्रमजीवी संघटना महाराष्ट्र यांच्या ९/७/२००८च्या पत्रानंतर १४/७/२००८ रोजी अधिक्षक अभियंता, ठाणे यांच्याकडे तशी मागणी केली असल्याचे श्री. महाले यांनी सांगितले.

इमारतींची पाहणी केली असता दरवाजे आणि खिडक्या मोडलेल्या दिसून येत आहेत. भिंतींना भेगा पडलेल्या दिसत आहेत. निवासस्थानाच्या आत शिरून पाहिले असता सर्वत्र घाण झालेली असून ती साफ केलेली दिसते. खोलीतील कपाटांचे दरवाजे, खिडक्यांच्या झडपा व ग्रील्स यांची चोरी झाल्याचे दिसत आहे. विद्युतीकरणासाठी केलेली जोडणी (उपकरणे) नष्ट झालेली दिसत आहेत. वॉशबेसीन चोरीला गेल्याचे दिसत आहे. स्नानगृहात व शौचालयात बसवलेले पाण्याचे पाईप नष्ट झालेले असून दरवाजाच्या खिडक्या नष्ट झाल्या आहेत. स्वयंपाकघरातील कपाट पूर्णपणे नष्ट झालेले आहेत. खिडकीच्या काचा दिसत नाही. तसेच सिमेंटचे प्लास्टर गळून पडलेले आहे.

सदर पंचनामा सायंकाळी ६.१५ वाजता संपविण्यात आला.''

**समक्ष :-**

श्री. बी.जे. महाले, कार्यकारी अभियंता

**पंच :-**

१) श्री. विवेक पंडित, संस्थापक, श्रमजीवी संघटना

२) श्रीम. जयश्री खाडीलकर-पांडे, संपादक, दै. नवाकाळ

३) श्री. श्री. वा. निर्लेकर, ज्येष्ठ पत्रकार, दै. महाराष्ट्र टाईम्स

४) श्री. सोपान बोंगाणे, ज्येष्ठ पत्रकार, दै. लोकसत्ता
५) श्री. सुरेश नगर्सेकर, ज्येष्ठ पत्रकार, दै. नवाकाळ
६) श्री. सुहास रेळेकर, प्रतिनिधी, स्टार माझा
७) श्री. जगदिश धोडी, जिल्हाध्यक्ष, श्रमजीवी संघटना
८) श्री. बाळाराम भोईर, सरचिटणीस, श्रमजीवी संघटना

या पंचनाम्यानंतर श्रमजीवी संघटनेने पाठपुरावा केला. शासनाकडे निधी नाही म्हणून जव्हार शहरात हातात भिकेचा कटोरा घेऊन संघटनेच्या कार्यकर्त्यांसह मी बाजारपेठेत, बसस्थानकावर, शासकीय कार्यालयात जाऊन ३,८७१ रुपयांची भीक जमविली. ती सार्वजनिक बांधकाम खात्याला दिल्यावर त्याच दिवशी इमारत दुरुस्तीचे काम सुरू झाले. १ जानेवारी २००९ रोजी पोलीस आपल्या नव्या निवासस्थानात राहण्यास गेले. असा दृश्य परिणाम पंचनाम्याशिवाय अन्य कोणत्या मार्गाने झाला असता असे वाटत नाही. तीच अवस्था शासकीय आश्रमशाळांची आहे. पंचनाम्यांनंतर आश्रमशाळांतीलही बनावट साबण, दंतमंजन व तेल जाऊन लाईफबॉय, व्हील, कोलगेट टूथ पावडर व पॅराशूट तेल आले. किडलेले धान्य त्वरेने हलविले गेले व चांगल्या दर्जाचे धान्य आश्रमशाळांना पुरविले गेले.

पंचनामातंत्रात शासन व्यवस्थेला वठणीवर आणण्याचे सामर्थ्य आहे. नागरिकांनी शासनावर असा दबाव सातत्याने ठेवला तर परिस्थिती बदलेल हे निश्चित.

**माहितीचे अस्त्र :**

अहिंसक संघर्षाचे मार्ग चोखाळताना, नियोजनबद्धरीतीने संघर्ष करीत असताना संबंधित विषयाची अधिकाधिक माहिती संघटकाला असणे आवश्यक असते. अहिंसक संघर्षात माहिती हेच अत्यंत प्रभावी हत्यार असते. माहितीचे प्रभावी विश्लेषण करून योग्य स्वरूपात प्रश्नांची मांडणी केल्यास आंदोलनाला प्रचंड बळकटी येऊ शकते. माहितीच्या आधाराशिवाय प्रश्न सोडविण्याची सुरुवात म्हणजे पराभव ओढवून घेण्यासारखे असते. कायद्याची, धोरणांची अमंलबजावणी वा त्यात बदल यापैकी नेमके काय हवे आहे, याची नेमकेपणाने मांडणी केल्याशिवाय संघर्षाची सुरुवात करणे योग्य नसते. व्यवस्थांतर्गत उपलब्ध होणारी माहिती व व्यवस्थेबाहेर उपलब्ध होणारी माहिती हे माहितीचे दोन प्रकार म्हणता येतील.

सरकारने तयार केलेली व सरकारच्या अधिकार क्षेत्रात असलेली माहिती म्हणजे 'व्यवस्थांतर्गत माहिती' होय. यात कायदे, शासकीय आदेश, प्रशासकीय आदेश,

न्यायालयीन निवाडे, आंतरराष्ट्रीय करार, विधिमंडळ वृत्तांत, मंत्रिमंडळाचे निर्णय, विविध समित्यांचे व खात्यांचे अहवाल, अर्थसंकल्पीय कागदपत्रे तसेच जनगणना, शासकीय सर्वेक्षणे आदी सांख्यिकी तपशिलाचा समावेश होतो.

'व्यवस्थेबाहेरची माहिती' म्हणजे खासगी सर्वेक्षणे, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके यातील माहिती होय. संघटकाला माहिती मिळविण्याचे विविध मार्ग शोधावे लागतात. व्यवस्थांतर्गत उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे न्यायालयात दाद मागता येऊ शकते. अशी माहिती कोणती याचा शोध घ्यावा लागतो. आंतरराष्ट्रीय करारासारखे दस्तऐवज महत्त्वाचे असले तरी त्यानुसार जर देशांतर्गत कायदेशीर तरतुदी झाल्या नसतील तर न्यायालयात दाद मागता येत नाही.

व्यवस्थेबाहेरून मिळविलेल्या माहितीचा शासनाला झुकविण्यासाठी, आपला दावा बळकट करण्यासाठी  उपयोग करता येतो. मात्र या माहितीची पूर्ण सत्यता पडताळून पाहणे आवश्यक असते. माहिती मिळविण्यासाठी माहितीच्या अधिकाराचे प्रभावी अस्त्र उपलब्ध आहे. माहिती मिळविण्यासाठी त्या शिवायही इतर अनेक मार्ग संघटकाला शोधून काढावे लागतात. यासाठी व्यवस्थांतर्गत असणाऱ्या सत्ता स्पर्धेचा उपयोग संघटकाला कौशल्याने करता येऊ शकेल.

पुस्तकात अगर कागदोपत्री उपलब्ध असणारी माहिती 'क्रियाशून्य' असते. त्या माहितीला योग्य विश्लेषणाची जोड देऊन 'क्रियाशील' करावे लागते. संघटकाकडे माहिती क्रियाशील करण्याचे कौशल्य असावे लागते. अर्थसंकल्पाच्या हजारो पानांमध्ये क्रियाशून्य माहिती उपलब्ध असते. राज्यातील ज्वलंत प्रश्नाला अर्थसंकल्पाच्या तरतुदींशी, योजनांच्या अंमलबजावणीतील यशापयशाशी जोडले म्हणजे ती माहिती क्रियाशील होते.

*******

# आंदोलनाची रणनीती

प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी विविध मार्गांचा वापर करून करावयाच्या व्यापक आखणीला 'आंदोलनाची रणनीती' म्हणता येईल. संघटनेच्या उद्दिष्टांनुसार रणनीतीची आखणी होत असते. कमीत कमी नुकसान होऊन, किमान परिश्रम घेऊन, लवकरात लवकर जिंकण्यासाठी रणनीती आखणे आवश्यक असते. प्रश्न कितीही छोटा असला तरी यशाची निश्चिती करण्यासाठी रणनीतीची आखणी करावी लागते.

विरोधक आपल्यापेक्षा सामर्थ्यवान आहे हे संघटकाने गृहीत धरावे लागते. स्वतःच्या सामर्थ्याविषयीच्या अवास्तव कल्पना पराभवाकडे नेऊ शकतात. नियोजनाशिवाय मैदानात उतरल्यास पराभवाची शक्यता दाट असते. अहिंसक संघर्षामध्ये रणनीतीला अधिकच महत्त्व असते. विरोधक हिंसेचा आधार घेऊ शकतो. अहिंसक प्रतिकार कसा करावा याचे पूर्वनियोजन करणे आवश्यक असते.

अहिंसक संघर्षात रणनीती आखताना सुरुवातीपासून शेवटपर्यंतचे नियोजन करावे लागते. बारीकसारीक गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. शक्य असेल तर नेतृत्व करणाऱ्यांचे, कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण घेऊन प्रश्नाचे बारकावे, आपली भूमिका, आपला विरोधक, आपणासमोर उपलब्ध असलेले पर्याय यांची सांगोपांग चर्चा करणे हितावह असते.

**पूर्वतयारी :**

रणनीतीची आखणी करीत असताना दोन कृतींच्या दरम्यान काही अवधी ठेवणे आवश्यक असते. एका कृतीनंतर पुढे काय, याचा विचार पूर्वतयारीदरम्यानच केलेला असला तरी पुढील कृतीपूर्वी पहिल्या कृतीचे सिंहावलोकन करण्यासाठी हा अवधी आवश्यक असतो.

उपोषणासारख्या साधनांचा वापर करताना संघर्षाची तीव्रता वाढविण्यासाठी इतरही साधनांचा एकाच वेळी वापर करणे हिताचे असते. विरोधकाला उपोषणाला वाढता पाठिंबा मिळत असल्याचे दिसायचे असेल तर रास्ता रोको, साखळी उपोषण, सह्यांची मोहीम आदी साधनेही त्याच वेळी वापरावी लागतात. याची पूर्वतयारी असावी लागते. आपण करीत असलेल्या संघर्षाचे समर्थन करण्यासाठी आपण संघर्षपूर्व केलेले प्रयत्न दाखविता येणे आवश्यक असते. विरोधकाशी आपण केलेला पत्रव्यवहार, केलेली चर्चा, त्यातून न झालेली फलनिष्पत्ती आपले आंदोलन बळकट करते. हे सर्व न करता अचानक संघर्ष केल्यास, तो तसा करणे का अपरिहार्य वा अटळ होते याचे समर्थन आपणास करता आले पाहिजे.

**संघर्षाच्या उद्देशांची स्पष्टता :**

आपण करीत असलेल्या संघर्षाचा काय उद्देश आहे याची स्पष्टता शक्यतोवर संघर्षात सहभागी होणाऱ्या प्रत्येकाला असेल याची दक्षता संघटकाला घ्यावी लागते. संघर्षाचे विविध उद्देश असू शकतात. काही वेळा लोकांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी, लोकांना भयमुक्त करण्यासाठी अगर संघटना बांधणीसाठी संघर्ष असू शकतो. प्रत्येक वेळी वाटाघाटी करून काही पदरात पाडून घेणे अपेक्षितही नसते. काही वेळा वाटाघाटी नंतर होऊ शकतात, तर काही वेळा त्या त्वरित होऊ शकतात.

**मैदानातील चार हितसंबंधी घटक :**

संघटना बांधणी म्हणजे एकपात्री प्रयोग नव्हे. आपल्याशिवायही अनेक जण रणभूमीवर वावरत असतात. प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी रणनीतीची आखणी करताना, समाजातील ज्या ज्या घटकांशी प्रश्नाचा संबंध येत असतो त्या सर्वांचा विचार संघटकाला करावा लागतो. समाजाची वर्गवारी संघटकाला 'आपले', 'मित्र', 'कुंपणावरील', 'विरोधक' या चार घटकांत करता येते. यापुढे या घटकांचा समाजघटक असा उल्लेख केलेला आहे.

यश मिळविण्यासाठी या चार समाजघटकांचा विचार करणे आवश्यक असते. त्यासाठी विविध मार्गांनी माहिती मिळवून खात्री करून घ्यावी लागते. प्रत्येक समाजघटक त्याची भूमिका बजावीत असतो. आपल्या प्रत्येक क्रियेला या घटकांमधून प्रतिक्रिया येणार असतेच. म्हणूनच संभाव्य प्रतिक्रिया काय येणार याचा अंदाज संघटकाला कृतीपूर्वी घ्यावा लागतो. प्रत्येक प्रश्नाच्या सोडवणुकीच्या वेळी हे विश्लेषण करावे लागते. कारण मुद्द्यानुसार वर्गीकरण बदलू शकते.

'आपले' कोण ? ज्यांच्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न चालले आहेत, प्रश्नाची झळ ज्यांना लागते, जे बाधित लोक आहेत ते 'आपले' या घटकात येतात. ते प्रत्यक्ष लढणारे असतात. लढ्याचे मुख्य बळ असतात.

'मित्र' कोण ? प्रश्नाने प्रत्यक्ष बाधित नसलेले परंतु सहानुभूती असणारे 'मित्र' असतात. आपणच केवळ शोषितांच्या बाजूचे आहोत असा संघटकाने समज करून घेतला तर त्याला मित्र दिसू शकत नाहीत. गरिबांबद्दल कणव असणारे अनेक लोक असतात. भिन्न जाती-धर्माचे, पक्ष-पंथाचे, विविध क्षेत्रातील असतात. समाजातील व्यंगे दूर व्हावीत अशी त्यांची इच्छा असते मात्र काही मर्यादांमुळे ते सक्रिय बनून कार्य करू शकत नाहीत. परंतु आपल्या कार्याला त्यांच्या मर्यादेत राहून मदत करण्याची त्यांची इच्छा असते. लोकप्रतिनिधी, पोलीस, पत्रकार, वकील, बुद्धिवंत, अगदी उद्योजक-धनिकांमध्येही मित्र असू शकतात. त्यांचा शोध घेण्यामध्ये, त्यांना कार्यप्रवृत्त करण्यामध्ये संघटकाचे कौशल्य असते. मित्रांचा शोध घेण्यात संघटक कमी पडल्यास संघटना एकाकी पडण्याची भीती असते. असे एकाकी पडणे यशाच्या मार्गाआड येते.

समाजातील काही प्रथितयश लेखक, कलाकार, सामाजिक बांधीलकीच्या भावनेतून अन्यायाविरोधी उठणाऱ्या आवाजाला साथ देतात. वेठबिगारांच्या मुक्ती लढ्यात तसेच गुरुदेव सिद्धपीठ आश्रमाच्या किमान वेतनाच्या लढ्यात प्रसिद्ध नाटककार श्री. विजय तेंडुलकर, सुप्रसिद्ध चित्रपट, नाट्य अभिनेते डॉ. श्रीराम लागू अत्यंत खंबीरपणे संघटनेच्या बाजूने उभे राहिले. शोषितांच्या वतीने जेव्हा असे मान्यवर उभे राहतात, तेव्हा लढ्याला हत्तीचे बळ येते.

मंगळ्या दळवी, ठाण्याजवळील खारीगाव येथे बुधाजी पाटील या धनाढ्य मालकाकडे गुलामीचे जीवन जगत होता. मंगळ्याचे मूळ गांव भिवंडी तालुक्यातील डोहळा. मंगळ्याचा एक वर्षाचा मुलगा खूप आजारी होता. त्याच्या औषधपाण्यासाठी मालकाकडे त्याने २० रूपये मागितले. ते देण्याऐवजी मालकाने त्याला बेदम चोपले. रात्री मुलाची प्रकृती अधिकच खालावली म्हणून तो पत्नीसह मुलांना घेऊन मूळ गावी जाण्यासाठी चालतच निघाला. वाटेतच त्याच्या मुलाने प्राण सोडले. दुसऱ्या दिवशी मालक गावी आला. त्याला पाहून मंगळ्या जंगलात पळून गेला. मालकाने मंगळ्याच्या पत्नीला उचलून नेले.

हे प्रकरण मी जिल्हाधिकाऱ्यांच्या व पोलिसांच्या कानी घातले. परंतु मालक सत्ताधीशांच्या इतक्या जवळ होता की, त्याच्यावर कारवाई करण्यास कोणीही धजावले नाही. अखेर मंगळ्याची पत्नी परत मिळावी म्हणून विद्युल्लताने उच्च न्यायालयात हेबियस कॉर्पस् याचिका दाखल केली. मंगळ्याच्या पत्नीला जिवंत अगर मृत न्यायालयात हजर करण्याचे आदेश न्यायालयाने पोलिसांना दिले. दरम्यानच्या काळात मंगळ्याच्या पत्नीला प्रत्यक्ष भेटण्यासाठी आम्ही प्रयत्न केले. त्यावेळी विजय तेंडुलकर व ज्येष्ठ पत्रकार भैयासाहेब सहस्त्रबुद्धे यांना घेऊन आम्ही मंगळ्याच्या पत्नीला भेटण्याचे ठरवले. प्रथम रबाळे पोलीस ठाण्यात गेलो. तेथील पोलीस निरीक्षकाने मंगळ्याची पत्नी खखुशीने बुधाजी पाटलाकडे राहत आहे, तिला कोणताही त्रास नाही हेच आळवायला सुरुवात केली. खूप आग्रहानंतर तो आमच्यासोबत आला. त्याला रस्त्यावर उभे केले. विजय तेंडुलकर, भैयासाहेब सहस्त्रबुद्धे व विद्युल्लता मंगळ्याच्या पत्नीला भेटण्यास गेले. तिने तिला होणाऱ्या त्रासाची कल्पना तिघांनाही दिली व या तिघांसोबत ती येण्यास निघाली. तोवर मालकाचे काही लोक पोलीस निरीक्षकाच्या बाजूला येऊन उभे राहिले. मंगळ्याची पत्नी त्या सर्वांना पाहताच माघारी फिरली. विद्युल्लताने तिला रस्त्यापर्यंत कसे तरी आणले. परंतु आमच्यासोबत येण्यास तिने नकार दिला. पोलीस निरीक्षकाच्या वाहनाने ती पोलीस ठाण्यात आली. पोलीस निरीक्षक तिला दरडावून विचारत होता, ''बोल, तू स्वतःच पाटलाकडे राहतेस की नाही?'' ती हो म्हणाली. ''तुला कोणाचा त्रास आहे का?'' ती नाही म्हणाली. आमच्यासोबत येण्यासही तिने नकार दिला. हसत हसत पोलीस निरीक्षक म्हणाला, ''बघा, तुमच्यासमोरच ती काय म्हणते ते? झाले तुमचे समाधान.'' आम्ही तसेच बाहेर पडलो. विजय तेंडुलकरांनी या घटनेबद्दल उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले. न्यायालयात सुनावणीसाठी त्याच पोलीस निरीक्षकाने मंगळ्याच्या पत्नीला हजर केले. न्यायालयातही तिने तिला कसलाच त्रास नाही असे सांगितले. आमचे वकील नितीन प्रधान यांनी मंगळ्याच्या पत्नीचा जबाब खुल्या न्यायालयात पोलिसांसमक्ष न घेता न्यायाधीशाच्या चेंबरमध्ये विद्युल्लताच्या उपस्थितीत घ्यावा ही विनंती केली व न्यायालयाने ते मान्य केले. चेंबरच्या बाहेर निरीक्षक आपल्या पोलिसांसह हजेरी लावण्यास विसरला नाही. चेंबरमध्येही मंगळ्याच्या पत्नीने खरे सांगितलेच नाही. न्यायाधीशाने विद्युल्लताला

सांगितले, ‘‘तुमचे सर्व म्हणणे मला मान्य आहे परंतु मी काहीही करू शकत नाही.’’ तेंडुलकरांच्या प्रतिज्ञापत्राचा न्यायाधीशांवर योग्य तो परिणाम झाला होता. अन्यथा संघटना तोंडघशी पडण्याची शक्यता होती. या सर्व घटनेचे चित्रण ‘मंगळया पराभवाला घाबरत नाही’ या शीर्षकाखाली महाराष्ट्र टाइम्सचे पत्रकार सतीश कामत यांनी केले होते.

‘कुंपणावरील’कोण? समाजातील बहुसंख्य लोक निश्चित भूमिका घेत नाहीत. प्रश्नाविषयी माहिती नसल्याने अथवा विरोधकांकडून चुकीची माहिती मिळाल्याने अगर आपल्याला त्याचे काय अशी भावना असल्याने बहुसंख्य लोक आपला मानस बनवित नाहीत, प्रश्नावर भूमिका घेत नाहीत किंवा तटस्थ राहतात. संघटकाने प्रयत्न केल्यास समाजातील या मोठ्या घटकाचा पाठिंबा मिळू शकतो. संघटकाने प्रयत्न न केल्यास आणि विरोधकाने असे प्रयत्न केल्यास त्याची बाजू बळकट होऊ शकते.

‘विरोधक’ कोण? हाती घेतलेल्या मुद्द्याच्या सोडवणुकीमध्ये आपला नेमका विरोधक कोण, या विरोधकाचा चेहरा कोणता, याची स्पष्टता संघटकाला असावी लागते. प्रत्येक मुद्द्याचा विरोधक वेगळा असू शकतो. व्यवस्थेच्या विरोधातील व्यापक संघर्ष असला तरीही संघटकाला त्या व्यवस्थेमध्ये चेहरा शोधावा लागतो.

**विरोधकाच्या दृष्टिकोनातून समाज घटक :**

संघटकाला केवळ स्वत:च्या दृष्टिकोनातून समाजघटकांचे विश्लेषण करून रणनीतीची आखणी करता येत नाही. विरोधकाच्या दृष्टिकोनातूनही या चार घटकांचा विचार करून विरोधक कशी रणनीती आखतो आहे याची माहिती सतत मिळवीत राहणे, विरोधकाच्या कृतीचा अंदाज घेणे व त्या दृष्टीने आपल्या रणनीतीचा आढावा घेत राहणे हे यश मिळविण्याच्या दृष्टीने आवश्यक असते.

**बलाबलाचे विश्लेषण :**

समाजघटकांचे असे विश्लेषण केल्यानंतर आपली व विरोधकाची बलस्थाने व मर्यादा, दोघांनाही असलेल्या संधी, संभाव्य धोके याचे विश्लेषण सातत्याने करीत राहणे रणनीतीच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी अत्यावश्यक असते. हे विश्लेषण अत्यंत वस्तुनिष्ठ असावे लागते. आपणास समाधान मिळावे म्हणून संघटकाने अपुऱ्या माहितीवर विश्लेषण केल्यास ती आत्मवंचना ठरते.

आपले बळ नेमके कशात आहे आणि ते खरोखरीच आहे का ? विरोधकाचे नेमके बळ कशात आहे ? आपल्या व विरोधकाच्या कमजोरी काय ? आपणास व विरोधकास विजयासाठी कोणत्या संधी उपलब्ध होऊ शकतात ? विरोधक आपणास कोणते धोके निर्माण करू शकतो ? तसेच आपण विरोधकास कोणत्या धोक्यांना सामोरे जाण्यास भाग पाडू शकतो ? हे विश्लेषण केवळ एकदाच करून भागत नाही. ते सातत्याने करीत राहावे लागते.

**रणनीतीची आवश्यकता :**

हाती घेतलेल्या मुद्द्यावर निश्चित विजय मिळवायचाच असेल तर रणनीतीची आखणी अनिवार्य ठरते. ही आखणी काल्पनिक, स्वप्नाळू आणि भाबडी असेल तर लढ्याच्या सुरुवातीलाच पराभव निश्चित असतो. लढ्याच्या प्रत्येक टप्प्यात योग्य कृतीचा अवलंब करून बळ वाढवत न्यावयाचे असते. रणनीतीची आखणी हा संघटनाबांधणीच्या प्रक्रियेचा एक भाग असतो. रणनीती आखताना आपल्या लोकांचे सामर्थ्य वाढविणे, विरोधकांचे सामर्थ्य कमी करणे, मित्रांना कार्यप्रवण करणे, कुंपणावरील लोकांना आपल्या बाजूला वळविणे किंवा ते विरोधकांना साथ देणार नाहीत यासाठी प्रयत्न करणे, आपल्या मर्यादा किंवा कमजोऱ्या कमी करून आपले सामर्थ्य वाढविणे, प्रत्येक संधी घेत संभाव्य धोके टाळणे, हे रणनीतीचे अविभाज्य भाग असतात.

**रणनीतीची आखणी :**

रणनीतीची आखणी करताना प्रत्येक घटकाबरोबर कसे काम करावयाचे आहे याचे नियोजन संघटकास करावे लागते.

'आपले' आंदोलनाच्या अखेरपर्यंत सतत सक्रिय राहतील, त्यांचे नैतिक बळ वृद्धिंगत होत राहील असे कृती कार्यक्रम त्यांना द्यावे लागतात. ते निष्क्रिय झाल्यास वा विरोधकाला जाऊन मिळाल्यास संघटनेची शक्ती कमी तर होतेच मात्र विरोधकाचे बळ वाढते. ते समर्पित असतील तर संख्येने कमी असूनही आपण सामर्थ्यवान असू शकतो. त्यांचे योग्य प्रशिक्षण आवश्यक असते. संघर्षाच्या वेळी नेतृत्व करणाऱ्यांचे इशारे संघर्षात सहभागी होणाऱ्यांना कळावे लागतात. अहिंसक संघर्षात शिस्तबद्ध फौजेला महत्त्व असते. तसे नसेल तर विरोधकांच्या हिंसक चिथावणीला रोखता येत नाही.

संघटनेचे अंतर्गत वातावरण पारदर्शक व आरोग्यदायी ठेवणे संघटकासाठी महत्त्वाचे असते. अंतर्गत हेवेदावे अथवा नेतृत्व स्पर्धा याकडे वेळीच लक्ष न दिल्यास त्याचे पर्यवसान फूट पडून आपली संख्या कमी होण्यात होऊ शकते.

आपल्या 'मित्रां'साठी कृती कार्यक्रमाची आखणी करीत असताना ते आपले मित्र आहेत याचे भान संघटकाला ठेवावे लागते. पत्रकार, पोलीस अगर प्रशासनामध्ये आपले मित्र असले तरीही त्यांच्याकडून अवास्तव अपेक्षा करता येत नाहीत. मित्राकडून पत्र लिहिणे, माहिती मिळविणे, आर्थिक सहाय्य मिळविणे अशा कामांची अपेक्षा करता येते.

चळवळीतील एक कार्यकर्ता पत्रकार झाला. तो जनआंदोलनांना आपल्या लेखणीद्वारे सतत मदत करीत असे. एकदा त्याने एका आंदोलनातील विरोधकाचे म्हणणे आपल्या बातमीत छापले. एका कार्यक्रमाला तो पत्रकार आला असता त्या आंदोलनकर्त्यांनी जाहीरपणे त्याला कार्यक्रमाबाहेर काढले.

संघटना मित्र कसे गमवू शकते, याचे हे उदाहरण आहे. संघटना प्रश्नांची मांडणी बरेचदा अशा पद्धतीने करतात की ज्यामुळे मित्र दूर जातात. संघर्ष सुरू करण्यापूर्वी मित्रांना पूर्वकल्पना देणे, त्यांच्या मर्यादा लक्षात घेऊन त्यांना लढ्यात सहभागी करून घेण्यासाठी काही कार्यक्रम देणे, ते अखेरपर्यंत आपल्या सोबत राहतील यासाठी त्यांना माहिती देत राहणे महत्त्वाचे आहे. आपल्या मित्रांना माहिती न दिल्यास व त्यांना कार्यक्रम न दिल्यास आपल्या सामर्थ्यात वाढ होणार नाही. संघर्ष सुरू होण्यापूर्वी प्रशासनातील, प्रसारमाध्यमातील तसेच इतर व्यवस्थांमधील मित्रांशी संपर्क साधून त्यांना विश्वासात घेणे फार महत्त्वाचे असते.

'कुंपणावरील' घटक आपल्याविरोधी आहेत, असा बरेचदा संघटक स्वत:चा समज करून घेतो. मानस न बनविलेल्या समाजघटकाला आपल्या बाजूने वळविण्यासाठी प्रश्नांची मांडणी काळजीपूर्वक करावी लागते. कुंपणावरील लोकांनी भूमिका घेतलेली नसल्याने त्यांना आपली बाजू समजावून देऊन ते मित्र बनावेत यासाठी कोणते कार्यक्रम आपणास घ्यावे लागतील याचा गांभीर्याने विचार करावा लागतो.

कुंपणावरील लोकांनी आपल्या भूमिकेला पाठिंबा न दिल्यास निदान ते विरोधकाच्या बाजूने जाऊन विरोधकाचे सामर्थ्य वाढविणार नाहीत यासाठी प्रयत्न करावे लागतात.

'विरोधक' संख्येने नेहमीच कमी परंतु सत्तेने सामर्थ्यवान असतो. विरोधकाला कमी लेखणे म्हणजे आत्मवंचनाच. आपल्या विरोधकाची मानसिकता काय आहे? त्याचे नैतिक, कायदेशीर स्थान काय आहे? याची वस्तुनिष्ठ माहिती संघटकास मिळवावी लागते. विरोधकांचे अंतर्गत वाद अथवा मतभेद यांचीही माहिती संघटकास मिळवावी लागते आणि तिचा उपयोग करून घ्यावा लागतो.

संघटना बांधणीच्या प्रक्रियेमध्ये संख्याबळाचे सामर्थ्य वाढवीत नेणे महत्त्वाचे असते. ज्या लोकशाहीच्या चौकटीत आपण काम करीत आहोत त्यात संख्याबळाला मोठे स्थान आहे. चार घटकांचे विश्लेषण केल्यानंतर या चारही घटकांतून अधिकाधिक लोक आपल्या बाजूने कसे येतील या दृष्टीने संघटकास रणनीतीची आखणी करावी लागते. 'आपले' लोक संघर्षाला उभे राहिल्यानंतर'मित्र' व 'कुंपणावरील' अधिकाधिक लोक आपल्या साथीला आले तर आपले सामर्थ्य वाढून आपण विरोधकाला एकाकी टाकून लढा सहज जिंकू शकतो. मित्र व कुंपणावरील घटकांच्या सहभागाशिवाय आपण एकाकी राहू याचे भान संघटकास ठेवावे लागते.

लढ्यातील संख्येचे गणित नेहमीच्या बेरीज-वजाबाकीपेक्षा भिन्न असते. आपली ताकद कमी झाली तर फक्त आपलीच ताकद कमी होत नाही तर विरोधकाची ताकद वाढते हे संघटकाने लक्षात घेतले पाहिजे. संख्येचे हे गणित संघटकाला सातत्याने डोळ्यासमोर ठेवावे लागते.

**विरोधकाला चेहरा देणे :**

व्यवस्था व्यक्तींनी बनलेली आहे व व्यक्ती व्यवस्थेचे संचालन करतात. यासाठी व्यवस्थेला चेहरा देणे आवश्यक ठरते. प्रस्थापित व्यवस्थेमुळे समस्या उभ्या राहिलेल्या असतात हे खरे असले तरी चेहरा नसलेल्या व्यवस्थेविरोधात संघटनाबांधणी करता येत नाही.

हाती घेतलेल्या प्रश्नाचा नेमका विरोधक कोण ? हे स्पष्टपणे जाहीर करावे लागते. विरोधकाला विरोधक म्हणून जाहीर केल्याशिवाय व विरोधक म्हणून त्याची प्रतिमा तयार केल्याशिवाय लोकांना संघटित करता येत नाही. मात्र हे करताना व्यक्तिगत शत्रुत्व येणार नाही याची काळजी घ्यावी लागते.

विरोधकाकडून काय हवे आहे ते नेमकेपणाने संघटकास माहीत असावयास हवे. मागणे ठोस असावे लागते, ते ढोबळ असून चालत नाही. मागणीमध्ये संभ्रम नसावा. जे हवे आहे ते देण्याची क्षमता ज्याच्याकडे आहे तोच विरोधक असतो. विरोधकाचा चेहरा ज्यास दिला तो आपण जे मागतो आहोत ते देण्यास सक्षम नसेल तर फसगत होऊ शकते.

एका प्रश्नावर एकाचवेळी अनेक विरोधक असू शकतात. त्यांना एकाच वेळी विरोधक घोषित करावयाचे अगर टप्प्याटप्प्याने, हा रणनीतीचा भाग असू शकतो. किमान वेतन न देणारा मालक व कायद्याची अंमलबजावणी न करणारे कामगार अधिकारी या दोघांशी एकाच वेळी लढावयाचे की, एका वेळी एकाशीच लढावयाचे याचा निर्णय संघटकाला परिस्थितीनुरूप घ्यावा लागतो.

**कृतीसाठी निमित्त :**

आंदोलनाची सुरुवात करण्यासाठी काही कारण लागते, काही निमित्त लागते. विरोधकाने हे कारण आयते दिल्यास उत्तमच, नाही तर तसे कारण निर्माण करावे लागते. काही वेळा आंदोलनाची सुरुवात करण्यासाठी जी कृती निवडली जाते त्यानेच प्रश्न सुटू शकतो. इशारा देणारे पत्र, निवेदन, आंदोलनाची सुरुवात म्हणून दिल्यानंतर केवळ या इशाऱ्यानेच प्रश्न सुटल्यास आंदोलनाची आवश्यकता राहत नाही.

काही वेळा विरोधकाने काहीतरी चुकीचे करावे व त्याचा फायदा घेता यावा यासाठीही संघटकास प्रयत्न करता येतात. त्या दृष्टीने विरोधकाला चिथावणी देऊन त्याला चूक करण्यास प्रवृत्त करता येते.

**मुद्द्याच्या मांडणीची चौकट :**

प्रश्न सोडविताना अधिकाधिक लोक आपल्या बाजूने राहावेत म्हणून प्रश्नाची मांडणी काळजीपूर्वक करावी लागते. प्रत्येक समाजघटकासाठी मांडणीची चौकट वेगळी असू शकते. वेगळी चौकट याचा अर्थ वेगळा प्रश्न मांडणे अथवा असत्य सांगणे नव्हे. प्रत्येक हितसंबंधी घटकाला कोणती चौकट रुचेल याचा विचार करून ही चौकट घालावी लागते.

एखादा प्रश्न वर्तमानपत्राद्वारे मांडायचा असेल तर आकडेवारी, कायदेशीर तरतुदी यापेक्षा मानवी भावभावना, घटना यांना महत्त्व द्यावे लागते. पण तोच प्रश्न न्यायालयात मांडताना मानवी भावनांना महत्त्व देण्याऐवजी कायदेशीर तरतुदींना महत्त्व द्यावे लागते. मुद्दा तोच असला तरी तो कोणासमोर कसा मांडावा याचा विचारपूर्वक निर्णय संघटकास घ्यावा लागतो. जाहीर सभेत लोकांसमोर भाषण करताना, पत्रकारांना माहिती देताना, प्रशासनास समजावताना, विधिमंडळाच्या व्यासपीठावर प्रश्न उपस्थित करताना, न्यायालयात प्रश्न मांडताना, एकाच मुद्द्याला भिन्न चौकटी घालाव्या लागतात.

**संघर्षाची रणभूमी :**

संघर्षात रणभूमीचे महत्त्व अनन्यसाधारण असते. यशापयश रणभूमीवर अवलंबून असते. विरोधकाच्या रणभूमीवर आपण लढावयाला गेल्यास विजयाची शक्यता कमी असते. आपल्या मैदानात विरोधकाला लढण्यास भाग पाडल्यास लढाई सोपी होते. प्रत्येक संघर्षात रणभूमीची निवड आपल्याच हाती असत नाही. विरोधकाच्या मैदानातही लढणे काही वेळा अपरिहार्य ठरते. अशा वेळी युक्तीने रणभूमी बदलण्याचा प्रयत्न संघटकास करावा लागतो. तोवर आपला पराभव होणार नाही अशा पद्धतीने पावले टाकावी लागतात.

कल्याण तालुक्यातील आदिवासींची घरे पिढ्यान्‌पिढ्या एका मालकाच्या जागेत होती. परंतु त्या घरांची नोंद जमीन हक्कात नव्हती. मालकाने न्यायालयातून घरे उठविण्याचा आदेश मिळविला. त्या आदेशाची अंमलबजावणी करण्याचा डिक्री आदेशही त्याने मिळविला. तेव्हा ते आदिवासी संघटनेकडे आले. घरे वाचविण्यासाठी कायद्याचा कोणताही आधार शिल्लक नव्हता. डिक्रीची तारीख टाळणे व त्या दिवशी घरे पाडली जाणार नाहीत हे पाहणे हा एकच पर्याय शिल्लक होता.

स्वातंत्र्यदिनाच्या सुवर्णमहोत्सवाचे निमित्त करून सर्व घरांवर तिरंगा लावण्यात आला. हजारो लोकांना डिक्रीच्या दिवशी सुवर्णमहोत्सव साजरा करण्यास निमंत्रित करण्यात आले. घरे उद्‌ध्वस्त करण्यासाठी आलेले बेलिफ व पोलीस निघून जाईपर्यंत स्वातंत्र्याचा उत्सव चालला. त्यादिवशी घरे वाचली ती कायमची! न्यायालयाच्या आदेशाच्या विरोधात कृती न करता घरे वाचविण्यात संघटना यशस्वी ठरली.

असेच आणखी एक उदाहरण :

मुंबईतील एका बांधकाम व्यावसायिकाने आदिवासींची जमिनीवरील कब्जे वहिवाट हटविण्यासाठी न्यायालयाचा आधार घेतला. कागदोपत्री आदिवासींची हक्क नोंद नसल्याने न्यायालयाने काही आदिवासींच्या विरोधात निकाल दिला. अन्य आदिवासींच्याही विरोधात न्यायालय असाच निकाल देईल ही शक्यता लक्षात घेऊन न्यायालयाच्या रणभूमीवर न लढता, विधिमंडळात प्रश्न दाखल करून आदिवासींना संघटनेने न्याय मिळवून दिला.

अवघड असलेल्या रणभूमीवर लढणे संघटकास टाळता आले पाहिजे. विरोधक सामर्थ्यवान असल्याने त्याला सोयीच्या असलेल्या रणभूमीवर लढविण्याचा त्याचा प्रयत्न कसा हाणून पाडावा हे संघटकाचे कौशल्य असते.

**रणभूमीच्या निवडीसाठी आधार :**

सामाजिक संघर्षात विविध रणमैदाने उपलब्ध असतात. मुद्द्याच्या कायदेशीर, कायदेबाह्य, नैतिक, राजकीय व आर्थिक आधारावर ही मैदाने निश्चित करता येतात.

**१) कायदेशीर आधार :**

भारतीय संविधानाने प्रदान केलेल्या मूलभूत अधिकार वा मार्गदर्शक तत्त्वांचा भंग विरोधक करीत असेल किंवा राज्य व केंद्र शासनाने मंजूर केलेल्या कायद्याचा अगर

धोरणाचा भंग विरोधक करीत असेल तर कायदेशीर मार्गाचा अवलंब करून विरोधकाशी लढता येते. उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे निवाडे मदतीला येऊ शकतात. आपली बाजू कायद्याच्या दृष्टीने मजबूत असल्यासच संघटकाने या मैदानाचा विचार करावा.

अनेकदा संघटना जनहित याचिकांचा वापर करतात. या मैदानात लोकांच्या सहभागाला मर्यादा असतात. या रणभूमीवर लोक नव्हे तर वकील लढत असतात. हार आणि जीत वकिलांच्या हातात असते. जिंकल्याचे समाधान व विजयातून येणारा आत्मविश्वास या मैदानातून मिळू शकत नाही. या मैदानाद्वारे कधीही संघटना बांधणीची प्रक्रिया सफल होत नाही.

अंतिम पर्याय म्हणूनच शक्यतोवर न्यायालयाचा वापर करावा. सर्वोच्च न्यायालयात यश न मिळाल्यास अन्य पर्याय शिल्लक राहत नाहीत. यामुळे आंदोलनाची पीछेहाट होऊ शकते.

वेठबिगार मुक्तीच्या वेळी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिकेद्वारे वेठबिगारांची यादी पाठवून त्यांची मुक्ती करवून घेण्याचा पर्याय आमच्यापुढे होता. परंतु वेठबिगार स्वत: मुक्त होण्यास तयार आहेत, त्याचे परिणाम भोगण्यास तयार आहेत व त्यातून संघटित होण्याचा मार्ग ते शोधत आहेत, असे दिसल्यावर सर्वोच्च न्यायालयात न जाता रस्त्यावर येऊन संघर्ष करण्याचा मार्ग आम्ही निवडला होता. सतत दोन वर्षे संघर्ष करीत आम्ही सरकारला झुकविले होते. त्यानंतरच दोन वर्षांनी धोरणात्मक बदलाकरिता सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे संघटनेने ठोठाविले होते.

न्यायालयाचे मैदान हा अखेरचा पर्याय असावा याचे आणखी एक कारण म्हणजे न्यायालयाने आपल्या बाजूने निर्णय दिला नाही तर विरोधकाचे सामर्थ्य वाढते आणि लढण्यासाठी अन्य मैदाने शिल्लक राहत नाहीत.

### २) **कायदेतर आधार :**

विरोधकाची कायदेशीर बाजू अधिक भक्कम असेल व कायद्याचा आधार आपणास मिळणार नसेल तर अशा वेळी संविधानाला मान्य असलेल्या अन्य मार्गाने लढण्याचा विचार संघटक करू शकतो. राज्य घटनेची मार्गदर्शक तत्त्वे अथवा आंतरराष्ट्रीय करार यांचा आधार संघटकास घेता येतो.

आंतरराष्ट्रीय करार अथवा मार्गदर्शक तत्त्वे कायद्यामध्ये रूपांतरित होत नाहीत तोवर त्याच्या अंमलबजावणीची अपेक्षा करता येत नसली, तरी सरकारवर दबाव टाकण्यासाठी आपणास त्याचा उपयोग होतो.

**३) नैतिक आधार :**

कायद्याच्या दृष्टीने आपली बाजू भक्कम नसली तरी संघटकास विरोधकाला नैतिकतेच्या अथवा त्याच्या सामाजिक प्रतिष्ठेच्या मैदानावर लढविता येते. विरोधकाच्या सामाजिक प्रतिष्ठेचा उपयोग प्रश्न सोडविण्याच्या कामी करता येऊ शकतो. प्रश्नाचा संबंध समाजाच्या व्यापक हिताशी आहे अथवा प्रश्नाला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे अशा पद्धतीने मांडणी करून विरोधकाच्या नैतिकतेला आव्हान देता येते.

**४) राजकीय आधार :**

हाती घेतलेल्या प्रश्नांबाबत राजकीय पक्षांची लिखित धोरणे कोणती? त्यांच्या निवडणूक जाहीरनाम्यात घोषित केलेली धोरणे कोणती ? त्याचा आधार आपल्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी कसा घेता येईल हे संघटकाने पाहणे आवश्यक ठरते. बहुतांश वेळा ही धोरणे कागदावरच असतात. मात्र योग्य संधी घेतल्यास त्याचा परिणामकारक वापर होऊ शकतो. पक्षा-पक्षांमधील हेवेदावे व एकाच पक्षातील अंतर्गत सत्तासंघर्ष यांचाही विरोधकास कल्पकतेने वापर करता येतो.

**५) आर्थिक आधार :**

विरोधक आर्थिकदृष्ट्या सक्षम असेल आणि विरोधकाचे आर्थिक नुकसान आपणास करता येऊ शकत असेल व जाणवण्याएवढे आर्थिक नुकसान होणार असेल तर विजयाची शक्यता वाढते.

रत्नागिरी येथील एका आंबा प्रक्रिया उद्योगात चंद्रपूरमधील तरूण मुले, काम करीत असल्याचे समजले. येथील उत्पादन निर्यात केले जात होते. सुट्टीच्या काळात शाळा-महाविद्यालयातील तरूणांना कामासाठी येथे आणले जात असे. सुट्टी संपून एक महिना होऊन गेला तरी या तरूणांना कंपनीने मुक्त केले नाही. अठरा-अठरा तास ते त्यांच्याकडून काम करवून घेत. पाण्यात काम करून त्यांचे हातपाय अक्षरश: कुजले होते. पोलिसांच्या मदतीने कंपनीत धाड टाकून तरूणांना मुक्त केले. ही कंपनी परदेशात ज्या कंपनीला माल पुरवित होती त्या कंपनीला ही घटना कळविण्याची धमकी

आम्ही दिली. त्यामुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी कंपनीने या तरुणांनी केलेल्या प्रत्येक तासाचा हिशोब करून तात्काळ, मजुरी व त्यांचा येण्या-जाण्याचा खर्चही दिला.

**संघर्षातील पवित्रा :**

मुंगीसारखा नगण्य प्राणी कानात जाताच हत्तीही वेडापिसा होतो. संघटकालाही अशी स्थाने निवडावी लागतात, असा पवित्रा घ्यावा लागतो की ज्यामुळे विरोधकाच्या नेमक्या कमजोरीवर आघात करता येईल.

विरोधकाचे व आपले स्थान ओळखून संघटकास प्रश्नाची मांडणी व रणनीतीची आखणी करावी लागते. कमीत-कमी शक्ती वापरून जिंकता येईल असा पवित्रा संघटकाने निश्चित करणे फार महत्त्वाचे असते. तुलनेने विरोधकाचे सामर्थ्य अधिक असले तरीही योग्य पवित्रा घेतल्यास, स्थान निवडल्यास आणि कल्पकतेने आखणी केल्यास जिंकता येते.

आपला विरोधक कोणत्या स्थानावर आहे, आपण कोणत्या स्थानावर आहोत व संघर्षाच्या प्रक्रियेत ती स्थाने कशी बदलत राहतात यावर संघटकाला सातत्याने नजर ठेवावी लागते. संघटकाला गाफील राहता येत नाही. योग्य पवित्रा न घेतल्यास सहज जिंकता येणाऱ्या लढ्यातही हार पत्करावी लागते व योग्य स्थान निवडले तर अवघड लढाही सहज जिंकता येतो.

मध्य प्रदेशमध्ये सादिक व सीमा अगवान नावाचे मुस्लिम जोडपे आदिवासींना संघटित करण्याचा प्रयत्न करीत आहे. अतिशय समर्थपणे त्यांनी मध्य प्रदेशमध्ये आदिवासींची संघटना उभी केली आहे. त्या भागातल्या सत्ताधाऱ्यांना ही संघटना संपविणे आवश्यक वाटत होते. त्यासाठी त्यांनी त्यांच्या धर्माचा वापर केला. सादिक मुस्लिम आहे म्हणून तो पाकिस्तानच्या आय.एस.आय.चा हस्तक आहे, असा प्रचार वर्तमानपत्रांतून केला गेला. पोलिसांना बरोबर घेऊन त्याच्या ऑफिसवर आणि घरावर धाडी टाकून त्याचे ऑफिस व घर उद्‌ध्वस्त केले गेले. सरकार अशा सर्व पद्धतीने दडपशाही करीत होते. पोलीस अधीक्षक हे त्यात विशेष सक्रिय होते.

जिल्ह्यामध्येच अडकवून ठेवून सत्ताधाऱ्यांना उघडे पाडण्याची आवश्यकता होती. राजकीय सत्ताधाऱ्यांपासून पोलीस महासंचालकापर्यंत सर्वांविरोधात जेव्हा मानवी हक्क आयोगाकडे तक्रार केली, तेव्हा राज्यातले सर्व पोलीस प्रमुख या प्रकरणामध्ये अडकले गेले. त्यांना बचाव द्यावे लागले.

पोलीस अधिक्षक स्वत: जिल्ह्यामध्ये अडकून पडले. परंतु आम्ही मात्र भोपाळमधून या सर्वांना नाचविण्याचे काम आणि त्यांचे कारस्थान उघडे पाडण्याचे काम करीत राहिलो. आम्ही जर जिल्ह्याच्या ठिकाणीच राहून हा विरोध केला असता तर तोंड देणे मुश्कील झाले असते. जिल्ह्यातून होत असलेला विरोध राज्याच्या ठिकाणाहून मोडून काढताना आम्ही विरोधकापेक्षा वरचा पवित्रा घेतला.

योग्य रणनीतीच्या व डावपेचाच्या आधारावर संघटकास आपले सामर्थ्य वाढवीत न्यावे लागते. सुरुवातीची 'हार-हार' ही स्थिती कल्पक रणनीती व संघर्षाच्या आधारे 'हार-जिती' कडे व तेथून 'जीत-जीत' स्थितीकडे संघटकास न्यायची असते. संघर्षात सर्व प्रयत्न करूनही जर 'हार-हार' अशीच स्थिती राहिली तर सन्मानाने माघार कशी घेता येईल याचा विचारही संघटकाला करावा लागतो. अशी माघार घेत असताना लोकांचा आत्मविश्वास कमी होणार नाही याचीही काळजी संघटकास घ्यावी लागते.

**लढा केव्हा पुकारावा ?**

लढ्याचा अंतिम उद्देश वाटाघाटींसाठी विरोधकाला समपातळीत आणणे असल्याने तसा तो समपातळीवर असेल व वाटाघाटीस तयार असेल तर लढा पुकारण्याची आवश्यकता नसते. मात्र तशी परिस्थिती नसेल तर सामर्थ्य मिळविण्यासाठी लढावेच लागते. 'शक्य तेथे सहकार्य व आवश्यक असेल तरच संघर्ष', हा महात्माजींचा संदेश होता.

लढा पुकारताना विरोधक गाफील असेल अशी वेळ निवडणे उत्तम असते. विरोधक प्रतिकाराच्या तयारीत अथवा सावध असेल तर आपले अधिक बळ खर्ची पडते. पूर्ण तयारी आणि सामर्थ्य सोबत घेऊन, योग्य रणनीतीचा आधार घेऊन, विविध डावपेच वापरीत संघर्षाची सुरुवात करता येते. उपलब्ध विविध पर्यायांचा विचार करून आपल्या लोकांसाठी सुलभ पर्याय स्वीकारावा लागतो.

विरोधकाची सर्वात मोठी कमजोरी हेरून त्यावर आघात करणे जिंकण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. आपण कमजोर असताना, आपली तयारी नसताना विरोधकाने लढा लादला तर तो आपण जिंकण्याच्या स्थितीत येईपर्यंत कसा टाळता येईल याचाही विचार संघटकाला करावा लागतो.

वाटाघाटीसाठी विरोधकाच्या समपातळीत आल्यावर योग्य वाटाघाटी करून लढा संपवावा. लढ्यामधील प्रत्येक पायरीवर मिळालेले यश विविध मार्गाने साजरे करणे आवश्यक असते. लढ्यातील यश लोकांसोबत साजरे करून लढ्यात ज्यांनी ज्यांनी सहयोग दिला त्यांना श्रेयाचे वाटेकरी केल्याने संघटना बांधणीला बळकटी येते. काही लढ्यात जिंकता आले नाही तरीही संघटनेने काही ना काही मिळविलेले असतेच, ते काय हे लोकांना सांगता यायला हवे, त्याचाही आनंद साजरा करणे महत्त्वाचे ठरते.

*******

# संघर्षाचे डावपेच

संघटनेच्या प्रक्रियेत अनेक संघर्षांना सामोरे जावे लागते. संघर्षाच्या रणनीतीमध्ये छोटेछोटे लढे लढावे लागतात. विविध डावपेचांचा वापर केल्यास लढ्यांना धार येते व विरोधक कमजोर होतो. डावपेचाची आखणी करताना संघटकाला विविध प्रकारची माहिती असावी लागते. लोकशाही राज्यव्यवस्था, विधिमंडळ, मंत्रिमंडळ, प्रशासकीय यंत्रणा, विविध न्यायालये, आयोग, राज्यघटनेतील तरतुदी, न्यायालयाचे निवाडे, प्रशासन व मंत्रिमंडळ यांचे परस्पर संबंध, व्यवस्थेने निर्माण केलेले उत्तरदायित्व यांच्या सखोल माहितीवर आधारित लढ्याची आखणी अहिंसक संघर्षात करावी लागते. डावपेच लढ्यात नाट्य निर्माण करतात. सहभागी होणाऱ्या लोकांना लढतानाही आनंद मिळावा यासाठी अत्यंत कल्पकतेने लढ्याचे डावपेच आखल्यास लढा जिंकणे सोपे होते.

**प्रतीकांचे महत्त्व :**

अहिंसक संघर्षात लढ्याची जागा, वेळ, दिवस यांना फार महत्व असते. गाणी, घोषणा आणि प्रतीके लढ्याला विजयाकडे नेतात. काही विशिष्ट दिवसांना खूप महत्त्व असते. स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताकदिन, क्रांतीदिन या दिवशी केलेली कृती लढ्याला बळकटी देते. सरकारवर दबाव टाकणे सोपे जाते. स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास, स्वातंत्र्य लढ्याच्या प्रेरणा यातून लोकशिक्षणही होते.

स्वातंत्र्याच्या ५० वर्षांनंतरही पालघर तालुक्यातील बहिरीपोंडा या आदिवासी गावात रस्ता नव्हता. मुख्य रस्त्यापासून त्यांना १८ कि.मी. चालत जावे लागे. दीर्घकाळ पत्रव्यवहार करूनही वनखाते रस्त्यास परवानगी देत नव्हते. प्रजासत्ताकदिनी संघटनेचे शेकडो लोक त्या गावी सकाळी झेंडावंदनासाठी जमा झाले. मोठ्या संख्येने पोलीस व वनखात्याचे कर्मचारीही हजर होते. सन्मानाने जगण्याचा आमचा अधिकार वनखाते

काढून घेत आहे, अशी भूमिका घेऊन आम्ही नारळ फोडला. नारळ फोडताच कुऱ्हाडी घेऊन आलेल्या शेकडो आदिवासींनी झाडे तोडण्यास सुरुवात केली. पोलीस आणि वनखात्याचे कर्मचारी बघ्याच्या भूमिकेशिवाय काहीच करू शकले नाहीत. रस्त्याच्या आड येणारी झाडे संघटनेने सरकारी अधिकाऱ्यांसमोर तोडून टाकली. वनखाते वाटाघाटीला तयार झाले व कालांतराने रस्ताही तयार झाला.

**राष्ट्रीय प्रतीके :**

स्वातंत्र्यलढ्यातून अनेक प्रतीके नागरिकांना उपलब्ध झाली आहेत. तिरंगा हे स्वातंत्र्यलढ्याचे आकर्षक प्रतीक आहे. प्रतीकांचा योग्य वापर संघटकाला करता आला पाहिजे. शंकर पवारच्या प्रकरणात प्रजासत्ताकदिनी तिरंग्याने तोंड बांधून आंदोलन करण्याच्या कृतीने लढ्यास धार आली होती.

**घोषणांचे महत्त्व :**

संघटना बांधणीत, संघर्षाच्या प्रक्रियेत उत्तम घोषणा अत्यंत प्रभावी ठरतात. आपल्या भावना मोजक्या शब्दात मांडणाऱ्या योग्य ताल व लयीतल्या घोषणा प्रभावी ठरतात. अशा घोषणा लोकांचा आत्मविश्वास वाढवितात, लोकांच्या मनातील भीती दूर करतात. अनेक लढ्यांमध्ये घोषणा निर्माण होतात. लोकांना उत्तेजन दिल्यास लोक स्वत:हून घोषणा तयार करतात.

'देश की जनता भूखी है, ये आजादी झूठी है', ही घोषणा नवनिर्माणाच्या आंदोलनात प्रभावीपणे वापरली गेली. 'कमानेवाला खायेगा, लूटनेवाला जायेगा, नया जमाना आयेगा'. 'आमचा लढा न्यायासाठी, माणूस म्हणून जगण्यासाठी' ही घोषणा श्रमजीवी संघटनेचा उद्देश स्पष्ट करते. संघटना स्वाभिमान जागृत करते. आदिवासी, गरीब, दलित, कष्टकऱ्यांच्या वाट्याला जनावराचे जीवन, स्वप्नहीन जगणे आलेले आपणास जाणवते. त्यांना सन्मान, प्रतिष्ठा यापासून समाजाने कोसभर दूर ठेवले आहे. पदोपदीचा अपमान त्यांना अस्वस्थ करीत असतो. या अस्वस्थतेला संघटना वाट करून देत असते. आम्हीही माणसे आहोत व आम्ही भीक न मागता आमच्या हक्क प्राप्तीसाठी लढायला तयार आहोत ही स्वाभिमानाची व त्यासाठीच्या समर्पणाची भावना, घोषणांमधून अत्यंत स्पष्टपणे व्यक्त होते. लोकांच्या मनातली चीड घोषणांतून प्रभावीपणे व्यक्त करता येते. 'आदिवासी कष्टकरी ढोर नाय, मानूस हाय, मानूसकीची भीक नको, हक्क हवा, हक्क हवा.' संघटनेची ही घोषणा व तिचा ताल सभासदांच्या लहान मुलांच्या तोंडीही सदैव असतो.

'दलितों पे अन्याय रहेगा, धरती पे तुफान रहेगा' या घोषणेने बळ मिळते. श्रमजीवी महिलांनी आपल्या हक्कासाठी तयार केलेली ही घोषणा अशीच प्रभावी आहे, 'आम्ही बाया मानूस हाव, अन्याय झाला तर इंगोल (निखारा) हाव!'

घोषणांद्वारे विरोधकाला आव्हान देता येते. विरोधकाबाबतची असलेली भीती घोषणेद्वारे लोकांच्या मनातून काढता येते. 'तुझ्या खाकी वर्दीचा उपयोग काय? आमची संघटना जोरात हाय. तुझ्या लाठीकाठीचा उपयोग काय? आमची संघटना जोरात हाय.' किंवा 'लाठी गोली खायेंगे, फिर भी आगे जायेंगे.'

ध्येयाप्रती समर्पण वृत्ती व्यक्त करण्यासाठी घोषणा फार प्रभावी साधन आहे. वेठबिगार मुक्त होत असताना मालकांनी बहिष्कार टाकून मजुरांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला असता त्याला उत्तर म्हणून घोषणा तयार झाली, 'कवला खांव, कडू कांद खांव, पण मालकाचे पाय धरणार नाय!'

**संघर्षात गीताचे स्थान :**

घोषणांइतकेच संघटना बांधणीच्या प्रक्रियेत गीतांचे स्थान आहे. घोषणांप्रमाणेच गाण्यांतून भावना व्यक्त करता येतात. आदिवासी, दलित, गरीब समाजाला गाणी व नृत्यातून प्रचंड मानसिक आनंद मिळतो. गाणी व नृत्य हा त्यांच्या संस्कृतीचा अविभाज्य घटक असतो. या गाणी व नृत्याचा वापर संघटना बांधणीसाठी व संघर्षात, संघटकाला कौशल्याने करून घेता येतो. विविध प्रश्नांवर लोक त्यांना आवडणाऱ्या चालींवर गाणी लिहितात. संघटकाने त्यासाठी असे लोक हेरून त्यांना उत्तेजन दिले पाहिजे. सुरुवातीच्या काळात, संघटनेच्या प्रशिक्षण शिबिरात कार्यकर्त्यांचे गट करून गाणी रचण्याच्या स्पर्धा घेतल्याने कित्येक प्रेरक व सुंदर गाणी तयार झाली. श्रमजीवी संघटनेचा कार्यकर्ता एकनाथ पाटील याने लिहिलेले वेठबिगार प्रथेचे वर्णन करणारे हे गाणे हिंदी सिनेमातील 'सुन सायबा सुन' या गाण्याच्या चालीवर लिहिलेले आहे,

सून बोले सून, पाटलाची सून
बसलास का अजून? घे शेण भरून।।
कधी ते देतात चाय, न्याहरीचा पत्त्याच नाय
मग दुपारचे ते जेवण, वेलेवर मिळणार काय?
असा पाटील हाय रं, ईचार त्याला नाय रं
आणली मी गाय, म्हणे चेप माझं पाय रं
चेपताना पाय माझं, तेल लाव वरून।।

वेठबिगार मुक्तीच्या वेळी गावागावात वस्तीला राहावे लागे. एका घरात असाच एकदा वस्तीला असताना एका छोट्या मुलीचे गाणे कानी आले. सात-आठ वर्षांची ती छोटी मुलगी आपल्या लहान भावाला पाळण्यात झोके देत असताना गाणे म्हणत होती –

चला उठा पळवू या गुंडगिरीला, या मालकशाहीला,
या गुंडांची झुंड लोटू खोल दरीला।

संघटनेचे हे लोकप्रिय गाणे त्या छोटीच्या तोंडून मी ऐकत होतो. आजही ते दृश्य माझ्या डोळ्यांसमोर तरळल्यावर रोमांच उभे राहतात.

आपल्या व्यथा, दु:ख व्यक्त करणारी अशी किती तरी गाणी आंदोलनात तयार होत असतात. विजयोत्सवाच्या वेळीही गाणी फार महत्त्वाची भूमिका बजावतात. 'तुमच्या तरुणांच्या तोंडी कोणती गाणी आहेत ते सांगा, मी तुमच्या देशाचे भविष्य सांगतो' असे लेनिनने म्हटले होते.

**डावपेचांची आखणी :**

कल्पकतेने नवनवे डावपेच टाकल्यास लढ्याची धार वाढत जाते. विरोधकाला गोंधळवून टाकता येते, नामोहरम करता येते. डावपेच आखताना काही मुद्दे आपणास लक्षात घ्यावे लागतात.

**१) संभ्रम :**

आपल्या डावपेचांनी आपण विरोधकाला संभ्रमात टाकून नामोहरम करू शकतो. दहा हजारांपेक्षा जास्त आदिवासींची जातीचा दाखला मिळविण्याची प्रकरणे ठाणे जिल्ह्यात प्रलंबित होती. अर्ज, निवेदने, भेटी, चर्चा यातून काहीही निष्पन्न होत नव्हते. प्रजासत्ताकदिनाच्या दिवशी जिल्हाधिकाऱ्यांना आदिवासींच्या पारंपरिक नृत्याचा कार्यक्रम करावयाचा होता. संघटनेने त्यांना कळविले की, आम्ही कार्यक्रमाची व्यवस्था करू, फक्त आमच्या राहण्या-जेवणाची व्यवस्था करावी. संघटनेने पाच हजारांपेक्षा जास्त लोक पंचवीस तारखेला संध्याकाळीच ठाण्याला नेले. एवढे लोक पाहून जिल्हाधिकारी संभ्रमात पडले. प्रजासत्ताकदिनाच्या पहाटेच ते पाच हजार लोक जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ पोहोचले, तेव्हा संपूर्ण ठाणे शहर थक्क झाले.

आम्ही आदिवासी आहोत याचे पुरावे घेऊन ते आले होते. सर्व पुरुष फक्त लंगोटी लावून तर महिला आदिवासींचा पारंपरिक पेहराव करून आल्या होत्या. त्यांच्या डोक्यावर आदिवासींचे देव होते. मिरवणुकीत सर्वजण

आदिवासींची गाणी म्हणत नृत्य करीत होते. जिल्हाधिकाऱ्यांनी तत्काळ, ठराविक कालमर्यादेत आदिवासींचे दाखले देण्याचे आदेश दिले.

## २) विरोधकाची टर उडविणे :

विरोधकाची टर उडविल्याने तो नामोहरम होऊ शकतो. लोकांना रोजगार मिळावा म्हणून 'किसान रोपवाटिके' ची योजना होती. परंतु भ्रष्ट उपसंचालक, योजनेचा लाभ गरजू लोकांना न देता आपल्या मर्जीतील लोकांना देऊन योजनेचा बोजवारा उडवित होता. प्रजासत्ताकदिनाच्या पूर्वसंध्येला २५ जानेवारीला त्याच्या कार्यालयात जाऊन त्याची टर उडवायचे ठरले. मेलेले रोपटे त्याला भेट देऊन त्याच्या कर्मचाऱ्यांसमोर त्याचा सत्कार करून त्याचा भ्रष्टाचार उघड करण्याचा निर्णय घेतला. आम्ही त्याच्या कार्यालयात जाताच मागच्या दाराने तो पळून गेला. दुसऱ्या दिवशी झेंडावंदनासाठी त्याला यावेच लागणार होते, म्हणून आम्ही त्याच्या कार्यालयातच मुक्काम ठोकला. खिडक्या-दरवाजाच्या पडद्यांची अंथरुणे-पांघरुणे केली. झेंडावंदन झाल्यावर आम्ही त्याचा सर्वांसमक्ष सत्कार केला.

अशीच आणखी एक कथा वसई तालुक्यातील आंबोडे गावातल्या काही मुक्त वेठबिगारांची. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे वसईच्या तहसीलदारांवर त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी दडपण होते. पुनर्वसन म्हणून मुक्त वेठबिगारांना ट्रक हवा होता. तहसीलदारांना ते मान्य नव्हते. तहसीलदार त्यांच्या गावी गेले व त्यांच्या मालकाच्या घरी त्यांना बोलावून घेतले. त्यांना शेळ्या, बकऱ्या घेण्याचा आग्रह करू लागले. त्यांनी ट्रकची मागणी करताच तहसीलदार खवळले व त्यांना शिवीगाळ करू लागले. वेठबिगार तेथून निघून गेले व मला येऊन भेटले. मी संतापलो! काय व कसे करावे याचा विचार केला. मकरसंक्रांतीच्या दिवशी सकाळीच साडेतीन रुपयांचे तिळगूळ व एक रुपयाचा हार घेतला. तहसीलदार, कार्यालयात पोहोचण्यापूर्वीच आम्ही पोहोचलो. मला भेटण्यास ते उतावीळ झाले होते. त्यांनी मला त्यांच्या बाजूस बसविले. एका मुक्त वेठबिगाराने त्यांना हार घातला तर दुसऱ्याने तिळगूळ दिले. तहसीलदार भारावून गेले. त्यांनी भाषण ठोकले. "मला हे आधी ठाऊक असते तर मी माझ्या पत्नीलाही आणले असते" ते म्हणाले. मी त्यांच्या हाती एक पत्र दिले. ते पंतप्रधान राजीव गांधी यांना उद्देशून होते. 'शिवराळ तहसीलदारांना आम्ही तिळगूळ दिला आणि आमच्या तोंडावर तरी गोड बोला असे सांगितले आहे. पंतप्रधानांनी त्यांची राष्ट्रपती पदकासाठी

शिफारस करावी', अशी विनंतीवजा सूचना त्या पत्रात होती. पत्र वाचताच तहसीलदार घामाघूम झाले.

मुक्त वेठबिगारांसमोर जाऊन स्वतःच्या कानशिलावर मारून घेत ते सांगू लागले, ''शिव्या तुम्हाला नाही मला स्वतःला दिल्या होत्या.'' सहा वेळा तरी त्यांनी शिपायास चहा आणण्यास सांगितले. मुक्त वेठबिगारांची सोसायटी त्याच दिवशी रजिस्टर झाली व दुसऱ्या दिवशी रजेवर जाऊन नंतर त्यांनी स्वतःची बदली करवून घेतली. वेठबिगारांना ट्रक मिळाला.

**३) आनंद :**

लढताना आपल्या लोकांना आनंद मिळेल व विरोधकाची त्रेधातिरपीट उडेल अशी डावपेचांची आखणी करावी लागते. विटभट्टीवरील बालकामगारांच्या शिक्षणासाठी संघटनेने भोंगाशाळा सुरू केल्या होत्या. सरकारने वीटभट्टी मालकाकडून सहा महिन्यांसाठी तात्पुरत्या शाळा उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी ही संघटनेची मागणी होती. जिल्हाधिकाऱ्यांनी ती मान्यही केली. भिवंडी तालुक्यातील एका गावात मात्र मालकाचा विरोध होता. जिल्हा प्रशासन जागा उपलब्ध करून देऊ शकले नाही. वारंवार सांगूनही प्रशासन निष्क्रिय राहिले. जागतिक मानवी हक्क दिनाच्या दिवशी, १० डिसेंबरला लढा देऊन संघटनेने त्याच दिवशी संध्याकाळी शाळेला जागा मिळविली.

विटभट्टीवरील मुलांना व त्यांच्या पालकांना घेऊन संघटनेचे कार्यकर्ते थेट जिल्हाधिकारी कार्यालयातच घुसले. कार्यालयाच्या व्हरांड्यात मुलांना रांगेत बसवून शाळा सुरू केली. बोर्ड लावला: 'भोंगाशाळा' जागा 'जिल्हाधिकारी कार्यालय' पोलीस आले, निवासी उपजिल्हाधिकारी आले. आम्ही प्रार्थना सुरू केली. प्रार्थनेच्या वेळी सर्वांनी शांतता पाळावी असे आवाहन केले. त्यामुळे पोलीस व अधिकारी हतबल होताहेत हे लक्षात आल्याने प्रार्थनेमागून प्रार्थनागीते चालू ठेवली. तोवर खूप लोक जमा झाले. संघटनेने मागणी केली की, आम्हाला गावात शाळेसाठी जागा नको, एका बसची व्यवस्था करा, जिल्हाधिकारी कार्यालयातच आम्ही शाळा भरवू. या अभिनव लढ्याला पोलिसांचीही सहानुभूती मिळाली. लोक, पोलीस, जमलेला जमाव, जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी या सर्वांनी या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचा आनंद घेतला. सारे जिल्हाधिकारी कार्यालय कामाला लागले आणि संध्याकाळीच शाळेला जागा मिळाली.

लढताना आपल्या लोकांनी आनंद घेतल्याचे हे आणखी एक उदाहरण.

किमान वेतन मिळविण्यासाठी झालेल्या एका लढ्यात मालक न्यायालयाचाच आग्रह धरीत होता. या कारखान्यात निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूंचे उत्पादन होत होते. दीर्घकाळ चाललेल्या वाटाघाटीनंतर मालक किमान वेतनास तयार झाला परंतु त्याने कामगारांना गणवेश देण्यास ठाम नकार दिला. कामगारही गणवेश मिळाला पाहिजे म्हणून आग्रही होते.

त्या दिवशी आंतरराष्ट्रीय प्रमाणीकरणासाठी प्रतिनिधी मंडळ कारखान्यात आले होते. मालकाला गणवेश देणे परवडत नाही तसेच कामगारांनाही गणवेश स्वत: घेणे परवडत नाही त्यामुळे कपडे घातलेच पाहिजेत असे नाही, असा निर्णय घेऊन सर्व कामगार अंडरवेअरवर काम करू लागले. मालकाने पोलिसांना बोलाविले. कामगारांनी काय गुन्हा केला, असा सवाल पोलिसांनी केल्यावर ते निरूत्तर झाले. हात जोडून मालकाने कामगारांना कपडे घालण्याची विनंती केली व गणवेश देण्याचे मान्य केले.

### ४) **इशारा** :

अनेकदा विरोधकाला दिलेला इशारा किंवा धमकी प्रत्यक्ष कृतीपेक्षा प्रभावी ठरते. मात्र दिलेला इशारा प्रत्यक्षात आणण्याची संघटनेची क्षमता आहे यावर विरोधकाचा विश्वास असावा लागतो. आपले सामर्थ्य किती आहे, हे आपल्या खऱ्या सामर्थ्यावर अवलंबून नसते. ते विरोधकाला किती वाटते यावर अवलंबून असते. त्यामुळे संघटनेची संख्येची ताकद नसेल परंतु विरोधकाला तशी ताकद आहे असे वाटत असेल तर संख्येची ताकद न दाखविणे चांगले. ती केवळ ऐकवावी, दाखविल्यास तशी ताकद नाही हे विरोधकाला कळते.

एका मान्यवर नेत्याने राज्यभर प्रत्येक तालुक्यात आंदोलन करण्याचा इशारा दिला. सरकार त्या नेत्याला भीत होते. या इशाऱ्यानंतर सरकार वाटाघाटीस तयार झाले. परंतु वाटाघाटी न करता त्या नेत्याने इशारा अमलात आणला. केवळ काही निवडक ठिकाणी आंदोलन झाले. त्यामुळे त्या नेत्याची खरी ताकद सरकारला कळली. त्यानंतर सरकार त्या नेत्याच्या इशाऱ्यांना बधेनासे झाले.

### ५) **हवे ते न मागणे** :

काहीवेळा आपणास जे हवे आहे ते न मागता दुसरेच मागितले म्हणजे हवे ते मिळविता येते. संघटनेच्या विरोधात विरोधकांनी एकत्र येऊन मोर्चा काढायचे ठरविले.

विरोधकांचा तो मोर्चा निघू नये, अशी संघटनेची इच्छा होती. त्या मोर्चावर पोलिसांनी बंदी आणावी असे संघटनेचे मागणे होते. परंतु ते तसे न मागता त्यांच्या मोर्चाच्या दिवशीच, त्याच ठिकाणाहून, त्याच वेळी संघटनेचा मोर्चा निघत असल्याचे पत्र संघटनेने पोलिसांना दिले. संघटनेने मोर्चा काढू नये म्हणून पोलिसांनी प्रयत्न केले. परंतु संघटना ठाम राहिली. त्याचा अपेक्षित परिणाम झाला. अखेर पोलिसांनी बंदीहुकूम जारी केला. विरोधकांनी मोर्चा काढल्यावर पोलिसांनी कडक कारवाई करावी तरच संघटना मोर्चा काढणार नाही, अशा वाटाघाटी पोलिसांसोबत झाल्या. संघटनेने मोर्चा न काढण्याचे ठरविले कारण संघटनेला मोर्चा काढायचाच नव्हता. परंतु आपण मोर्चा काढणारच असे संघटना सांगत राहिली. विरोधकांनी बंदीहुकूम मोडून मोर्चा काढला. पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे संघटनेविरोधात पुन्हा कधीही मोर्चा काढण्याचा विरोधकांनी विचार केला नाही.

## ६) **इशारा प्रत्यक्षात आणणे** :

इशारा दिल्यानंतर विरोधक बधला नाही तर इशारा प्रत्यक्षात आणावाच लागतो. तसा जर तो अमलात आणला नाही, तर नंतर दिलेल्या इशाऱ्यांना विरोधक कधीही जुमानत नाही. गुरुदेव सिद्धपीठ आश्रमाच्या लढ्यात कामगारांना किमान वेतन देण्यास आश्रम तयार नव्हता. गुरुपौर्णिमेच्या दिवशी आश्रमात मुंबईचे शेकडो लोक येत. तो त्यांच्या प्रतिष्ठेचा दिवस असे. त्यादिवशी 'रास्ता रोको' करून आश्रमाची कोंडी करण्याचा इशारा संघटनेने दिला. आश्रमाने पोलिसांवर राजकीय दबाव आणला. पोलीस अधीक्षक स्वत: बंदीहुकूम घेऊन संघटनेच्या कार्यालयात आले व संघटनेने रास्ता रोको आंदोलन करू नये अशी सूचना त्यांनी केली. संघटनेने ती मान्य केली नाही. संघटनेने रास्ता रोको केल्यास गोळीबार करण्याची धमकी पोलीस अधिक्षकांनी दिली. शेकडो कार्यकर्ते बंदीहुकूम नसलेल्या कार्यक्षेत्रात आदल्या दिवशी जमा झाले. रात्रभर आंदोलनाची तालीम केली गेली. गुरुपौर्णिमेच्या दिवशी सकाळीच हात मागे बांधून कार्यकर्ते रस्त्यावर उतरले व वाहतूक बंद केली. सशस्त्र पोलीस मोठ्या संख्येने समोर होते. गोळीबार काय, लाठ्या उभारायचीही पोलिसांची हिम्मत झाली नाही. पोलीस अधिक्षकांशी चर्चा करण्यासही संघटनेने नकार दिला. 'हिंमत असेल तर गोळीबार करा, आमचे हातही बांधलेले आहेत, गोळ्या झेलण्यास छाती तयार आहे' असे त्यांना सांगितले. पोलीस अधिक्षक रडकुंडीला आले. अखेर जिल्हाधिकारी स्वत: जागेवर आले. पोलीस

अधिक्षकांनी ध्वनिक्षेपकावरून सर्वांची जाहीर माफी मागितली तेव्हा रस्ता खुला झाला. आश्रमात जाण्यासाठी आलेले लोक केव्हाच परत घरी गेले होते.

### ७) विरोधकाच्या साधनांचा वापर :

विरोधकाच्या साधनांचा वापर करून त्याच्या विरोधात लढता येते. गणेशपुरीच्या नित्यानंद बाबांच्या मंदिरात कामगारांना किमान वेतन दिले जात नव्हते. व्यवस्थापन कामगारांच्या विरोधात कामगार न्यायालयात गेले होते व वेळकाढूपणा करीत होते. एका उत्सवाच्या दिवशी संघटनेचे शेकडो लोक मंदिरात जमा झाले. उत्सवासाठी व्यवस्थापनाने मोठा मंडप घातला होता. भजनासाठी ध्वनिक्षेपक लावला होता. वाद्यसाहित्य तयार होते. येणाऱ्या सर्व भाविकांना जेवण दिले जाणार होते. संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मंडपाचा कब्जा घेतला. वाद्ये आपल्या ताब्यात घेतली व भजने म्हणण्यास सुरुवात केली. भजन संपल्यावर एक-एक कामगार व्यवस्थापनाकडून होणारा त्रास व्यक्त करून या त्रासातून सुटका करण्याची सद्बुद्धी विश्वस्तांना मिळावी, अशी नित्यानंद बाबांकडे प्रार्थना करीत होता. दिवसभर हा कार्यक्रम सुरू राहिला. व्यवस्थापनाने बनविलेल्या भोजनावर आंदोलकांनी ताव मारला. व्यवस्थापन झुकले.

### ८) विरोधकाला एकटे पाडणे :

विरोधकाला एकटे पाडल्यास लढा जिंकणे सोपे जाते. गणेशपुरी येथील गुरुदेव सिद्धपीठ आश्रमाच्या लढ्यादरम्यान स्वातंत्र्यदिनाची मिरवणूक आश्रमासमोरून जात होती. घोषणांचा आवाज दडपून टाकण्यासाठी आश्रमाने अनेक ध्वनिक्षेपक लावले होते. कानठळ्या बसविणाऱ्या आवाजात भजने सुरू होती. पोलिसांची साथ संघटनेला मिळावी, पोलिसांनी आश्रमाच्या विरोधात भूमिका घ्यावी व ध्वनिक्षेपक बंद करण्यास आश्रमाला भाग पाडावे म्हणून संघटनेने डावपेच टाकला.

आश्रमाविरोधातल्या घोषणा बंद करून भारतमातेच्या, भगतसिंग, महात्मा गांधींच्या जयजयकाराच्या घोषणा सुरू केल्या. राष्ट्रीय गीते सुरू केली व ध्वनिक्षेपकाच्या अडथळ्यामुळे राष्ट्राचा अपमान होतो अशी भूमिका घेतली. पोलिसांनी आश्रमाला ध्वनिक्षेपक बंद करण्याची सूचना केली. ती आश्रमाने मानली नाही. आश्रमाने पोलिसांचा अपमान केल्याच्या निषेधार्थ कार्यकर्त्यांनी रस्त्यावरच बैठक मारली. आश्रमाने ध्वनिक्षेपक बंद करून पोलिसांची माफी मागितलीच पाहिजे असा आग्रह धरला. आश्रमाने माफी

मागितल्यानंतरच मिरवणूक पुढे निघाली.

## ९) धक्कातंत्र :

धक्कातंत्राचा वापर करून विरोधकावर दबाव आणता येतो. विरोधक बेसावध असताना अचानक त्यास धक्का देऊन तेवढ्याच त्वरेने निघून जाता येते. वज्रेश्वरी मंदिरातील एक विश्वस्त कॉलेजमध्ये प्राचार्य होते. मंदिराच्या जमीन विक्रीतील भ्रष्टाचाराचे व कामगारविरोधी भूमिकेचे तेच खरे सूत्रधार होते. एकदा तहसील कार्यालयावरील आंदोलन आटोपून, काही कार्यकर्त्यांना घेऊन आम्ही कॉलेजमध्ये घुसलो. प्राचार्यांच्या विरोधात घोषणा देताच मुलांसह इतर प्राध्यापक बाहेर आले. प्राचार्यांनी बोलाविलेले पोलीस येण्यापूर्वीच आम्ही निघूनही गेलो होतो. प्राचार्यांनी नंतर कधीच कामगारांच्या विरोधी भूमिका घेतली नाही.

## १०) विरोधकाला चिथावणी :

काही वेळा आपल्या कृतीपेक्षा विरोधकाने केलेली चूक आपले सामर्थ्य बनते. तशी चूक त्याने करावी यासाठी विरोधकाला चिथावणी देता येते. या चिथावणीला विरोधक बळी पडल्यास त्या चुकीचा फायदा घेऊन विरोधकावर चाल करता येते.

गुरुदेव सिद्धपीठ आश्रमाचा लढा दीर्घकाळ चालूनही व्यवस्थापन कामगारांना किमान वेतन देण्यास तयार होत नव्हते. त्यांना झुकविण्यासाठी बेमुदत उपोषण करण्याचा निर्णय झाला. विद्युल्लता संघटनेची अध्यक्ष होती. ती, निवृत्त तहसीलदार रा. वि. भुस्कुटे व आश्रमातील तीन कामगार असे पाच जण उपोषणास बसले. उपोषणाच्या पाचव्या दिवसापर्यंतही व्यवस्थापन चर्चेस तयार झाले नाही. जिल्हा प्रशासन पूर्णपणे कामगारांच्या बाजूने असूनही व्यवस्थापन जिल्हा प्रशासनाचे न ऐकता त्यांचा अपमान करीत होते. तेव्हा जिल्हा प्रशासनाला विश्वासात घेऊन व्यवस्थापनाला चिथावणी देण्याचे ठरविले.

गावोगावी निरोप पाठवून लोकांना भल्या पहाटेच आश्रमाच्या ठिकाणी बोलाविले. आश्रमाला १२ प्रवेशद्वारे होती. समाधीच्या दर्शनाचे निमित्त करून प्रत्येक प्रवेशद्वारावर संघटनेचे लोक उभे राहिले. व्यवस्थापनाने त्यांना आत घेण्यास मनाई केली. परंतु यामुळे संघटनेला जे हवे होते ते मिळाले. आश्रमाचे सर्व दरवाजे बंद झाले. पुढे काय होणार आहे याची पूर्वकल्पना असूनही जिवाची जोखीम उचलून मुख्य प्रवेशद्वारापाशी माधवी चावला, संगीता

कोपर्डे, मंदा खिराडे, पार्वती पवार, शेवंती पासारी, वेणू मेघवाले, सरस्वती बेंदर, भीमाबाई मुकणे आदी महिला उभ्या राहिल्या.

दुपारी सव्वादोनच्या सुमारास मुख्य प्रवेशद्वाराजवळ मी जाऊन उभा राहिलो व गाणी घेऊ लागलो. विखुरलेले लोक माझ्याभोवती जमा झाले. जवळ असलेले पोलीस त्यामुळे दूर गेले. गाणी म्हणण्यासाठी मला बाकड्यावर उभे राहायचे आहे, असे सांगून पोलीस ज्या बाकड्यावर बसले होते ते बाकडे मुख्य प्रवेशद्वाराजवळ आणले. मी त्यावर उभा राहून गाणी घेऊ लागलो व माझ्या बाजूला या महिलांना उभे केले. दोन चाळीसच्या सुमारास ठरल्याप्रमाणे मी तीन घोषणा देताच या महिलांनी मुख्य प्रवेशद्वारावर चढून आश्रमात उड्या मारल्या.

आश्रमातील भगव्या कपड्यातील साधूंनी या महिलांना मारहाण करण्यास सुरुवात केली. महिलांना मारहाण होत आहे हे पाहून संघटनेच्या सभासदांचा संताप अनावर झाला. त्यांना काबूत ठेवणे फार अवघड होते. उपोषणाला बसलेले विद्युल्लता, भुस्कुटे व प्रभुसर जमावाला काबूत ठेवण्यासाठी प्रयत्न करीत होते. प्रांत अधिकारी अजयभूषण पांडे जिवावर उदार होऊन आश्रमाचे छोटे लाकडी दार तोडून आत घुसले. त्यांनाही साधूंनी मारहाण करण्यास सुरुवात केली. महिलांचा मार वाचविण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला.

ठीक दोन पंचेचाळीस वाजता जिल्हाधिकारी भास्करराव पाटील तेथे पोहोचले. त्यांनी त्वरित मारहाण करणाऱ्या त्या सर्व साधूंना अटक करण्याचे आदेश पोलिसांना दिले. व्यवस्थापनास बोलावून किमान वेतन दिले नाही तर बंदोबस्ताचे सर्व पोलीस काढून घेतले जातील, त्यानंतर संघटना व आश्रमाने काय करायचे ते पाहून घ्यावे अशी भूमिका त्यांनी घेतली. त्यामुळे व्यवस्थापनाला त्याच ठिकाणी किमान वेतन देण्याचे कबूल करावे लागले.

## ११) कायदा न मोडता कायदेभंग :

अनेकदा कायद्याच्या चौकटीत राहून कायदा मोडून विरोधकाला जेरीस आणता येते. गुरुदेव सिद्धपीठ आश्रमाच्या दीर्घकाळ चाललेल्या लढ्यात अशा अनेक डावपेचांनी श्रमजीवी संघटनेने आश्रमाला जेरीस आणले. आश्रमाच्या उत्सवाच्या वेळी शेकडो लोक आश्रमाविरोधी घोषणा देण्यासाठी जमले होते. पोलिसांनी बंदीहुकूम आणला होता. घोषणा द्यायच्याच परंतु अटकही होऊ द्यायची नाही असा डावपेच संघटनेने टाकला. बंदी हुकुमानुसार पाच किंवा

पाचपेक्षा अधिक लोकांनी एकत्र येऊन घोषणा देणे हा गुन्हा ठरणार होता. म्हणून संघटनेचे कार्यकर्ते चार-चारच्या गटात उभे राहिले. एकामागून दुसऱ्या गटाने घोषणा देण्यास सुरुवात केली. दिवसभर घोषणा सुरू राहिल्या आणि बंदीहुकूम असूनही पोलीस काहीच करू शकले नाहीत.

कायद्यातल्या पळवाटा शोधून काढून अगर संदिग्धता असल्यास कायद्याचा आपल्याला हवा तसा अर्थ लावून, कल्पकता वापरून असे अनेक डावपेच संघटकाला वापरता येतात व विरोधकाला जेरीस आणता येते.

*******

# वाटाघाटी

संघर्षाचा अंतिम उद्देश वाटाघाटी असल्यामुळे वाटाघाटीसाठी पूर्वतयारी व योग्य वातावरणनिर्मिती महत्त्वाची असते. वाटाघाटी यशस्वी होण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतात. संघर्षातील रणनीतीला आणि डावपेचांना जितके महत्त्व आहे तितकेच किंबहुना त्याहूनही अधिक महत्त्व यशस्वी वाटाघाटींना आहे. अन्यथा 'युद्धात जिंकले, तहात हरले' अशी परिस्थिती ओढवू शकते.

**वाटाघाटीची पूर्वतयारी** :

वाटाघाटी यशस्वी होण्यासाठी प्रश्नांची, तसेच ज्यांच्याबरोबर वाटाघाटी करावयाच्या आहेत त्यांची चौफेर माहिती, विषयाचे ज्ञान, पर्यायांचा विचार व संवादाचे कौशल्य आवश्यक ठरते.

आपले व विरोधकाचे सामर्थ्य व कमजोरी, त्यावरून आपण जोखलेले आपले व विरोधकाचे स्थान याच्या विश्लेषणाचा, वाटाघाटींसाठी पूर्वतयारी करताना व प्रत्यक्ष वाटाघाटींच्या वेळेसही उपयोग होतो. विरोधकापैकी  निर्णय घेण्याची खरी क्षमता कोणामध्ये आहे ? विरोधकांतील अंतर्गत संघर्ष, अशा विरोधकाबाबत आपण मिळविलेल्या माहितीचा योग्य वापर संघटकाला वाटाघाटीच्या वेळी करता येतो.

आपले मित्र अगर सहानुभूतीदार वाटाघाटीच्या वेळी कसे उपयोगी पडतील, वाटाघाटीच्या वेळी कोंडी निर्माण झाल्यास ती कोंडी फोडण्यास कसे सहाय्यभूत ठरतील याचा विचार संघटकासाठी आवश्यक असतो.

प्रश्नाच्या सोडवणुकीसाठीचा आपला दावा मान्य करून घेण्यासाठीचे सामर्थ्य व त्याच्या बळकटीकरणासाठी लागणारी सर्व कागदपत्रे संघटकाच्या हाती तयार असावी लागतात. आपला युक्तिवाद अत्यंत प्रभावी व टोकदार असावा लागतो.

वाटाघाटीची पूर्वतयारी करताना शक्यतो दोन्ही बाजूंचा विचार करावा. आपल्या दाव्याला विरोधकाचा प्रतिदावा कोणता असेल ? तो आपण कसा खोडून काढणार आहोत ? याची संघटकाने तयारी करावी लागते. आपल्यातीलच कोणालातरी विरोधकाची भूमिका वठविण्यास सांगून प्रत्यक्ष वाटाघाटी सुरू आहेत, असे समजून रंगीत तालीम केल्यास त्याचा उपयोग होऊ शकतो.

वाटाघाटीत एकापेक्षा अधिक लोक सहभागी होणार असतील तर कुणी काय मांडावे हे आधी ठरवावे लागते. विरोधक चाणाक्ष असतो हे गृहीत धरावे. आपल्यावतीने बोलणाऱ्यांमध्ये एखादा कमजोर दुवा असल्यास विरोधक त्याचे लक्ष त्या कमजोर दुव्यासोबत वाटाघाटी करण्यावर केंद्रित करील.

ज्याच्यासोबत वाटाघाटी करीत आहोत ती व्यक्ती निर्णय घेण्यास समर्थ असल्याची खात्री करूनच वाटाघाटी कराव्यात. ज्यांच्यासोबत आपणास वाटाघाटी करावयाच्या आहेत त्याशिवाय इतर कुणाशीही वाटाघाटी करू नयेत.

वाटाघाटीच्या वेळी तडजोडीचे व बिनतडजोडीचे मुद्दे तयार असावेत. बिनतडजोडीच्या मुद्द्यांवर वाटाघाटी करता येत नाहीत.

**प्रत्यक्ष वाटाघाटी :**

आपणास मान्य नसलेला सत्याचा काही अंश आपल्या विरोधकाच्या मुद्द्यात असू शकतो यावर महात्मा गांधीजी ठाम होते. वाटाघाटी करतानाही आपल्या लक्षात न आलेला एखादा मुद्दा, सत्याचा अंश विरोधकाच्या म्हणण्यात असू शकतो हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. असा मुद्दा समोर आल्यास तो स्वीकारणे महत्त्वाचे असते.

ज्यांचा प्रश्न आहे त्यांच्या प्रतिनिधींना सोबत घेऊनच वाटाघाटीस बसावे. तडजोड होत असताना बाधिताशिवाय तडजोड झाल्यास संघटकावरील विश्वासाला तडा जाण्याची शक्यता असते. काही वेळा प्रश्नाची दुसरी बाजू समोर येऊ शकते, त्यामुळे आपण आधी घेतलेला निर्णय बदलणे भाग असते. ही दुसरी बाजू बाधितासमोर उघड झाल्यास वाटाघाटीत अडथळा येत नाही.

वाटाघाटीस बसण्यापूर्वी आपण जिंकण्याइतके सामर्थ्यवान झालो आहोत, असा विश्वास असेल तरच बसावे किंवा आपण हरणारच असू तर कमीत कमी नुकसान कसे होईल याची तयारी करूनच वाटाघाटीस बसावे. वाटाघाटी म्हणजे देवाण-घेवाण असते. त्यामुळे वाटाघाटीच्या वेळी काहीशी लवचिकता असावी लागते. सरकारशी वाटाघाटी

करताना सरकारच्या प्रतिनिधीने सुचविलेल्या जागी व त्यांच्या वेळेनुसार जावे लागते. परंतु विरोधक खाजगी व्यक्ती असल्यास संघटकाने वाटाघाटीसाठी आपल्या सोयीची जागा व वेळ ठरविण्यासाठी आग्रही राहिल्यास व ते अमलात आणल्यास वाटाघाटींमध्ये संघटक वरचढ राहण्याची शक्यता वाढते.

आपणास मान्य असलेला मध्यस्थ विरोधकांनी स्वीकारल्यास मध्यस्थी स्वीकारण्यात धोका नसतो. वाटाघाटीसाठी खेळीमेळीचे वातावरण निर्माण करणे महत्वाचे असते म्हणून प्रत्यक्ष विषयाला हात घालण्यापूर्वी एखादी ताजी घटना अगर कोणतातरी हलकाफुलका विषय घेऊन वातावरणातील ताण कमी करावा. बैठक व्यवस्थेमध्ये आपले स्थान महत्त्वाचे राहील हे संघटकाने पहावे. आपल्यावतीने वाटाघाटी करणारा प्रमुख व विरोधकांचा प्रमुख आमनेसामने असावा.

शक्यतोवर विरोधक सुरुवात करील असे पाहावे. आपल्याला सुरुवात करावयाची असल्यास आपण ज्या मुद्यावर तडजोड करणार आहोत त्याने सुरुवात करावी. विरोधकाला देण्यासाठी आपल्याकडे काही नसल्यास काहीतरी निर्माण करावे व त्याचा आग्रह आपण धरत नसल्याचे दाखवावे. त्यामुळे विरोधकाला काहीतरी मिळविल्याचा आनंद मिळतो.

चर्चेच्या वेळी जे शब्द अगर संज्ञा आपण वा विरोधक वापरीत आहोत त्याचा दोघांनाही समान अर्थ अभिप्रेत आहे याची खात्री करून घ्यावी. आपली मूठ झाकली ठेवून विरोधकांची अधिकाधिक माहिती मिळवावी. काही वेळा विरोधकाला, त्याच्यावर आरोप करून चिथावणी देऊन माहिती काढून घ्यावी लागते. विरोधकाची एखादी कमजोरी हेरून त्याचा तोल ढळेल व चर्चेवर आपला वरचष्मा राहील असे संघटकाने पाहावे.

विरोधक मूळ मुद्द्याला बगल देऊन आपले लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करील याचे भान ठेवून संघटकाने मूळ मुद्द्याकडे यावे. वाटाघाटीसाठी वातावरण अनुकूल नसल्यास अगर आपली जीत होत नाही असे दिसल्यास काहीतरी कारण काढून वाटाघाटी पुढे ढकलाव्यात. वाटाघाटी फिस्कटल्या तरी संवाद तोडू नये.

सर्व प्रयत्नांनंतरही जर विरोधक ताठर भूमिका घेत असेल तर त्याला गंभीर इशारा देऊन त्याला मवाळ करता येईल. मात्र हा इशारा प्रत्यक्षात उतरविण्याची ताकद संघटनेमध्ये हवी व विरोधकास त्याची जाणीव हवी.

वाटाघाटीच्या वेळी मानवी दृष्टिकोन ठेवणे हिताचे ठरते. विरोधकाची प्रकृती ठीक नसल्यास त्याची दखल घ्यावी. त्याने काही चांगले केलेले असल्यास त्याचे कौतुक करावे.

विरोधकाने आपले एखादे म्हणणे चुकीचे दाखवून दिल्यास मोठ्या मनाने त्याचा स्वीकार करावा.

वाटाघाटी सुरू असताना प्रत्येक टप्प्यावर आणि वाटाघाटी संपल्यानंतर संघर्षात सामील असलेल्या सर्वांना त्याची तपशीलवार माहिती देत राहावी. आपण काय कमावले व काय गमावले, ते का गमावले हे लोकांना स्पष्टपणे सांगावे. संघटकावर असलेल्या विश्वासावर संघटनाबांधणी होत असते. लोकांच्या विश्वासाला तडा जाणार नाही, हे संघटकाने कटाक्षाने पाहिले पाहिजे.

*******

# भाग २

## ‘नाही’ या दोन शब्दांनी अमेरिकेचा इतिहास बदलणारी

# गांधीकन्या रोझा पार्कस्

अमेरिकेच्या दक्षिणेतील अलाबामा राज्यातील माँटगोमेरी शहर. जागोजागी आढळणारे ४०० वर्षांच्या गुलामीचे अवशेष. पदोपदी जाणविणारा वंशद्वेषाचा साक्षात्कार. काळ्या-गोऱ्यांचा भेद कायद्यानेच मंजूर केलेला. ‘केवळ गोऱ्यांसाठी’ असे फलक उपाहारगृहात, दुकानात, अगदी बसमध्येही लावलेले. कृष्णवर्णीयांनी सारे अपमान गिळून कायद्याने मान्य केलेली वंशभेदाची प्रथा निमूटपणे स्वीकारलेली. सारेजण आपापल्या पायरीनेच वागत होते, कारण व्यवस्था नाकारण्याची हिम्मत नव्हती, ते नाकारण्यासाठी शक्ती नव्हती, सामर्थ्य नव्हते.

थेट सर्वोच्च न्यायालयानेही या वंशभेदाला मान्यता दिली होती. ‘समान परंतु वेगळे’ हे तत्त्व न्यायालयाने लागू केले होते. कृष्णवर्णीयांना शिक्षणात, सार्वजनिक ठिकाणी समान संधी असेल परंतु ते वेगळे असतील असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते. शंभरातील संख्येने बारा असलेल्या कृष्णवर्णीयांना आपल्या रंगामुळे, आफ्रिकन वंशामुळे हा भेद मान्य करावा लागत होता.

महात्मा गांधींची प्रेरणा घेऊन, मिठाच्या सत्याग्रहाच्या कथेने प्रभावित झालेल्या मार्टिन ल्युथर किंग यांनी नागरी हक्कांच्या चळवळीने अमेरिकेतल्या वंशद्वेषाचा हा कलंक धुवून काढला हे इतिहास जाणतो. परंतु ही चळवळ सुरू होण्यापूर्वी वंशद्वेषाविरुद्ध बंड करण्यास कृष्णवर्णीय पुढे येतील काय ? त्याला गौरवर्णीयांची साथ मिळेल काय ? ही शंका त्यांना होती.

अपमानाचा उद्रेक माँटगोमेरी शहरात झाला. हा उद्रेक नियोजित नव्हता, संघटित नव्हता. इतकेच नाही तर उद्रेकास वाचा फोडणाऱ्या व्यक्तीला आपण अमेरिकेचा चेहरा बदलविणारे कृत्य करीत आहोत याची साधी कल्पनाही नव्हती. या उद्रेकानंतर कोणत्याही

वर्तमानपत्राने त्या व्यक्तीची दखल घेतली नव्हती. एका सामान्य, घरकाम करणाऱ्या, कसेबसे थोडेफार शिक्षण झालेल्या, हातावर पोट असलेल्या, नेतृत्वाचे कोणतेही वलय नसलेल्या कृष्णवर्णीय महिलेने अमेरिकेतील भेदाभेद नष्ट करणारी ठिणगी टाकली. वर वर शांत दिसणाऱ्या या ज्वालामुखीचे नाव होते 'रोझा पार्कस्'.

'टाइम्स' मासिकाने ३१ डिसेंबर १९९९ च्या अंकात शतकातील महिला घोषित केल्या. त्यात रोझा पार्कस्‌ला असामान्य स्थान दिले गेले आणि तिला महात्मा गांधीजींची कन्या म्हणून गौरविण्यात आले.

१ डिसेंबर १९५५ ची संध्याकाळ. ख्रिसमसच्या सणासाठी साऱ्या शहराने तयारी केलेली. दुकाने, घरे सजत होती. रोझा पार्कस् कपड्याच्या दुकानातील आपले काम आटोपून संध्याकाळी आपल्या घरी जाण्यास निघाली होती. संध्याकाळची पाचची वेळ होती. दुकानात काम करताना, दिवसभर उभे राहून ४३ वर्षांची रोझा थकली होती. तिच्या पायाला सूज आली होती. घरी जाण्यासाठी ती कोर्ट स्क्वेअर बसथांब्याकडे आली. बससाठी तोबा गर्दी पाहून थोडा वेळ नजीकच्या दुकानात फेरफटका मारावा, घरच्यासाठी काही वस्तू खरेदी कराव्यात, सुजलेल्या पायाला आराम मिळावा म्हणून गरम पिशवी विकत घ्यावी, या उद्देशाने ती एका दुकानाकडे वळली. गरम पिशवीची किंमत तिला परवडणारी नव्हती. म्हणून केवळ वेदनाशामक गोळ्या व थोडेफार किराणा सामान घेऊन ती बससाठी पुन्हा थांब्यावर आली.

बसचे भाडे ड्रायव्हर समोरील पेटीत टाकून 'केवळ कृष्णवर्णीयांसाठी' राखीव असलेल्या जागेवर ती बसली. गर्दी ओसरल्याने बसमध्ये फार काही प्रवासी नव्हते. केवळ गोऱ्यांसाठी राखीव असलेल्या जागाही मोकळ्याच होत्या. पुढच्या दोन थांब्यांवर गोरे प्रवासी चढले आणि बसमधील गोऱ्यांच्या जागा भरल्या. बस एम्पायर थिएटरच्या थांब्यावर थांबली. दोन गोरे बसमध्ये चढले. त्यापैकी एकाला जागा मिळाली तर दुसऱ्याला उभे राहावे लागले. बसच्या ड्रायव्हरने मागे वळून पाहिले. गोरा उभा असल्याने त्याला जागा करून देणे ड्रायव्हरला कायद्याने आवश्यक होते. ड्रायव्हरने रोझा पार्कस्‌कडे कटाक्ष टाकला. रोझाच्या छातीत धस्स झाले. ड्रायव्हरचे नाव तिच्या स्मरणात नव्हते. परंतु हा तोच जेम्स ब्लेक होता, ज्याने १२ वर्षांपूर्वी रोझा पार्कस्‌ला बसमधून धक्के मारून खाली उतरविले हाते. १२ वर्षात जेम्स असलेल्या बसमध्ये तिने कधीही पाऊल टाकले नव्हते आणि आज नकळत ती त्याच्याच बसमध्ये पुन्हा चढली होती.

''ए उठा रे, मला त्या दोन्ही जागा मोकळ्या करून द्या!'' ड्रायव्हर किंचाळला. 'जिम क्रो' नावाने ओळखला जाणारा कायदा त्याच्या तोंडून बोलत होता. कायद्यानुसार दोनही सीटवरील चारही जागा कृष्णवर्णीयांनी एका गोऱ्यासाठी मोकळ्या करून द्यावयाला हव्या होत्या. समान परंतु वेगळ्या तत्त्वानुसार एक गोरा तीन काळ्यांच्या सोबत बसू शकत नव्हता. ड्रायव्हरच्या ओरडण्याने बसमध्ये अचानक शांतता पसरली.

ड्रायव्हरने पुन्हा रागात दरडावले, ''बऱ्या बोलाने ऐका, मला त्या चारही जागा ताबडतोब मोकळ्या करून देता की नाही?'' ड्रायव्हरचा पारा चढला होता. रोझा पार्कस्सोबत बसलेल्या दोन्ही कृष्णवर्णीय महिलांनी अपमानाचा आवंढा गिळत निमूटपणे जागा रिकाम्या करून दिल्या. त्या उभ्या राहिल्या. रोझा पार्कस्च्या बाजूला खिडकीजवळ बसलेला कृष्णवर्णीय तरुण उभा राहिला. रोझा पार्कस्ने त्याला बाहेर जाण्यास जागा करून दिली. त्याच्या जागेवर खिडकीजवळ रोझा पार्कस् सरकून बसली आणि शांतपणे एम्पायर थिएटरकडे पाहू लागली.

रोझा शरीराने तर थकली होतीच, परंतु वर्णभेदाच्या अत्याचाराने, जुलमी कायद्याने आणि नेहमीच्या अपमानाने ती अधिक थकली होती. ती या साऱ्या भेदाभेदाला विटली होती. आज म्हणूनच तिने प्रतिकार करण्याचे ठरविले.

ड्रायव्हर ब्लेक तिच्या दिशेने चालू लागला तसा साक्षात घनघोर अपमान तिच्यावर आक्रमण करून येत असल्यासारखे तिला वाटले. आपल्या पूर्वजांनी केलेली गुलामी, त्यांना जगावे लागलेले पशुवत जिणे, सारे सारे तिच्या डोळ्यांसमोरून सरकू लागले. वर्णद्वेष्ट्या अमेरिकेचा विद्रूप अवतार ब्लेकच्या रूपाने तिच्यासमोर साक्षात उभा होता. तिच्या आजोबांची तिला आठवण झाली. ''केवळ बडबड! बडबड!! बडबड!!! आता बडबड पुरे, आता गरज आहे कृतीची.'' तिच्या कानांवर हे शब्द घाव घालू लागले. तिने ब्लेककडे पाहिले, त्याच्या नजरेला नजर भिडविली.

ब्लेक पुन्हा किंचाळला, ''तू उठतेस की नाही?'' संभाव्य परिणाम रोझाला स्पष्ट दिसत होते. त्या परिणामांना तोंड देण्याची तिने मानसिक तयारी केली. सारे सामर्थ्य तिने एकवटले आणि शांतपणे त्याच्या नजरेला नजर भिडवीत, वैयक्तिक सत्याग्रही बनून एक सामर्थ्यशाली मंत्र उच्चारला, ''नाही!''

''ठीक आहे, मला तुला अटक करायची व्यवस्था करावी लागेल.'' ब्लेक म्हणाला. आपल्या जागी स्थिर राहून रोझा म्हणाली, ''तू असे करू शकतोस?'' रोझाने, आपण आता

वंशद्वेषाचे बळी नाही, तर त्याचा प्रतिकार करणार असल्याचे आपल्या उत्तराने स्पष्ट केले. तिला आपण माणूस असल्याची प्रखर जाणीव त्या क्षणी झाली. माणुसकीच्या सन्मानासाठी तिने हिमतीने 'नाही' म्हणायचे ठरविले. हा 'नाही' शब्द अमेरिकेचा इतिहास बदलणार होता. वर्णद्वेषाला कायमची तिलांजली देणार होता. एकट्या रोझाने नाकारलेली व्यवस्था सारे कृष्णवर्णीय सामूहिकपणे नाकारण्याची ती सुरुवात होती. रोझा नागरी हक्कांच्या चळवळीला जन्म देत होती. याची कल्पना मात्र रोझाला त्या क्षणी नव्हती.

ब्लेक चक्रावला. रोझाने 'नाही' म्हणून केवळ त्यालाच नाही तर जुलमी कायद्याला आव्हान दिले होते. या बाईला बसमधून बाहेर काढायलाच पाहिजे होते. पण ते त्याने स्वत: करावे की त्यासाठी पोलिसांना बोलवावे हे तो ठरवू शकत नव्हता. तिचे नाव आणि पत्ता घेऊन नंतर गुन्हा दाखल करण्याचा विचारही त्याच्या मनात येऊन गेला. त्याने वरिष्ठांशी संपर्क साधला. ब्लेकने तिला समज दिली असतानाही ती उठली नाही, हे ऐकून वरिष्ठांनी सरळ पोलिसांना बोलाविण्याचाच सल्ला दिला.

काही क्षणातच दोन पोलीस बसमध्ये हजर झाले. तोवर बसमधील प्रवासी शांतपणे बाहेर पडले होते. काही कृष्णवर्णीय अस्वस्थतेने घोटाळत राहिले. बस ड्रायव्हरने चुकीच्या व्यक्तीशी भांडण ओढावून घेतल्याचे काहींना वाटले. पोलिसांनी रोझाला शांतपणे ती न उठण्याचे कारण विचारले.

रोझानेही तितक्याच शांतपणे उत्तर दिले 'तुम्ही सारे आम्हाला बाहेर का फेकता?' पोलीस निरुत्तर झाले. 'मलाही ठाऊक नाही, पण कायदा म्हणजे कायदा. मला तुला अटक करावीच लागेल.' डे नावाचा पोलीस उद्गारला. अत्यंत सौजन्याने एका पोलिसाने तिच्याकडील पिशव्या उचलल्या आणि दुसरा तिच्या मागोमाग पोलिसांच्या गाडीकडे चालू लागला. रोझाला पोलीस ठाण्यात नेण्यात आले. तिथे तिला पाणीही नाकारण्यात आले, आपल्या घरी फोन करण्यासही मज्जाव करण्यात आला.

केशकर्तनालयात न्हाव्याचे काम करणाऱ्या तिच्या पतीला, रेमंडला, ही बातमी कोठून तरी कळली. तो भयभीत झाला. पोलीस स्टेशनला जाण्यासाठी त्याच्याकडे वाहनही नव्हते. रोझाचा मित्र, बेर्था बटलर याने ई. डी. निक्सन या गौरवर्णीय वकिलाशी संपर्क साधला. ते रेमंडसह रोझाकडे गेले. निक्सन नागरी हक्कांच्या बाजूचा होता. रोझाला जामीनावर सोडविण्यात आले.

दुसऱ्या दिवशी अशी घटना घडल्याचे काही वर्तमानपत्रांनी प्रसिद्धही केले. परंतु त्यात रोझाचा उल्लेख कोठेही नव्हता. रोझा एन.ए.ए.सी.पी. (नॅशनल असोसिएशन फॉर द ॲडव्हान्समेंट ऑफ कलर्ड पिपल) या संघटनेची पदाधिकारी होती. या संघटनेची बैठक बोलाविण्यात आली. रोझाच्या खटल्याची सुनावणी ५ डिसेंबर रोजी होणार होती. त्या दिवशी शहरातील बसेसवर कृष्णवर्णीयांनी बहिष्कार टाकावा म्हणून प्रस्ताव पुढे आला. २८ वर्षांचा मार्टिन ल्युथर किंग शहरातील एका चर्चमध्ये मिनिस्टर होता. बहिष्कार यशस्वी होईल काय? अशी शंका त्याने उपस्थित केली. परंतु उपस्थितांनी एकमुखाने बहिष्काराचा निर्णय जाहीर केला.

५ डिसेंबर रोजी अपेक्षेपलीकडे बहिष्कार यशस्वी झाला. एकही कृष्णवर्णीय बसमध्ये चढला नाही. कोर्टाने रोझाला दोषी ठरविले, तिला सजा झाली. सायंकाळी झालेल्या जाहीर सभेत मार्टिन ल्युथर किंग याचे आवेशपूर्ण व आक्रमक भाषण झाले. नागरी हक्कांच्या चळवळीचा नेता या सभेत जन्माला आला. वर्णद्वेषी कायद्याच्या विरोधात एक दिवसाचा बहिष्कार ३८१ दिवस सलग चालला. केवळ अमेरिकेतच नाही तर जगाच्या कानाकोपऱ्यात वर्णद्वेषाविरोधी निनाद उमटले.

एका घरकाम करणाऱ्या, कपडे शिवणाऱ्या सामान्य स्त्रीने नकळत असामान्य कर्तृत्व केले आणि कृष्णवर्णीयांना समतेचे दार खुले करून दिले.

*******

# संपन्न अमेरिकेतील उपाशी अन्नदाते

''आम्हाला जे मिळायला पाहिजे ते मिळत नाही. याची कल्पना मला आहे. मी गुलाम आहे हेही मला जाणवते. जनावराप्रमाणेच आयुष्य मला जगावे लागते. मुलं-बाळं एकीकडे, आम्ही एकीकडे. राहायला ना घर, ना पोटाला अन्न, प्यायला शुद्ध पाणीही नाही'' जगातल्या अत्यंत प्रगत आणि भांडवलप्रधान अमेरिकेतील एका शेतमजुराचे हे बोल.

''यासाठी तुम्ही संघटीत का होत नाही? अन्यायाविरुद्ध आवाज का उठवित नाही?'' मी विचारले.

''मी आवाज उठविला. आज भीक मागण्याची पाळी माझ्यावर आली. मला कामावरून काढून टाकले. मला कायद्याप्रमाणे मजुरी मिळाली पाहिजे. प्यायला चांगले पाणी मिळाले पाहिजे. एवढ्या साध्या गोष्टींची मी मागणी केली. त्याची मला ही शिक्षा. माझ्यासारखे जीवन जगणारे एक दोन नाहीत किमान पन्नास हजार शेतमजूर बेकर्स फिल्ड व्हॅलीमध्ये आहेत. परंतु मला मिळालेली शिक्षा नको म्हणून निमूट गुलामीचे, जनावरासारखे जिणे जगताहेत.''

कॅलिफोर्निया राज्यातील बेकर्स फिल्ड व्हॅलीत आढळणाऱ्या मजुरांचे बोल ऐकले आणि धक्का बसला. पार्लिअर या गावात द्राक्षांच्या मळ्यात काम करणाऱ्या पावलो सिप्रियानो या शेतमजुराला भेटल्यावर प्रगत अमेरिकेची लक्तरे माझ्यासमोर उलगडू लागली.

अमेरिकेच्या ५ आठवड्यांच्या वास्तव्यात माझा अभ्यासाचा विषय अमेरिकेत बनणाऱ्या कायद्यांची प्रक्रिया व या प्रक्रियेतील बिगर सरकारी संस्थांची भूमिका असा होता. तरीही कॅलिफोर्नियातील शेतमजुरांची स्थिती पाहाण्यास जाण्याचे मी आधीच निश्चित केले होते. सीझर चावेझ या अमेरिकेतील शेतमजुरांच्या नेत्याची भेट मिळणे अवघड होते. ही

जबाबदारी कॅथी श्रीधर व नॅन्सी डोनाल्डसन या सहकाऱ्यांनी पार पाडली. सीझर चावेझ अमेरिकन शेतमजुरांमध्ये मार्टीन ल्युथर किंग म्हणून प्रसिद्ध होते. सिनेटर रॉबर्ट केनेडी यांनी त्यांचा जिवंत संत (लिव्हींग सेंट) म्हणून सन्मान केला होता. सुमारे ३० वर्षे अमेरिकेतील शेतमजुरांना तसेच मेक्सिको, फिलिपाईन्स, क्युबा येथून अमेरिकेत येणाऱ्या स्थलांतरीत झालेल्या शेतमजुरांना संघटित करून न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न ते करीत होते. त्यांच्या भेटीनंतर पार्लिअर या गावी करोल मनोग या माझ्या मित्रासोबत गेलो. करोल मनोग हा अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर अँड काँग्रेस ऑफ इंडस्ट्रीयल ऑर्गनायझेशन या सर्वात मोठ्या कामगार संघटनेचा कॅलिफोर्नियातील प्रमुख. तो सीझर चावेझ यांच्या फार्म वर्कर्स युनियनसाठी पाठबळ उभे करीत असे.

पार्लिअरला सकाळी ८.३० च्या सुमारास आम्ही पोहोचलो. पावलो सिप्रियानो हा युनियनच्या कार्यालयामध्ये आम्हाला भेटला. ४० वर्षे वयाचा पावलो आपल्या ३ मुलांना सोडून गेली अनेक वर्षे स्थलांतरीत मजूर म्हणून काम करीत होता. तो मेक्सिकन होता. नित्यनेमाने वृत्तपत्र वाचणारा, दूरदर्शनसमोर बसून खास बातम्या ऐकणारा हा शेतमजूर. न्यायाची मागणी केली म्हणून अशी शिक्षा भोगत होता. अमेरिका स्वातंत्र्यप्रिय आहे याची त्याला पूर्ण कल्पना होती. न्यूयॉर्क येथे असलेल्या स्वातंत्र्य देवतेच्या भव्य पुतळ्याबद्दल तो जाणून होता.

दहा-दहा हजार एकरवर पसरलेले द्राक्षांचे मळे, या मळ्यांच्या मालक कंपन्या स्थलांतरीत मजूरांवर करोडो डॉलर्सचा नफा कमवितात. स्थलांतरीत मजुरांपैकी जवळपास ९० टक्के मजूर वास्तव्याची कायदेशीर कागदपत्रे नसताना अमेरिकेत मजुरी करतात. आर्थिक गांजलेपणा व बेकायदेशीर वास्तव्यामुळे येणारी असुरक्षितता हेच शोषणाचे मूळ बनते. पावलो ज्या मळ्यात काम करीत असे तेथील मजुरांना दिलेले घर कोंडवाड्याप्रमाणे होते. १५ × १०च्या खोलीत २५-३० मजुरांना डांबले होते. एकावर एक खाटा टाकून केलेली झोपण्याची व्यवस्था, पिण्यासाठी अस्वच्छ पाणी, आंघोळीला नेहमीच थंड पाणी, प्रातर्विधीसाठी नॅपकिनची सोय नाही, अत्यंत निकृष्ट दर्जाचे जेवण अशा अवस्थेत त्यांना राहावे लागत होते. पावलोने आपल्या मुकादमाला या अवस्थेबद्दल केवळ विचारले. ही व्यवस्था करण्यासाठी दर आठवड्याला ८८ डॉलर कापले गेले त्याचा हिशोब काय ? इतका साधा प्रश्न पावलोने विचारला.

''ज्या दिवशी हा प्रश्न माझ्या मुकादमाला विचारला तो माझ्या कामाचा शेवटचा दिवस ठरला. मला कामावरून काढले. माझे नाव काळ्या यादीत टाकले. माझ्या शिलकेत शंभर

डॉलर. आता मला राहायला नाही घर, ना खायला अन्न, दोन आठवड्यात मी घरी काही पाठविलेले नाही. मुलंबाळं काय करीत असतील या चिंतेने मी बेजार आहे. अमेरिकेची श्रीमंती ऐकून मी येथे कामाला आलो. पण आता मात्र नरक अनुभवतोय'' पावलोचे हे उद्गार हजारो शेतमजुरांचे प्रातिनिधिक बोल होते.

आठवड्याला जेवणाचे ६२ डॉलर घेतले जात. शिळेपाके अन्न दुसऱ्या दिवशी गरम करून दिले जाई. या मजुरांना राहण्यासाठी जी छावणी असे ती द्राक्षमळ्याच्या मुख्य फाटकापासून कितीतरी आत होती. बाहेर जायला जवळपास बंदी. जे थंड पेय बाहेर ७५ सेंटसला मिळत असे ते या मजुरांना २ डॉलरला घ्यावे लागे. ते बाहेरून आणून साठा करायलाही बंदी होती. कंपनीच्या शेतात नेण्यासाठी २८ ते ३० मजुरांना व्यवस्थित खिडक्या नसलेल्या एका व्हॅनमध्ये कोंबत असत. कंपनीत न्यायला ४ ते ५ डॉलर घेतले जात. पिण्याचे पाणी साठविण्यासाठी शेतात फवारलेल्या कीटकनाशकांचे रिकामे ड्रम्स वापरावे लागत. मजुरांना मुख्य फाटकातून आत जाणे किंवा बाहेर येणे मालकाच्या परवानगीशिवाय शक्यच नव्हते.

युनियनच्या कार्यालयामध्येच ९.४५ वाजले होते. पावलो बरोबरचे माझे बोलणे मला आटोपते घ्यावे लागले. अजून किती तरी माहिती मला पावलोकडून हवी होती. मात्र ठीक १० वाजता मला एका द्राक्षाच्या मळ्यात पोहोचणे आवश्यक होते. सकाळची १० ची वेळ जेवणाची. सकाळी ६ वाजल्यापासून संध्याकाळी ६ पर्यंत काम करावे लागे. जेवणाची वेळ तेवढीच काय ती विश्रांती. कायद्यानुसार किमान १ तास जेवणासाठी मिळणे आवश्यक होते. युनियनच्या प्रतिनिधीला मालकाचे पूर्व परवानगीशिवाय कामाआधी, कामानंतर किंवा जेवणाच्या सुट्टीतच मजुरांना भेटता येते. कॅलिफोर्निया शेतमजूर संबंध कायद्यानुसार वर्षातून केवळ ३० वेळा संघटनेच्या कार्यकर्त्यांना मजुरांना भेटण्यासाठी मालक परवानगी देतो. ३० पेक्षा कमी मजूर असल्यास दोन कार्यकर्त्यांना, ३१ ते ४५ मजूर असल्यास तीन कार्यकर्त्यांना व ४६ ते ६० मजूर असल्यास चार कार्यकर्त्यांना प्रवेश मिळतो. युनियनने मालकाला पूर्वसूचना देऊन मालकाची वेळ घेऊन नंतरच ही परवानगी मिळते. ही सर्व प्रक्रिया पूर्ण करून भेट मिळेल तेव्हा मालकाच्या प्रतिनिधीच्या पहाऱ्याखाली युनियनचे काम संघटक मजुरांना सांगतो.

हा कायदा शेतमजुरांच्या हितसंरक्षणासाठी तयार करण्यात आला असल्याचा दावा करण्यात येतो. परंतु प्रत्यक्षात शेतमजुरांच्या किमान हक्कांवर सरसकट वरवंटा फिरविल्याचेच दिसते. मालकांचे हितसंबंध यात जपण्यात आलेले आहेत. अमेरिका

स्वातंत्र्यप्रिय, लोकशाहीवादी असल्याने या मजुरांना युनियन करण्याचे वा न करण्याचेही स्वातंत्र्य बहाल करण्यात आलेले आहे.

मजुरांना युनियन हवी असल्याचा अर्ज आपल्या मागण्यांसह कामगार हक्क मंडळाकडे सादर करावा लागतो. किमान १० टक्के मजुरांनी प्राथमिक मागणी करणे आवश्यक असते. त्यावर मंडळ मालकाकडून किंवा कंपनीकडून मजुरांची यादी मागविते. कंपनीने ही यादी ५ दिवसांचे आत सादर करावयाची असते. मालकाकडून यादी आल्यावर त्या यादीत संघटनेची मागणी करणाऱ्या मजुरांची नावे आहेत की नाहीत हे मंडळाचे अधिकारी पाहतात. मागणी पत्रावर सह्या केलेल्या मजुरांनी संघटनेची खरोखरीच मागणी केलेली आहे का ? याची खात्री करून घेतली जाते. वर्षातून जास्तीत जास्त ४ वेळा अशी यादी मागविता येते. कंपनीच्या यादीत असलेल्या सर्वच मजुरांना प्रत्येक वेळी काम उपलब्ध असते असे नाही. ज्यावेळी युनियनची मागणी करण्यात येईल त्यावेळी कंपनीच्या यादीत असलेल्या मजुरांपैकी किमान ५० टक्के मजूर कामाला आहेत असे कंपनीने जाहीर करावे लागते. तसे केले नाही तर किंवा कमी मजूर असतील तर मंडळ निवडणूक घेत नाही.

संघटनेचे महत्त्व पटविण्यासाठी, त्यांच्यावरील अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी मालकांची परवानगी घेणे आवश्यक ठरते. आपला प्रतिनिधी निवडल्यावर कामाचे तास, कामाची स्थिती, वेतन याबद्दल करार करण्याचे अधिकार संघटनेला प्राप्त होतात. मात्र या कायद्यानुसार गेल्या १३ वर्षात एकही निवडणूक झाली नाही यातच सारे काही आले. आठ तास कामासाठी ज्या अमेरिकेत शिकागो येथे शतकापूर्वी जगातला पहिला कामगारांचा लढा झाला त्याच अमेरिकेत या शेतमजुरांना आजही बारा-बारा तास जनावरासारखे काम करावे लागते.

दहा वाजता आम्ही द्राक्षमळ्यात पोहोचलो. मजुरांनी नुकतेच जेवण करायला सुरुवात केली होती. त्यांचे जेवण सुरू असतानाच आम्ही त्यांच्याशी बोलत होतो. इमेल्डा या २८ वर्षाच्या शेतमजूर महिलेशी मला संवाद साधता आला. इमेल्डा ७ वी शिकलेली स्थलांतरीत शेतमजूर होती. श्रमजीवी संघटनेतील मुक्त वेठबिगारांना आपल्या देशाचे, देशाच्या राजधानीचे, देशाच्या पंतप्रधानाचे नाव ठाऊक नव्हते याचा अनुभव मी घेतला होता. इमेल्डालाही अमेरिकेच्या राजधानीचे, अध्यक्षांचे नाव ठाऊक नव्हते. मी हा प्रश्न विचारताना ज्या अमेरिकन मित्रांनी माझी टिंगल केली होती ते इमेल्डाचे उत्तर ऐकून अक्षरश: हादरले. मुलांची सतत शाळा बदलावी लागते, या कामामुळे मुलांकडे दुर्लक्ष करावे लागते हे सांगताना इमेल्डाला गहिवरून आले होते. ''माझ्या मुलांनी काहीही व्हावे

परंतु शेतमजूर होऊ नये'' तिच्या या भावना व भारतातील शेतमजूर स्त्रीच्या भावना यात काहीही फरक नाही.

इमेल्डाला पुढचा प्रश्न विचारण्याआधीच एक कार आली. एक गोरा त्यातून बाहेर आला. बंदुकीचा आवाज झाल्यावर पक्षी उडावेत अक्षरश: तसेच इमेल्डासह सर्व शेतमजूर भराभर निघून गेले. वेळ होती १० वाजून २० मिनिटांची. २० मिनिटात जेवणाची सुटी संपली होती. एक तासाची सुटी असताना, नेहमीच केवळ २० मिनिटे या शेतमजूरांना जेवणासाठी दिली जात होती. हताशपणे त्यांच्यावर होणारा अन्याय आम्ही पहात राहिलो. युनियनचा संघटक, रॉबर्ट परिस्थितीशी जुळवून घेण्यापलीकडे काहीही करू शकला नाही.

जवळच असणाऱ्या मजुरांच्या छावणीत आम्ही गेलो. मजुरांची छावणी कसली छोटासा जेलच होता तो. पावलोने वर्णन केलेले दृश्य त्या घरात दिसले. अर्धा पाऊण तास आम्ही तेथे काढला असेल, जवळपास कधीच न धुतलेल्या चादरी आणि पाण्याचे दुर्भिक्ष्य.

गोमॅन्सेडो मेकलीना, या ४९ वर्षाच्या मजुराशी माझे थोडे फार बोलणे झाले. १९७१ सालापासून तो नऊ मुले, आई, बायको यांना आपल्या देशात, मेक्सिकोत ठेवून कॅलिफोर्नियामध्ये मजुरीसाठी येत होता. आम्ही गेलो त्या दिवशी काम नसल्याने तो आराम करीत होता. परंतु हा आराम त्याला नको होता. गेली ३ वर्षे पुरेसा पैसा न मिळाल्याने तो आपल्या गावी जाऊ शकला नव्हता.

त्याची मुले कितवीत शिकतात हे सुद्धा त्याला माहिती नव्हते. मजुरी करून खाऊन काही थोडे फार शिलकीस राहील ते तो आपल्या मुलाबाळांना पाठवित असे. त्यावर त्यांचे कुटुंबिय कसेबसे घर चालवित. त्याची मुले बरेचदा उपाशी झोपत. श्रीमंत मजुरी चोरतात म्हणून मजूर गरीब राहतात असे त्याला वाटे. कधी तरी चांगले दिवस येतील या एकाच आशेवर तो जगत होता.

ज्या दिवशी पाऊस पडतो त्या दिवशी काम केले तरी मजुरी मिळत नाही. बर्फ पडते त्या दिवशी काम नाही. बारा बारा तास काम केले तरी मुकादम कमी तास लावतो. मजुरांचे हजेरी पत्रक मुकादमाकडे असते हे विशेष. ते मागून सुद्धा मजुराला दाखविले जात नाही. त्यामुळे मुकादमाच्या मर्जीप्रमाणे तो कामाचे तास लावतो. गोमॅन्सेडोकडे एक दमडीही नव्हती. अन्यायाविरुद्ध बोलायला गोमॅन्सेडो तयार नव्हता. कारण पावलो प्रमाणे त्याला कामाला मुकावे लागले असते, भीक मागावी लागली असती.

सीझर चावेझ यांच्या म्हणण्याप्रमाणे किमान ८ लाख मुले अमेरिकेत शेतमजुरी करतात. अमेरिकेच्या अधिकृत आकडेवारीप्रमाणे लोकसंख्येच्या केवळ तीन टक्के शेतमजूर आहेत. मेक्सिको, ग्वाटेमाला, एल् सॅल्वाडोर, व्हिएतनाम, कंबोडिया, फिलीपाईन्स या ठिकाणाहून स्थलांतरीत झालेल्या बहुसंख्य शेतमजूरांचा या आकडेवारीत समावेश नाही. अमेरिकन गरिबांना मिळणाऱ्या सवलती स्वाभाविकपणे त्यांना मिळत नाहीत. कोणतेही हक्क ते मागू शकत नाहीत. मालकांच्या सततच्या मेहेरबानीवर त्यांना दिवस काढावे लागत आहेत.

या शेतमजुरांची परिस्थिती वॉशिंग्टनमधील काही शहरी सामाजिक कार्यकर्त्यांना सांगितल्यावर त्यांच्यातील देशाभिमान जागा होणे स्वाभाविक होते. ते म्हणाले ''जर हे स्थलांतरीत मजूर आमच्या देशाचे नागरिक नाहीत तर त्यांची सामाजिक संरक्षणाची जबाबदारी आम्ही का घ्यावी ? त्यांनी अमेरिकेत येऊ नये.''

बेकायदेशीर लाखो शेतमजूर अमेरिकेत आहेत याची कल्पना अमेरिकन सरकारला नाही असे म्हणणे मूर्खपणाचे ठरेल. जगावर अवकाशातून लक्ष ठेवणाऱ्या या प्रगत देशाचे आपल्या देशातील शेतमजुरांवर लक्ष नाही ? इमेल्डा ही तर टेक्ससची अमेरिकन नागरिक, तिच्या दुरावस्थेबद्दल काय ? अमेरिकेच्या सीमा या शेतमजुरांसाठी अमेरिका बंद का करीत नाही ?

स्थलांतरीत शेतमजुरांबाबत अमेरिकेचे धोरण इतके 'उदार' का? एका आठवड्याला २० डॉलर, एवढ्या कमी रकमेत मी माझे जेवण स्वत: करू शकत होतो. या वास्तवतेत या प्रश्नाचे उत्तर आहे काय ? याचा मी शोध घेऊ लागलो.

''अन्यायाविरोधी मी आवाज उठविला म्हणून मला यातना भोगाव्या लागतात. परंतु मी आवाज उठविला याचे मला दु:ख होत नाही. मी मेलो तरी चालेल, पण जनावरांसारखे जगणे मला मान्य नाही'' पावलोचे हे उद्‌गार माझ्या हृदयात घुमत राहिले. पावलोसारखे आणखी काही पावलो तयार झाले, परिस्थितीला आव्हान दिले, आहे त्या व्यवस्थेला 'नाही' म्हटले तरी अमरिकेतील लाखो शेतमजूरांचे भविष्य बदलून जाईल. मार्टिन ल्युथर किंगची चळवळ रोझा पार्कस्‌ने बसमधून उठण्यास 'नाही' म्हटले, तेथूनच तर सुरू झाली. जे व्यवस्थेला 'नाही' म्हणतात तेच बदलाची सुरुवात करतात हा इतिहास कसा बदलेल ?

*******

# तुझा रंग पुरेसा आहे

न्यूयॉर्कहून न्यूजर्सी शहरातील ईस्ट ऑरेंज रेल्वे स्टेशनकडे जायला तसा तासभरच लागला. पोलीस विभागाची इमारत हाकेच्या अंतरावरच होती. वेळेपूर्वीच पोहोचल्याने अवतीभवती फेरफटका मारीत बसलो.

अमेरिकेतील पोलीस खाते आपल्या देशापेक्षा पूर्ण वेगळे आहे. प्रत्येक शहराला स्वतंत्र पोलीस खाते आहे. आपल्यासारखी केंद्रीय पोलीस सेवा नाही. राजकीय हस्तक्षेपाविषयी बोलायचे तर अध्यक्षीय पद्धतीनुसार सरळ लोकांमार्फत निवडून आलेल्या महापौरांनाच शहराचा पोलीस प्रमुख उत्तरदायी असतो. नव्या महापौराला नवा पोलीस प्रमुख नेमण्याचा अधिकार असतो. पोलिसांना मिळणारे लाभही आपल्या तुलनेत उत्तम असतात. आपल्यासारखी तीस -तीस तासांची 'ड्युटी' नाही. तीन पाळ्यांमध्ये पोलीस काम करतात. प्रशिक्षण महत्त्वाचे मानले जाते. आपल्याकडे प्रशिक्षण खात्यात बदली म्हणजे 'साईड पोस्टींग' समजले जाते. अमेरिकेत मात्र उत्तम अधिकाऱ्यास, विशेष प्राविण्य मिळविलेल्या अधिकाऱ्यास प्रशिक्षण देण्यासाठी नेमले जाते. या व इतर अनेक गोष्टी मी गेले काही दिवस विविध शहरातील पोलिसांकडून समजावून घेत होतो. त्याचबरोबर मानवी हक्क भंगाच्या विशेषत: वर्णद्वेषाच्या कहाण्याही ऐकत होतो. खुद्द पोलीस खात्यातही वर्णद्वेष आहे आणि त्यावर प्रभावी उपाययोजना करण्यात फारसे यश मिळाले नसल्याचे अनेक दाखले जागोजागी मिळत होते.

सार्जंट डेलसी डेव्हीस हा कृष्णवर्णीय पोलीस अधिकारी, पोलिसातील वर्णद्वेषाच्या विरोधात सर्व सामर्थ्यानिशी लढत असल्याचे समजले. मी त्याचे कार्य समजून घेण्यासाठी ईस्ट ऑरेंज पोलीस विभागात आलो होतो. प्रवेशद्वारापाशीच सार्जंटने स्वागत केले. आपल्या अन्य सहकाऱ्यांचा परिचय करून दिला व त्यांच्या स्वत:च्या कार्यालयाकडे

आम्ही वळलो. ऑफिसर बिलाल हॉल एका तरुणाशी बोलण्यात गुंतला होता. मी फक्त हस्तांदोलन करून चर्चा ऐकण्याची परवानगी घेतली व शांतपणे त्यांची चर्चा ऐकत राहिलो.

१५ वर्षे वयाच्या ख्रिस्तोफर जेनींगला त्यांनी बोलावून घेतले होते. ख्रिस्तोफर शाळा शिकत होता. काही आरोपींच्या सोबत ऑफिसरने काल त्याला पाहिले होते. पोलिसांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या व्यायामशाळेचा तो उत्तम व्यायामपटू होता. मुष्टीयोद्धात त्याने प्राविण्य मिळविल्याचेही मला त्यांच्या संभाषणावरून समजले. ख्रिस्तोफर शांत होता. फक्त एकच वाक्य तो पुन्हा पुन्हा उच्चारीत होता.

''पण, पण, मी तर काहीच केलं नाही''

''माझं समजून घे मुला, मी तुझ्यासारखे खूप खूप तरुण गमावलेत. तुला गमवायची माझी खरंच इच्छा नाही. तुला कल्पना आहे का, की तुला समानतेची वागणूक मिळावी म्हणून किती जण मेलेत ? किती जणांनी घराची राख रांगोळी केलीय ? का ? का ते सारं वाया घालवतोस ?'' ऑफिसर बिलाल बोलत होता.

ख्रिस्तोफर भिंतीकडे एकटक पहात होता. जणू काही ऐकलेच नाही, अशीच प्रतिक्रिया होती त्याच्या चेहऱ्यावर होती.

सार्जंट डेलसी उठला. काहीसा चिडला. ''तुला ऐकू येत नाही का रे ? काय बोलतोय ऑफिसर ? अरे बोल. काही तरी उत्तर दे.''

''मला का सांगताय तुम्ही हे सारं ? मी काय केलं ?'' ख्रिस्तोफर उद्वेगाने म्हणाला.

''काय केलं ? अरे तू काल त्या नाक्यावर होतास ना ?'' सार्जंट.

''हो'' ख्रिस्तोफर.

''का ? का उभा होतास त्या नाक्यावर ?'' ऑफिसर बिलालने विचारले.

''मी सहज उभा होतो, मी काय गुन्हा केला ?''

''तुझ्या शेजारी जे उभे होते ते अंमली पदार्थांचा व्यापार करतात ना ? अरे तू त्यांच्यासोबत जरी असलास तरी आम्हाला पुरे आहे, समजलं का ?'' ऑफिसर चिडला होता.

''या पोरांना कसे समजवायचे हाच माझ्यासमोर प्रश्न आहे. आजचे आमचे कृष्णवर्णीय पुढारी पोटभरू झाले आहेत. ते विसरलेत मार्टीन ल्युथरला, विसरलेत रोझा पार्कस्‌ला, विसरलेत माल्कम एक्सला आणि फेडरिक डग्लसला, ते विसरलेत त्या अमेरिकन स्वप्नाला ....'' सार्जंट मला उद्देशून बोलत राहिला.

''कोणत्या दुनियेत हे पुढारी आहेत समजत नाही. या वयाची कोवळी पोरं उद्ध्वस्त होताना मला पाहावे लागतेय ? ही मुले निराश आहेत, उदास आहेत. त्यांच्यासमोर काही स्वप्नच नाहीत. एका बाजूला ऐषारामी अमेरिका तर दुसऱ्या बाजूला ही स्वप्नहीन, दारिद्र्याने गांजलेली कृष्णवर्णीयांची तरुण पिढी.''

''तुला सांगू, खूनाचे प्रमाण अलीकडे खूप घटले आहे अमेरिकेत. पण चोऱ्या, दरोडे, लुटमारीचे प्रमाण आभाळाला भिडलेय'' सार्जंटने माहिती दिली.

''का ? काय कारण असावे ?'' मी विचारले.

''सरळ आहे. अगदी सोपं आहे. चैनबाजी आणि उधळपट्टी समोर दिसत असेल तर उपाशी पोटं काय करतील ? गप्प बसतील ? गुन्हे वाढवायचे राज्यकर्त्यांनी, पैसेवाल्यांनी आणि दोष मात्र पोलिसांना ? गुन्हेगारी वाढते म्हणून ? काय विचित्र न्याय आहे पहा !'' सार्जंट बोलत होता. ''फक्त १२ टक्के कृष्णवर्णीय अमेरिकेत असताना, गुन्हेगारांचे सम्राट गोरे असताना, अमेरिकेचे तुरुंग मात्र काळ्यांनी भरलेत. तुरुंगातील ९०टक्के लोक काळे आहेत हे ठाऊक आहे तुला ?'' सार्जंट अस्वस्थ झाला होता.

ख्रिस्तोफरच्या हे सारं डोक्यावरून जात असावे किंवा त्याला त्यात रस नसावा. सार्जंट जरा खवळलाच होता. ''ऑफिसर, चल जाऊ दे, खूप झालं. हा काही समजणार नाही. काही दिवसांनी ते गोरे पोलीस आणतील धरून याला चोरीच्या आरोपाखाली, नाही तर घालतील गोळ्या रस्त्यावर.''

आता मात्र ख्रिस्तोफर उठला, किंचाळला.

''का, काय केले. मी कोठे चोऱ्या करतो ? माझी आई घरकाम करते. आम्हा तीन भावंडांना कसेतरी सांभाळते. आम्ही उपाशी राहातो कधीकधी. तरी मी शिकतो. मला का बोलता तुम्ही सारं''

''चूप. कोणीही गोरी बाई आली पोलीस ठाण्यात, तिने तक्रार दिली चोरीची, घरफोडीची तर काय होईल सांग ?''

''पण तुम्ही तिला आरोपींची नावे तरी विचारणार की नाही'' ख्रिस्तोफर म्हणाला.

''विचारू, जरूर विचारू, काळजी नको करूस.'' सार्जंट शांतपणे बोलू लागला. ''ती काय सांगणार ? आरोपीचं नाव ? माहिती नाही. वर्णन कसे ? कृष्णवर्णीय, पाच फूट तीन इंच, साधारण दाढी असलेला. कुरळ्या केसांचा, बरोबर ? बरोबर आहे का ? मी काय म्हणतोय ते ?''

''हो'' ख्रिस्तोफर म्हणाला. ''मग, तू या वर्णनात बसतोस की नाही ते सांग ?'' सार्जंटने विचारले.

ख्रिस्तोफरला रडू कोसळलं. डोकं भिंतीवर आदळू लागला. सारखे एकच बोलत होता, ''मी काय करू, काय केलं मी ?''

''पुन्हा, पुन्हा ते शब्द उच्चारू नकोस. मी काय सांगतो ते लक्षात घे. आम्हा पोलिसांना तुला रस्त्यावर गोळी घालून ठार मारण्यासाठी तू काहीही केलं असण्याची आवश्यकता नाही ! तुझा रंग, तुझा काळा रंग त्यासाठी पुरेसा आहे ! कळलं ?''

दोन्ही हात डोक्यावर घट्ट धरून, डोळ्यातील आसवांना सावरता न आलेला सार्जंट कसातरी खुर्चीवर बसला, कितीतरी वेळ टेबलावरून मान वर न करताच.

*******

# काळ्याचं पोर

कमाऊ मर्चेरिया, चाळीशीचा कृष्णवर्णीय रांगडा तरुण. अमेरिकन शिष्टाचाराबद्दल अत्यंत तिटकारा असलेला. कमाऊ हे नाव आई वडिलांनी ठेवलेले. आपल्या गुलाम पूर्वजाची आठवण म्हणून आजोबांनी नाव ठेवले रॉबर्ट जॉन लुईस. जेलमधील सहकाऱ्यांनी ठेवलेले नाव ड्रॅगन. कमाऊला स्वत:ला आवडणारे नाव 'सन ऑफ ब्लॅक', काळ्याचं पोर.

काळं कृत्य, काळे धंदे, काळा दिवस, पाप काळं, निषेध काळा, जे जे वाईट ते सर्व काळं. समाजाने काळ्या रंगाला दिलेली दूषणे कमाऊच्या मनात प्रचंड आग पेटवतात. जे वाईट धंदे समाजात घडतात, घडविले जातात, समाजाची बरबादी ज्यांच्यामुळे होते त्या सर्वांचा रंग गोरा परंतु दोष मात्र काळ्या रंगाला. काळ्या रंगाची माणसे जगभर राबतात. शेतामध्ये, कारखान्यात, बांधकामावर, खाणीत, सर्वत्र घाम गळतो तो काळ्यांचा आणि मजा मारणारे मात्र गोरे. गोऱ्यांनी काळ्यांचा तिरस्कार करायचा, त्यांना अर्धपोटी, अशिक्षित, बेरोजगार ठेवायचे आणि त्यांच्या जखमांना मीठ चोळत त्यांच्या रंगाचा उद्धारही करायचा. काळ्या रंगाच्या कमाऊला तो रंगाने काळा आहे याचा विलक्षण अभिमान. त्याचा जीवनात बदल घडवून आणणारे गोरेच. परंतु तरीही गोऱ्यांच्या एकूण वृत्तीबद्दल आणि गोऱ्यांनी त्याला भोगायला लावलेल्या यातनांबद्दल त्याच्या मनात गोऱ्यांबद्दल प्रचंड संताप.

नॉर्थ कॅरोलिना राज्यातील फेअर फिल्ड या गावात कमाऊ राहतो. त्याच्यासोबत त्याच्या घरी मी तीन दिवस राहिलो. महिन्याला १५० डॉलर भाड्याच्या घरात तो एकटाच राहतो. कृष्णवर्णीयांची अमेरिकेतील स्थिती कमाऊ प्रत्यक्ष दाखवित होता. कमाऊ सर्वसामान्य कृष्णवर्णीय नाही. तो आगीचा पेटता गोळा आहे. मार्टिन ल्युथर किंग इतकाच किंबहुना त्यापेक्षा जास्त आभिमान कमाऊला माल्कम एक्सबद्दल आहे. मार्टिन ल्युथर किंगच्या शांतताप्रिय चळवळीने नागरी हक्काची लढाई जिंकली गेली, हे त्याला तितकेसे मान्य नाही. त्यावेळी ज्या दंगली उसळल्या, कृष्णवर्णीयांचा जो उद्रेक झाला, प्रचंड प्रक्षोभ

अमेरिकेत सर्वत्र झाला त्यामुळेच नागरी हक्कांचा विचार अमेरिकन सरकारला करावा लागला असे मानणारे असंख्य कृष्णवर्णीय मला भेटले.

सेल्ड्रा या गावी एका शेतमजूर कुटुंबात कमाऊचा जन्म झाला. जन्मापासूनच तो वर्णद्वेषाची शिकार बनला. तो पाच वर्षांचा असताना आईवडिलांनी फिलाडेल्फियाला मजुरीसाठी स्थलांतर केले. त्यानंतर तो न्यू जर्सी येथे बालमजूर म्हणून काम करू लागला.

''बाळा, गोरे कधीही चुकत नसतात, गोऱ्यांपासून सावध राहा'' कमाऊच्या आईने पाळण्यातच कमाऊला हे धडे दिले. वयाच्या १२ व्या वर्षी कमाऊची आई त्याला सोडून गेली. रडावे कसे हेही तीन आठवडे त्याला कळले नाही. ''तीन आठवड्यानंतर मी एक आठवडा अक्षरश: रडून काढला, जेवलो नाही. वडिलही त्या दरम्यानच केव्हातरी देवाघरी गेले.'' कमाऊने सांगितले.

पोलिसांनी गोळ्या घालून भावाला ठार मारले तो दिवस कमाऊला अजून आठवतो. तो राहात होता ती वस्ती पूर्णपणे कृष्णवर्णीयांची, औषधालासुद्धा एकही गोरा नाही. येणारा गोरा म्हणजे बहुत करून पोलीसच असायचा. त्यांच्या वस्तीतल्या एका कृष्णवर्णीय तरुणीवर बलात्कार करीत असताना कमाऊच्या भावाने अशाच एका गोऱ्याला पाहिले व आरडाओरडा केला. कमाऊच्या आईसमोर कमाऊच्या भावाला गोळ्या घातल्या. कमाऊचे दुसरे दोन भाऊ खाणीत काम करायचे. एकाच दिवशी ते दोघेही भाऊ खाणीत गाडले गेले.

कमाऊचा एकाकी प्रवास सुरू झाला. सन १९६२ मध्ये अमेरिकत नागरी हक्कांच्या चळवळीने जोर धरला होता. कमाऊ १६ वर्षांचा होता. त्याचे सळसळते रक्त त्याला स्वस्थ बसू देत नव्हते. वर्णद्वेष विरोधी चळवळीत तो ओढला गेला. कृष्णवर्णीय तरुणांना उद्ध्वस्त करण्याकरिता वर्णद्वेषी अमेरिकेने कित्येक मार्ग अवलंबिले. कमाऊ त्याचा बळी ठरला. एका गोऱ्या बाईवर बलात्कार केल्याचा व दरोडा घातल्याचा गुन्हा त्याच्यावर दाखल करण्यात आला. पोलिसांच्या भीतीने कमाऊ जॉर्जियाला पळून गेला. दिवसाला दोन डॉलर मजुरीवर त्याने कशीबशी गुजराण केली. एक वर्षानंतर त्याच्या गावी, सॅल्युडा येथे तो पकडला गेला. न्यू जर्सीपर्यंत त्याला मारत, सिगारेटचे चटके देत नेण्यात आले. पोलिसांपासून न्यायाधीशापर्यंत सारेच गोरे. अटकेनंतर त्याला दोन-तीन दिवसांनी ब्रेड दिले गेले. आठ दिवसातून एकदा भाजी दिली जाई. बंडखोर कमाऊला जेलमधील हे अत्याचार सहन झाले नाहीत. त्याच्यातल्या बंडखोरीने उचल खाल्ली. जेलमध्ये सिगारेटचे चटके देणाऱ्या एका जेलरला कमाऊने उचलून आपटले. त्यासाठी कमाऊला एकांतवासाची शिक्षा भोगावी लागली.

केस चालली, कमाऊ वकील देऊ शकत नव्हता. त्याच्यासाठी न्यायालयाने वकिलाची नेमणूक केली. कमाऊला ५५ वर्षांची शिक्षा झाली. नैसर्गिक न्यायाचे तत्त्व पायमल्ली तुडवून त्याला गुन्हेगार ठरविले गेले. ज्या बाईवर बलात्कार केला म्हणून गुन्हा दाखल केला होता, त्या बाईने न्यायालयात जाहीरपणे सांगितले की, बलात्कार करणारा कमाऊ नाही. तरीही आश्यर्चकारकपणे कमाऊ गुन्हेगार ठरला.

जेलमध्ये, तेथील दवाखान्यातसुद्धा कृष्णवर्णीय वर्णद्वेषाचे शिकार बनत होते. जेलमधील एक गोरी नर्स कृष्णवर्णीयांना अक्षरश: जनावरांना देतात त्याप्रमाणे इंजेक्शन देई. निसर्गत: कृष्णवर्णीयांची दाढी व केस कुरळे. त्यांची दाढी करण्याची पद्धत वेगळी. परंतु जेलमध्ये कृष्णवर्णीयांना शारिरीक यातना व्हाव्यात म्हणून त्यांची दाढी गोऱ्यांसारखीच केली जाई. त्यांचा चेहरा रक्तबंबाळ होई. कमाऊने या विरोधी बंड करायचे ठरविले. तुरुंगातील सर्व कृष्णवर्णीयांनी दाढी करायचे नाकारले. कृष्णवर्णीयांच्याच पद्धतीने दाढी केली जावी या मागणीसाठी आंदोलन झाले. हा लढा कृष्णवर्णीयांनी गव्हर्नरच्या हस्तक्षेपाने जिंकला.

तुरुंगात कमाऊने कृष्णवर्णीयांचा इतिहास वाचला. त्याला त्याच्या काळ्या रंगाचा, कुरळ्या केसांचा, राठ ओठांचा अभिमान वाटू लागला. आपण आफ्रिकेत राजे-महाराजे होतो हे त्याला कळले. गोऱ्यांनी त्यांच्या स्वार्थासाठी आपल्याला अमेरिकेत आणले, आपला बाजार मांडला, आपल्याला गुलाम बनविले, आपणास जनावराप्रमाणे वागविले, हे त्याला समजले. गोऱ्यांबद्दल त्याला वाटणाऱ्या तिरस्कारात जेलमध्ये भर पडली. मोठमोठे गुन्हे करणारे, समाजविघातक कृत्य करणारे बहुसंख्य गोरेच दिसत असताना, जेल मात्र काळ्यांनी भरलेला का ? असा प्रश्न त्याला पडू लागला.

कमाऊ अखेर भाग्यवान ठरला. त्याच्या सुदैवाने ॲन्ड्र्यु वॉच हा न्यूयॉर्कमधील ज्यू वकील कमाऊच्या मदतीला धावला. ॲन्ड्र्यु वॉच प्रमाणेच साय काह्न व इतर अनेक ज्यू नागरिक कृष्णवर्णीयांच्या लढ्यात अग्रेसर राहिले. ॲन्ड्र्यु वॉचने कमाऊच्यावतीने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. कमाऊची १० वर्षे तुरुंगात गेली होती. कमाऊ निर्दोष आहे याबद्दल ॲन्ड्र्युची खात्री पटली होती. अमेरिकेच्या न्यायालयीन इतिहासात कमाऊची केस नोंदली गेली. कमाऊ निर्दोष असल्याचा दाखला सर्वोच्च न्यायालयाने सन १९७२ साली दिला. शिक्षा भोगत असणाऱ्या गुन्हेगाराचे निर्दोषत्व शाबित झाले. १८ सप्टेंबर १९७३ रोजी कमाऊचा पुनर्जन्म झाला.

अमेरिकेचे सामाजिक, राजकीय जीवन कमाऊ तुरुंगातून बाहेर आला तेव्हा बदलले होते. दहा वर्षात त्याला एकही नातेवाईक किंवा मित्र तुरुंगामध्ये भेटायला आला नव्हता. याचे शल्य कमाऊला होते. तुरुंगाबाहेर आल्यावर कमाऊने कैद्यांच्या कुटुंबियांना संघटित करायला सुरुवात केली. असंख्य निर्दोष मुले व तरुण तुरुंगात सडत आहेत हे पाहून त्याने त्यांचे प्रश्न सोडवायला सुरुवात केली. त्याच्या प्रयत्नात साय काह्न याने साथ दिली. कमाऊच्या प्रयत्नांना संस्थात्मक रूप प्राप्त झाले. 'फेअर फिल्ड युनायटेड ॲक्शन ॲन्ड ग्रास रुट लिडरशीप' या संस्थेचा संचालक म्हणून कमाऊ काम पाहू लागला. आता साऊथ व नॉर्थ कॅरोलिनामधील कृष्णवर्णीयांना संघटित करण्याचे काम कमाऊ जोमाने करीत आहे.

मला शॅरलोट विमानतळावर पोहोचविण्यासाठी कमाऊ आला होता. आम्ही दोघेही शांत होतो. गाडी १२० मैलाच्या गतीने धावत होती. यापेक्षा अधिक गतीने आम्ही दूर जाणार या विचाराने गहिवरून आले होते. विमानतळावर केव्हा आलो हे कळलेही नाही. निघण्याची वेळ झाली. मिठी मारून कमाऊ ओक्साबोक्सी रडला. आयुष्याशी कणखरपणे, बेडर वृत्तीने लढणारा पोलादी मनाचा कमाऊ प्रेमाच्या ओलाव्याने ओथंबला होता. मागे वळूनही न पाहता मूठ वळवून मी त्याला 'झिंदाबाद'' केला. गेल्या चार दिवसात तो आमचा परवलीचा शब्द झाला होता. ब्लॅक सॅल्युटशी जवळीक साधणारा. . . .

*******

# धंदा... चॅप्टर कोर्ट

ती दुपार अनोखी होती. पोलीस स्टेशनसमोर बरीच गर्दी जमली होती. गर्दी जमण्याचे कारणही तसेच होते. या गर्दीला नेहमीची भीती नव्हती, दहशत नव्हती. या गर्दीत बहुसंख्य आदिवासी आणि गरीब होते. कल्पनेपलीकडले आगळेवेगळे चित्र ही गर्दी आज पाहत होती.

पोलिसांसह पाच-पन्नास जणांना साष्टांग दंडवत घातला जात होता. ''साहेब, माझी चूक झाली, माझी बायका-पोरे आहेत, मी माफी मागतो, तुमचे पाय धरतो... मला माफ करा.'' अशा आर्जवी स्वरात पुन्हा पुन्हा तीच तीच विनवणी केली जात होती. पुन्हा पुन्हा दंडवत घातला जात होता. दंडवत घालणारी व्यक्ती फाटकी, मळकी किंवा गरीब नव्हती. चांगली मध्यमवर्गीय, मध्यमवयीन, नीटनेटकी होती. ज्यांना दंडवत घातले जात होते ते मात्र फाटके दिसत होते.

तालुक्यातील तहसील कार्यालयासमोरचे पोलीस स्टेशन आणि इतर कार्यालये. तहसील कार्यालयात आठवड्यातून दोनदा चालणारे कोर्ट. या कोर्टात चालणाऱ्या केसेस प्रतिबंधात्मक कायद्याबाबतच्या. या कार्यवाहीला चॅप्टर केसेसची कार्यवाही म्हणतात. म्हणून या कोर्टाला म्हणतात 'चॅप्टर कोर्ट'. समाजात शांतता राहावी म्हणून पोलीस जी प्रतिबंधात्मक कारवाई करतात, ते खटले या चॅप्टर कोर्टात चालतात. पोलीस आणि ज्यांच्यावर कार्यवाही केली किंवा करावयाची असते ते सामनेवाले यांची गर्दी नेहमीचीच. सहा महिने खटल्याची मुदत असल्याने सामनेवाल्यांना हैराण करण्यासाठी लगतच्या तारखा देणे हे या कोर्टाचे काम. एका तारखेला पुढची तारीख, त्यानंतर पुन्हा पुढची तारीख असे चक्र.पुढची तारीख देण्यासाठी दर ठरलेला, प्रत्येक सामनेवाल्याकडून पन्नास रुपये.

त्या दिवशी गोविंद शंकर पाटील आणि गोपाळ तपिसर यांची तारीख होती. नेहमीप्रमाणे दुपारनंतर पुकारा झाला. गोविंद आणि गोपाळ यांच्यासोबत असलेले अजून दोन सामनेवाले कोर्टासमोर हजर झाले. हे कोर्ट विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांचे.

कोर्टाजवळच बसलेले असतात भाऊसाहेब, ते कोर्टाला मदत करतात, जबाब घेतात, तारखा देतात. गोविंद, गोपाळ आणि इतर आदिवासींना पुढची तारीख देण्यासाठी कोर्टाने ठरविलेल्या नियमाप्रमाणे २०० रुपयांची मागणी झाली.

सप्टेंबरचा महिना, पीक हाती नाही, कापणीची सुरुवात नाही, हातात पैसा नाही. आज कोणी कर्जही दिलेले नाही. पुढच्या तारखेसाठी भाऊसाहेबाला कोठून पैसे द्यायचे ? हा प्रश्न त्यांना पडला. पुढची तारीख मिळाल्याशिवाय घरीही जाता येणार नाही, काय करावे ? कोर्टाच्या बाहेर येताच त्यांना श्रमजीवी संघटनेचा बाळाराम भोईर दिसला. बाळाराम जेमतेम पंचविशीचा, पण संघटनेच्या कामामुळे लोकप्रिय असलेला, दबदबा असलेला तरुण. गोपाळ आणि गोविंद यांनी ही हकीकत त्याला सांगितली. बाळारामने गोपाळसोबत लक्ष्मण मढवी, गोविंद वेंडगे आणि हिरामण यांना आत पाठवून दिले, बाळाराम मागे उभा राहिला.

''साहेब, हे गरीब लोक आहेत, पैसे कोठून देणार ? त्यांना पुढची तारीख द्या.'' गोविंद वेंडगे म्हणाला.

''नियमाप्रमाणे पैसे द्यावेच लागतील.'' भाऊसाहेबाची अरेरावी सुरू झाली.

बाळाराम पुढे झाला. ''साहेब, हे कोर्ट आहे की बाजार ? तुम्ही इकडे न्याय द्यायला बसला आहात की पैसे खायला ?''

बाळारामचे हे बोलणे ऐकून भाऊसाहेबाचा पारा चढला, तो उठून उभा राहिला, अद्वातद्वा बोलू लागला. चॅप्टर कोर्ट मध्ये पडले. बाळारामला बाहेर जाण्यास सांगण्यात आले.

बाळाराम बाहेर पडताच भाऊसाहेबाला पुन्हा जोर आला. ''हा काथोड्यांच्या जीवावर पोट भरतो आणि आम्हाला शिकवायला येतो.'' हे ऐकताच बाळाराम पुन्हा आत गेला. त्याने भाऊसाहेबाला धारेवर धरले, ''पैसे खाता ते खाता, वर आदिवासींना शिवीगाळ करता, तुमच्यावर कायदेशीर कारवाई केल्याशिवाय मी राहणार नाही.''

तोवर कोर्टाबाहेर गर्दी जमा झाली होती. बाळाराम आपल्या सहकाऱ्यांसह थेट पोलीस ठाण्यात गेला. पोलीस निरीक्षकांना घटना सांगितली. चॅप्टर कोर्टातली केस असल्याने पोलिसांनी फोनवरून कोर्टाशी बोलण्याचा प्रयत्न केला, पण कोर्ट काही फोनवर येईना. पोलिसांनी त्यांची गाडी पाठविली आणि थोड्याच वेळात भाऊसाहेबासह चॅप्टर कोर्ट पोलीस ठाण्यात हजर झाले. खुद्द कोर्टातील भाऊसाहेबाने चारचौघांदेखत जातिवाचक शिवीगाळ करून आदिवासींच्या विरोधात गुन्हा केला होता. पोलीस स्टेशनला येताच भाऊसाहेबाचेच नाही तर चॅप्टर कोर्टाचेही धाबे दणाणले. आता काय होणार याची स्पष्ट कल्पना त्यांना

आली. क्षणार्धात भाऊसाहेबाचा पारा उतरला, दिमाख उतरला, मस्ती जिरली. चॅप्टर कोर्ट स्वत:ला आणि भाऊसाहेबाला वाचविण्यासाठी गयावया करू लागले, बाळारामच्या विनवण्या करू लागले.

ही बातमी सर्वत्र पसरल्यामुळे अनेकजण पोलीस स्टेशनसमोरील गर्दीत सामील झाले. एक पोलीस अधिकारी बाळारामला म्हणाला, ''बाळाराम, तो माफी मागत असेल तर सोडून दे. पाठीवर मार पण पोटावर मारू नकोस.'' ''बाळारामसाहेब, मला माफ करा. मी याबाबतीत तुमच्या पाया पडतो, मला बायका-मुले आहेत. माझी नोकरी जाईल.' भाऊसाहेब म्हणाले. ''मी सुद्धा माफी मागतो, पण कारवाई करू नका,'' चॅप्टर कोर्ट बाळारामला विनवू लागले. ''तुम्ही भरपूर पैसे कमावलेत. नोकरी गेल्याने तुम्हाला काही कमी पडणार नाहा,'' बाळाराम म्हणाला. आणखी एक पोलीस अधिकारी मध्ये पडला.

''माझी चूक झाली, मी पाय धरतो.'' असे म्हणत भाऊसाहेब बाळारामच्या, गोविंदच्या, गोपाळच्या इतकेच नाही तर तेथे असलेल्या ५-५० लोकांच्या चरणी पडला, साष्टांग दंडवत घालू लागला. पोलीस अधिकाऱ्यांचे पाय धरू लागला. चॅप्टर कोर्ट तर भीतीने थरथरत होते. जोडलेले हात काही खाली येत नव्हते. भाऊसाहेब नजीकच्या हॉटेलात पळाला, तेथून थम्सअपच्या बाटल्या स्वत: घेऊन आला. बाळारामने एका अटीवर पोलिसांचे ऐकायचे ठरविले. भाऊसाहेबाने कोर्टात काय झाले ते जसेच्या तसे लिहून दिले पाहिजे आणि यापुढे असे होणार नाही याची हमी दिली पाहिजे. भाऊसाहेबाने पेन उघडले आणि तो लिहून देऊ लागला.

**हमी पत्र**

दि.१७.१०.९६

मी, ————, वय ४०, धंदा: चॅप्टर कोर्ट, तालुका ———ग्रामीण. या कोर्टात १ जानेवारी १९९५ पासून लिपिक म्हणून काम करीत आहे. मी माझ्या कुटुंबासह ————— येथे राहतो.

आज दिनांक १७.१०.९६ रोजी आमच्या कोर्टातून गोविंद शंकर पाटील याला पकड वॉरंट गेले होते. त्याचा जामीन देण्यासाठी तो व इतर आरोपी आमच्या कोर्टासमोर हजर झाले. आमच्या कोर्टाचे विशेष कार्यकारी दंडाधिकारीसाहेबांनी जामीन मंजूर करून घेतले.

आरोपी गोविंद पाटील यांनी माझ्याकडे पुढील तारीख मागितली. ती तारीख देण्याआधी मी त्यांना सांगितले की चहापाण्यासाठी पैसे द्या. मी पैशाची मागणी केल्यामुळे गोविंद पाटील हे श्रमजीवी संघटनेचे सेक्रेटरी बाळाराम भोईर यांना घेऊन आले. त्यांनी विचारले की पैसे कशासाठी मागता, या विषयावरून साहेबांसमोर आमची शाब्दिक बाचाबाची झाली. साहेबांनी समज दिल्यामुळे ते बाहेर गेले. त्यांच्या संघटनेचे दोन सभासद जबाब देण्यासाठी आमच्या कोर्टात होते.

ते जबाब देऊन जात असताना मी बाळाराम भोईर यांना उद्देशून मोठ्या आवाजात ‘‘हा काथोड्यांच्या जीवावर पोट भरतो’’ असे म्हटले. या शब्दांमुळे कोर्टात असणारे, गोपाळ राम तपिसर हे कातकरी असल्यामुळे त्यांचा अपमान झाला असे मला नंतर समजले.

मी ‘काथोडी’ बोललो, हे शब्द बाळाराम भोईर यांना समजल्यावर ते कोर्टात येऊन आमची पुन्हा शाब्दिक बाचाबाची झाली. मी रागाच्या भरात त्यांचे कार्यकर्ते व त्यांना अरेरावी करून अपमानास्पद वागणूक दिली. ही माझी चूक झाली असून मी कार्यकर्त्यांची व गोपाळ तपिसर, गोविंद पाटील, बाळाराम भोईर व लक्ष्मण मढवी यांची पाय धरून जाहीर माफी मागतो.

मी यापुढे कुठल्याही आदिवासी वा गरिबाकडून पैसे मागणार नाही. अशा पद्धतीची वागणूक देणार नाही, असे मी लिहून देतो. यापुढे माझ्याकडून असा गुन्हा घडल्यास माझ्यावर कायदेशीर कारवाई करण्यास ते मोकळे आहेत.

आपला

(सही)

(सही)

समक्ष

विशेष कार्यकारी दंडाधिकारी

यापुढे कोणत्याही आदिवासींकडून, गरिबांकडून पैसे मागणार नाही आणि तुम्हाला त्रासही देणार नाही असे जाहीर आश्वासन चॅप्टर कोर्टाने जमलेल्या गर्दीला, संघटनेच्या कार्यकर्त्यांना हात जोडून दिले. (ही सत्यकथा असून भाऊसाहेबाचे, चॅप्टर कोर्टाचे व तालुक्याचे नाव यात देण्यात आलेले नाही.)

*******

# नरबळी

शोषितांवर होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडून न्याय मिळवून देण्यासाठी संघटकाला काय काय करावे लागते याची ही कहाणी. गुन्ह्याचा तपास कसा करावा लागतो व न्यायदान यंत्रणेसोबत संघटकाला कसे काम करावे लागते याचे वर्णन या प्रकरणात आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील जवळा खुर्द या गावची ही घटना. छगन उर्फ संगीत पवार या सवर्णाच्या विहिरीचे खोदकाम सुरू असताना दिनांक २२ मे १९९३ रोजी सकाळी ११.३०च्या सुमारास राजाभाऊ लोंढे या पंचवीस वर्षे वयाच्या मातंग युवकाचा संशयास्पद मृत्यू झाला. चाळीस फूट खोदूनही विहिरीला पाणी लागत नाही म्हणून विजेवर चालणाऱ्या क्रेनने विहीर अधिक खोल केली जात होती. क्रेन चालकाचे आसन लाकडी होते, बाकी सर्व क्रेन लोखंडी होती. चारशे पंचवीस व्होल्टेजचा विजेचा दाब होता.

अमावस्येच्या दिवशी संगीत पवार, त्याची आई व इतर दोघेजण विहिरीजवळ जमले. प्रथम राजाभाऊ लोंढे क्रेनमध्ये चढला, क्रेनच्या ट्रॉलीसह तो विहिरीत उतरला आणि तळाला जाताच त्याचा मृत्यू झाला.

पोलिसांनी पहिली खबर नोंदविली. त्यात विहिरीच्या तळाला जात असताना राजाभाऊ ''नाग! नाग!'' असे ओरडला व नागाच्या भीतीने, मानसिक धक्क्याने तो मेला असे नोंदविले गेले. पहिल्या खबरेची री ऽ ऽ ओढणारा पंचनामा तयार करण्यात आला. शवविच्छेदन अहवालातही हेच कारण दाखविले गेले व साक्षीदारांचे जाबजबाबही असेच घेतले गेले. गुन्हा दडपण्यासाठी सत्याचा अंश नसलेली कागदपत्रे बनविली गेली. मानवी हक्क अभियानाच्या दत्ता खंडागळेने मला ही घटना कळविली. दिनांक २७ मे १९९३ रोजी मी, मृताचे वडील श्री. लिंबाजी लोंढे यांना त्यांच्या घरी जाऊन भेटलो. त्यांनी संगीत पवारच्या विहिरीला पाणी लागत नाही, म्हणून त्यांच्या मुलाला नरबळी दिल्याचे मला

सांगितले. त्यांच्या म्हणण्यानुसार, १) विहिरीत उतरण्यापूर्वी राजाभाऊची पूजा करून त्याच्या कपाळावर टिळा लावला गेला. २) अमावास्येला शुभकार्याची सुरुवात करीत नाहीत, परंतु बळी मात्र अमावास्येलाच दिला जातो. ३) मातंगाचे रक्त बळी देताना पडले पाहिजेच असे नाही, त्याची हत्या त्या जागी झाली म्हणजे पुरे असे समजले जाते. ४) मातंगाचा मोठा मुलगा बळी द्यावा असा समज आहे. राजाभाऊ हा लिंबाजीचा मोठा मुलगा होता.

**तपासाची सुरुवात :**

पोलिसांच्या कागदपत्रांप्रमाणे राजाभाऊ, ''नाग! नाग!'' असे ओरडून धक्क्याने मेला होता. तर लिंबाजीच्या म्हणण्याप्रमाणे त्याच्या मुलाचा बळी दिला होता. अशी दोन टोकाची मृत्यूची कारणे माझ्यासमोर होती. सत्याचा शोध घेण्यासाठी मी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. मी त्याच दिवशी पोलीस अधीक्षक, गुन्ह्याचा तपास करणारे उपअधीक्षक, शवविच्छेदन केलेले वैद्यकीय अधिकारी, पोलीस पाटील, मृताचा भाऊ भाऊसाहेब लोंढे व प्रेताचा पंचनामा करणाऱ्यांपैकी एक पंच विश्वनाथ कांबळे यांना भेटलो.

मी गुन्ह्याची पहिली खबर, प्रेताचा पंचनामा, घटनास्थळाचा पंचनामा यांचा बारकाईने अभ्यास केला. पहिल्या खबरीनुसार मृत्यूपूर्वी राजाभाऊ ''नाग! नाग!'' असे ओरडला असा उल्लेख होता. प्रेताच्या पंचनाम्यात पायावर खरचटल्याच्या खुणा व तीन छोट्या जखमा असल्याचा उल्लेख होता. प्रेताचा पंचनामा सायंकाळी ५ ते ५.५५ या वेळात झाल्याचे म्हटले होते. पंच विश्वनाथ कांबळेच्या म्हणण्यानुसार पंचनामा रात्रौ ७ ते ८ या वेळेत झाला होता. त्यावेळी शरीरावर काळे-निळे डाग होते, हाताच्या मुठी घट्ट होत्या असे कांबळेंनी सांगितले. विश्वनाथ कांबळेला लिहिता वाचता येत नसल्याने पोलिसांनी पंचनाम्यात काय लिहिले आहे याची त्यांना माहिती नव्हती. पंचनाम्याच्या वेळी हजर असणाऱ्या विठ्ठल भागवत, चंद्रकांत कांबळे आणि मृताचा भाऊ भाऊसाहेब लोंढे यांनी विश्वनाथ कांबळेच्या म्हणण्याला दुजोरा दिला. प्रेताच्या पंचनाम्यात व प्रत्यक्ष परिस्थितीत प्रचंड तफावत असल्याचे लक्षात आले. प्रेताचा पंचनामा सूर्यप्रकाशात अगर प्रखर उजेडात करण्याऐवजी छोट्याशा दिव्याच्या उजेडात केला गेला होता.

शवविच्छेदन अहवालात शरीरावर असणाऱ्या काळ्या-निळ्या डागांचा उल्लेख नव्हता, हे माझ्या निदर्शनास आले. शवविच्छेदन अहवालात मृत्यूचे कारण 'Cardio-respiratory failure due to shock' म्हणजे धक्क्याने हृदयक्रिया बंद पडली असे दिले होते. मी सोबत

नेलेल्या न्याय वैद्यकशास्त्राच्या पुस्तकाचा (Medical Jurisprudence) अभ्यास केला व ज्येष्ठ वैद्यकीयतज्ज्ञांचाही सल्ला घेतला. वैद्यकशास्त्राप्रमाणे धक्का ४ मुख्य विभागात विभागला असून धक्क्याचे एकूण १२ प्रकार आहेत. तपासी अधिकाऱ्यांनी ११ प्रकारचे धक्के वगळल्यानंतरच अखेरीस मानसिक धक्क्याच्या निर्णयाप्रत यावे अन्यथा नाही असे शास्त्र सांगते. वैद्यकीय अधिकाऱ्याने धक्क्याने मृत्यू असे कारण दिले होते पण धक्क्याचा प्रकार कोणता हे स्पष्ट केले नव्हते. नाग पाहिल्याने भीतीपोटी मानसिक धक्क्याने मृत्यू झाला असे सोयीचे कारण पोलिसांनी घेतले. विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला असण्याच्या शक्यतेचा विचार करण्यात आला नव्हता.

**माझा निष्कर्ष :**

राजाभाऊ दलित तरुण होता. नाग पाहणे त्याला नवे नव्हते. पाण्यातील साप विषारी नसतात हे गावातील शेंबड्या मुलालाही ठाऊक असते. त्यामुळे नाग पाहिल्याचा धक्का बसून तत्काळ प्राण जाणे राजाभाऊच्या बाबतीत शक्यच नव्हते. वैद्यकशास्त्राप्रमाणे मानसिक धक्क्याने मृत्यू येऊ शकतो. असा मानसिक धक्का बसून त्याचा मृत्यू झाला असेल असे गृहीत धरले तर तो ''नाग! नाग!'' असे ओरडला हे शक्य नाही. राजाभाऊला विहिरीबाहेर काढताच विलास भक्ते व लक्ष्मण माळी विहिरीत उतरले होते परंतु त्यांनी आपल्या जबाबात नाग पाहिल्याचे सांगितले नव्हते.

**पाठपुरावा :**

स्थानिक पोलीस व वैद्यकीय अधिकारी गुन्हा दडपण्यासाठी आरोपीला साथ देत आहेत याबद्धल माझी खात्री झाली. राजाभाऊचा मृत्यू मानसिक धक्क्याने झाला नसून विजेच्या धक्क्याने त्याला ठार मारले गेले असल्याचे माझ्या लक्षात आले. सदरचा तपास नागरी हक्क संरक्षण शाखेकडे द्यावा म्हणून मी पोलीस महासंचालकांना भेटलो. या शाखेने तपास करून जमीन मालक, संबंधित पोलीस अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व विद्युत मंडळाचा अधिकारी यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल केला.

सवर्ण विरोधकांनी आपले राजकीय वजन वापरून खुनाच्या गुन्ह्याचा तपास गुन्हे अन्वेषण खात्याकडे सोपविला. त्यांनी गुन्ह्याची तीव्रता कमी करून सर्व सरकारी अधिकाऱ्यांना त्यातून वगळले आणि सदोष मनुष्यवधाऐवजी निष्काळजीपणाने मृत्यू असा आरोप ठेवला.

मला राजाभाऊला न्याय मिळवून देण्यासाठी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात दावा दाखल करण्याशिवाय पर्याय राहिला नाही. आधीच्या आरोपींशिवाय,

गुन्ह्याची तीव्रता कमी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यालाही मी आरोपी केले. अत्याचार प्रतिबंधक कायद्याखाली हा गुन्हा मी दाखल केला. माझे साक्षीदार म्हणून पोलीस महानिरीक्षक श्री. टी.के. चौधरी यांना न्यायालयात साक्षीसाठी बोलाविले. त्यांनी त्यांचे पोलीस सेवेतील भवितव्य पणाला लावून एका दलिताला न्याय मिळवून देण्यासाठी आपल्या खात्यातील अधिकाऱ्यांविरुद्ध साक्ष दिली. न्यायालयाने साक्षी नोंदवून, माझे म्हणणे ग्राह्य धरून खुनाचा गुन्हा पुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले.

*******

# शिक्षणाच्या हक्कासाठी

वंचित मुलांच्या प्राथमिक शिक्षणासंदर्भातले राज्याचे धोरण बदलणाऱ्या यशस्वी लढ्याचे हे वर्णन. 'श्रमजीवी संघटना', 'विधायक संसद' व 'समर्थन'च्या संघटित प्रयत्नांमुळे राज्यातील शाळाबाह्य लाखो मुलांना प्राथमिक शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला. प्राथमिक शिक्षणाच्या मुद्द्यावर हजारोंना संघटित करून श्रमजीवी संघटनेने अनेक लढे उभारले. भोंगा शाळा चालवून विधायक संसदने पथदर्शक प्रयोग केला. त्यावेळी विधायक संसदचा प्रकल्प असणाऱ्या अर्थसंकल्प अध्ययन केंद्राने शासनाचे प्राथमिक शिक्षणविषयक धोरण आणि त्या अनुषंगाने राज्याच्या अर्थसंकल्पात केल्या जाणाऱ्या आर्थिक तरतुदी व खर्च यांचे प्रभावी विश्लेषण केले. 'समर्थन'ने भोंगा शाळांच्या धर्तीवर प्राथमिक शिक्षणाची नवी योजना शासनाने स्वीकारावी म्हणून विधिमंडळ सदस्य, राज्याचे प्रशासन व प्रसारमाध्यमांसोबत काम केले.

१९९५-९६ साली विधायक संसदने श्रमजीवी संघटनेच्या सहकार्याने भोंगा शाळा सुरू केल्या तेव्हा हा लढा सुरू झाला. विटभट्टीवर पालकांसोबत हंगामी स्थलांतर करणाऱ्या मुलांसाठी स्थलांतराच्या काळात (साधारण नोव्हेंबर ते मे) विटभट्टीच्या जागीच भोंगा शाळा चालतात. (भोंगा म्हणजे विटभट्टीवर काम करणारे आदिवासी राहण्यासाठी बांधतात ती झोपडी. विटभट्टीवरील शाळा अशा भोंग्यातच भरते.) पावसाळ्यानंतर ठाणे जिल्ह्यातील आदिवासी कामाच्या शोधात, शहराच्या जवळील विटभट्ट्यांवर मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करतात. याला ते 'जगण्यासाठी' जाणे असे म्हणतात.विटभट्ट्यांवरील ५-६ वर्षांचीही मुले डोक्यावरून विटा वाहून नेण्याचे काम करीत. पहाटे चारच्या सुमारास ते कामाची सुरुवात करीत व रात्री उशिरापर्यंत काम चाले. चिखल तयार करणे, साच्यातून विटा पाडणे, भट्टीपर्यंत त्या पोहचविणे, तयार विटा ट्रकमध्ये चढविणे, कोळसा बारीक करणे आदी कामे मुलेही करीत. काही मुले

बाळग्याचे (लहान भावंडांना सांभाळण्याचे) काम करीत. यातील काही मुले मूळ गावच्या शाळेत दाखल होत असत परंतु स्थलांतरामुळे त्यांच्या शिक्षणात खंड पडे.

भोंगा शाळेत आदिवासी युवकांनाच प्रशिक्षण देऊन शिक्षक म्हणून नियुक्त केले जाते. या प्रशिक्षणावर विधायक संसदने विचारपूर्वक परिश्रम घेतले आहेत. श्रमजीवी संघटनेच्या सभासदांसोबत शिक्षक कारवीच्या तात्पुरत्या शाळा उभ्या करतात. पुरुष शिक्षक शाळेतच निवास करतात. शिक्षक मुलांना घरून शाळेत आणणे व त्यांना परत घरी पोहोचविणे, त्यांच्या पालकांचे विटभट्टीवरील हिशोब करणे आदी कामेही करतात.

१९९५-९६ साली पाच शाळा आणि ५०० विद्यार्थ्यांनी सुरू झालेला हा प्रकल्प १० वर्षात २५,००० मुलांपर्यंत पोहोचला आहे. या प्रकल्पाच्या सुरुवातीच्या काळात अनेकदा संघर्ष करून जिल्हा प्रशासनाचे सहकार्य मिळवावे लागले आहे.

**लढ्याचे पहिले पाऊल :**

विधायक संसदने भोंगा शाळा सुरू केल्यानंतर जिल्हा प्रशासनाने या शाळा अधिकृत नाहीत अशी संतापजनक भूमिका घेतली. त्यांनी आर्थिक सहकार्य तर दिले नाहीच पण शाळांना साध्या भेटीही दिल्या नाहीत. जिल्हा परिषदेनेच भोंगा शाळेतील मुलांच्या परीक्षा घ्याव्यात ही मागणीही मान्य केली नाही. त्यांच्या या उदासीन भूमिकेचा निषेध करण्यासाठी ८ मार्च १९९६ ला महिला दिनी संघटनेच्या महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयाला घेराव घालून परीक्षा घेण्यास जिल्हा प्रशासनाला भाग पाडले.

विधायक संसदने महाराष्ट्र सरकारविरोधातील दृक्-श्राव्य स्वरुपातील याचिका राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाकडे दाखल केली. विटभट्टीवर काम करणाऱ्या मुलांचे व्हिडीओ चित्रण करून सरकारचा उदासीन दृष्टिकोन याचिकेत स्पष्ट केला गेला. वीटभट्टीवर बालकाने काम करण्यास कायद्याने बंदी घालावी व वीटभट्टी उद्योग बालकामगारांसाठी धोकादायक उद्योग म्हणून जाहीर व्हावा, अशी विनंती याचिकेत करण्यात आली होती. आयोगाने याचिका दाखल करून घेतली व मुख्य सचिवांना याचिकेचे उत्तर देण्यासाठी नोटीस बजावली. पुढे १९९९ साली विटभट्ट्या व कौलांचे कारखाने हे उद्योग बालकामगारांसाठी धोकादायक ठरवून देशभर अशा उद्योगात काम करण्यास बालकामगारांना बंदी घालण्यात यावी असा निर्णय आयोगाने दिला.

१९९५ते ९७ या दोन वर्षांत भोंगा शाळा चालविताना मालकांच्या विरोधालाही तोंड द्यावे लागले. ज्यू नांदुर्खी गावात वीटभट्टी मालकांनी भोंगा शाळा शिक्षकाला जबर मारहाण केली.

कामण गावी शिक्षक शाळेत झोपला असताना रात्री दगडफेक करण्यात आली. पाये गावी सर्व मालकांनी एकत्र येऊन शाळेसाठी जागा नाकारली. वीटभट्टी मालक, स्थानिक पुढारी यांचा विरोध अपेक्षित होता. मात्र जिल्हा प्रशासनाची उदासीनता संतापजनक होती.

याचिका दाखल झाल्याचे कळताच जिल्हा प्रशासनाने मात्र सहकार्याचा हात देऊ केला. अप्पर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरावर बालकामगार प्रकल्प सोसायटीची स्थापना झाली. सोसायटीच्या कार्यकारी मंडळावर माझी नियुक्ती केली गेली. सोसायटीचे अध्यक्ष अप्पर आयुक्त, आदिवासी विकास असल्याने, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शिक्षण अधिकारी, जिल्हा कामगार अधिकारी, सभांना हजर राहण्याच्या बाबतीत उदासीन असत.

आदिवासी विकास विभागाने भोंगा शाळेतील विद्यार्थी मूळ गावी परत जातील तेव्हा पाठपुराव्यासाठी साह्य करावे अशी आमची अपेक्षा होती. हे विद्यार्थी गावच्या शाळेत दाखल व्हावेत व त्यांचे शिक्षण पुढे चालू राहावे म्हणून स्थानिक तरुणांना सोबत घेऊन त्यांचे अभ्यासवर्ग चालविण्यासाठी आदिवासी प्रकल्पाने साह्य करावे, असे प्रकल्प अधिकाऱ्याने मान्यही केले. परंतु ते अमलात आणले नाही.

अप्पर आयुक्तही याबाबत उदासीनच होते. संस्थेने केलेल्या पत्रव्यवहाराची ते साधी पोचही देत नसत. आम्ही अधिक पाठपुरावा केल्यावर विटभट्ट्यांवर बालकामगार नाहीतच, अशी आडमुठी भूमिका त्यांनी घेतली. शिक्षकांना मजुरांच्या किमान वेतनापेक्षाही कमी वेतन दिले जात होते. ते आणखी कमी करण्याचे त्यांनी सुचविले. त्याचसोबत त्या भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये या मुलांना दाखल करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

अप्पर आयुक्तांनी आपली जबाबदारी जाणीवपूर्वक जिल्हा परिषदेवर टाकली. त्यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र लिहून, स्थलांतरीत मुले जिल्हा परिषदेच्या नियमित शाळेत दाखल करता येतील का याची विचारणा केली. जिल्हा परिषदेला साहजिकच होकार कळवावा लागला. वसईतील तीन व भिवंडीतील दहा शाळांमध्ये या मुलांना सामावून घेण्याचे त्यांनी कळविले. हा पत्रव्यवहार आयुक्तांनी सोसायटीच्या सभेत वाचून दखविला. मी या पत्राचे स्वागत केले आणि सर्व ३८ भोंगा शाळा तात्काळ बंद करण्याचा निर्णय जाहीर केला.

मूळ गावी शाळेत न गेलेले भोंगा शाळांमधील अनेक विद्यार्थी डिसेंबरमध्ये अभ्यासाची सुरुवात करतात तर जिल्हा परिषदेचे नियमित विद्यार्थी जूनमध्ये. त्यामुळे भोंगा शाळांना

नेहमीच्या रजा देणे शक्य नसते. बहुसंख्य विद्यार्थी आपल्या कुटुंबात प्रथमच शिकणारे विद्यार्थी असतात, त्यामुळे शाळेत आणण्यासाठी पालकांच्या मनाची तयारी करावी लागते. मुलांना घरून आणणे व पोहचविणे हे कामही शिक्षकास करावे लागते. यातील बहुसंख्य मुले कुपोषित असल्यामुळे त्यांना पूरक आहारही द्यावा लागतो.

फेब्रुवारी ९८ मध्ये सर्व भोंगा शाळा बंद करण्यात आल्या. भोंगा शाळा शिक्षकांनी पहिल्या दिवशी सर्व मुलांना एकत्र करून नजिकच्या जिल्हा परिषद शाळेत नेऊन सोडले व त्या दिवशी हजर असलेल्या मुलांच्या यादीवर जिल्हा परिषद शिक्षकांकडून पोच घेतली. त्यानंतर रोज जिल्हा परिषद शाळेत जाऊन या विद्यार्थ्यांची हजेरी घेणे सुरू झाले. विद्यार्थ्यांची उपस्थिती दिवसागणिक रोडावत गेली. शिरवली आणि परशुराम पाडा येथील शाळेत दुसऱ्या दिवसापासून एकही विद्यार्थी गेला नाही. मुले जिल्हा परिषद शाळेतून पळून भोंगा शाळेच्या झोपडीत येऊन बसली.

भोंगा शाळा शिक्षकांनी जिल्हा परिषद शाळेत रोज हजेरी लावून नोंदविलेली निरीक्षणे :

१) विटभट्टीवरील मुलांना वर्गात न बसविता व्हरांड्यात बसविले गेले. याबाबत मुख्याध्यापकाला सांगितले असता त्यांनी विद्यार्थ्यांना वर्गात घेतले. वर्गात बसायला जागा नव्हती.

२) माझ्या भोंगा शाळेतील मुले तीन जिल्हा परिषद शाळांमध्ये विभागली गेली. जिल्हा परिषदेचा एकही शिक्षक मुलांना शाळेत आणण्यासाठी त्यांच्या घरी गेला नाही. एक शिक्षक गेला, त्यांनी काही मुले आणली तोवर दुपारचे १२.३० वाजून गेले होते.

३) मी दुपारी शाळेत गेलो. मुले भुकेने रडत होती. त्यांना दुपारचे जेवण देण्याविषयी मुख्याध्यापकांना सांगितल्यावर त्यांनी असमर्थता व्यक्त केली. मुले शाळेतून पळून घरी गेली.

४) भोंगा शाळेतल्या मुलांमुळे एका शाळेतील पट वाढल्यामुळे जिल्हा परिषदेने दुसऱ्या शाळेतला शिक्षक त्या शाळेत नेमला. ज्या शाळेतून शिक्षक काढला गेला तेथील गावकरी त्यांच्या विद्यार्थ्यांचे नुकसान होते म्हणून तक्रारी करू लागले.

संघटनेने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना भेटून वरील निरीक्षणे सांगितली. जिल्हा परिषद शाळेमार्फत वीटभट्टीवरील स्थलांतरित मुलांना शिकविणे शक्य नाही या निष्कर्षाला तेही आले. अखेर विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी भोंगा शाळा पुन्हा सुरू करण्याचे ठरले. बंद केल्यापासून आठवडाभरातच सर्व भोंगा शाळा पूर्ववत सुरू झाल्या.

भोंगा शाळेद्वारे दरवर्षी सुमारे २००० विद्यार्थ्यांना विधायक संसद शिकवू शकत होते. केवळ ठाणे जिल्ह्यातच २५ हजारांहून अधिक मुले वीटभट्टीवर स्थलांतरित होत होती. याशिवाय राज्यभरात कितीतरी मुले हंगामी स्थलांतरामुळे शिक्षणापासून वंचित होती व आहेत. स्थलांतरित होणारी मुले आदिवासी असल्याने आदिवासी विकास व शिक्षण विभाग या दोन्हीही खात्यांची जबाबदारी होती. या मुलांना शिकण्यासाठी आर्थिक तरतूद नाही, असा बचाव सरकार घेऊ शकत नव्हते. स्थलांतरित मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न अधिकच उग्र रूप धारण करू लागला.

**माहितीची जमवाजमव व विश्लेषण :**

बालकामगार अधिनियम, १९८६ हा मुलांच्या शिक्षणाबाबत प्रभावी कायदा नसल्याचे आमच्या लक्षात आले. त्याचा आधार घेऊन संघर्ष करण्याऐवजी प्राथमिक शिक्षणाच्या अधिकाराबाबत उन्नीकृष्णन विरुद्ध आंध्र प्रदेश सरकार या खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या अत्यंत उपयुक्त निवाड्याचा आधार घेण्याचे ठरले. संविधानाच्या अनुच्छेद ४५ नुसार प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हे मार्गदर्शक तत्त्व होते. या तरतुदीला १० वर्षांची कालमर्यादा असल्याचे उन्नीकृष्णन विरुद्ध आंध्र प्रदेश सरकार या खटल्यात न्यायालयाने स्पष्ट केले होते. संविधानाच्या स्वीकृतीनंतर दहा वर्षांच्या आत चौदा वर्षांखालील सर्वांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणे शासनास बंधनकारक होते. दहा वर्षांनंतर ते मार्गदर्शक तत्त्व न राहता तो मूलभूत अधिकार झाला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या या निवाड्याचा आधार घेऊन केवळ विटभट्टीवरील मुलांच्या शिक्षणाचा आग्रह धरण्याऐवजी, राज्यातील शिक्षणापासून वंचित असलेल्या सर्व मुलांना प्राथमिक शिक्षणाचा मूलभूत अधिकार मिळाला पाहिजे, अशी आम्ही प्रश्नांची मांडणी केली. बांधकामावरील मुले, वेश्यांची मुले, रस्त्यावरील मुले, गुराखी मुले या सर्वांना शिक्षणाचा अधिकार मिळावा म्हणून लढण्याचे आम्ही ठरविले.

राज्य शासनाचे शिक्षणविषयक धोरण, बालकामगार कायदा, साखर कामगारांसाठी असलेला शासनाचा ठराव, सर्वोच्च न्यायालयाचे निवाडे, राज्याचा अर्थसंकल्प यांचा अभ्यास करण्यास अर्थसंकल्प अध्ययन केंद्राने सुरुवात केली. केंद्रीय कामगार मंत्रालयाचा १९९६-९७ चा वार्षिक अहवाल मिळविला. व्ही. व्ही. गिरी राष्ट्रीय कामगार संस्थेने प्रकाशित केलेला 'बालकामगार : आव्हान व प्रतिसाद' हा अहवालही मिळविला.

बालकामगारांची संख्या व स्थिती पाहिल्यानंतर 'प्रचंड आव्हानाला' शासन 'अल्पसा प्रतिसाद' देत असल्याचे लक्षात आले. या पुस्तिकेला शासनाच्याच भाषेत संस्थेकडील

माहितीच्या आधारे प्रतिउत्तर देणारी पुस्तिका अर्थसंकल्प अध्ययन केंद्राने प्रकाशित केली. 'बालकामगार : प्रचंड आव्हान, अत्यल्प प्रतिसाद' हे शीर्षक पुस्तिकेला दिले. पुस्तिकेच्या शेवटी वंचित मुलांच्या शिक्षणासाठी सरकारने धोरण आखावे यासाठी विधिमंडळ सदस्यांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन करण्यात आले.

**कृतीची सुरुवात :**

त्या वर्षी राज्य शासनाचा अर्थसंकल्प २३ मार्च रोजी सादर होणार असल्याने आंदोलनासाठी २४ मार्च हा दिवस निश्चित केला. त्यापूर्वी इंडियन एक्स्प्रेस, लोकसत्ता, जनसत्ता आणि सकाळ या वर्तमानपत्रांचे वार्ताहर प्रत्यक्ष भोंगा शाळेला भेट देण्यासाठी आले होते. विद्यार्थी, शिक्षक, पालक यांच्या मुलाखती घेतल्या. मुले सरकारसाठी भीक मागणार असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या.

प्राथमिक शिक्षणाविषयी सहानुभूती असलेल्या विधिमंडळ सदस्यांना 'समर्थन' संस्थेच्या सहकार्याने संघटनेचे कार्यकर्ते भेटले. अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी विधिमंडळाच्या उभय सभागृहांसमोर राज्यपालांचे अभिभाषण झाले होते. या अभिभाषणावरील चर्चेत वंचित मुलांच्या शिक्षणाच्या मुद्द्याचा उल्लेख व्हावा म्हणून आमचे प्रयत्न होते. माजी गृहराज्यमंत्री श्री. अरुण मेहता यांनी त्यांच्या भाषणात हा मुद्दा उचलण्याचे मान्य केले. विधान परिषदेत अरुण मेहतांशिवाय श्री. व्यंकप्पा पत्की, श्री. पी. जी. दस्तूरकर आदी आमदारांनीही हा मुद्दा उचलला. बालकामगारांची पुस्तिका 'समर्थन'ने सर्व विधिमंडळ सदस्य आणि पत्रकारांना दिली होती.

दुसरीकडे श्रमजीवी संघटना लढ्याची आखणी करीत होती. सरकारसाठी भीक मागून मुख्यमंत्री निधीत ती जमा करण्याचे ठरविण्यात आले. या कृतीमुळे लढ्याला नाट्यमय वळण मिळणार होते. भीक मागण्यासाठी बांबूच्या मोठ्या टोपल्या बनविण्यात आल्या. भोंगा शाळेतील पाचशे मुलांसह विविध तालुक्यांतून चार हजार लोक सहभागी होतील असा अंदाज केला. आझाद मैदानात पोहोचण्यासाठी दोन मार्गांनी लोकांना नेण्याचे ठरले.

मुंबईमधील संघटनेच्या हितचिंतकांनी मुलांसाठी जेवण, सर्वांसाठी पाणी, व्यासपीठ आणि ध्वनिक्षेपकाची व्यवस्था केली. आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मुंबईतील झोपडपट्टीतील कार्यकर्ते आले. 'समर्थन' मधील अनिल म्हात्रे व विलास सुवरे मुख्यमंत्र्यांची भेट ठरविण्यासाठी व आमदारांना माहिती देण्यासाठी प्रयत्न करीत होते.

**प्रत्यक्ष कृती :**

प्रत्यक्ष कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आझाद मैदानात हजर होते. दुपारी बाराच्या सुमारास तळपत्या उन्हात सहाशे मुले व चार हजार लोक सहभागी झाले. मुलांच्या हातात फलक होते. ती छायाचित्रकार व चॅनल्सचे पत्रकार यांचे आकर्षण ठरली. विधान परिषद सदस्य दस्तूरकर आझाद मैदानात आले. त्यांनी भिकेच्या टोपल्यात पहिली भीक टाकली. त्यानंतर मुलांनी, उपस्थित लोकांनी, पत्रकारांनी आणि पोलिसांनीही सरकारसाठी चार-आठ आण्याची भीक टाकली. एकूण एक हजार तीस रुपये तीस पैसे जमा करण्यात आले. 'सरकारला लागली भीक, मुलांना म्हणते शिक' ही प्रमुख घोषणा होती.

**आगळेवेगळे शिष्टमंडळ :**

विरोधी पक्षनेते मधुकरराव पिचड यांनी मुख्यमंत्र्यांची ५.१५ ची वेळ घेतली आहे व ते आमची वाट पाहत आहेत असा निरोप समर्थनच्या अनिल म्हात्रेने आणला. आम्ही चार बालकामगारांची निवड शिष्टमंडळासाठी केली. पुस्तिकेच्या मुखपृष्ठावर डोक्यावर विटा घेतलेल्या ज्या मुलीचा फोटो होता ती मुलगी शिष्टमंडळात होती. जमविलेले सर्व पैसे भिकेच्या मोठ्या टोपलीऐवजी छोट्या टोपलीत एकत्र केले. पोलीस शिष्टमंडळाला घेऊन विधानभवनाकडे पोहोचले. लहू पासारी व जानू मेघवाले यांनी परंपरागत आदिवासी वेशानुसार कमरेला फक्त रुमाल बांधून खांद्यावर गाठोडे घेतले होते. पोलिसांनी त्यांना विधानभवनात प्रवेश नाकारला. संघटनेने आग्रह धरल्यावर अखेर त्यांना आत घेण्यात आले. भिकेचे टोपलेही विधानभवनात नेऊ देण्यास पोलिसांनी मज्जाव केला. आम्ही त्यावर अधिक वाद न घालता मुख्यमंत्र्यांना चेक देण्याचा निर्णय घेतला.

आमदार अरुण मेहता, व्यंकप्पा पत्की व पी. जी. दस्तूरकर शिष्टमंडळासमवेत मुख्यमंत्र्यांकडे आले. मुख्यमंत्र्यांनी हात जोडून पत्रकारांना बाहेर जाण्याची विनंती केली. शिष्टमंडळातील मुले मुख्यमंत्र्यांच्या समोर बसली होती. तीनही आमदारांनी पुस्तिकेचा चांगला अभ्यास केला होता. स्थलांतरीत मुलांसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात कशी तरतूद नाही हे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी यांना पटवून दिले. भोंगा शाळेला अनुदान देण्याचे त्यांनी मान्य केले. परंतु राज्यातील सर्व मुलांच्या शिक्षणाचे धोरण सरकारने आखावे ही आमची मागणी होती.

अशा मुलांसाठी काय करावे ते दोनच वाक्यात सांगावे असे मुख्यमंत्र्यांनी मला सुचविले. तेव्हा मुख्यमंत्र्यांनी कृतिगट स्थापन करावा व त्या कृतिगटात मला घ्यावे असे

आमदार व्यंकप्पा पत्की यांनी सुचविले. ते मुख्यमंत्र्यांनी त्वरित मान्य करून अतिरिक्त मुख्य सचिव अरुण बोंगीरवार यांना तशा सूचना दिल्या.

पत्रकार निघून गेल्यावर अरुण मेहतांनी, मुलांनी सरकारसाठी भीक जमा केल्याचे मुख्यमंत्र्यांना सांगितले. त्या रकमेचा चेक एका मुलाच्या हस्ते मुख्यमंत्र्यांना देण्यासाठी पुढे केला. मुख्यमंत्र्यांनी ओशाळून हात जोडून चेक संघटनेला परत दिला.

**आनंदोत्सव :**

आझाद मैदानात परत आल्यावर जानू मेघवाले याने वारली भाषेत अत्यंत प्रभावी भाषण केले. त्याच्या पारंपरिक आदिवासी वेशाने आणि भाषेने पत्रकार व इतर बघ्यांवर छाप टाकली. मी आंदोलनाच्या विजयाबद्धल माहिती देऊन सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले व जमलेले पैसे अपंगांसाठी काम करणाऱ्या भिवंडीच्या 'भैरव सेवा समिती' या संस्थेस प्रदान केले. कार्यक्रम संपण्यास उशीर झाला तरी सर्व लोक आनंदाने तासभर नृत्य करीत राहिले व विजयाचा आनंद साजरा केला.

**कार्यक्रमानंतर :**

कार्यक्रमानंतर मराठी व इंग्रजी प्रसिद्धीपत्रक 'समर्थन'च्या कार्यकर्त्यांनी सर्व वर्तमानपत्र व चॅनल्सना पाठविले. पत्रकारांचे अधिक माहिती विचारणारे फोन आले. मुख्यमंत्र्यांनी त्वरित पाऊल उचलून कृतिगट स्थापन करण्याचे आदेश दिले, त्याबद्दल त्यांचे आभार मानणारे पत्र देण्यात आले.

**प्रसिद्धी :**

'सरकारला लागली भीक, मुलांना म्हणते शिक' हे फलक हातात असलेल्या मुलांचे फोटो दुसऱ्या दिवशी सर्व वर्तमानपत्रांमध्ये ठळकपणे छापून आले, चॅनल्सनीही ठळक प्रसिद्धी दिली.

**पुढचा टप्पा :**

मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर ७ महिने उलटले तरी कृतिगट स्थापन झाला नाही. म्हणून १३ नोव्हेंबर रोजी बालदिनाच्या पूर्वसंध्येला सत्याग्रह करण्याचा निर्णय झाला. महात्मा गांधींनी घालून दिलेल्या नियमानुसारच सत्याग्रह करण्याचे ठरविले. म्हणून आम्ही करणार असलेल्या कृतीचा तपशील पोलिसांना कळविला. शासनाच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालय आम्ही बंद पाडण्याचे ठरविले. ही प्रतीकात्मक कृती होती. शासनाचे प्रतिनिधी

म्हणून जिल्हाधिकारी कार्यालय निवडले गेले. सत्याग्रहाची पूर्ण माहिती आम्ही जिल्हाधिकारी व पोलीस आयुक्त यांना भेटून दिली. ते दोघेही काहीसे नाराज होते, परंतु त्यांनी आम्हाला विरोध केला नाही.

प्रसिद्धीमाध्यमांच्या प्रतिनिधींना भोंगाशाळेविषयी आधीच माहिती होती व आम्ही हाती घेतलेल्या मुद्द्यांविषयी त्यांना सहानुभूती होती. या सर्वांनी सत्याग्रहाच्यावेळी उपस्थित राहण्याचे मान्य केले.

याच दरम्यान 'मुख्यमंत्र्याचा वचनभंग' या शीर्षकाची पुस्तिका आम्ही प्रकाशित केली. या पुस्तिकेसाठी राज्य सरकारच्या शिक्षणविषयक धोरणाचे विश्लेषण, शिक्षण खात्याच्या कार्यक्रम अंदाजपत्रकाचे विश्लेषण व आमची शाळा प्रकल्पाचे विश्लेषण अर्थसंकल्प अध्ययन केंद्राने केले होते. स्थलांतरीत बालकामगारांची समस्या कोणत्याही धोरणात प्रतिबिंबित झाली नाही हे आम्ही सिद्ध केले.

१३ नोव्हेंबर रोजी पाचशेहून अधिक लोक सत्याग्रहात सहभागी झाले. पंचवीस-पंचवीसच्या गटाने सत्याग्रह करण्याचे ठरविले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या काही अंतरावर पंचवीस-पंचवीसच्या गटाने सर्वजण बसले. सत्याग्रह कसा करणार ते मी लोकांना व पोलिसांना समजावून सांगितले. पंचवीस जण प्रवेशद्वाराकडे जातील व ते जिल्हाधिकारी कार्यालयात शिरण्याचा प्रयत्न करतील. पोलीस सत्याग्रहींना थांबवू शकतील आणि अटक करू शकतील. परंतु सत्याग्रही अटकेचा शांतपणे प्रतिकार करतील.

सत्याग्रह सुमारे दोन तास चालला. पंचवीसचा जथ्था जागेवरून उठून प्रवेशद्वारापाशी जाई. पोलीस त्यांना अडवीत. सत्याग्रही तरीही पुढे जात. अटकेला विरोध करीत. पहिल्या तुकडीतील सर्व पंचवीस सत्याग्रहींना अटक झाल्यावर दुसरी तुकडी सत्याग्रहासाठी पुढे जाई व अटक करवून घेई. एक तुकडी अटक होताना बाकीचे सत्याग्रही घोषणा देऊन त्यांना प्रोत्साहन देत.

पोलिसांचे पूर्ण सहकार्य सत्याग्रहास मिळाले. त्यांनी लाठ्या हातात घेतल्या नाहीत. अटक करताना कोणालाही दुखापत होईल असे काही केले नाही. सत्याग्रहींनी अटकेला विरोध न करता अटक करवून घ्यावी म्हणून ते विनंतीही करीत. आमच्या मागणीबद्दल त्यांना सहानुभूती होती. आम्हाला अटक करताना त्यांना वेदना होत होत्या असे अनेकांनी मला नंतर सांगितले. अटकेनंतर सत्याग्रहींना जवळच्या एका स्टेडियममध्ये नेण्यात आले. तेथे गाणी, नृत्य करून सत्याग्रहाचा आनंद आम्ही साजरा केला, पोलीस व पत्रकारही त्यात सामील झाले.

**विजय :**

दुसऱ्या दिवशी पुढील लढ्याच्या आखणीबद्दल आमची बैठक सुरू होती. त्याच वेळी राज्य सरकारचा लखोटा माझ्या हाती आला. १२ नोव्हेंबर १९९९ रोजी प्राथमिक शिक्षणासाठी कृतिगट स्थापन केल्याचा निर्णय त्यात होता. माझ्याशिवाय ज्या आमदारांनी शिष्टमंडळात सहभाग घेतला होता त्या तीनही आमदारांचा कृतिगटात समावेश केलेला होता. याच कृतिगटाने राज्यातील शिक्षणापासून वंचित असणाऱ्या प्रत्येक बालकाला शिक्षणाचा हक्क देणारी महात्मा फुले शिक्षण हमी योजना तयार केली. आमच्या लढ्याला अशा तऱ्हेने यश मिळाले.

*******

# भाग ३

# विधिमंडळ

**लोकशाही राज्यव्यवस्था :**

समाजाचे नियमन करण्यासाठी, समाजातील व्यक्तींच्या परस्परातील संबंधांचे नियंत्रण करण्यासाठी कायदे बनविले जातात. कायदेभंगासाठी शिक्षेची तरतूद कायद्यात केली जाते. कायदा बनविणारी, कायदा राबविणारी आणि शिक्षा देणारी स्वतंत्र यंत्रणा लोकशाही राज्यव्यवस्थेने निर्माण केली आहे. कायदे काळाच्या गरजेप्रमाणे व समाजाच्या आवश्यकतेनुसार बदलत राहतात.

कायदे मंडळ, कार्यपालिका व न्यायपालिका ही भारतीय लोकशाही राज्यव्यवस्थेची तीन अंगे आहेत. समाजाच्या आशा-आकांक्षांचे प्रतिबिंब असलेले कायदे बनविणे हे कायदे मंडळाचे प्रमुख कार्य आहे. राज्यामध्ये विधान सभा व विधान परिषद तर केंद्रामध्ये लोकसभा व राज्यसभा ही कायदेमंडळे आहेत. राज्यव्यवस्थेने अंमलबजावणी करणाऱ्या कार्यपालिकेची विभागणी मंत्रिमंडळ व प्रशासन अशा दोन भागात केलेली आहे. न्यायदान करणारी न्यायपालिका हे राज्यव्यवस्थेचे तिसरे अंग होय. भारतीय नागरिकाच्या मूलभूत अधिकाराचा भंग सरकारी यंत्रणेने केल्यास उच्च व सर्वोच्च न्यायालय सरकारला जाब विचारू शकते. राज्यव्यवस्थेची ही तीन अंगे स्वतंत्र आहेत व ती एकमेकांच्या अधिकारात हस्तक्षेप करू शकत नाहीत. राज्याचे व देशाचे घटनात्मक प्रमुख म्हणून राज्यघटनेने अनुक्रमे राज्यपाल व राष्ट्रपती या पदांची निर्मिती केली आहे.

भारतीय राज्यव्यवस्था संसदीय प्रणालीवर आधारित आहे. त्यामुळे कार्यपालिका व कायदेमंडळ, अमेरिकेमध्ये जसे पूर्णपणे स्वतंत्र आहे तसे भारतात नाही. भारतात कायदेमंडळातून मंत्रिमंडळाची निर्मिती होत असल्याने कायदेमंडळाचा विश्वास असेपर्यंतच मंत्रिमंडळ कार्य करू शकते. म्हणूनच मंत्रिमंडळ कायदेमंडळाला उत्तरदायी आहे.

कायदेमंडळाला मंत्रिमंडळाला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे आणि मंत्रिमंडळावर उत्तर देण्याचे बंधन आहे. व्यवस्थांमधील हे उत्तरदायित्व लोकशाहीचा गाभा आहे.

**राज्यव्यवस्थांसोबत कार्य :**

संघटना बांधणी करीत असताना लोकशाही राज्यव्यवस्थेंतर्गत निर्माण झालेल्या यंत्रणांसोबत कार्य करावे लागते. या यंत्रणा गरिबांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करतातच असे नाही. अनेकदा या व्यवस्थाच शोषणाचे साधन बनतात, असे असले तरीही लोकशाही व्यवस्थेतच आपण कार्य करीत असल्याने या यंत्रणा समजून घेऊन त्यांचा मुद्द्यांच्या सोडवणुकीसाठी वापर करणे आवश्यक ठरते.

या व्यवस्था दगडी भिंतीसारख्या आहेत, डोके आपटून आपण जखमी होऊ पण या भिंतीला काही होणार नाही असे अनेकांना वाटते. सकारात्मक दृष्टिकोनातून विचार केल्यास या व्यवस्थांशिवाय देशाच्या कारभाराचा विचारही करता येत नाही. राजकीय अस्थिरतेच्या काळातही देश टिकून राहिला याचे श्रेय या व्यवस्थांना द्यावेच लागेल.

उपलब्ध असलेल्या सर्व व्यवस्था व त्याबरोबर काम कसे करावे हे संघटकास शिकावेच लागते. व्यवस्था एकमेकांशी जोडलेल्या असल्यामुळे सर्वांचा अभ्यास केल्याशिवाय लोकांचे प्रश्न प्रभावीपणे सोडविता येणार नाहीत. या व्यवस्थांमध्ये भारतातील नागरिकांचा सहभाग कसा वाढवत नेता येईल त्याचे प्रयत्नही आवश्यक आहेत.

**विधिमंडळाचा इतिहास :**

आपल्या देशात साम्राज्यवादी सत्तेतही कायदेमंडळ अस्तित्वात होते. ती यंत्रणा तेव्हा भारतीय नागरिकांच्या हितरक्षणाऐवजी इंग्रजी सत्तेचे हित जोपासणारी होती. भारतीय कायदेमंडळाची मुळे वसाहतवादात आहेत. इंग्रज व्यापाराच्या निमित्ताने भारतात आले व ईस्ट इंडिया कंपनीने हळूहळू देशभर पाय पसरले. कंपनीचा प्रभाव वाढत असल्याचे लक्षात आल्यानंतर ब्रिटीश संसदेने एका कायद्याद्वारे भारताला वसाहत करून भारतावरील नियंत्रण ब्रिटीश साम्राज्याकडे घेतले. कलकत्त्याच्या गव्हर्नरला संपूर्ण देशाचे प्रमुख केले व चार जणांची कार्यकारी परिषद त्याच्या मदतीस निर्माण केली. मुंबई व मद्रास प्रांताचे गव्हर्नर या परिषदेच्या अधिकारक्षेत्रात आले.

१७८४ साली ब्रिटीश संसदेने इंडिया बिल मंजूर केले व त्याद्वारे ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकार गोठवून गव्हर्नर जनरलकडे अधिक सत्ता दिली. सहा जणांची प्रायव्ही काउन्सिल नियंत्रणासाठी निर्माण केली व त्यासोबतच मुंबई व मद्रास प्रांताच्या गव्हर्नर्सना सल्ला देण्यासाठी सल्लागार समित्या स्थापन केल्या.

१८३३ मध्ये ब्रिटीश संसदेने व्यापाराला दुय्यम स्थान देऊन राजकीय हिताला प्राधान्य दिले. याच दरम्यान मुंबई आणि मद्रास प्रांतांच्या गव्हर्नर्सचे विधिविषयक अधिकार काढून घेऊन ते गव्हर्नर जनरलकडे सुपूर्द करण्यात आले. १८५७ च्या सैनिकी बंडानंतर ब्रिटीश संसदेने कंपनीचे अधिकार पूर्णपणे काढून घेऊन भारताच्या राजकीय नियंत्रणाचे पूर्ण अधिकार स्वत:कडे घेतले. १८५८च्या कायद्यानुसार ब्रिटीश साम्राज्याचा भारतातील प्रतिनिधी म्हणून व्हॉईसरॉयची नेमणूक करण्यात आली. १८६१ मध्ये काउंसिल ॲक्टनुसार मद्रास व मुंबई प्रांतांचे अधिकार पुन्हा प्रस्थापित करण्यात आले व त्यांच्या मदतीसाठी चार ते अधिकाधिक आठ सदस्यांची परिषद स्थापन करण्यात आली. मात्र या परिषदेमध्ये भारतीयांना स्थान नव्हते. १८९१ पर्यंत या कायद्याचा अंमल होता.

१८९२ मध्ये काउंसिल ॲक्टमध्ये सुधारणा होऊन, केंद्रीय परिषदांना विस्तारित करून सरकारच्या बाहेरील १० ते १६ सदस्यांना नेमले गेले. प्रांतिक परिषदांमध्ये सरकार बाहेरील ७ ते २० सदस्य नेमण्याची मुभा दिली गेली. प्रांतिक परिषदा आणि कलकत्ता चेंबर ऑफ कॉमर्स आपले प्रतिनिधी केंद्रीय परिषदेत पाठवू शकणार होते. या सुधारणांमुळे देशात प्रथमच कायदे मंडळाची मुहूर्तमेढ रोवली गेली. प्रथमच सार्वजनिक धोरणांवर व सरकारी अर्थसंकल्पावर चर्चेसाठी व्यासपीठ उपलब्ध झाले. १८९२चा कायदा भारतीय कायदेमंडळाच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरला.

त्यानंतर १९०८ साली मॉर्ले मिंटो सुधारणांमुळे साम्राज्यवादी सत्तेचे स्वरुप बदलले. केंद्रीय कायदेमंडळात ८० सदस्य आणि मुंबई व मद्रास कायदेमंडळात ५० सदस्यांचा समावेश करण्यात आला. केंद्रीय कायदेमंडळात प्रांतिक कायदेमंडळाच्या प्रतिनिधींशिवाय मुसलमान समाजाचे प्रतिनिधी, चेंबर ऑफ कॉमर्स, डिस्ट्रिक्ट बोर्ड आणि जमीनदारांचे प्रतिनिधी यांचा समावेश करण्यात आला. पहिल्या जागतिक महायुद्धानंतर १९१८ साली माँटेग्यू चेम्स्‌फोर्ड सुधारणा अंमलात आल्या. या सुधारणांमुळे कायदेमंडळाची उभय सभागृहे अस्तित्वात आली. वरिष्ठ सभागृहाला राज्य परिषद व कनिष्ठ सभागृहाला विधान परिषद असे म्हटले जाऊ लागले. राज्य परिषदेत सरकारचे २० तर बिगर सरकारी ४० सदस्य असत. विधान परिषदेत २६ सरकारी, १४ नामनिर्देशित व १०० निवडून येणाऱ्या सदस्यांचा समावेश केला गेला. मात्र या कायदेमंडळांपेक्षा अधिक अधिकार साम्राज्यशाही सत्तेचा प्रतिनिधी असलेल्या गव्हर्नर जनरलकडे राहिले. १९३५ साली संघराज्य पद्धती अंमलात आली आणि प्रांतिक सरकारला स्वतंत्र अधिकार दिले गेले. कायद्याद्वारे मंत्रिमंडळाला खातेवाटप करून अधिकारक्षेत्र बहाल केले गेले. मात्र तरीही गव्हर्नर

जनरलच्या अधिकारांना हात लावला गेला नाही.

१९४७ साली स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यासाठी संविधान सभा निर्माण करण्यात आली. भारतीयांचाच सहभाग असलेल्या या संविधान सभेने मंजूर केलेल्या संविधानानुसार देशातील कायदे मंडळांची रचना व कार्ये निश्चित केली गेली. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १६८ नुसार विधान सभा आणि विधान परिषदांची निर्मिती करण्यात आली. मात्र देशातील सर्व राज्यांमध्ये अशी दोन सभागृहे नाहीत. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, बिहार, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, तामिळनाडू आणि कर्नाटक या राज्यांमध्येच दोन सभागृहे आहेत. संविधानाच्या अनुच्छेद १६९ नुसार राज्य विधानसभेला वरिष्ठ सभागृह निर्माण करता येते अगर बरखास्त करता येते. विधान परिषद बरखास्त करण्याकरिता अथवा अशी विधान परिषद नसलेल्या राज्यात विधान परिषद निर्माण करण्याकरिता त्या राज्याच्या विधान सभेने सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने आणि सभागृहातील उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या दोन तृतियांशहून कमी नाही इतक्या बहुमताने अशा आशयाचा ठराव पारित केल्यास संसदेस कायद्याद्वारे उपबंध करता येतो.

**राज्य विधिमंडळाची अधिवेशने :**

विधिमंडळाची वर्षभरात साधारण ३ अधिवेशने पार पडतात. आर्थिक वर्षाच्या अखेरीस म्हणजे मार्च महिन्याच्या मध्यावर सुरू होणाऱ्या पहिल्या अधिवेशनास अर्थसंकल्पीय अधिवेशन म्हणून संबोधले जाते. या अधिवेशनाची सुरुवात दोन्ही सभागृहांसमोर राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाने होते. या अधिवेशनातील मुख्य कामकाज हे अर्थसंकल्प विषयक असते. ३१ मार्चपूर्वी आगामी वर्षाचा राज्य अर्थसंकल्प चर्चेअंती मंजूर केला जातो. त्यानंतर काही निवडक विभागांच्या अर्थसंकल्पांवर चर्चा होते. विधिमंडळाचे दुसरे अधिवेशन साधारणपणे जुलै माहिन्यात पार पडते. या अधिवेशनास पावसाळी अधिवेशन असे संबोधले जाते. ही दोनही अधिवेशने राज्याच्या राजधानीत म्हणजे मुंबईत पार पडतात. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या वेळेस विदर्भ प्रांत महाराष्ट्रात सामावून घेण्यासाठी जो नागपूर करार करण्यात आला त्यानुसार राज्य विधिमंडळाचे व राज्य प्रशासनाचे कामकाज काही विशिष्ट कालावधीकरिता नागपूर येथून चालविणे बंधनकारक आहे. त्यानुसार विधिमंडळाचे तिसरे अधिवेशन नागपूर येथे पार पडते. विदर्भाशी संबधित प्रश्नांवरील चर्चेने हे अधिवेशन गाजते. विधिमंडळाचे कामकाज वर्षभरात साधारण १०० दिवस चालणे अपेक्षित असले तरी मागील अनेक वर्षांच्या अनुभवानुसार तीनही अधिवेशने मिळून जवळपास निम्मेच दिवस कामकाज होते. निम्मेच दिवस चालणारे हे कामकाजही

प्रत्यक्षात किती तास होते व किती वेळ गोंधळात व तहकुबीत जातो हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे.

**महत्त्वाची संसदीय आयुधे :**

विधिमंडळ शासनावर म्हणजेच कार्यपालिकेवर अंकुश ठेवण्याचे कार्य करीत असते. शासनाच्या निर्णय प्रक्रियेत प्रशासन महत्त्वाची भूमिका पार पाडीत असते. प्रशासन मंत्रिमंडळामार्फत विधिमंडळाला जबाबदार असते. विधिमंडळात जनहिताचे प्रश्न मांडण्यासाठी तसेच मंत्रिमंडळ व प्रशासनाच्या कामकाजावर अंकुश ठेवण्यासाठी सदस्यांना अनेक संसदीय आयुधांचा वापर करता येतो. या विविध संसदीय आयुधांचा वापर करून जागरूक सदस्य विधिमंडळात आपला प्रभाव पाडू शकतो व शासनावर अंकुशही ठेवू शकतो.

**प्रश्नोत्तरे :** विधिमंडळ कामकाजात प्रश्नोत्तराच्या तासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रश्नोत्तराच्या तासाने सभागृहाच्या दिवसाच्या कामकाजाला प्रारंभ होतो. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून सदस्यांना आपल्या मतदारसंघातील वा राज्यातील कुठल्याही घटना, प्रसंग, बाबींविषयी प्रश्न विचारता येतात. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून नोकरशाहीच्या, लोकप्रतिनिधींच्या भ्रष्टाचाराची सभागृहात सार्वजनिक चौकशीच होऊ शकते. शासनाने एखाद्या समस्येविषयी काय उपाययोजना केली आहे, हे प्रश्नोत्तराच्या माध्यमातून समजून घेता येते. सदस्याला आपला प्रश्न विधिमंडळात चर्चेस आणण्यासाठी प्रश्नाची सूचना ३० दिवस आधी द्यावी लागते. सदस्यांनी दिलेले सर्वच प्रश्न चर्चेसाठी येतातच असे नाही. जे प्रश्न प्रश्नोत्तराच्या तासासाठी स्वीकृत केले जातात त्यांना 'तारांकित' प्रश्न असे म्हणतात. जे प्रश्न तारांकित म्हणून स्वीकृत झालेले असतात परंतु त्यावर प्रत्यक्ष चर्चा होत नाही असे प्रश्न अतारांकित होतात. याशिवाय केवळ माहिती मागविण्याच्या हेतूने केलेला प्रश्न 'अतारांकित' ठरविला जातो. विधिमंडळ सचिवालयाच्या वतीने अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी अधिवेशनादरम्यान पटलावर ठेवली जाते. 'अल्पसूचना' प्रश्न असाही एक तिसरा प्रकार असतो. एखाद्या निकडीच्या प्रश्नाचे तातडीने उत्तर पाहिजे असल्यास सदस्यांना त्याबाबत अल्प सूचना देऊन प्रश्न विचारता येतो. या प्रश्नांना उत्तर देण्यास संबंधित खात्याचा मंत्री तयार आहे किंवा कसे हे पाहिले जाते. विचारलेल्या प्रश्नासंबंधीची माहिती मुंबई आसपासच्या भागापुरती मर्यादित असेल तर १४ दिवसांपर्यंत प्रश्नाचे उत्तर देण्याची मुभा असते. प्रश्नोत्तराचा तास चालू असताना ज्या सदस्यांनी लेखी प्रश्न विचारले असतील, त्यांना व इतरही सदस्यांना उपप्रश्न विचारता येतात. एका सदस्याला सर्वसाधारणपणे तीनपेक्षा जास्त उपप्रश्न विचारता येत नाहीत.

**शून्य प्रहर**: कार्यक्रम पत्रिकेवर या आयुधाचा उल्लेख नसतो. प्रश्नोत्तराच्या तासानंतर कार्यक्रम पत्रिकेवरील कामकाज सुरू होण्यापूर्वी अनेक सदस्य कार्यक्रम पत्रिकेवर नसलेले पण त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करू पाहतात. सहसा अध्यक्ष त्यांना परवानगी देत नाहीत. प्रश्नोत्तराच्या तासानंतरच्या या घटकेस शून्य प्रहर म्हणतात. अनेकदा शून्य प्रहरात गदारोळ व असंसदीय वर्तन घडताना दिसते.

**लक्षवेधी सूचना**: विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असताना घडणाऱ्या महत्त्वपूर्ण घटनांसंदर्भात शासनाचे म्हणणे, शासनाने केलेली कार्यवाही जाणून घेण्यासाठी व शासनाकडून आश्वासन मिळविण्यासाठी सदस्यांना या आयुधाचा वापर करता येतो. अपघात, गंभीर गुन्हे, अत्याचार, नैसर्गिक आपत्ती, जनआंदोलने याकडे सरकारचे लक्ष या आयुधाच्या माध्यमातून वेधता येते. संबंधित खात्याच्या मंत्र्याने लक्षवेधी सूचनेसंबंधी संक्षिप्त लेखी उत्तर देणे अपेक्षित असते. त्या लेखी उत्तरावर सभागृहात प्रश्न/उपप्रश्न विचारून सदस्यांना अधिक माहिती मिळविता येते. चर्चेला न येणाऱ्या लक्षवेधी सूचनांची लेखी उत्तरे पटलावर ठेवली जातात.

**स्थगन प्रस्ताव**: स्थगन प्रस्तावास 'तहकुबीचा प्रस्ताव' असेही म्हटले जाते. विधान परिषदेत स्थगन प्रस्तावाऐवजी नियम ९३ अन्वये सूचना मांडता येते. सार्वजनिक महत्त्वाच्या अशा तातडीच्या बाबीसंबंधी सभागृहाचे लक्ष वेधण्यासाठी स्थगन प्रस्ताव मांडता येतो. स्थगन प्रस्तावातील प्रत्येक बाब निश्चित तातडीच्या स्वरुपाची आणि सार्वजनिक महत्त्वाची असली पाहिजे. राज्यकारभारातील दोषांवर बोट ठेवण्यासाठी एक प्रभावी हत्यार या प्रस्तावाच्या रूपाने सदस्यांच्या हाती असल्याने ते हत्यार सवंग होऊ नये यासाठी नियमांचे कडक निर्बंध लादलेले आहेत.

ज्या सदस्याला स्थगन प्रस्ताव मांडावयाचा असतो, त्याने सभागृह सुरू होण्यापूर्वी किमान एक तास प्रस्तावाची पूर्वसूचना अध्यक्ष, संबंधित खात्याचा मंत्री वा सचिव यांना द्यावी लागते. स्थगन प्रस्तावास अध्यक्षांनी संमती देण्यापूर्वी वृत्तपत्रात तो प्रसिद्ध करता येत नाही.

नियमांन्वये नसलेले स्थगन प्रस्ताव अध्यक्ष वा सभापती आपल्या दालनातच फेटाळून लावतात. प्रस्ताव संमत करण्याची वा फेटाळण्याची कारणे अध्यक्ष सभागृहात वाचून दाखवितात. प्रस्तावास अध्यक्षांनी संमती दिली असेल तर तो प्रस्ताव मांडण्यास प्रश्नोत्तराच्या तासानंतर सभागृहाची परवानगी मागितली जाते. जर या प्रस्तावास हरकत घेतली गेली तर प्रस्तावास ज्या सदस्यांचा पाठिंबा आहे अशांची संख्या मोजली जाते. ही

संख्या ३० वा ३० पेक्षा अधिक असेल तर प्रस्ताव मांडण्यास परवानगी दिली जाते अन्यथा प्रस्ताव फेटाळला जातो. प्रस्तावास परवानगी मिळाली तर त्याच दिवशी सभागृहाने ठरविलेल्या वेळेस तो चर्चेस घेतला जातो. सत्ताधारी अथवा विरोधी पक्षांना वेळ वाटून दिली जाते. दोन तासांपेक्षा जास्त अवधी चर्चेस दिला जात नाही. दोन तासांमध्ये चर्चा संपल्यास त्यावर मतदान घेतले जाते. प्रस्ताव नामंजूर झाल्यास सभागृहाचे कामकाज पुढे चालते. प्रस्ताव मंजूर झाल्यास सभागृहाचे कामकाज तहकूब होते. स्थगन प्रस्ताव मंजूर होणे म्हणजे सरकारवर अविश्वास व्यक्त केल्यासारखे असते.

**ठराव :** सरकारची एखादी कृती किंवा धोरण यावर पसंती - नापसंती दर्शविण्यासाठी कुणाही सदस्याला ठराव मांडता येतो. याखेरीज सरकारचे लक्ष एखाद्या विशिष्ट घटनेकडे वेधण्यासाठी ठराव आणण्याची पद्धत आहे. ठराव मांडू इच्छिणाऱ्या सदस्यास अधिवेशनापूर्वी पंधरा दिवस ठरावाची पूर्व सूचना व ठरावाची प्रत द्यावी लागते. एका अधिवेशनात कोणत्याही सदस्याला पाचपेक्षा जास्त ठरावांची पूर्वसूचना देता येत नाही.

ठराव अथवा त्याचा भाग चर्चेसाठी दाखल करून घेण्याचा अधिकार सभापती वा अध्यक्षांचा असतो. नियमानुसार आलेल्या कोणत्या ठरावाला अग्रक्रम द्यावा हे चिठ्ठ्या टाकून ठरविले जाते. ठराव मांडण्यास १५ मिनिटांचा वेळ व त्यावरील भाषणे आणि मंत्र्यांचे उत्तर याला एकूण ४५ मिनिटे असतात. ठरावावरील चर्चेशेवटी मतदान घेतले जाते वा सदस्य तो ठराव सभागृहाच्या परवानगीने मागे घेऊ शकतो. एकाच विषयावरचे दोन ठराव एकाच अधिवेशनात एकाच सभागृहात मांडता येत नाहीत.

**अर्धा तास चर्चा :** चर्चेस न आल्यामुळे अतारांकित झालेल्या प्रश्नाला दिले गेलेले उत्तर त्रोटक व अर्थबोध न होणारे असेल व बाब सार्वजनिक महत्त्वाची असेल तर त्याबाबत चर्चा करण्यासाठी अर्धा तास चर्चा उपस्थित करता येते. आठवड्यातील किमान दोन दिवस सर्व कामकाजाच्या शेवटी अर्ध्या तासाचा वेळ अशा चर्चेसाठी देण्यात आलेला असतो. संबंधित प्रश्नावर चर्चा उपस्थित करण्याची कारणे नमूद करणारी एक खुलासेवजा टीप सभासदाला आपल्या सूचनेसोबत जोडावी लागते. याखेरीज प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी एखाद्या प्रश्नास जास्त वेळ मिळाला नाही किंवा दिलेली उत्तरे समाधानकारक नाहीत असे एखाद्या सदस्यास वाटल्यास अर्ध्या तासाच्या चर्चेची सूचना देता येते.

**अल्पवेळ चर्चा :** सार्वजनिक महत्त्वाच्या एखाद्या प्रश्नावर पूर्वसूचनेने अल्पवेळ चर्चा उपस्थित करता येते. पूर्वसूचनेस किमान दोन सदस्यांनी पाठिंबा देण्याची आवश्यकता असते. अल्पवेळ चर्चेची मागणी मान्य झाल्यास अध्यक्ष सभागृहाच्या नेत्यांशी चर्चा करून

चर्चेचा दिवस व वेळ निश्चित करतात. साधारणपणे अडीच तासाची वेळ अशा चर्चेला देण्यात येते. चर्चा उपस्थित करणाऱ्या सदस्यांना थोडावेळ आपले निवेदन करता येते. मग इतर सदस्य त्या चर्चेत भाग घेतात. चर्चेच्या शेवटी संबंधित मंत्री त्यास उत्तर देतात.

**अविश्वास ठराव :** अविश्वास ठराव संमत झाला तर सरकार कोसळते. सरकारच्या (मंत्रिमंडळाच्या) कामगिरीविषयी विश्वास राहिला नसेल तर एखाद्या धोरणाविषयी नापसंती व्यक्त करण्यासाठी अविश्वास ठराव मांडता येतो. प्रस्ताव मांडण्यासंबंधी सदस्यांना लेखी पूर्वसूचना द्यावी लागते. दोन दिवसांच्या आत तो प्रस्ताव मांडण्यासाठी दिवस निश्चित करावा लागतो. सभागृहातील एकोणतीस वा त्याहून जास्त सदस्यांचा पाठिंबा असेल तर असा प्रस्ताव दाखल करून घेतला जातो. प्रस्ताव मांडण्यापूर्वी असा प्रस्ताव मांडण्याची कारणे सभागृहाला कळवावी लागतात. या प्रस्तावाच्या निमित्ताने सरकारच्या धोरणांवर, कारभारावर चर्चा, टीका-टिपण्णी करण्याची संधी विरोधी पक्ष सदस्यांना मिळते. 'या सभागृहाला मंत्रिमंडळावर विश्वास राहिलेला नाही' या एका ओळीचा अविश्वास ठराव मांडण्यात येतो. हा प्रस्ताव संमत झाल्यास मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. बिहार, हरयाणा, केरळ या राज्यात अविश्वास ठराव मंजूर झाल्याच्या काही घटना घडलेल्या आहेत.

**हरकतीचा मुद्दा :** विधान सभेत वा विधान परिषदेत कामकाजासंबंधी हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्याची मुभा असते. मंत्री एखाद्या प्रश्नासंबंधी वा घटनेसंबंधी चुकीची माहिती देत असेल तर कोणताही सदस्य त्यासंबंधी हरकतीचा मुद्दा उपस्थित करू शकतो. हरकतीच्या मुद्द्याद्वारे एखादा सदस्य महत्त्वाची माहिती सभागृहास देऊ शकतो. औचित्याचा मुद्दा हेही एक आयुध सदस्याकडे असते. सभागृहातील कामकाजासंबंधी एखादा सदस्य औचित्याच्या मुद्द्याद्वारे अध्यक्ष/सभापतींचे लक्ष वेधू शकतो. माहिती घेण्याचा मुद्दा उपस्थित करूनही एखाद्या विषयासंबंधी सदस्य माहिती घेऊ शकतो.

**राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा :** दरवर्षीच्या पहिल्या अधिवेशनाची (अर्थसंकल्पीय) सुरुवात राज्यपालांच्या अभिभाषणाने होते. राज्यपाल आपल्या भाषणात सरकारच्या योजनांचा आढावा घेतात आणि पुढील काळात करावयाच्या कामासंबंधी सूतोवाच करतात. या भाषणाचा मसुदा मंत्रिमंडळाच्या बैठकीत ठरतो. राज्यपालांनी भाषण केल्यानंतर त्या भाषणासंबंधी राज्यापालांचे आभार मानण्याचा ठराव सत्ताधारी पक्षाच्यावतीने दोन्ही सभागृहात आणला जातो. या ठरावावर चर्चा करण्यासाठी दोन दिवस देण्यात येतात. राज्यपालांनी आपल्या भाषणात उल्लेख केलेल्या गोष्टींवर सदस्यांना चर्चा करता येते. अलीकडे राज्यपालांच्या भाषणात उल्लेख नसलेल्या गोष्टींवरही चर्चा

करण्याची प्रथा पडली आहे. या चर्चेच्यावेळी सरकारच्या धोरणांवर विरोधी पक्ष सदस्य टीका करतात. अनेक योजनांसंबंधीच्या त्रुटींवर सदस्य नेमके बोट ठेवू शकतात. सरकारच्या लोकहिताच्या योजनांना आलेले अपयश, एखाद्या योजनेत होणारा पैशाचा अपव्यय अथवा भ्रष्टाचार यासंबंधी सदस्य सभागृहात बोलू शकतात.

**शासकीय व अशासकीय विधेयके :**

कायदे तयार करणे हे विधिमंडळाचे प्रमुख कार्य आहे. कायदा पारित होण्यापूर्वी प्रस्तावित कायद्याच्या मसुद्याची नियमानुसार जी कागदपत्रे तयार केली जातात त्यास विधेयक असे म्हणतात. नवीन कायद्याच्या निर्मितीसाठी, पूर्वीचा कायदा रद्द करण्यासाठी वा कायद्यात सुधारणा करण्यासाठी विधेयक सादर केले जाते. शासनाचा मंत्री वा राज्यमंत्री यांनी मांडलेल्या विधेयकास शासकीय विधेयक तर त्याशिवाय इतर सदस्यांनी मांडलेल्या विधेयकास अशासकीय विधेयक म्हणून संबोधले जाते. साधारणपणे अशासकीय विधेयक संमत होत नाही. विधेयकावर चर्चा होऊन चर्चेअंती शासनाकडून त्यासंदर्भातील शासकीय विधेयक आणले जाईल या आश्वासनानंतर विधेयक सदस्याकडून मागे घेतले जाते.

सर्वसाधारण विधेयके, धनविषयक विधेयके, वित्तविषयक विधेयके असे विधेयकांचे प्रकार आहेत. सर्वसाधारण विधेयके दोन्ही सभागृहांच्या मान्यतेशिवाय मंजूर होत नाहीत. मात्र उर्वरित दोन प्रकारच्या विधेयकांसंदर्भात विधान परिषदेने केलेल्या दुरुस्त्या स्वीकारण्याचे बंधन विधानसभेवर नसते. विधिमंडळातील ठरावानुसार विधेयक संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविले जाऊ शकते वा लोकमत अजमावण्यासाठी प्रसिद्धही केले जाऊ शकते.

विधिमंडळाचे अधिवेशन सुरू नसताना शासनास एखादा कायदा तातडीने मंजूर करवून घेणे आवश्यक असल्यास वटहुकूम जारी करता येतो. राज्यपालांना घटनेच्या अनुच्छेद २१३ नुसार प्राप्त झालेल्या अधिकारानुसार वटहुकूम काढता येतो. वटहुकुमाची मुदत विधिमंडळाची बैठक भरल्यापासून सहा आठवडेपर्यंत असते, अधिवेशन सुरू झाल्यानंतर वटहुकुमात तरतूद असलेले विधेयक सभागृहात मांडले जाते ते विधेयक संमत झाल्यावर वटहुकुम आपोआप रद्द होतो.

**विशेष हक्क व हक्कभंग :**

विधिमंडळ सदस्यांना आपले कर्तव्य निरंकुशपणे व स्वत:च्या सद्सद्विवेकबुद्धीला पटेल अशा पद्धतीने पार पाडता यावे म्हणून विशेषाधिकार देण्यात आले आहेत. कोणत्याही

सदस्याने विधिमंडळात अथवा विधिमंडळाच्या समितीत केलेल्या कोणत्याही वक्तव्यासाठी न्यायालयात कार्यवाही होऊ शकत नाही. याशिवाय सदस्यांच्या वा विधिमंडळाच्या कोणत्याही हक्काचा मान राखण्यात आला नाही वा त्यावर टीका करण्यात आली तर तो हक्क भंग मानला जातो. विधिमंडळ सदस्याबद्दल अनादर दाखविणे, आमदार या नात्याने केलेल्या कृतीविषयी बदनामीकारक मजकूर प्रसिद्ध करणे, एखाद्या मंत्र्याने वा अधिकाऱ्याने सभागृहाची दिशाभूल होईल अशी माहिती देणे, अध्यक्ष वा सभापतींविरुद्ध आक्षेप घेणे वा आरोप करणे, सदनाच्या कायदेशीर हुकुमाचे पालन न करणे असे हक्कभंगाचे विविध प्रकार आहेत. विशेषाधिकारांच्या भंगाबद्दल शिक्षा करण्याचा अधिकार सभागृहाला असतो.

**विधिमंडळाच्या विषय समित्या :**

राज्याची ध्येय-धोरणे निश्चित करणे, कायदे तयार करणे, प्रशासनावर देखरेख ठेवणे अशी विविध कार्ये विधिमंडळाने पार पाडावयाची असतात. प्रशासनावर प्रभावी व अर्थपूर्ण नियंत्रण ठेवण्यासाठी व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी विधिमंडळाच्या समित्या निर्माण करण्यात आल्या. सभागृहातील कामकाजावर पक्षीय ध्येय-धोरणांचा प्रभाव असतो मात्र समित्यांमधील कामकाज नि:पक्षपणे व गुणवत्तेच्या आधाराने होत असल्याने विषयाला पूर्णत: न्याय मिळण्याची असते. विधिमंडळाच्या निवडक विषय समित्या व त्यांची थोडक्यात लिखित कार्ये पुढीलप्रमाणे:

**अंदाज समिती**: खर्चाच्या अंदाजांची तपशीलवार छाननी करण्याचे व शासनाची उद्दिष्टे कार्यक्षमतेने पार पाडली जाण्यासाठी शिफारशी करण्याचे काम अंदाज समिती करते.

**लोकलेखा समिती**: भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे लेखापरीक्षण अहवाल विधिमंडळात सादर झाल्यानंतर त्यांची छाननी करण्याचे काम लोकलेखा समिती करते.

**सार्वजनिक उपक्रम समिती :** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे सार्वजनिक उपक्रमांसंदर्भातील (शासकीय महामंडळे व कंपन्या) लेखापरीक्षण अहवाल विधिमंडळात सादर झाल्यानंतर त्यांची छाननी करण्याचे काम सार्वजनिक उपक्रम समिती करते.

**पंचायत राज समिती :** जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांची अंदाजपत्रके व लेखे यांची तपासणी करण्याचे, त्यांचे वार्षिक प्रशासन अहवाल तपासण्याचे काम ही समिती करते.

**रोजगार हमी समिती :** रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन करून योजना प्रभावी ठरण्यासाठी उपाययोजना सुचविण्याचे व शिफारशी करण्याचे कार्य सदर समिती करते.

**उपविधान समिती :** शासनाने केलेले व सभागृहासमोर मांडलेले नियम, विनियम, उप-विधी तत्संबंधित अधिनियमाच्या तरतुदींशी वा सामान्य उद्दिष्टांशी सुसंगत आहेत किंवा नाही याची छाननी करण्याचे कार्य ही समिती करते.

**अनुसूचित जाती कल्याण समिती :** अनुसूचित जातींवर होणारे अन्याय, अत्याचार या संदर्भात शासनाकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजना व अनुसूचित जातींसाठी शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजना यासंबंधी विचारविनिमय करून शासनास शिफारशी करण्याचे काम ही समिती पार पाडते.

**अनुसूचित जमाती कल्याण समिती :** अनुसूचित जमातींवर होणारे अन्याय, अत्याचार या संदर्भात शासनाकडून केल्या जाण्याऱ्या उपाययोजना व अनुसूचित जमातींसाठी शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजना यासंबंधी विचारविनिमय करून शासनास शिफारशी करण्याचे काम ही समिती पार पाडते.

**विमुक्त जाती भटक्या जमाती :** विमुक्त जाती भटक्या जमातींवर होणारे अन्याय, अत्याचार या संदर्भात शासनाकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजना व विमुक्त जाती भटक्या जमातींसाठी शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजना यासंबंधी विचारविनिमय करून शासनास शिफारशी करण्याचे काम ही समिती पार पाडते.

**महिलांचे हक्क व कल्याण समिती :** स्त्रियांना समाजात समानता, सुयोग्य दर्जा व प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केलेल्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेऊन उपाययोजना सुचविण्याचे कार्य सदर समिती करते.

**इतर मागासवर्ग कल्याण समिती :** इतर मागासवर्गीय लोकांच्या विकासासाठी शासनाकडून केली जाणारी उपाययोजना व राबविल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजना यांचेवर विचारविनिमय करून शासनास शिफारशी करण्याचे काम ही समिती करते.

**आश्वासन समिती :** सभागृहात विविध संसदीय आयुधांतर्गत उत्तरे देताना संबंधित खात्यांचे मंत्री विविध कार्यवाही निदर्शक आश्वासने देत असतात. या आश्वासनांची पूर्तता प्रशासनामार्फत करण्यात येत आहे किंवा नाही यावर नियंत्रण व देखरेख ठेवण्याचे कार्य सदर समिती पार पाडते.

**विनंती अर्ज समिती**: सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाच्या विषयी एखाद्या सदस्याने केलेला विनंती अर्ज मान. अध्यक्ष सदर समितीकडे विचारार्थ पाठवितात. अर्जातील समाविष्ट बाबीवर निश्चित उपाययोजना सुचविण्याचे कार्य सदर समिती पार पाडते.

**विधिमंडळाच्या स्थायी समित्यांची आवश्यकता :**

वर उल्लेख केलेल्या विषय समित्यांव्यतिरिक्त विविध खात्यांच्या अर्थसकल्पांची विस्तृत छाननी करणाऱ्या, खात्याशी संबंधित विधेयकांवर चर्चा करणाऱ्या व खात्याच्या मंत्र्यासोबतच प्रशासनाला उत्तरदायी ठरविणाऱ्या स्थायी समित्या १९७६ ते १९७९ या काळात व २००२-०३ या कालावधीमध्ये राज्यात अस्तित्वात होत्या. विधिमंडळाच्या स्थायी समित्या विधिमंडळाचे छोटे रूप असते. संसदेमध्ये व इतर काही राज्यांमध्ये अशा स्थायी समित्या कार्यरत आहेत. महाराष्ट्रात मात्र अशा स्थायी समित्या असण्याबाबत राजकीय इच्छाशक्ती नाही. स्थायी समित्यांच्या कामकाजामुळे विधिमंडळाचा प्रशासनावर थेट अंकुश राहू शकतो. सुदृढ लोकशाहीसाठी, पारदर्शक राज्य कारभारासाठी, शासनाच्या उत्तरदायित्वासाठी स्थायी समित्या आवश्यक आहेत.

अमेरिकेतील काँग्रेस व सिनेटमधील तसेच तेथील विविध राज्यातील व दक्षिण आफ्रिकेतील विधिमंडळाच्या स्थायी समित्यांचा अभ्यास करण्याची संधी मला मिळाली होती. या समिती पद्धतीमुळे नागरिकांचा लोकशाही प्रक्रियेतील सहभाग वाढू शकतो याचा अनुभव मी घेतला आहे. वर्णद्वेषी राजवटीनंतर दक्षिण आफ्रिका नव्या दमाने राज्यकारभार करण्याची सुरुवात करीत होती. त्याच दरम्यान मला हा अभ्यास करता आला.

दक्षिण अफ्रिकेतील श्री. डी. लॉकी या संसद सदस्याबरोबर समित्यांच्या कामाची माहिती घेण्यासाठी मी त्यांच्या कार्यालयात गेलो. ते गृह मंत्रालयाच्या स्थायी समितीचे सदस्य होते. समितीच्या बैठकीची तयारी करण्यात ते मग्न होते. कोणत्याही प्रवेशपत्राविना त्यांच्यासोबत मी संसदेत पोहोचलो. समिती सभागृह सर्वांसाठी खुले होते. सदस्यांच्या मागील रांगेत मी बसलो. दक्षिण आफ्रिकन सरकारमधील मंत्रिमंडळ सदस्यांना स्वत:साठी सल्लागार नेमण्याची मुभा सरकारने दिली होती. गृहमंत्री श्री. बुथेलेझी यांनी त्यांच्यासाठी श्री. मारिओ ॲम्ब्रोसिनी या इटालियन कायदेतज्ज्ञाची नेमणूक केली होती. मंत्र्यासोबत पक्षाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहून पक्ष कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केल्याचा आक्षेप त्यांच्यावर घेण्यात आला होता. सल्लागारावर झालेला सरकारी खर्च त्यामुळे वादग्रस्त ठरला होता. गृहमंत्रालयाच्या स्थायी समितीने या आक्षेपाबाबत चौकशी करण्यासाठी त्यांना साक्षीसाठी निमंत्रित केले होते. वादग्रस्त मुद्द्यांवर समिती चौकशी करणार असल्याने

सभागृह पत्रकार व नागरिकांच्या प्रतिनिधींनी तुडुंब भरले होते. सल्लागार श्री. ॲम्ब्रोसिनी यांना स्थानापन्न होण्याचा आदेश समितीच्या अध्यक्षांनी सन्मानाने दिला. श्री. ॲम्ब्रोसिनी यांनी आपले लेखी म्हणणे सर्व सदस्यांना दिले. समिती सदस्य श्री. रॉकी यांनी गृहमंत्रालयाच्या महासंचालकांकडून खर्चाचा तपशील व अहवाल मागविलेला होता. ही सर्व कागदपत्रे सभागृहात उपस्थित सर्वांना मुक्तपणे देण्यात आली. समिती सदस्य गृहपाठ करून आले होते. त्यांनी अत्यंत विनयाने परंतु अत्यंत खोचक प्रश्न विचारून श्री. ॲम्ब्रोसिनी यांना बेचैन केले. त्यांना देण्यात येणारे वेतन, पात्रता, काम, त्यांचा मंत्रालयाला झालेला उपयोग याची विस्तृत छाननी समितीने केली. सुमारे तीन तास आरडाओरड वा गोंधळ न घालता ही छाननी चालली होती. समितीच्या कर्तव्य-कठोर भूमिकेसमोर प्रशासनाला आपले उत्तरदायित्व सिद्ध करावे लागत होते. समिती सदस्यांच्या मागे जनसंघटनांचे काही प्रतिनिधीही बसले होते. ते वेळोवेळी त्यांच्याकडील माहिती समिती सदस्यांना लिहून पुरवित होते. राज्यकारभारात उत्तरदायित्व ही केवळ संकल्पना नाही तर तो व्यवहार आहे याचे मूर्तिमंत रूप मी अनुभवित होतो.

आपल्याकडील राज्यकर्त्यांनी उत्तरदायित्वाला तिलांजली देण्याचे जे धोरण स्वीकारले आहे ते बदलावे यासाठी प्रयत्नांची आवश्यकता आहे.

**अर्थसंकल्प :**

विधिमंडळाच्या मान्यतेशिवाय शासनाला एक पैसाही खर्च करता येत नाही. या तत्त्वानुसार आगामी आर्थिक वर्षात उपलब्ध होणारे उत्पन्न व केला जाणारा खर्च यांचे अंदाजपत्रक शासन विधिमंडळासमोर सादर करते. यालाच वार्षिक अर्थसंकल्प असे म्हणतात. कल्याणकारी राज्याची संकल्पना भारताने स्वीकारल्याने अर्थसंकल्पाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जनकल्याणाच्या विविध योजना अर्थसंकल्पाद्वारेच जनतेला प्राप्त होऊ शकतात. राज्याच्या अर्थसंकल्पाच्या अभ्यासातून शासनाचे खरे धोरण व शासनाचे प्राधान्यक्रम समजून घेता येतात.

अर्थसंकल्प तयार करण्याची प्रक्रिया, अर्थसंकल्पाची रचना, अर्थसंकल्पीय प्रकाशने या बाबी क्लिष्ट असून त्याबद्दल लिहावयाचे झाल्यास तो एक स्वतंत्र विषय ठरेल. त्याशिवाय अर्थसंकल्पात खर्चाची तरतूद होणे, निधी प्रत्यक्षात उपलब्ध होणे व तो खर्च होणे आदी प्रक्रियाही स्वतंत्र समजून घेण्याचा विषय आहे. एवढे मात्र खरे की राज्यकर्ते किती व काय घोषणा करतात यापेक्षा ते त्या घोषणांसाठी अर्थसंकल्पात किती तरतूद करतात हे

जास्त महत्त्वाचे ठरते. यासाठी संघटकाचा अर्थसंकल्पाचा अभ्यास असल्यास संघटकाच्या भात्यात आणखी एका प्रभावी अस्त्राची भर पडेल हे निश्चित. मात्र या सर्व अभ्यासासाठी द्यावा लागणारा वेळ, प्रकाशनांची उपलब्धता, तज्ज्ञांची उपलब्धता या बाबी लक्षात घेता संघटकांना आपल्याकडील प्रश्नांच्या व्यापातून असा अभ्यास करणे शक्य होईलच असे नव्हे. समर्थनसारखी संस्था या कामी संघटनांच्या उपयोगी पडू शकेल. अनेक राज्यांमध्ये अर्थसंकल्पाच्या अभ्यासावर लक्ष केंद्रीत करणाऱ्या संस्था तयार होत आहेत ही आनंदाचीच बाब म्हणावी लागेल.

**विधिमंडळासोबत कार्य :**

कायदे, अर्थसंकल्प, प्रशासनावर अंकुश, धोरणांची आखणी हे विधिमंडळाचे कार्य असते. विविध विषयांवरील अशा कामकाजात विधिमंडळ सदस्यांनी सहभाग घ्यावा अशी अपेक्षा असते. या सर्व विषयांची तज्ज्ञता विधिमंडळ सदस्याकडे असेल अशी अपेक्षा करणे गैर आहे. त्या त्या विषयावरील चर्चेच्यावेळी विधिमंडळ सदस्यांना आवश्यक असणारी अद्ययावत माहिती उपलब्ध होण्यासाठी यंत्रणा आज उपलब्ध नाही. विधिमंडळ सदस्याचे स्वत:चे कार्यालय असत नाही. विधिमंडळातील पक्षांना कार्यालये आहेत. या कार्यालयातून प्रामुख्याने विधिमंडळातील आयुधांची उदा. प्रश्न, लक्षवेधी  आदींची तयारी केली जाते. मात्र अशा कार्यालयातही विविध विषयांवरील अद्ययावत माहिती वा तज्ज्ञांच्या सेवा क्वचितच उपलब्ध असतात. ही महत्त्वाची कमतरता भरून काढण्याचा प्रयत्न समर्थन करीत आहे.

समर्थनमार्फत विविध राजकीय पक्षांच्या विधिमंडळ सदस्यांना अर्थसंकल्पाशी संबंधित माहिती पुरविली जाते. याचबरोबर राज्यातील विविध समाजघटकांचे सार्वजनिक महत्त्वाचे प्रश्न यावरील माहिती दिली जाते. समर्थनचे कर्मचारी सातत्याने मंत्रालय, विविध आयोग, विधिमंडळ सदस्य, विधिमंडळातील पक्ष कार्यालये व इतर कक्षांच्या, अधिकाऱ्यांच्या संपर्कात असतात. राज्यातील अनेक प्रश्नांची माहिती विधिमंडळ सदस्यांपर्यंत पोहोचवून त्यांच्या सहकार्याने विविध आयुधांच्या माध्यमातून असे प्रश्न सोडविण्यात समर्थन यशस्वी ठरले आहे.

गडचिरोलीतील चिन्ना मट्टामी या आदिवासी युवकाला नक्षलवादी समजून पोलिसांनी ठार केले. श्रमिक एल्गार संघटनेने उच्च न्यायालयात या प्रकरणी दाद मागितली. नागपूर खंडपीठाने दोन लाखांची नुकसानभरपाई देण्याचा आदेश राज्य सरकारला दिला. राज्य सरकार मात्र त्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात गेले. हा प्रश्न विधिमंडळाच्या

व्यासपीठावरून सोडविण्यास समर्थनने सहाय्य केले. उपोषण स्थळापासून विरोधी पक्ष नेते श्री. रामदास कदम यांनी चिन्ना मट्टामीच्या आईला आपल्या वाहनातून गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्याकडे नेले. चिन्नाच्या आईला न्याय देण्याचा निर्णय शासनाला घ्यावा लागला.

वसई - विरार परिसरातील एस.टी. वाहतूक बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. त्यामुळे त्या भागातील प्रवाशांचे अतोनात हाल होणार होते. परिसरातील विविध राजकीय पक्षांचे अकरा नेते बेमुदत उपोषणास बसले होते. तेव्हा विधिमंडळाचे अधिवेशन चालू होते. विविध पक्षांच्या विधिमंडळ सदस्यांना हा मुद्दा समर्थनने समजावून दिला. विविध आयुधांचा वापर करीत सभागृहात सदस्यांनी प्रश्न उपस्थित करून शासनाला निर्णय बदलण्यास भाग पाडले.

ठाणे जिल्ह्यातील रेतीचा ठेका सरकारने एका माफियास दिला होता. त्यामुळे सुमारे ५० हजार रेती उत्पादक व कामगार बेरोजगार होणार होते. रेती उत्पादकांनी अनेक आंदोलने केली. परंतु सरकार बधले नाही. अखेर सत्याग्रह करून सुमारे दीडशे कार्यकर्ते व खासदार दामू शिंगडा यांचेसह मी तुरुंगात गेलो. आम्ही तुरुंगात असताना समर्थनने विधिमंडळात विधिमंडळ सदस्यांद्वारे प्रश्न उपस्थित करून सरकारला निर्णय बदलण्यास भाग पाडले.

राज्याचे सहा राखीव निधी संपुष्टात आणून या राखीव निधींतर्गत जमा होणारा महसूल एकत्रित निधीमध्येच ठेवण्याच्या दृष्टीने एक विधेयक शासनाने विधिमंडळात सादर केले होते. एकत्रित निधीमधून राखीव निधीकडे रकमा वळविल्यामुळे एकत्रित निधीमध्ये दिसणारा खर्च यामुळे दिसणार नाही व त्यामुळे महसुली तूट दिसणार नाही, या उद्देशाने शासनाने हे विधेयक मांडले होते. मात्र त्यामुळे रोजगार हमी योजनेसाठी राखून ठेवलेल्या हक्काच्या निधीचे, रोजगार हमी निधीचे अस्तित्वच संपुष्टात येणार होते. हे विधेयक विचारार्थ संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले होते व ते कोणत्याही परिस्थितीत मंजूर करवून घेण्यासाठी शासन आग्रही होते. संख्याबळामुळे जरी विधेयक संमत झाले तरी समर्थनने या संदर्भात केलेल्या प्रयत्नांमुळे शासनाला रोजगार हमी योजनेसाठी रु. २ हजार कोटींचा कॉर्पस राखून ठेवणे भाग पडले.

*******

(समर्थन प्रकाशित 'विधिमंडळ: रचना व कार्यपद्धती' वर आधारीत)

# पोलादी चौकट

भारतीय नोकरशाही यंत्रणेचा पाया ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने सन १६०० मध्ये घातला. व्यापार हेच कंपनीचे उद्दिष्ट असल्यामुळे त्यावेळच्या नोकरशाहीचे स्वरूप व्यापाराच्या अनुषंगाने ठरविले गेले. १८१३ साली ब्रिटीश संसदेने ईस्ट इंडिया कंपनीची भारतातील मक्तेदारी संपुष्टात आणली. त्यानंतर प्रशासकीय सेवेतील अधिकारी गुणवत्तेच्या निकषावर स्पर्धा परीक्षेद्वारे नेमण्याची प्रथा सुरू झाली. १८३३ पर्यंत भारतीय नागरी सेवेतील अधिकारी केवळ इंग्रज असत. भारतीय केवळ कनिष्ठ स्तरावर काम करीत. १८८५ मध्ये भारतीयांना भारतीय नागरी सेवेत स्थान देण्याचे निश्चित झाले. प्रत्यक्षात १९२२ साली भारतात स्पर्धा परीक्षा घेतल्या गेल्या. आज अस्तित्वात असलेली नोकरशाही यंत्रणेची मूळे याच काळात रुजलेली आहेत.

**भारतातील नागरी सेवा तीन प्रमुख गटांमध्ये विभागलेल्या आहेत.**

**अखिल भारतीय सेवा :** भारतीय प्रशासनिक सेवा (IAS) आणि भारतीय पोलीस सेवा (IPS) या दोन सेवा ब्रिटीश साम्राज्य काळापासूनच पोलादी चौकटीचा महत्त्वाचा भाग होत्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय वन सेवा (IFS) ही तिसरी अखिल भारतीय सेवा निर्माण करण्यात आली. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांच्या माध्यमातून या अधिकाऱ्यांची निवड केली जाते. निवडलेल्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांची विशिष्ट राज्यांमध्ये नेमणूक केली जाते. राज्याच्या सेवेत असणाऱ्या या अधिकाऱ्यांची बदली करण्याचा अधिकार राज्य सरकारला असतो. मात्र त्यांना पदावरून दूर करण्याचा अधिकार फक्त केंद्र सरकारला असतो.

**केंद्रीय सेवा:** यामध्ये भारतीय परराष्ट्र सेवा, वित्त व लेखा सेवा, भारतीय डाक सेवा, भारतीय महसूल सेवा, इत्यादींचा अंतर्भाव असतो. या सेवा केंद्र सरकारच्या प्रत्यक्ष

नियंत्रणाखाली असतात. प्रत्येक सेवेंतर्गत अधिकाऱ्यांचे चार स्तर असतात. पहिल्या दोन स्तरांवरील अधिकाऱ्यांची निवड केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांद्वारे केली जाते. तर तिसऱ्या व चौथ्या स्तरावरील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या सेवा भरती आयोगाच्या (स्टाफ सिलेक्शन कमिशनच्या) परीक्षेद्वारे होतात.

**राज्य सेवा :** राज्य प्रशासन सेवा, पोलीस सेवा, न्यायिक सेवा या सोबतच वन, शिक्षण, आरोग्य, कृषी, अभियंता, सहकार अशा विषयांसाठी स्वतंत्र सेवा राज्य सेवांतर्गत येतात. राज्य कर्मचाऱ्यांचे चार वर्गांमध्ये विभाजन होते. वर्ग एक व दोनचे अधिकारी राजपत्रित अधिकारी असतात. वर्ग तीन मध्ये लिपिक दर्जाचे तर वर्ग चार मध्ये अन्य कर्मचारी येतात. या सेवांचे नियंत्रण राज्य शासन करते. राज्य लोक सेवा आयोगाच्या परीक्षांद्वारे वर्ग एक व दोनच्या अधिकाऱ्यांची निवड केली जाते. राज्य प्रशासन व पोलीस सेवेतील अधिकारी कालांतराने पदोन्नतीद्वारे भारतीय प्रशासन व पोलीस सेवेतील अधिकारी बनू शकतात.

लोकशाहीच्या तीन अंगांपैकी कार्यपालिका ही मंत्रिमंडळ व प्रशासकीय यंत्रणा यांनी बनलेली असते. राज्य कारभार करीत असताना धोरणे आखणे, शासकीय ठराव करणे, कायद्याचा मसुदा तयार करणे, अर्थसंकल्पाची आखणी करणे, कायद्यांची अंमलबजावणी करणे आदी कामे मंत्रिमंडळाने करणे अपेक्षित असते. या कामांची दिशा निश्चिती मंत्रिमंडळ करीत असले तरी प्रत्यक्ष दस्तावेज तयार करण्याचे काम नोकरशहा करीत असतात. हे दस्तावेज भारतीय राज्य घटनेच्या चौकटीत, अस्तित्वात असलेल्या कायद्यांवर आधारित व तांत्रिकदृष्ट्या योग्य असतील याची दक्षता नोकरशहांनी घ्यावयाची असते. लोकप्रतिनिधींना केवळ धोरणे आखतानाच नव्हे तर त्यांची अंमलबजावणी करतानाही नोकरशाहीवरच अवलंबून राहावे लागते.

प्रशासकीय अधिकारी अगर नोकरशहा कायम स्वरुपाच्या शासकीय सेवेत असतात. त्यांचे आसन स्थिर असते. कार्यकक्षा निश्चित असल्याने ही यंत्रणा लवचिकता नसणाऱ्या स्थिर पोलादी चौकटी प्रमाणे असते. याउलट लोकप्रतिनिधी ठराविक काळासाठीच पदावर असतात व ते अस्थिर असतात. अस्थिर राज्यकर्ते व स्थिर पोलादी चौकटीसारखे प्रशासन याचा परिणाम धोरणे आखताना व त्याची अंमलबजावणी करताना प्रशासनाचा वरचष्मा राहण्यात होतो. यामुळेच धोरण आखून घेण्यासाठी, बदलून घेण्यासाठी व अंमलबजावणी करवून घेण्यासाठी राज्यकर्त्यांबरोबरीने प्रशासनासोबत काम करणे महत्त्वाचे ठरते. यासाठी नोकरशाहीची रचना, स्वरूप आणि कार्यपद्धती यासोबतच लोकप्रतिनिधी व प्रशासन यांच्यामधील परस्पर संबंध व प्रशासनातील अंतर्गत संबंध याचाही अभ्यास

संघटकाला करावा लागतो. नोकरशाहीची रचना व अपेक्षित कार्यपद्धती कागदपत्रांवरून अभ्यासता येते, मात्र तिची प्रत्यक्ष कार्यपद्धती कशी आहे याचा अनुभव घ्यावा लागतो.

कायदा व सुव्यवस्था राखण्यापुरती मर्यादित असलेली नोकरशाहीची भूमिका स्वातंत्र्यानंतर लोककल्याणकारी बनणे अपेक्षित होते. मात्र या यंत्रणेवर असलेला साम्राज्यवादाचा प्रभाव कायम राहिला. गमतीचे उदाहरण द्यायचे झाल्यास सायंकाळी चार वाजता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एकत्र चहा घेण्याची ब्रिटिशांची परंपरा पोलीस मुख्यालयात व सैन्यात कायम आहे. स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिशांची सत्ता असताना सरकार लोकांचे नव्हते, ते ब्रिटिशांचे होते. त्यामुळे प्रशासन हे साम्राज्यवादी सरकारचे नोकर होते. स्वातंत्र्यानंतर सरकार लोकांचे आले. भारतीय दंड संहिता कलम २१ नुसार राज्य व्यवस्थेच्या सेवेत असणाऱ्या व शासनाकडून आर्थिक लाभ मिळविणाऱ्या प्रत्येकाची जनसेवक अशी व्याख्या करण्यात आली. मात्र राजकीय लोकप्रतिनिधींच्या साम्राज्यवादी मानसिकतेमुळे व प्रशासन लोकाभिमुख करण्याच्या इच्छाशक्ती अभावी नोकरशाहीचे जे स्वरूप बदलावयास हवे होते ते बदलले नाही. नोकरशाहीची मानसिकताही साम्राज्यवादीच राहिली. नोकरशहा ‘सरकारी नोकर’ राहिले, ‘जनसेवक’ झालेच नाहीत. ब्रिटीश काळातील सरकारी नोकरांची मानसिकता, प्रशासकीय यंत्रणेत अनेक ठिकाणी अस्तित्वात असल्याचे आपणास आजही जाणवते.

कायद्यांची आणि कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी प्रशासनातील नोकरशहांनी करणे अपेक्षित असते. ही अंमलबजावणी त्यांनी निर्भयपणे, कोणावरही मेहेरबानी न करता, कायद्याचा व संविधानाचा आत्मा लक्षात घेऊन करावी अशी अपेक्षा असते. आपल्या देशातील सामाजिक व्यंगे दूर करण्यासाठी अनेक कायद्यांची निर्मिती करण्यात आली आहे. दारिद्र्य निर्मूलनासाठी असंख्य योजना सरकार आखीत असते. मात्र वेठबिगारी, बालमजूरी, किमान वेतन, हुंडाबळी, महिलांवरील अत्याचार, आदिवासी-दलितांवरील अत्याचार, भूमी सुधार इत्यादी सामाजिक न्यायाच्या कायद्यांचा अंमल देशात कोठेही प्रभावीपणे झालेला नाही हे वास्तव कोणीही नाकारणार नाही. सत्ताधारी व प्रस्थापित व्यक्तिगत हितासाठी दबाव तंत्राचा वापर करून प्रशासनास अनेकदा कायद्याचा अंमल करू देत नाहीत. मात्र कायद्याची अंमलबजावणी न करण्यासाठी नोकरशहांनी हा बचाव घेतल्यास तो समर्थनीय ठरू शकत नाही.

कायदा अस्तित्वात आल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी नोकरशाहीची असते. अंमलबजावणीसाठी नोकरशाहीला कायद्याद्वारे अधिकारही प्राप्त

झालेले असतात. कायद्याने प्राप्त झालेले अधिकार वापरण्याचे अगर कर्तव्य पार पाडण्याचे बंधन अशा अधिकाऱ्यांवर असते. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राजकीय इच्छाशक्ती असो अगर नसो, नोकरशाहीला त्याची अंमलबजावणी करण्यावाचून, कायद्याने नेमून दिलेले कर्तव्य बजावण्यावाचून पर्याय नसतो. राजकीय इच्छाशक्ती विरोधामध्ये लढा देत असताना संघटनेला नोकरशाहीच्या या भूमिकेचा पुरेपूर उपयोग करून घेता येतो. कर्तव्य कठोर नोकरशहांना देखील राजकीय इच्छाशक्ती विरोधात आपले कर्तव्य पार पाडताना या भूमिकेचा उपयोग होतो.

कायदा, नियम, सरकारी ठराव याची प्रक्रिया पार पाडण्याचे बंधन नोकरशाहीवर असते. नियमाच्या बाहेर त्यांना जाता येत नाही. कायद्यातील तरतूद स्पष्ट नसल्यास कायद्याचा आत्मा लक्षात घेऊन अधिकाऱ्यांना आपले अधिकार वापरता येतात. दुर्बलांच्या बाजूने, दुर्बलांच्या हिताचा असा कायद्याचा अर्थ अधिकाऱ्याने लावावा आणि स्वत:च्या सद्सद्विवेकबुद्धीने निर्णय घ्यावा अशी अपेक्षा असते, असा अर्थ लावून अधिकाऱ्याने केलेल्या कृतीस (action in good faith) संरक्षण असते.

प्रामणिकपणे, कर्तव्यनिष्ठेने आपले कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्या नगण्य नसली तरी बहुसंख्य नोकरशाहीकडून कर्तव्य पालनात कसूरच होत असल्याचे आढळून येते. यासाठी अनेक कारणे असू शकतात. अनेकदा निम्नस्तरावरील प्रशासकीय कर्मचाऱ्यांना कायदा अस्तित्वात असल्याचीही माहिती नसते. अनेकांकडे कायद्याचे पुस्तकही उपलब्ध नसते. कायद्याबाबत त्यांचे प्रशिक्षण अपुरे असते. संविधानातील तरतुदींबाबत त्यांचे ज्ञान जवळपास शून्य असते. त्यामुळे नागरिकांना प्राप्त झालेले अधिकार मिळवून देण्यासाठी त्यांचे काही कर्तव्य आहे याची जाणीव त्यांना क्वचितच असते. याशिवाय बहुसंख्य कर्मचारी सत्ताधाऱ्यांच्या राजकीय दबावाखाली काम करतात. अधिकाऱ्याची मानसिकताही महत्त्वाची ठरते. अधिकारी भ्रष्ट असेल तर ज्यांच्याकडे पैसे नाहीत त्यांचे काम करण्यात त्याला रस नसतो. अधिकाऱ्याची मानसिकता पुरुषी अहंकाराची, जातीयवादी किंवा गरिबाच्या विरोधी असेल तर त्याची कृती त्याप्रमाणेच होते. कायद्यातील अस्पष्ट तरतूदी व पळवाटांचा फायदाही अधिकारी उठवत असतात. सरकारी नोकरी सुरक्षित असल्याने कामे टाळण्याकडे कामचुकार अधिकाऱ्यांचा कल असतो.

बहुसंख्य सरकारी कर्मचारी अगर अधिकारी सुरक्षित नोकरी म्हणून किंवा करिअर करण्यासाठी शासकीय नोकरीत आलेले असतात. फारच थोडे समाजाच्या सेवेसाठी

नोकरीत येतात. त्यामुळे साहजिकच ते आपले प्राधान्यक्रम सांभाळून जनतेला सेवा देतात. लक्ष्यांक, इष्टांक पूर्ण करणे त्यांच्या दृष्टीने प्राधान्याचे काम असते, कारण त्याआधारे त्यांचा वार्षिक गोपनीय अहवाल लिहिला जातो. त्यांच्या वरिष्ठाने लिहिलेल्या या अहवालावर त्यांची बदली, पदोन्नती अगर पदावनती अवलंबून असते.

अधिकाऱ्याचा जनतेबरोबर असलेला संवाद, पत्रकार, राजकीय व्यक्तींसोबतचा संपर्क, कनिष्ठ आणि वरिष्ठांबरोबरचे त्याचे संबंध यावर अधिकाऱ्याची परिणामकारकता तोलली जाते. अनेकदा गोपनीय अहवालात याचीही दखल घेतली जाते. गोपनीय अहवालाचे महत्त्व लक्षात घेऊन संघटकाला संघटना-सामर्थ्याच्या बळावर प्रशासनास उत्तरदायी ठरविता येते.

नोकरशाही व्यवस्था भली किंवा बुरी याबाबत सरसकट विधान करणे योग्य ठरणार नाही. ही व्यवस्था व्यक्तींनी बनलेली आहे. संबधित पदावर असलेला अधिकारी वा कर्मचारी कशारीतीने काम करतो हे त्याच्या व्यक्तिमत्त्वावर ठरते. त्या अधिकाऱ्याचे व्यक्तिमत्त्व जाणून घेऊन संघटकाला आपले धोरण ठरवावे लागते. माझ्या अनुभवानुसार नोकरशहांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

**संतुलित नोकरशहा :**

संतुलित विचाराचे अधिकारी सारासार विचार करून कायद्याने नेमून दिलेले कार्य करतात. ते कोणाच्याही दडपणाखाली येत नाहीत. अशा अधिकाऱ्यांना कायद्यातील तरतूदी आणि त्यांच्याकडून आपण करीत असलेल्या कृतीची अपेक्षा शांतपणे समजावून दिली तर ते हमखास मदत करतात. ठाण्याला श्री. गो. बा. पिंगुळकर यांनी जिल्हाधिकारी पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर आम्हाला बोलावून घेतले. वेठबिगार मुक्तीचे काम त्यापूर्वी त्यांनी कधीही केले नव्हते. तेव्हा कायद्यातील सर्व तरतूदी मला समजावून सांगा, असे त्यांनी आम्हाला मोकळेपणाने सांगितले. त्याचबरोबर तुम्ही अशी प्रकरणे माझ्यासमोर आणा, माझी खात्री झाली तर मी निश्चितच कारवाई करीन आणि माझी खात्री झाली नाही तर त्याची कारणेही तुम्हाला देईन, हे त्यांनी स्पष्ट केले व त्यानुसारच कार्य केले. ते पदावर असताना आम्हाला कधीही संघर्ष करावा लागला नाही. अशा अधिकाऱ्यांबरोबर काम करताना संघटकाची जबाबदारी वाढते. पूर्ण गृहपाठ करूनच संघटकाला अशा अधिकाऱ्यांसमोर जावे लागते.

**भावनाप्रधान नोकरशहा :**

काही अधिकारी भावनाप्रधान असतात. एकदा का त्यांचा एखाद्या व्यक्तीवर वा कार्यावर विश्वास बसला की, ते संपूर्ण सहकार्य करतात. वेठबिगार मुक्तीच्या लढ्यादरम्यान श्री. भास्करराव पाटील, एक ज्येष्ठ सनदी अधिकारी ठाण्याचे जिल्हाधिकारी म्हणून नेमले गेले. त्यांच्या पूर्वीचे जिल्हाधिकारी प्रस्थापितांना साथ देत होते. साहजिकच श्रमजीवी संघटनेला त्यांच्याविरोधी लढावे लागले होते. नव्या जिल्हाधिकाऱ्यांनी आमच्यासमोर त्यांच्या सर्व अधिकाऱ्यांना बोलावून घेतले आणि यापुढे आम्हाला प्रशासनाविरोधी लढावे लागणार नाही असे सांगितले. आमच्या समोर अधिकाऱ्यांना हात जोडून सांगितले की, ''विवेक व विद्युल्लताच्या कार्याला सहकार्य करा, ते परमेश्वराचे कार्य आहे! आता हात जोडतो, पण नाही केलेत, तर लाथा घालीन!'' त्यांच्या संपूर्ण कार्यकाळात संघटनेशी त्यांचे भावनात्मक नाते जोडले गेले. अशा अधिकाऱ्याबरोबर काम करताना आपल्यामुळे ते कोठे अडचणीत येणार नाहीत, याची काळजी संघटकास घ्यावी लागते व आपल्याकडून त्यांचा गैरफायदा घेतला जाणार नाही याबाबत जागरूक राहावे लागते.

**सहृदयी नोकरशहा :**

काही अधिकारी खुलेपणाने लोकांच्या बाजूचे असतात आणि गरिबांच्या प्रश्नांबाबत संवेदनाक्षम असतात. कायद्यातील संदिग्ध तरतुदींचा लाभ दुर्बलांना मिळवून देण्याकडे त्यांचा कल असतो, अशा अधिकाऱ्यांसोबत सहसा संघर्ष करावा लागत नाही. मात्र आपल्या संवेदनक्षमतेमुळे असे अधिकारी स्वत: अडचणीत येण्याची शक्यता असते. अशावेळी संघटनेने त्यांच्या हेतूबद्दल शंका न घेता संपूर्ण सहकार्य करून त्यांचे मनोबल उंचावण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**सुस्त नोकरशहा :**

काही अधिकारी सुस्त असतात व वेळकाढूपणा करतात, असे अधिकारी बहुधा गोडबोले असतात. संघटकाशी गोड बोलून, विषयांतर करून मूळ मुद्याला बगल देण्याकडे त्यांचा कल असतो, अशा अधिकाऱ्यांसोबत काम करताना संघटकाला आपल्या मुद्द्याला चिकटून राहावे लागते व चिवटपणाने अधिकाऱ्याकडून काम करवून घ्यावे लागते. अशा अधिकाऱ्यांना आपत्ती नको असते. त्यामुळे संघटकाने अशा अधिकाऱ्यांसमोर संकट उभे केले तर ते टाळण्यासाठी तो अधिकारी काम करतो.

**विरोधक / भ्रष्ट नोकरशहा :**

भ्रष्टाचारामुळे अगर राजकीय मेहेरबानीसाठी गरिबांचे कायदेशीर काम टाळण्याकडे अगर गरिबांच्या विरोधी काम करण्याकडे ज्यांचा कल असतो असे नोकरशहा संघटनेचे विरोधक असतात. संघटित सामर्थ्याच्या दबावाखालीच ते गरिबांची कामे करतात अन्यथा नाही. अहिंसक संघर्षाचा मार्ग वापरून अशा अधिकाऱ्यांना कार्यप्रवृत्त करावे लागते. त्यासाठी संघर्षाची योग्य रणनीती व डावपेचांचा आधार घ्यावा लागतो.

**हुकूमशाही वृत्तीचा नोकरशहा :**

काही अधिकारी उद्धट व हुकूमशाही वृत्तीने वागणारे असतात. ते लोकांचा व कायद्याचा सन्मान करीत नाहीत. ते म्हणतील तेच खरे, असे त्यांचे वागणे असते. अशा अधिकाऱ्यांचे बहुधा त्यांच्या कनिष्ठ अधिकाऱ्यांशीही जमत नाही. अशा अधिकाऱ्यांबरोबर पूर्ण विचारांती डावपेच आखून संघटकाला काम करावे लागते.

**नोकरशाहीसोबत काम :**

नोकरशाहीबरोबर कार्य करताना 'शक्य तेथे सहकार्य व आवश्यक तेथे संघर्ष' हे महात्माजींचे वचन मोलाचे ठरते. नोकरशाही व्यवस्था व्यक्ती-व्यक्तींनी बनलेली असल्यामुळे त्या अधिकारावरील व्यक्ती जसा प्रतिसाद देतात त्यानुसार आपले धोरण आखावे लागते. नोकरशाहीबरोबर काम करताना पुढील काही मुद्दे लक्षात ठेवता येतील.

१) संपर्क प्रस्थापित करणे

अधिकाऱ्यांबरोबर संपर्क प्रस्थापित करणे आवश्यक असते. आपण पदाचा आदर राखतो असे आपल्या वागण्या-बोलण्यातून त्या अधिकाऱ्याला जाणवले पाहिजे. त्याचबरोबर आपण भ्रष्टाचाराच्या, कोणावर मेहेरबानी करण्याच्या, दफ्तर-दिरंगाईच्या विरोधात आहोत हेही त्याला कळले पाहिजे. कायद्याची अंमलबजावणी राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार, दुर्बल घटकांच्या बाजूने व्हावी अशी आपली अपेक्षा असते. त्याच वेळी असे काम करू इच्छिणाऱ्या अधिकाऱ्याला आपल्याकडून संपूर्ण सहकार्य मिळेल याची आपण खात्री केली पाहिजे.

अधिकाऱ्याबरोबर संपर्क प्रस्थापित करताना तो कोणत्या दडपणाखाली काम करीत आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अनेकदा वरिष्ठ अधिकारी, राजकीय नेते, मंत्री तोंडी आदेशावर त्यांचेकडून गैरकृत्य करवून घेण्याचा प्रयत्न करीत असतात, त्यासाठी त्यांच्यावर दबाव आणीत असतात. हे समजून घेतल्यास, संघटित दबाव आणून

त्या अधिकाऱ्यावरील वरिष्ठांचा दबाव आपणास रोखता येतो. कायद्याने काम करणाऱ्या अधिकाऱ्याला अनेकदा वरिष्ठांच्या रोषाला बळी पडावे लागते, अनेकदा कारवायांना तोंड द्यावे लागते. अशावेळी त्या अधिकाऱ्याला नैतिक बळ देण्याव्यतिरिक्त अन्य सर्व प्रकारचे सहकार्य संघटनेने केल्यास कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याला समाधान मिळते व असे अधिकारी कर्तव्य बजावण्यासाठी पुढे येतात.

२) दुसरी बाजू समजावून देणे

अधिकाऱ्याला मिळणारी माहिती त्याच्या सूत्रांकडून मिळत असते, त्यामुळे अनेकदा त्याला मिळणारी माहिती एकांगी असते. प्रश्नाची दुसरी बाजू त्याच्यासमोर येत नाही म्हणून अधिकाऱ्याला प्रश्नाची दुसरी बाजूही आपणास समजावून सांगता आली पाहिजे. अधिकारी आपल्या विरोधातच असतात असे संघटकाने गृहीत धरून चालू नये.

३) नोकरशाहीच्या मर्यादा समजून घेणे

आपण ज्या विभागाबरोबर काम करीत आहोत त्या विभागाची रचना समजून घेतल्याशिवाय आपले काम प्रभावी होणार नाही. कोणाकडून काय अपेक्षा करावी हे संघटकाने समजून घेतले पाहिजे. चांगल्या अधिकाऱ्यानेही प्रत्येकवेळी आपण सांगू तसेच काम केले पाहिजे अशी संघटकाने अपेक्षा करू नये. अधिकारी त्याच्या मर्यादेत काम करू शकेल, त्याच्या मर्यादांची चौकट त्याला तोडता येणार नाही. हत्तीने माकडासारख्या उड्या माराव्यात अशी अपेक्षा आपणास करता येईल का ?

४) माहितीचे आदान-प्रदान

अधिकाऱ्यांना कायदे, नियम, शासकीय ठराव, परिपत्रके यांची माहिती असावी ही अपेक्षा रास्तच आहे. परंतु व्यवस्थेमध्ये अशी सर्व माहिती त्यांना सहजपणे उपलब्ध असतेच असे नाही. माहिती व तंत्रज्ञानाचा प्रसार म्हणावा तसा झालेला नाही. अधिकाऱ्यांना हवी असणारी माहिती आपणही मिळवून देण्याचा प्रयत्न केल्यास ते त्यांचे कार्य प्रभावीपणे करू शकतील.

५) संयम बाळगणे

अधिकाऱ्याने तात्काळ काम केले पाहिजे, असा आग्रह आपणास धरता येत नाही. नोकरशाही व्यवस्थेमध्ये प्रत्येक बाब लिखित स्वरुपात असावी लागते. त्यामुळे अनेकदा निर्णय घेण्यास विलंब लागत असतो. अनेकदा निर्णय घेण्यापूर्वी कायद्याने नेमून दिलेली कार्यपद्धती त्यांना अवलंबावी लागते. त्यामध्ये वेळ जात असतो. त्या कार्यपद्धतीचा आपण

आदर केला पाहिजे. उचित कालावधीनंतरही अधिकाऱ्याने काम केले नाही तर इतर अनेक मार्गांचा उपयोग करून आपणास काम करवून घेता येते.

६) नियमाच्या चौकटीत प्रश्नांची मांडणी

संघटकास आपला मुद्दा कायदा अगर नियमांच्या चौकटीत अधिकाऱ्यांसमोर मांडता यायला हवा. अधिकारी त्याच चौकटीत काम करू शकतात. मानवतेचे अगर भावनिक आवाहन कामी येत नाही. भावनिक आवाहनाने एखादा अधिकारी व्यक्तिश: प्रभावित होईलही मात्र मुद्द्यांची शेवटपर्यंत तड लागण्याच्या दृष्टीने मुद्दा नियमांच्या चौकटीत मांडला जाणे आवश्यक ठरते.

७) कागदोपत्री पुरावा

अधिकारी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी बांधील आहेत. त्यांनी कायद्याने नेमून दिलेले कर्तव्य पार पाडले नाही तर त्यांच्यावर कारवाई होऊ शकते. त्यांचेवर त्यांचे वरिष्ठ अगर मंत्री, विधानसभा, विधान परिषद, उच्च व सर्वोच्च न्यायालय कारवाई करू शकतात. मात्र त्यासाठी त्यांनी जे करावे अशी आपली अपेक्षा आहे ते करण्याचे बंधन कायद्याने त्यांच्यावर टाकले आहे हे पाहणे आवश्यक असते. ते कार्य आपण त्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे व तरीही ते त्यांनी केले नाही, या सर्व बाबी आपणास कागदोपत्री पुराव्याच्या आधारे सिद्ध कराव्या लागतात. म्हणून अधिकाऱ्याशी कितीही चांगले संबंध असले तरी फक्त तोंडी बोलणे करू नये. मुद्द्यांचा पाठपुरावा लेखी स्वरूपात असावा. तारीख, वेळ व शिक्क्यासह प्रत्येक लेखी पत्रव्यवहाराची पोच घेतलेली असावी.

८) बैठकीची तयारी

अधिकाऱ्यांबरोबर बैठकीला जाताना भेटीची वेळ आगाऊ ठरविणे व बैठकीपूर्वी ती निश्चित करून घेणे सोयीचे असते. अपेक्षित परिणाम साधण्यासाठी संघटकाने गृहपाठ करणे आवश्यक ठरते. त्यासाठी संबंधित कायदे, नियम, परिपत्रके, निवाडे यांचा अभ्यास संघटकाला करावा लागतो. बैठकीत ज्या मुद्द्यांवर विचार होणार आहे, त्यासंदर्भात निवेदन तयार केल्यास व ते बैठकीत सादर केल्यास, मुद्द्याच्या पाठपुराव्यासाठी भविष्यात त्याचा उपयोग होतो. बैठकीत झालेली चर्चा व निर्णयांच्या आधारे तयार केलेले पत्र आभार मानण्याच्या निमित्ताने बैठकीनंतर अधिकाऱ्यास पाठवावे. अशा पत्रांची पोच आपल्याकडे असल्यास त्याचा उपयोग मुद्द्याच्या पाठपुराव्यासाठी होतो. काम संपताच कार्यालय सोडणे हिताचे ठरते. कामाशिवाय गप्पा मारत राहिल्यास अधिकाऱ्याच्या व त्याच्या भेटीसाठी आलेल्या इतर अभ्यागतांच्या वेळेचा अपव्यय होतो.

९) चांगल्या कामाची दखल घेणे

अधिकाऱ्याने केलेल्या चांगल्या कामाची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देणे महत्त्वाचे असते. त्याने केलेल्या चांगल्या कामाचे अभिनंदन करून त्या पत्राची प्रत त्याच्या वरिष्ठांना पाठविल्याने त्याच्या गोपनीय अहवालासाठी त्याचा उपयोग होतो व अशा कामांना प्रसिद्धी दिल्यानेही अधिकाऱ्याचे मनोबल उंचावते.

**पोलीस :**

वर्दीच घालते या गावात रोज डाके,
झटतात चोर सारे सद्‌रक्षणाय आता

जनमानसातील पोलिसांबद्दलच्या प्रतिमेचे अचूक वर्णन कविवर्य सुरेश भटांच्या वरील ओळींमधून झालेले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती आनंद भल्ला यांनी 'देशातील सर्वात मोठी कायदा मोडणारी टोळी' व 'वर्दीतील गुन्हेगार' असे पोलिसांचे वर्णन केले होते. पोलीस यंत्रणा बेशिस्त असल्याचा निष्कर्ष खुद्द पोलीस आयोगानेही काढला होता. अनेक संघटकही पोलिसांना सरसकट शत्रू मानून अगर भ्रष्ट म्हणून त्यांचा उपहास करताना दिसतात. सर्वसाधारणपणे पोलिसांबाबत असेच अनुभव जास्त असले तरी मला मात्र पोलीस दलातही राजकीय दबावाला बळी न पडणारे, कर्तव्य कठोरपणे कार्य करणारे, गरिबांना सर्व प्रकारे सहाय्य करणारे, चांगल्या कामाला प्रतिसाद देणारे अनेक अधिकारी व सामान्य शिपाई आढळून आले. पोलीस हे प्रशासकीय यंत्रणेचाच भाग असले तरी संघटनात्मक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी पोलिसांचे महत्त्व अधिकच असते. पोलीस हे प्रशासकीय यंत्रणेचे दृष्य अंग तर आहेच परंतु जेथे जेथे संघर्ष येतो, मग तो कोणत्याही यंत्रणेसोबत असेल, पोलिसांशी संबंधही अटळ आहे. म्हणूनच माझ्या अत्यंत जिव्हाळ्याच्या या विषयाबाबत, पोलीस यंत्रणेबाबत स्वतंत्रपणे लिहिले आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

इंग्रजांच्या राजवटीत देश गुलाम असल्याने, पारतंत्र्यात असल्याने भारतीय नागरिकांना अधिकार नव्हते. भारतीय स्वातंत्र्यानंतर संविधानाने भारतीय नागरिकाला मूलभूत अधिकार प्रदान केले. या अधिकारांचा सन्मान करणारे, अधिकारांची रक्षा करणारे पोलीस दल मात्र स्वातंत्र्यानंतर बदलण्यात आले नाही. पोलीस जनतेचे मित्र बनण्याऐवजी ब्रिटिशांचा वारसा चालवित सत्तेचे गुलाम व जनतेचे शत्रूच राहिले. पोलीस आणि जनता यांच्यातील दुरावा पोलीस दलाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीत आहे.

१८५७ च्या सैनिकी बंडानंतर ब्रिटिशांनी पोलीस दल निर्माण करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी नेमलेल्या आयोगाने 'राजकीयदृष्ट्या उपयुक्त साधन' म्हणून पोलीस दलाची रचना करावी अशी शिफारस केली. या शिफारशी आधारे भारतीय पोलीस कायदा, १८६१ नुसार पोलीस दल अस्तित्वात आले. साता-समुद्रापलीकडून इंग्रजांना भारतावर राज्य करावयाचे होते, असे करताना भारतीय जनतेचा असंतोष काबूत ठेवण्यासाठी व सत्तेचे जनतेपासून संरक्षण करण्यासाठी पोलीस दल निर्माण झाले. सत्ता व संपत्ती यांचे संरक्षण करणे हेच पोलिसांचे मुख्य काम होते.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर नागरिकांना मूलभूत अधिकार प्राप्त झाले. परंतु स्वातंत्र्याचे रक्षण करणारी पोलीस यंत्रणा निर्माण करण्याचे, स्वातंत्र्याला अनुकूल असे लोकाभिमुख पोलीस दल निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य मात्र स्वातंत्र्यानंतर सत्तेत आलेल्या राज्यकर्त्यांनी केले नाही. उलटपक्षी ब्रिटिशांचा वारसा स्वकीय राज्यकर्त्यांनी तसाच पुढे चालू ठेवण्याचा निर्णय जाणीवपूर्वक घेतल्याचे लक्षात येते. पोलीस दलाच्या प्रमुखाऐवजी खरे अधिकार गृहमंत्री व मुख्यमंत्री यांच्याकडे असल्याने सत्ताधारी पक्ष अप्रत्यक्षपणे पोलीस दलाचे सूत्र-संचालन करीत असतो. प्रस्थापितांविरोधात संघटना बांधणी करताना या अडथळ्यावर मात करावी लागते. संपूर्ण पोलीस यंत्रणाच जनतेच्या विरोधात ठेवण्याचे धोरण राज्यकर्त्यांनी अवलंबिले असल्याने यंत्रणेतील व्यक्तींकडे त्याचा दोष जात नाही.

भारतीय स्वातंत्र्यानंतर पंचवीस वर्षांनी देशातील नागरिकांचे मूलभूत अधिकार आणीबाणीच्या कालखंडात हिरावून घेतले गेले. संपूर्ण देशातील पोलिसांनी भारतीय संविधानाने नागरिकांना प्रदान केलेल्या मूलभूत अधिकारांचा खुलेआम उपमर्द करीत घटनाबाह्य व बेकायदेशीर वर्तन केले. या काळात पोलीस दल जनतेचे सेवक नसून सत्तेचे गुलाम असल्याचे प्रकर्षाने जाणवले. आणीबाणीनंतर पोलीस दलाची, त्याच्या भूमिकेची विस्तृत छाननी करण्यासाठी राष्ट्रीय पोलीस आयोगाची स्थापना करण्यात आली. जनतेला, कायद्याला आणि पोलिसांच्या संघटनेला उत्तरदायी असणारे पोलीस दल निर्माण करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण शिफारशी आयोगाने केल्या. अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने यापैकी काही शिफारशींची अंमलबजावणी करण्याचे आदेश केंद्र व राज्य सरकारांना दिले. परंतु साम्राज्यवादी सत्तेचा वारसा सोडण्याची राज्यकर्त्यांची आजही मानसिकता नाही. थोडक्यात पोलिसांमधील दोष हे व्यवस्थेने निर्माण केलेले आहेत, असे असले तरीही संघटना बांधणी करीत असताना पोलिसांकडून जनतेची कामे करवून घेण्याचे कौशल्य संघटकाला विकसित करावे लागते.

**पोलिसांच्या अडचणी :**

पोलिसांना घटनेच्या चौकटीत कायद्याचा अंमल करावयाचा असतो. उच्च व सर्वोच्च न्यायालये सातत्याने कायद्यातील कलमांचा विकास करीत नवनवीन निवाडे जारी करीत असतात. राज्य व राष्ट्रीय मानवी हक्क, अल्पसंख्यांक, महिला, अनुसूचित जाती-जमाती आयोग अनेक शिफारशी करीत असतात. त्यांची अंमलबजावणी पोलिसांनी करावी अशी अपेक्षा असते. या संदर्भात ही माहिती प्रत्यक्ष ठाणे अंमलदारापर्यंत पोहोचण्याची कोणतीही व्यवस्था अस्तित्वात नाही. भरतीच्या वेळी जे काही प्रशिक्षण होत असेल तेवढेच, त्यानंतर सेवा काळात विविध स्तरावरील पोलिसांचे प्रशिक्षण जवळपास होतच नाही. सैन्यामध्ये प्रशिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. उत्कृष्ट सेवा केलेल्या सैनिकाला व अधिकाऱ्याला प्रशिक्षक म्हणून नियुक्त केले जाते. याउलट पोलीस खात्यात प्रशिक्षण विभागाला 'साईड-ब्रॅंच' म्हणून पाहिले जाते. पुरस्काराऐवजी शिक्षा म्हणून प्रशिक्षण विभागात पाठविले जाते. याचा स्वाभाविक परिणाम कायद्यातील तरतुदींबाबतच्या त्यांच्या अज्ञानात तर होतोच परंतु त्याचबरोबर त्यांचा कामाविषयाचा उत्साह कमी होण्यात होतो.

पोलीस खात्यात आपले म्हणणे अगर तक्रार वरिष्ठाकडे मोकळेपणाने सांगण्याची प्रथा नाही. वरिष्ठ सांगेल ते खरे. त्यामुळे 'साहेबाच्या पुढे आणि गाढवाच्या मागे उभे राहू नये' असा संकेत पोलीस खात्यात आहे. कनिष्ठ स्तरावरील पोलिसांचे ऐकले जात नाही. त्यांच्या समस्यांचे निराकरण होत नाही. त्यामुळे कनिष्ठ स्तरावरील पोलिसांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष असतो. या तणावाचा परिणाम म्हणून आत्महत्या करणाऱ्या पोलिसांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे.

इतर शासकीय खात्यांच्या तुलनेत पोलीस यंत्रणेवरील कामाचा ताण खूपच अधिक असतो. शिवाय त्यांना सातत्याने राजकीय दबावाखाली काम करावे लागते. सण, उत्सव, परीक्षा या काळात स्वत:च्या कुटुंबात त्यांना राहता येत नाही. अनेकदा त्यांना साप्ताहिक सुट्टीही घेता येत नाही. त्यांच्या कामाचे तासही प्रमाणाबाहेर आहेत. त्यांना सरासरी पासष्ट किलोमीटरचा प्रवास (घर ते कामाचे ठिकाण) करावा लागतो, पगार, भत्ते, इतर सुविधा तुटपुंज्या प्रमाणात उपलब्ध असतात असे निष्कर्ष पोलीस आयोगाने मांडले आहेत. या सर्वांचा स्वाभाविक परिणाम पोलिसांवर होत असतो.

पोलिसांच्या संपर्कात राहिल्यास त्यांना येणाऱ्या अडचणी संघटक समजून घेऊ शकतो व पोलिसांना त्यांचे कर्तव्य पार पाडण्यास सहाय्यभूत होईल अशी कृती वा मदत तो करू

शकतो. पोलिसांसोबतच्या संपर्कातूनच पोलीस यंत्रणा व कायद्याचा चांगला अभ्यास होऊ शकतो व पोलिसांसोबत काम करण्याचे कौशल्यही विकसित करता येते असा माझा व्यक्तिगत अनुभव आहे. पोलिसांच्या अडचणी या त्यांनी काम न करण्यासाठी, आपले कर्तव्य न बजावण्यासाठी बचाव आहेत असे मात्र नव्हे.

**पोलीस व संघटना :**

संघटना बांधणी करीत असताना संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला प्रदान केलेले मूलभूत अधिकार संघटकाला आत्मसात करावे लागतात. संविधानाच्या भाग तीनमध्ये हे अधिकार शब्दबद्ध करण्यात आले आहेत. हे अधिकार म्हणजे स्वातंत्र्याचे मूर्तिमंत रूप आहे. हे अधिकार सरकारला काढून घेता येत नाहीत. देशात कोठेही मुक्तपणे संचार करणे, संघटना बांधणे, आपले मत व्यक्त करणे यासारखे घटनेने दिलेले अधिकार संघटना बांधणी करीत असताना आपल्या कामी येतात. प्रस्थापित व्यवस्था संघटना बांधणीची प्रक्रिया रोखण्यासाठी पोलिसांचा वापर करीत असते.

पोलिसांनी संविधानाचा आदर करून संघटना बांधणीसाठी सहाय्यभूत होणे अभिप्रेत असले तरी त्यांचे वर्तन मात्र उलट असते. संविधानाने दिलेल्या अधिकारांसंदर्भात पोलिसांचे प्रशिक्षण झाल्याचा अनुभव येत नाही. पोलिसांनी कायद्याची अंमलबजावणी करावी असे अपेक्षित असले तरी पोलिसांचे कायद्याबाबतचे प्रशिक्षण अत्यंत अपुरे असते. पोलीस दलाची रचना व कार्यपद्धती न बदलल्याने, पोलीस बुद्धीचा वापर क्वचितच करताना दिसतात. बळाचा वापर अधिक करण्याकडेच त्यांचा कल असतो. पोलीस लाठी, बंदूक, हातकडी आणि कोठडी यांचा वापर कायदा पाळणाऱ्या सामान्य नागरिकांच्याच विरोधात सर्रास करताना दिसतात.

प्रशिक्षण व अद्ययावत माहिती नसल्याने चालत आलेल्या प्रथेनुसार पोलीस अधिकारी कार्य करताना दिसतात. उदा. चौकशीसाठी दंड प्रक्रिया संहिता कलम १६० नुसार १५ वर्षांखालील व्यक्तीला व महिलेला पोलीस ठाण्यात बोलवता येत नाही या तरतुदीची माहिती फार क्वचितच पोलिसांना असल्याचे आढळते. मात्र तरतुदीची माहिती असूनही त्याचा भंग केल्याच्या घटनाही आढळतात.

अनेक बेकायदेशीर पद्धती पोलीस अवलंबित असल्याचेही आढळून येते. कामावरील ताण टाळण्यासाठी तक्रारदाराला त्रास नको या सबबीखाली मुंबई पोलिसांनी एक नामी शक्कल शोधून काढली आहे. भुरट्या चोऱ्या अगर तत्सम किरकोळ दखलपात्र गुन्हे प्रत्यक्ष

खबरी बुकात नोंदविले गेल्यास गुन्ह्यांचे प्रमाण वाढेल व त्यांच्या तपासाचा ताण वाढेल त्यामुळे गुन्हे प्रकटीकरणाच्या टक्केवारीत घट होईल म्हणून मुंबई पोलिसातील गुन्हे प्रगटीकरण शाखा अशा गुन्ह्यांच्या नोंदीसाठी कायद्यात नसलेले ‘आडवे बुक’ ठेवीत असते. नागरिकांची तक्रार रीतसर अशा बुकात नोंदविली जाते. एका कागदावर तक्रारदारास गुन्हा दाखल क्रमांक व दाखल कलमांची माहितीही दिली जाते. एखाद्या गुन्ह्याचा तपास लागल्यास व चीजवस्तू सापडल्यास तक्रारदारास बोलावून परत दिली जाते व त्यावेळी तो गुन्हा प्रत्यक्ष कायद्यानुसार दाखल केला जातो. याचा तक्रारदारास फायदा किती हा प्रश्न वेगळा. ही पद्धत मात्र कायदेशीर नाही हे निश्चित. कायदेशीर अटक न करता डांबून ठेवणे, तपासाच्या वेळी मारहाण करणे, आरोपीच्या नातेवाईकांना त्रास देणे, भ्रष्टाचारामुळे अगर राजकीय दबावामुळे गुन्हे दाखल करणे अगर न करणे, गुन्ह्याची तीव्रता कमी करणे अगर वाढविणे, बेकायदेशीर हातकड्या घालणे, दोरखंडाने बांधणे इत्यादी छळवणुकीचे प्रकार पोलीस करीत असतात.

कायद्याच्या अंमलबजावणीसाठी पोलिसांना वर्दी देण्यात आली आहे. वर्दीतील पोलीस कोणताही गुन्हा करण्यास मोकळे आहेत, त्यांना कायद्याचे संरक्षण आहे असा काहींचा समज असतो. प्रत्यक्षात अन्य नागरिकांनी केलेल्या गुन्ह्यांसाठी जो कायदा लागू होतो तोच पोलिसांनाही लागू आहे. उदा. पोलिसांनी अपशब्द वापरल्यास, मारहाण केल्यास, विनयभंग केल्यास अगर कोणताही गुन्हा केल्यास त्यांच्यावर संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करता येतो. लोकांच्या मनात असलेल्या भीताचा व अज्ञानाचा फायदा पोलीस उठविताना दिसतात. अदखलपात्र गुन्ह्यात न्यायालयाच्या आदेशाशिवाय पोलिसांना दखल घेता येत नाही. जनतेच्या अज्ञानाचा फायदा घेऊन पोलीस अनेकदा अशा तक्रारींची दखल घेतात. काहीवेळा लोकांच्याही पोलिसांकडून अवास्तव अपेक्षा असल्याचे जाणवते. नागरिकही अनेकदा पोलिसांनी अदखलपात्र गुन्ह्याची दखल घ्यावी म्हणून आग्रह धरताना दिसतात.

संघटनेचे कार्य सुरू केले तेव्हा पोलीस व कायदा या विषयीचे माझे ज्ञान जवळपास शून्य होते. श्री. अनंता धनाजी वनीस या त्यावेळी पोलीस शिपाई पदावर असणाऱ्या व्यक्तीने मला पोलिसांची बाराखडी शिकविली. त्यानंतर संबंधित प्रकरणाच्यावेळी त्या त्या कायद्यांचा, नियमांचा अगर कलमांचा अभ्यास करून मी माझे ज्ञान विकसित केले. सेवेत असणारे अगर निवृत्त झालेले अनेक पोलीस अधिकारी माझे या विषयातील शिक्षक आहेत. संघटकाने किमान फौजदारी प्रक्रिया संहिता, दंड विधान संहिता व मुंबई पोलीस अधिनियम यांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

पोलीस कायद्याला बांधील असल्याने कायद्याच्या बारकाव्यांचा अभ्यास हे संघटकासाठी बलस्थान ठरते. अनेक पोलीस अधिकाऱ्यांचा कायद्याच्या तपशीलांचा अभ्यास अपुरा असतो. न्यायालयांचे आदेश, परिपत्रके, मानवी हक्क आयोगांच्या शिफारशी प्रत्यक्ष अंमलबजावणी करणाऱ्या पोलिसांपर्यंत पोहोचतच नाहीत. मात्र संघटकाने या संदर्भात अभ्यास केल्यास, स्वत:ची माहिती अद्ययावत ठेवल्यास पोलिसांसोबत काम करताना संघटकाचा वरचष्मा राहील.

अनेक तरुण ध्येयवादाने प्रेरित होऊन कर्तव्यनिष्ठने प्रामाणिकपणे कार्य करण्यासाठी पोलीस सेवेत दाखल होतात. प्रस्थापित व्यवस्थेत काम करीत असताना त्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागते. अंतर्गत लढाई त्यांना एकाकीपणे लढावी लागते. अशा अधिकाऱ्यांच्या पाठीशी संघटना उभी राहिल्यास त्यांना एकाकीपण जाणवत नाही व त्यांच्या लढाईत त्यांचे मनोबल आपणास उंचावता येते. अशाच एका पोलीस अधिकाऱ्याचे त्याच्याच शब्दातील हे मनोगत.

''कोणताही अधिकारी जेव्हा व्यवस्थेमध्ये प्रवेश करतो तेव्हा सुरुवातीला त्याला घडविणारे किंवा बिघडविणारे हात भेटतात. अनाहूत सल्लागार त्यांना सल्ला देतात. व्यवस्थेत असेच चालते, तुला असेच वागावे लागेल असे सल्ले दिले जातात. त्या अधिकाऱ्याला सरकारी कर्मचाऱ्याचा वारसा लाभला असेल तर चहापानाचे बाळकडू त्याला पाळण्यातच मिळते. त्यामुळे सेवेत येताच तो सराईत होतो. भ्रष्ट मार्गाने पैसे कमावणे तो वरिष्ठ व कनिष्ठ दोघांकडून शिकतो. सुरुवातीला भेटीरूपाने लाच देणे सुरू होते. पुरुष अधिकाऱ्याला ओल्या पार्टीसह अन्य सर्व प्रकार व्यवस्थेचा भाग म्हणून शिकविले जातात.

सोप्या मार्गाने मिळणाऱ्या पैशामुळे भोगवादी संस्कृतीकडे त्याची वाटचाल सुरू होते. त्याला तत्त्वाचा विसर पडतो या प्रलोभनातून तगून राहणे व लाच नाकारणे महत्त्वाचे ठरते. लाच न घेणारा जुन्या पठडीतला म्हणून हिणविला जातो. तो व्यवस्थेतला अडथळा ठरतो. वरिष्ठ व कनिष्ठांकडून त्याच्याशी असहकार पुकारतात. अशा अधिकाऱ्याला व्यवस्थेचा भाग बनविणे किंवा त्याला दूर सारणे असे दोन पर्याय त्यांच्याकडे शिल्लक राहतात. वरिष्ठ जर पैशावर नजर ठेवून असतील तर विविध दबाव तंत्रांचा वापर होतो. त्याचे तोंड बंद केले जाते. वरिष्ठांच्या जाचामुळे व्यवस्थेचा भाग बनून जावे म्हणजे जाच कमी होईल असे अधिकाऱ्याला वाटते. भ्रष्ट मार्गाने कामे किती सुरळीत होतात याचा अनुभव तो घेऊ लागतो. त्यामुळे भ्रष्टाचार ही गरज आहे असे त्याला वाटू लागते. कायदेशीर व प्रामाणिकपणे काम करण्याऐवजी पळवाटा शोधणे, मॅनेज करणे सोपे आहे असे

अधिकाऱ्याला वाटू लागते. याही स्थितीत तो तत्त्वाला चिकटून राहिला व त्याने टिकाव धरला तर त्याला पुढचा लढा कौटुंबिक स्तरावर द्यावा लागतो.

कुटुंबवत्सल व तत्त्वाने चालणाऱ्या अधिकाऱ्याच्या घरातील सुविधा भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या घरातील सुविधांसारख्या नसतात. अशा वेळी त्याच्या घरात उत्पन्नाचा दुसरा मार्ग असेल तर ठीक अन्यथा आर्थिक कुचंबणेमुळे मानसिक ताणतणावांना बळी पडावे लागते. अशावेळी जोडीदाराची साथ महत्त्वाची ठरते. नेकीने व कायदेशीरपणे काम करणे ही बाब दुर्मिळ होत चालली आहे. आर्थिक, मानसिक, कौटुंबिक, राजकीय आघाड्यांवर त्याला एकाचवेळी लढाई लढावी लागते. यापैकी आर्थिक, मानसिक, कौटुंबिक लढाई तो विविध पर्याय शोधून लढूही शकतो परंतु राजकीय आघाडीवर लढताना त्याची दमछाक होते. समाजाने या परिस्थितीत अधिकाऱ्याच्या मागे उभे राहणे ही काळाची गरज आहे, पण असे क्वचितच घडताना दिसते. 'मी व माझे' या कोशामध्येच समाज असल्याने अशा अधिकाऱ्यांकडे त्याचे लक्ष नसते. सर्व आघाड्यांवर लढून टिकलेला अधिकारी राजकीय आघाडीवर लढताना मात्र घुसमटून जातो. त्याची खरी कसोटी तेथेच असते. जर या ही आघाडीवर तो टिकला तर ठीक अन्यथा तो किंवा त्याची तत्त्वे यापैकी एकाचा बळी जातो.''

*******

# न्यायपालिका

न्यायपालिका ही लोकशाही राज्यव्यवस्थेचे महत्त्वाचे अंग आहे. न्यायपालिका पूर्वापार अस्तित्वात असून न्यायपालिकेच्या व्यवस्थेत वेळोवेळी बदल झाले आहेत. नागरिकांचे संरक्षण तसेच त्यांच्या तंट्यांचे निवारण व निराकरण करण्याचे महत्त्वाचे काम न्यायपालिकेचे आहे.

जगाचा इतिहास पाहता आधुनिक न्यायपालिकेची बीजे रोमन साम्राज्याच्या काळात रुजल्याचे दिसते. त्यापूर्वी न्यायनिवाडे, तंट्यांचे निवारण होत असे पण त्यामध्ये सुसूत्रता, एकवाक्यता नव्हती. रोमन साम्राज्याने प्रजेचे हितरक्षण, शांतता व सुव्यवस्था, स्थावर व जंगम मालमत्तेचे जतन किंवा त्या संबंधीच्या तंट्यांचे निवारण याकरिता कायदे केले. त्या कायद्यांची अंमलबजावणी व त्या कायद्यांनुसार न्यायदान याकरिता यंत्रणा निर्माण केली. या यंत्रणेतून आधुनिक न्यायपालिका जन्मास आली. न्यायव्यवस्थेत वेळोवेळी सुधारणा होत गेल्या आहेत. भारतातील न्यायपालिकेचे अस्तित्वही पूर्वापार आहे. औरंगाबाद येथील बौद्धकालीन लेण्यातील चित्रकृती हा याचा पुरावा होय. फार पूर्वीपासून भारतात न्यायमंदीरे, त्यामध्ये निवाडे करणारे न्यायाधीश व अशिलांची बाजू मांडणारे वकील अस्तित्वात होते.

**न्यायपालिकेची भूमिका :**

न्यायपालिकेचे लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये महत्त्वाचे अंग म्हणून स्थान आहे. व्यक्ती व समुहांचे परस्परांमध्ये वाद निर्माण होणे ही स्वाभाविक गोष्ट आहे. या वादांचे न्याय्य निराकरण करण्याची जबाबदारी भारतीय संविधानाने न्यायपालिकेवर टाकलेली आहे. न्यायपालिका केवळ व्यक्ती-व्यक्तींमधील अगर व्यक्तीसमुहांमधील वादात हस्तक्षेप करते असे नाही तर व्यक्तिगत भारतीय नागरिक आणि सरकार यांच्या वादातही न्यायपालिका हस्तक्षेप करू शकते. भारतीय संघराज्यांमधील, राज्या-राज्यांमधील वाद

अथवा केंद्र व राज्यांमधील वाद सर्वोच्च न्यायालय मिटवू शकते. भारतीय लोकशाहीत नागरिकांना संविधानाने काही अधिकार प्रदान केले आहेत. या अधिकारांना संविधानाच्या भाग ३ मध्ये मूलभूत अधिकार म्हणून स्थान दिले गेले आहे. काही विशिष्ट परिस्थितीत कायद्याची प्रक्रिया पार पाडल्याशिवाय शासनाला नागरिकांचे मूलभूत अधिकार नियंत्रित करता येत नाहीत. मात्र सरकार अनेकदा मूलभूत अधिकारांचा भंग करते किंवा कायद्यांची अंमलबजावणी करीत नाही. अशावेळी सरकारवर अंकुश ठेवून नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्याची जबाबदारी न्यायपालिकेकडे आहे. त्या अर्थाने न्यायालये नागरिकांच्या हक्काचे रक्षण करणारे प्रभावी रक्षक आहेत. किंबहुना न्यायालयात दाद मागता येणे हाच एक महत्त्वाचा मूलभूत अधिकार संविधानाने प्रत्येक नागरिकाला प्रदान केलेला आहे. खटला चालवून आरोपीला दोषी ठरविण्याचे, त्याला शिक्षा देण्याचे अथवा दोषमुक्त करण्याचे अधिकार केवळ न्यायालयालाच आहेत.

**न्यायपालिका आणि कायदे मंडळ व कार्यपालिका :**

कायदेमंडळ म्हणजे विधिमंडळ किंवा संसद, कायदा मंजूर करते. कायद्याचा अर्थ लावण्याचे काम मात्र न्यायालये करतात. भारतीय संविधानाच्या मूलभूत ढाच्याला अगर आत्म्याला धक्का लावणारे कायदे विधिमंडळाने मंजूर केल्यास न्यायालय असे कायदे घटनाबाह्य ठरवून रद्द करू शकतात. काही वेळा उच्च व सर्वोच्च न्यायालयांचे निवाडे कायद्यात सुधारणा घडवून आणू शकतात अथवा कायद्याने घालून दिलेली प्रक्रिया बदलू शकतात. वेठबिगारमुक्तीच्या लढ्यादरम्यान असाच एक बदल संघटनेने उच्च न्यायालयाकडून करवून घेतला. कायद्यान्वये वेठबिगारी करवून घेणे हा दखलपात्र गुन्हा आहे. खटला चालविण्याचे अधिकार विशेष न्यायालय म्हणून कार्यकारी दंडाधिकाऱ्यांना देण्यात आले होते. कार्यकारी दंडाधिकारी महसूल खात्यातील असल्याने त्यांचे फौजदारी कायदा व प्रक्रियेसंदर्भातील प्रशिक्षण नसते. वेठबिगार दक्षता समिती सदस्य या नात्याने मी फिर्यादी म्हणून वेठबिगारीचे काही गुन्हे पोलिसात दाखल केले होते. वेठबिगारांनी गुन्हा दाखल केलेला नाही म्हणून पहिली खबरच नाही असे कारण दाखवून एका कार्यकारी दंडाधिकाऱ्यांने मी दाखल केलेले गुन्हे तडकाफडकी काढून टाकले. त्याचा हा निर्णय दंडप्रक्रिया संहितेतील तरतुदींबाबतच्या त्याच्या अज्ञानावर आधारीत होता. त्या विरोधात उच्च न्यायालयात आम्ही दाद मागितली. कायद्याचे अज्ञान असणाऱ्या कार्यकारी दंडाधिकाऱ्यांना हे खटले चालवण्यास देऊ नयेत व सर्व खटले न्याय दंडाधिकाऱ्यांकडे वर्ग करावेत असा निर्णय मिळविला. अशारीतीने कायद्यातील त्रुटी दाखवून कायद्यातील तरतूद बदलून घेतली.

काही वेळा न्यायालय स्वत:हून रिट याचिकेची व्याप्ती विस्तारू शकते व प्रशासनाला जाब विचारू शकते. तामिळनाडूतील एका रिट याचिकाकर्त्यांची वेठबिगार कायद्यासंदर्भातील याचिका तामिळनाडू सरकारविरोधी होती. परंतु या कायद्याची अंमलबजावणी अन्य राज्यातही होत नाही हे लक्षात आल्याने सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्य सरकारांना प्रतिवादी बनवून त्यांच्याकडून प्रतिज्ञापत्रे मागविली व कायद्याच्या अंमलबजावणीचे आदेश दिले.

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने अनेक निवाड्यांनी कायद्याच्या कक्षा विस्तारल्या आहेत. राज्यघटनेच्या तरतुदींचे अर्थ त्यांनी स्पष्ट केले आहेत. जीविताचा हक्क संविधानाच्या भाग ३ मधील अनुच्छेद २१ मध्ये नागरिकांना प्रदान करण्यात आला आहे. हा जीविताचा हक्क सर्वोच्च न्यायालयाने अनेक निवाड्यांद्वारे विस्तारित केला आहे. सन्मानाने जगण्याचा हक्क असा त्याचा अर्थ विस्तारला आहे. नागरिकांना सन्मानाने जगण्यासाठी प्राथमिक शिक्षण अत्यावश्यक असल्याने प्राथमिक शिक्षणाचा हक्क सुद्धा जीविताच्या हक्काचा भाग आहे, हे त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांचा सन्मान अबाधित ठेवण्यासाठी हातकड्या न घालणे, जामिनाची प्रक्रिया तसेच आरोपीचे अधिकार याच अनुच्छेदाचा वापर करून अनेक निवाड्यातून स्पष्ट केले आहेत.

उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे निवाडे प्रशासनावर बंधनकारक असतात. म्हणूनच नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी लढत असताना या निवाड्यांचा अभ्यास महत्त्वाचा आहे. उदा. जोगींदरसिंह विरुद्ध उत्तरप्रदेश सरकार या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने आरोपीचे अधिकार स्पष्ट केले आहेत. अटक केल्यानंतर आरोपींच्या कुटुंबियांना, मित्रांना अथवा हितचिंतकांना माहिती देण्याचे बंधन, त्याची नोंद स्टेशन डायरीत घेण्याचे बंधन, या डायरीची प्रत दंडाधिकाऱ्यांना देण्याचे बंधन पोलिसांवर घालण्यात आले आहे.

या आधी केलेल्या चर्चेनुसार नागरिकांच्या मूलभूत हक्काचे रक्षण करण्याची जबाबदारी राज्यव्यवस्थेची आहे. असे रक्षण करण्यास राज्यव्यवस्था असमर्थ ठरल्यास सर्वोच्च न्यायालय नागरिकांचे रक्षण करण्याचे निर्देश शासनास देऊ शकते. राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ नुसार सर्वोच्च न्यायालयाला हे अधिकार प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सरकारला आदेश देणे न्यायालयाला शक्य होते. या अनुच्छेदानुसार विविध प्रकारचे रिटस् दाखल करता येऊ शकतात. अनुच्छेद २२६ नुसार उच्च न्यायालयांना रिटचे अधिकार प्राप्त झाले आहेत.

**रिटचे प्रकार :**

**१) मँडॅमस (महादेश)**

शासनाने एखादे कायदेशीर कर्तव्य पार न पाडल्यास न्यायालये सरकारला ते कायदेशीर कर्तव्य पार पाडण्यास बाध्य करू शकतात. कायद्याची अंमलबजावणी शासन करीत नाही तेव्हा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आपण केलेले प्रयत्न व त्यातून तयार झालेली कागदपत्रे यांच्या आधारे या रिटचा वापर करून सरकारला अंमलबजावणी करण्यास भाग पाडता येते.

**२) सर्शिओराराय (प्राकर्षण)**

कनिष्ठ न्यायालयाने आपल्या अधिकारक्षेत्राच्या बाहेर जाऊन काही निर्णय दिला असल्यास न्यायालयाने आपले अधिकारक्षेत्र विस्तारले असे समजण्यात येते. त्या विरोधात या रिटचा वापर करता येतो.

**३) प्रोहिबिशन (प्रतिषेध)**

रिटचा हा प्रकारही वरील रिटप्रमाणेच कनिष्ठ न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राबाबत आहे. मात्र कनिष्ठ न्यायालयात खटला चालू असतानाच हा रिट दाखल करावा लागतो.

**४) को वॉरंटो (क्वाधिकार)**

एखाद्या प्राधिकरणाने अगर प्राधिकाऱ्याने त्याच्या अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन काही निर्णय घेतला असल्यास किंवा सरकारने कायदेबाह्य वर्तन करून एखाद्याची नेमणूक केल्यास या रिटचा आधार घेता येतो.

**५) हेबियस कॉर्पस (देहोपस्थिती)**

याचा अर्थ व्यक्तीला जिवंत अगर मृत हजर करणे. सरकारच्या ताब्यात असलेल्या व्यक्तीला न्यायालयासमोर जिवंत अगर मृत हजर करण्याचा आदेश न्यायालय सरकारला या रिटद्वारे देऊ शकते. संविधानाच्या अनुच्छेद २१ नुसार नागरिकांना जो जीविताचा अधिकार प्राप्त झाला आहे त्याचे रक्षण या रिटद्वारे करता येते.

**न्यायदान व्यवस्था :**

दिवाणी आणि फौजदारी न्यायव्यवस्थेची रचना आणि त्यांची कार्यपध्दती याची माहिती संघटकाला असावी लागते. संघटना बांधताना दिवाणी न्यायालयापेक्षा फौजदारी न्यायालयांसोबत अधिक काम करावे लागते.

**फौजदारी न्यायदान पद्धतीचे घटक पुढीलप्रमाणे आहेत**: १) तक्रारदार २) पोलीस अथवा तपासी यंत्रणा ३) तपासात साह्य करणाऱ्या यंत्रणा उदा. वैद्यकीय अधिकारी, हस्ताक्षर तज्ज्ञ, ठसे तज्ज्ञ, श्वानपथक, रासायनिक विश्लेषक, मानसोपचार तज्ज्ञ वगैरे, ४) सरकारी वकील व काही विशिष्ट परिस्थितीत सरकारच्या परवानगीने नेमलेले खाजगी वकील ५) आरोपीचे वकील ६) न्यायालय ७) कारागृह.

लोकशाही राज्यव्यवस्थेत न्यायपालिकेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारतीय संविधानातील तरतुदींनुसार भारतीय नागरिक प्रचलित कायद्याने बहाल केलेल्या हक्कांची अंमलबजावणी करवून घेण्याकरिता न्यायपालिकेचा आधार घेऊ शकतात. तशी अंमलबजावणी करविताना न्यायपालिकेला देशातील कोणाही इसमाविरुद्ध, राज्यकर्त्याविरुद्ध, स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य सरकार वा केंद्र सरकार विरुद्ध कारवाई करण्याचा आदेश देण्याचा अधिकार आहे. भारतीय पुरावा कायद्यानुसार कोणत्याही खटल्यात राष्ट्राच्या सार्वभौमत्वाच्या दृष्टीने गोपनीय नसलेला कोणताही दस्तावेज सादर करण्याचे फर्मान न्यायालय जारी करू शकते. भारतीय न्यायपालिका स्वतंत्र आहे व राज्यकर्ते, राज्य सरकार, केंद्र सरकार तिच्या कामकाजात ढवळाढवळ करू शकत नाहीत. भारतीय न्यायपालिका राज्यकर्ते व राज्य सरकार, केंद्रसरकार यांना धारेवर धरू शकते.

**निम्न न्यायिक संस्था :**

न्यायालयीन संस्थांशिवाय निम्न न्यायिक संस्थांसोबत लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी काम करता येते. या निम्न न्यायिक संस्था सरकारला जाब विचारू शकतात परंतु आदेश देऊ शकत नाहीत. त्या शिफारशी करू शकतात मात्र या शिफारशी सरकारवर बंधनकारक नसतात असे असले तरीही या शिफारशींच्या आधारे लोकांचे प्रश्न पुढे रेटता येतात. या संस्था म्हणजे राष्ट्रीय व राज्य मानवी हक्क आयोग, महिला आयोग, अल्पसंख्यांक आयोग, अनुसूचित जाती-जमाती आयोग यासारखे विविध आयोग. या आयोगांकडे दाद मागताना न्यायालयीन प्रक्रियेप्रमाणे कागदपत्रे तयार करावी लागत नाहीत. तक्रारदारास वकिलाशिवाय स्वत:च स्वत:ची बाजू मांडता येते, आयोगाशी चर्चा करता येते यामुळे अशा आयोगांसोबत काम करणे सोपे जाते. हे आयोग सरकारला नोटीस पाठवून जाब विचारू शकतात. एखाद्या प्रकरणात स्वत: अगर आपले प्रतिनिधी पाठवून चौकशी करू शकतात.

**जनहित याचिका :**

आजकाल कोणताही प्रश्न आढळला की जनहित याचिका दाखल करण्याचा हा सोपा पर्याय निवडला जाताना आपण पाहातो. यामुळे न्यायव्यवस्थेवरही अतिरिक्त ताण पडतो. त्यामुळे न्यायव्यवस्थेने जनहित याचिकेबाबत आता आपले धोरण लवचिक ठेवलेले नाही. असे असले तरी आजही वर्तमानपत्रातील बातम्यांची दखल घेऊनही उच्च व सर्वोच्च न्यायालये स्वत:हून याचिका दाखल करून घेतात व सरकारला जाब विचारताना दिसतात. या आधी पुस्तकात उल्लेख केल्यानुसार वेठबिगार मुक्तीच्या वेळी जनहित याचिका दाखल करावी असा सल्ला देण्यात आला होता. परंतु त्यावेळी मुक्तीसाठी वेठबिगार तयार असल्याने न्यायालयाचा मार्ग न अवलंबता संघटनेचा मार्ग अवलंबला. संघटनेची पाळेमुळे घट्ट केली सरकारच्या अनास्थेविरोधी आंदोलने केली. त्यानंतर कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सर्वोच्च न्यायालयाला सर्व पुराव्यानिशी दोन दीर्घ पत्रे संघटनेचा अध्यक्ष म्हणून मी लिहिली. त्याची दखल घेऊन तत्कालीन न्यायमूर्ती पी. एन. भगवती यांनी ती पत्रे रिट याचिका म्हणून दाखल करून घेतली. ही याचिका महाराष्ट्र सरकारच्या विरोधी होती तरीही ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. गोविंद मुखोती यांना माझे वकील म्हणून सर्वोच्च न्यायालयानेच नेमले व त्यांची फी महाराष्ट्र सरकारने द्यावी असे आदेश दिले. मी लिहिलेल्या पत्रातील वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी न्यायालयाने डॉ. सत्यरंजन साठे व ॲड. वसुधा धागमवार यांचा द्विसदस्यीय आयोग नेमला. त्यांच्या अहवालानंतर महाराष्ट्र सरकारला शरण यावे लागले व पत्रातील माझ्या सर्व विनंत्या मान्य होऊन वेठबिगार मुक्तीच्या प्रक्रियेसाठी राज्य शासनाला सर्व व्यवस्था करावी लागली.

मात्र लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी संघटना बांधणीला पर्याय नाही. संघटना बांधणी करीत असताना आंदोलने, प्रसारमाध्यमे, विधिमंडळे, इत्यादींचा वापर करूनही प्रश्न सुटत नसल्यास अंतिम उपाय म्हणून न्यायपालिकेकडे धाव घ्यावी असे माझे स्पष्ट मत आहे.

*******

# प्रसारमाध्यमे

आपल्या कार्याचा, आपल्या भूमिकेचा प्रसार करण्यासाठी संघटकास नाटक, पथनाट्य, प्रदर्शन येथपासून ई-ग्रुप्स व ब्लॉग्जपर्यंत विविध माध्यमांचा उपयोग, त्या त्या माध्यमाची वैशिष्ट्ये व आपल्या गरजा व संसाधने लक्षात घेऊन प्रभावीपणे व कल्पकतेने करता येतो. प्रस्तुत प्रकरणात वर्तमानपत्रावर तपशीलात तर आकाशवाणी व दूरदर्शन या माध्यमांवर संक्षेपात चर्चा केलेली आहे.

लोकशाहीमध्ये जनशिक्षणाला आणि जनशिक्षणाचे कार्य समर्थपणे करणाऱ्या प्रसारमाध्यमांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रसारमाध्यमांना लोकशाहीचा चौथा स्तंभ समजले जाते. सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवण्याचे विरोधी पक्षाचे काम प्रसारमाध्यमे प्रभावीपणे करू शकतात. आपला मुद्दा पुढे रेटण्यासाठी, तो अधिकाधिक लोकांसमोर मांडण्यासाठी, निर्णयकर्त्यांवर दबाव टाकण्यासाठी आणि लढ्यात यश मिळविण्यासाठी संघटकास प्रसारमाध्यमांसोबत कार्य करावे लागते.

माहिती व मते सामजासमोर ठेवून लोकांचे प्रबोधन करण्याचे काम प्रसारमाध्यमे करतात. लोकांना मत बनवायला प्रसारमाध्यमांची मदत होत असते. आपलेच म्हणणे प्रसारमाध्यमांनी उचलून धरावे, आपल्याला हवा तो मजकूर प्रसारमाध्यमांनी छापावा, प्रसारित करावा असे संघटकास वाटू शकते. आपला मजकूर छापला गेला नाही, उशिरा छापला गेला, मजकूर कमी लांबीचा किंवा ठळकपणे छापला गेला नाही, आपल्या विरोधातली मते व बातम्या छापल्या गेल्या किंवा प्रसारित झाल्या की साहजिकच संघटकास वाईट वाटते.

प्रसारमाध्यमांच्या काही मर्यादा असतात. त्या संघटकाने लक्षात घेतल्या पाहिजेत. प्रसारमाध्यमे हा एक व्यवसाय आहे. आपले माध्यम आकर्षक दिसावे, अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावे, त्याला जाहिराती मिळाव्यात हा ही माध्यमांचा एक उद्देश असतो.

आपला मजकूर, आपले काम याला एखाद्या माध्यमामध्ये कोणते स्थान मिळेल हे त्या माध्यमाच्या धोरणावर व तत्कालिक परिस्थितीवर अवलंबून असते. एखादे माध्यम आपल्या विरोधी मताचे असणे साहजिकच असते.

व्यवसाय करत असूनही माध्यमांना तत्त्वांची, मूल्यांची चाड असते. अनेक वेळा आपल्याला त्यांची मदतच होते. हितसंबंध आड येणार नसतील तर माध्यमे न्यायाच्या बाजूने उभी राहायला उत्सुक असतात. वर्तमानपत्रांची विश्वासार्हता ही त्यांच्या तटस्थपणातून सिद्ध होत असल्याने समाजातल्या सर्व विचारधारांचा आपण आदर करतो हे दाखवायला माध्यमे उत्सुक असतात. आपण सर्वांना न्याय देतो असे संधी मिळाल्यास माध्यमांना दाखवून द्यायचे असते. आपल्याला सतत विरोध करणाऱ्या माध्यमातही काही वेळा मनासारखा वाव मिळू शकतो. मात्र अशा जागांच्या शोधात राहण्याची जबाबदारी संघटकाची असते.

वर्तमानपत्रे, नियतकालिके, दूरचित्रवाहिन्या, आकाशवाणी अशी पारंपरिक प्रसारमाध्यमे संघटकास उपलब्ध आहेत. माहितीच्या महाजालामुळे, इंटरनेटमुळे त्यात भर पडत आहे. प्रत्येक माध्यमाची वैशिष्ट्ये, त्यातील संधी, त्यांच्या मर्यादा लक्षात घेऊन संघटकास त्या त्या माध्यमाचा उपयोग करता येतो.

**वर्तमानपत्रे :**

वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध होणारा मजकूर बाहेरून येत असतो किंवा माध्यमांतर्गत तो तयार केला जात असतो. दोन्ही प्रकारच्या मजकूरामध्ये संघटकाला जागा शोधता येते. मजकूराचे विविध प्रकार व संबंधित वर्तमानपत्राचा कल या गोष्टींचा अभ्यास केल्यास संघटकाला आपले म्हणणे वर्तमानपत्रांमध्ये छापून आणणे शक्य असते.

अलीकडच्या काळात साखळी वर्तमानपत्रांच्या प्रथेने जोर धरला आहे, स्थानिक आवृत्त्यांना स्थानिक वाचकांकडून मिळणारा प्रतिसाद पाहता हा कल कायम राहणार आहे. विभागीय अथवा जिल्हा आवृत्त्यांमुळे स्थानिक बातम्यांना बरीच जागा उपलब्ध होत असली तरी अनेक महत्त्वाच्या बातम्या त्या आवृत्तीपुरत्याच मर्यादित राहू लागल्या आहेत. संबंधित वर्तमानपत्राच्या धोरणानुसार एखाद्या घटनेचे महत्त्व किती यावर ती बातमी सर्व आवृत्त्यांमध्ये किंवा मुंबईच्या आवृत्तीत छापून येईल किंवा नाही हे ठरत असते. यामुळे या बातम्यांचा राज्यकर्त्यांवर, धोरणकर्त्यांवर म्हणावा तसा प्रभाव पडताना दिसत नाही. संघटनांपुढे हे एक आव्हान आहे. संघटकाने कल्पकतेने स्थानिक घटनेस असणारी

राज्याच्या धोरणाची पार्श्वभूमी अथवा राज्यभरातील अशा घटनांचे परिणाम अशी पूरक माहिती वर्तमानपत्रांना दिल्यास ती घटना बातमी व लेखाच्या माध्यमातून राज्यस्तरावर पोहोचविता येऊ शकेल. राज्याच्या इतर भागातील संस्था-संघटनांशी, पत्रकारांशी संपर्क व त्याचबरोबर संपादक स्तरावरील व्यक्तींशी संपर्क यासाठी आवश्यक ठरतो.

**बातमी :**

सहा ते बहात्तर तास आधी घडलेल्या घटना बातमीच्या स्वरुपात वर्तमानपत्रात येत असतात. वृत्तपत्रांचे बातमीदार, वृत्तसंस्थाचे प्रतिनिधी, घटनेच्या ठिकाणी हजर असणारी माणसे, घटनेचे वर्णन वर्तमानपत्रांना कळवित असतात. संघटनेच्या संदर्भातील किंवा संघटनेस महत्त्वाच्या वाटणाऱ्या घटनेचा वृत्तांत घेण्यासाठी प्रत्येकवेळी बातमीदार हजर असणे शक्यच नसते. तेव्हा संघटनेलाच घडलेली घटना बातमीच्या स्वरुपात प्रसिद्धीपत्राद्वारे वर्तमानपत्रापर्यंत पोहोचवावी लागते.

जी घटना बातमीच्या स्वरुपात द्यायची असेल ती लोकांसाठी महत्त्वाची आहे काय ? याचा विचार सर्वप्रथम करावा. लोकांनी आपली बातमी का वाचावी ? असा प्रश्न स्वत:ला विचारून बातमी लिहावी. मात्र ती वाचनीय होण्यासाठी खोटी रंगवू नये. व्यक्तीगत प्रसिद्धी मिळवणे हा बातमीचा हेतू असू नये. घटना घडल्यापासून शक्य तितक्या लवकर बातमी द्यावी. बातमी कमीतकमी शब्दात, समजण्यास सोपी, खरी व अचूक असावी. प्रसिद्धीपत्रक कागदाच्या एका बाजूला टंकलिखित केलेले किंवा सुवाच्च अक्षरात लिहिलेले असावे.

बातमी वेळेवर पोहोचली तर छापून येणे शक्य असते. वर्तमानपत्र निघण्याच्या वेळेशी बातमी घेण्याची वेळ जोडलेली असते. संध्याकाळी आठनंतर वर्तमानपत्रे फक्त अतिमहत्त्वाच्या बातम्याच घेत असतात. म्हणून त्या वेळेच्या बऱ्याच आधी, म्हणजे दुपारी चार पासून संध्याकाळी सातपर्यंत बातमी वर्तमानपत्राच्या कार्यालयात पोहोचायला हवी.

वर्तमानपत्रामध्ये छापून येणाऱ्या बातमीची वैशिष्ट्ये लक्षात घेतली तर प्रसिद्धीपत्रक तयार करणे सोपे जाते. बातमीमधून सर्वात महत्त्वाचे जे सांगावयाचे असेल त्याचे प्रतिबिंब शीर्षकात असावे. शीर्षक वाचून बातमी वाचावीशी वाटली पाहिजे. यासाठी बातमीस फार विचारपूर्वक शीर्षक द्यावे. बातमीचा गाभा मथळ्यामध्ये व्यक्त व्हावयास हवा. म्हणजे शीर्षकाचा तपशील मथळ्यात यावयास हवा. मथळा वाचल्यानंतर बातमीमध्ये काय आहे ते वाचकाला पटकन समजावयास हवे. मथळ्यातील मजकूर तपशीलात उर्वरीत परिच्छेदांमध्ये सांगितला जावा. कमी महत्त्वाचे परंतु बातमीत यावयास हवे असे तपशील

शेवटच्या परिच्छेदात यावेत. सर्वसाधारणपणे बातमी लिहिताना ही रुपरेषा सांभाळावी.

बातमीमध्ये तारीख, जागा, व्यक्ती व पद यांचा उल्लेख करताना अचूकतेची खात्री करावी. एखाद्याच्या तोंडी वाक्ये घालताना विशेष काळजी घ्यावी. संघटनेने एकदा का वर्तमानपत्राची विश्वासार्हता गमावली की पुन्हा बातमी छापण्यास ते तयार होणार नाहीत. बातमीचा स्रोत किंवा बातमीची सत्यता पटविणारी काही कागदपत्रे असल्यास ती बातमीस आवश्यकतेनुसार जोडता येतात.

बातमी शक्यतोवर वार्ताहरास/मुख्य वार्ताहरास/संपादकास भेटून द्यावी. फॅक्सवर बातमी पाठवल्यास ती मिळाल्याची खात्री करावी. बातमी छापून आल्यानंतर संबंधित संपादक, वार्ताहराचे आभार मानावेत. बातमी छापून येणे न येणे अनेक गोष्टींवर अवलंबून असते. त्या दिवशी घडलेल्या इतर घटनांवर ते अवलंबून असते. काही वेळेस बातमीत थोडा बदल करून ती बातमी नंतर छापणे शक्य असते.

**लेख (फीचर) :**

बातमीपेक्षा जास्त मुद्दे फीचरच्या माध्यमातून मांडता येतात. फीचर बातमीपेक्षा जास्त रंगतदार व आकर्षक असते. घटना शिळी झाल्यानंतरही फीचरमध्ये मांडता येते. मोर्चा, मिरवणूक, धरणे, भाषणे, लाठीमार इ. गोष्टींची बातमी होते. परिसंवाद, धोरणात्मक निर्णय, योजना, इतर महत्त्वपूर्ण घटना यांचे फीचर होऊ शकते. एखाद्या पाड्यावरील एखादा आदिवासी मुलगा अगदी पहिल्यांदाच मॅट्रिक झाल्याच्या घटनेचे चांगले फीचर तयार होऊ शकेल. असे फीचर लोक आवडीने वाचतात. संघटनेने एखादी मोहीम हाती घेतली असताना ज्या अनेक घटना घडत असतात त्यांना फीचरच्या रुपात मांडता येणे शक्य असते. भाषेवरील प्रभूत्व व लेख लिहिण्याचे कसब असणाऱ्या संघटकास फीचर देता येते. घटनेचा वृत्तांत घेण्यासाठी आलेल्या वार्ताहरास बातमीसोबतच घडणाऱ्या संबंधित घटनांवर फीचर लिहिण्यासाठी सुचविता येते.

**संपादकीय पानावरील लेख :**

संपादकीय पानावरील लेखांची लांबी ही प्रत्येक वर्तमानपत्राच्या धोरणानुसार ठरत असते. तरीही साधारणपणे पाचशे ते आठशे शब्द लांबीचे लेख या पानावर प्रसिद्ध होत असतात. या पानावरील लेखांद्वारे व्यापक जनहिताचे विविध प्रश्न, एखाद्या प्रश्नाच्या विविध बाजू वाचकांसमोर आणणे हा वर्तमानपत्रांचा उद्देश असतो. संघटनेला अनेक धोरणात्मक प्रश्न, ज्यावर जनमत तयार करावयाचे आहे असे प्रश्न, दुर्बोध विषय

मांडण्यासाठी या पानावर जागा मिळविता येते. संबंधित विषयातील तज्ज्ञ, संघटनेचे पदाधिकारी यांच्या लेखांना वर्तमानपत्रे व वाचकही महत्त्व देतात. असे लेख छापून आणण्यासाठी देताना वर्तमानपत्रातील संपर्क व संपादकाव्यतिरिक्त यासंदर्भात निर्णय घेणारी व्यक्ती कोण याची माहिती असणे आवश्यक ठरते. अशा लेखासोबत संपर्कासाठी पत्ता, इमेल, दूरध्वनी क्रमांक दिल्यास अनेक वाचक प्रतिक्रियाही पाठवितात. संघटनेचे संपर्क जाळे वाढविण्यास मदत होते.

**संपादकीय :**

संपादकीय किंवा अग्रलेख संपादक लिहीत असतात. परंतु संपादकीयाचा विषय, त्यात येणारी माहिती व मते यावर संघटक प्रभाव टाकू शकतो. संपादकीयाद्वारे संपादक भूमिका मांडत असतो. वर्तमानपत्राची भूमिका मानणाऱ्या वाचकांवर संपादकीयाचा प्रभाव असतो. आजूबाजूला घडत असणाऱ्या महत्त्वपूर्ण घटनांची माहिती ठेवल्यास संघटकास संपादकीयाच्या माध्यमातून आपल्याकडील कोणती माहिती कोणत्या वर्तमानपत्राच्या संपादकास उपयोगी होऊ शकेल याच्या संधी हेरता येऊ शकतात. आपले म्हणणे अनाग्रही पद्धतीने संपादकांच्या कानी घातले, ते सिद्ध करणारे पुरावे व माहिती संपादकांना दिली तर त्याची दखल घेतली जाऊ शकते. वार्ताहरांसोबतच संपादकांशी संपर्क ठेवणे, संघटनेच्या मोहिमांसंदर्भात त्यांना माहिती देत राहणे, आपल्याकडे उपलब्ध आकडेवारी, इतर माहिती देत राहणे महत्त्वाचे ठरते.

**संपादकीय टिपण :**

वर्तमानपत्रांमध्ये तीन-चार संपादकीय टिपणे प्रसिद्ध होत असतात. जे विषय महत्त्वाचे असतात पण अग्रलेखात त्यांचा समावेश करता येत नाही, ते विषय संपादकीय टिपणात घेतले जातात. संपादकीय टिपणे म्हणजे छोटे अग्रलेखच असतात. सहसंपादक, वृत्तसंपादक ही टिपणे लिहीत असतात. संपादकीयमधून दररोज एक किंवा फार तर दोन विषय हाताळले जातात. टिपणांमधून मात्र दररोज तीन-चार विषय हाताळायचे असतात. त्यामुळे ती टिपणे लिहिणारे संपादक सतत विषयांच्या शोधात असतात. त्यांच्याशी योग्य संपर्क ठेवल्यास या टिपणांसाठी विषय सुचविता येतात.

**संपादकांना पाठविलेली पत्रे :**

आपली भूमिका, आपले मत व आपल्याकडील माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याचा, आपल्या मोहिमा, आंदोलने या मागच्या भूमिका स्पष्ट करण्याचा हा प्रभावी मार्ग असतो.

आंदोलने व संघटनेवर जेव्हा आरोप होतात तेव्हा खुलासा करण्यासाठी, त्यांना तिरकस आणि तिखटपणे उत्तरे देण्यासाठी ही जागा चांगली असते. पत्रे आटोपशीर असतील तर संपादक ती आनंदाने छापतात. संपादकीय धोरणाला नेमस्त विरोध असेल तरी तो इतर जागेपेक्षा पत्रांच्या जागेत सहन केला जातो.

**पुरवण्या :**

काही वर्षांपूर्वी वर्तमानपत्रांनी रविवार, सुट्टीच्या दिवशी विशेष पुरवण्या काढण्यास सुरुवात केली. अलीकडे मात्र जवळपास प्रत्येक वर्तमानपत्राच्या रोजच विविध विषयांवरील पुरवण्या निघत असतात. अर्थ, आरोग्य, महिला असे अनेक विषय या पुरवण्यांतून हाताळले जातात. याशिवाय 'दिन विशेष' पुरवण्याही वर्तमानपत्रे काढीत असतात. या पुरवण्यांमधील लेख ताज्या विषयांवरच असतात असे नाही. महत्त्वाचे पण चर्चेत नसलेले विषय या लेखांमध्ये हाताळले जातात. या लेखांची लांबी जास्त व शैली पत्रकारितेपासून काहीशी दूर जाणारी असते. त्यात फोटो वापरता येतात. पुरवणीतले लेख निवांतपणे वाचले जात असल्याने ते चांगले वाचले जातात. एखादा विषय सविस्तरपणे मांडण्यासाठी अशा लेखांचा बराच उपयोग होत असतो.

संघटना अनेक विषयांवर काम करीत असतात. त्यावर नेहमीच आंदोलने होत असतात, मोहिमा राबविल्या जात असतात असे होत नाही. मात्र विषय महत्त्वाचे असतात व ते लोकांच्या कानी सतत जात राहणे आवश्यक असते. अशा वेळी या पद्धतीच्या लेखांचा उपयोग होतो. संघटनेने संबंधित विषयावरील माहिती, संदर्भ, तज्ज्ञांची मते यांचे संकलन करून असे लेख पत्रकार-लेखकांकडून लिहून घेणे उपयोगी ठरू शकते.

वर्तमानपत्रांप्रमाणे नियतकालिकांमधुनही संघटनेला आपले विषय लोकांपर्यंत पोहोचविता येतात. संबंधित नियतकालिकाचे धोरण, त्यातील सदरे, नियमित हाताळले जाणारे विषय, वाचकवर्ग याचा अभ्यास करून संघटकास या माध्यमाचा आपल्या कामात उपयोग करून घेता येऊ शकतो.

**पत्रकार परिषद :**

जेव्हा एखाद्या महत्त्वाच्या विषयी केवळ प्रसिद्धीपत्रक काढणे पुरेसे नसते, विषयाला अनेक अंगे असतात, विषयाचे दूरगामी परिणाम असतात, पत्रकारांशी संवाद साधून आपले म्हणणे मांडणे आवश्यक असते, पत्रकारांच्या शंका असण्याची शक्यता असते व त्या दूर करण्याची आवश्यकता असते अशा वेळी पत्रकार परिषदेचे आयोजन केले जाते. अगदीच महत्त्वाचा प्रसंग असल्यास परिषद घेतली जाते.

साधारणपणे दुपारी तीन ते पाच या काळात पत्रकार परिषद बोलवावी. पत्रकार परिषदेचे निमंत्रण तपशीलासह जसे विषय, वक्ते, ठिकाण प्रसारमाध्यमांना आधी पाठवावे. संबंधित वार्ताहरास अथवा त्याच्या वरिष्ठास प्रत्यक्ष भेटून वा दूरध्वनीद्वारे संपर्क करून हजर राहण्याची विनंती करावी. साधारणपणे वार्ताहरांना हजर राहणे सोपे जाईल व पत्रकार परिषद संपवून लगोलग बातमी देण्यास रवाना होणे शक्य होईल अशा ठिकाणी पत्रकार परिषदेचे आयोजन करावे. पत्रकार परिषदेच्या वेळी विषयाशी संबधित प्रसिद्धीपत्रक (जे बातमी म्हणून जसेच्या तसेही छापता येईल), करण्यात येणारे वक्तव्य, (ते लांबलचक असल्यास) एक संक्षेपातील वक्तव्य तयार ठेवावे. विशेषत: उशीरा येणाऱ्या, लवकर निघून जाणाऱ्या पत्रकारांना त्याचा उपयोग होतो. त्याचबरोबर योग्य ती सर्व कागदपत्रे (छायाचित्रांसह) तयार ठेवावीत. पत्रकारांची अपेक्षित संख्या लक्षात घेऊन त्यानुसार कागदपत्रांचे सेट काळजीपूर्वक तयार केले जावेत. कागदपत्रांची संख्या जास्त असल्यास अनुक्रमणिका तयार करून पानांवर क्रमांक टाकून सेट तयार करावेत. पाहुणचार म्हणून उपहाराची योग्य ती व्यवस्था ठेवावी. इतर कोणत्याही वाटेने पत्रकारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न किमान संघटनांनी तरी करू नये. एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवावी की, जोवर बातमीचे मोल असते तोवर बातमीदार आपणहूनच चांगली बातमी देतात.

पत्रकार परिषदेत कोणी बोलायचे ते ठरवावे. एकापेक्षा अधिक व्यक्ती बोलणार असल्यास कोणते मुद्दे कोणी मांडायचे तेही आधी ठरवावे. शक्यतो सगळे मुद्दे लिखित स्वरुपात असावेत, त्याची टिपणे व आधार आपल्या जवळ ठेवावेत. शक्यतो एकाच व्यक्तीने पत्रकारांशी बोलावे, सल्लामसलतीसाठी सहकारी सोबत असावेत पण पत्रकार परिषद एकाच माणसाने हाताळावी. एकापेक्षा अधिक व्यक्ती असल्यास त्यांच्यात एकवाक्यता राहील याची काळजी घ्यावी.

आपले म्हणणे थोडक्यात मांडल्यावर पत्रकारांना प्रश्न विचारण्याची विनंती करावी. पत्रकार बरेच प्रश्न विचारण्याची शक्यता असते. हे प्रश्न तिरकस व तीव्र असण्याची शक्यता असते. काही वेळा प्रश्न विषयाला सोडून, व्यक्तीगत स्वरुपाचेही असू शकतात. काही पत्रकार सहानुभूती बाळगणारे, मदत करणारेही असतात. पत्रकारांची प्रश्न विचारण्याची शैली कोणत्याही प्रकारची असू शकते. एकूणच पत्रकार परिषद ही एक कसोटी, परीक्षाच ठरू शकते. ही एक संधी आहे असे आपण मानायला हवे. तोल ढळू न देता, शांतपणाने प्रश्नांना उत्तरे द्यायला हवीत. काही कारणाने प्रश्न टाळावयाचा झाल्यास नम्रपणे उत्तर देण्याला नकार द्यावा. काही वेळा काही गोष्टी जाहीर होणे मोहिमेच्या

रणनीतीच्या दृष्टीने अडचणीचे असते. अशावेळी पत्रकारांना विश्वासात घेऊन सांगितले तर पत्रकार मदत करतात, वाच्यता टाळतात. आपण किती आत्मविश्वासाने बोलतो, आपल्यात किती प्रामाणिकपणा आहे यावर पत्रकारांची प्रतिक्रिया अवलंबून असते.

पत्रकार परिषद आटोपल्यावर त्याचा पाठपुरावा करावा. आलेल्या वार्ताहरांना दूरध्वनीवरून धन्यवाद द्यावेत, त्यांना समजण्यात काही अडचण आहे किंवा कसे त्याचा अंदाज घ्यावा व प्रसिद्धी देण्याची विनंती करावी.

**आकाशवाणी :**

आकाशवाणी हे वर्तमानपत्रापेक्षा अधिक लोकांपर्यंत पोहोचणारे माध्यम आहे. ते वापरायला सोपे व स्वस्त आहे. दूरचित्र माध्यमाचा प्रभाव वाढत असतानाही आकाशवाणीचा पारंपरिक श्रोतावर्ग टिकून आहे. आकाशवाणीच्या माध्यमातून विषय मांडण्यासाठी व पोहोचविण्यासाठी अनेक संधी आहेत. आकाशवाणीवरील बातम्या स्थानिक व विकेंद्रित स्वरुपाच्या असतात. एखादी प्रभावी मोहीम, प्रभावी आंदोलन यांना या बातम्यांत स्थान मिळण्याची शक्यता अधिक असते.

संघटनांना आकाशवाणीवरील बातम्यांपेक्षा इतर कार्यक्रमांमध्ये अधिक वाव असतो. आकाशवाणीवर भरपूर चर्चा, संवाद, भाषणे असतात. विविध विषयांमध्ये कार्यक्रम वाटले गेलेले असतात. आकाशवाणीवर कोणते कार्यक्रम होतात, कोणत्या विषयावर होतात, त्या कार्यक्रमांचे निर्माते कोण याकडे बारकाईने लक्ष दिल्यास संघटनांना त्यात निश्चित जागा सापडू शकते. कार्यक्रम पूर्णपणे जरी आपल्या विषयाशी, आंदोलनाशी संबंधित नसला तरी आपल्याकडील माहिती अनेक कार्यक्रमांसाठी पूरक ठरू शकते.

संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांना आकाशवाणीवरील चर्चा, मुलाखती अशा कार्यक्रमांमधून शिरकाव करता येतो. कार्यक्रमांच्या निर्मात्यांशी जिवंत संपर्क असेल तर आपल्या माणसांची नावे आपणास सुचविता येतात, अनेकदा निर्मातेही आपणास नावे सुचविण्यास सांगतात. आपल्या संपर्कातील तज्ज्ञांची नावेही आपणास सुचविता येतात. तटस्थ, नावाजलेल्या तज्ज्ञ माणसाने स्वतंत्रपणे आपल्या म्हणण्याला दुजोरा देणारे वक्तव्य केले, तर त्याचा परिणाम समाजावर अधिक होत असतो.याशिवाय आकाशवाणीवर नेहमी जाणाऱ्या लोकांचा माग काढणे, त्यापैकी आपल्या विषयाशी संबंधित असणाऱ्यांना आपल्याकडील माहिती पुरवत राहणे हा सुद्धा एक मार्ग आहे. अलीकडे प्रायोजित कार्यक्रमांच्या माध्यमातूनही संस्था संघटनांना प्रायोजक शोधून आपल्या आवश्यकतेनुसार कार्यक्रम तयार करण्याची एक संधी प्राप्त झाली आहे.

## दूरदर्शन व दूरचित्र वाहिन्या :

जगाच्या पाठीवर कोठेही घडलेली घटना लागलीच पाहता येणे ही या माध्यमाची सर्वात जमेची बाजू आहे. दृक-श्राव्य माध्यमातील दूरदर्शनची मक्तेदारी निरनिराळ्या खाजगी वाहिन्यांनी केव्हाच संपुष्टात आणली आहे. केवळ बातम्या देणाऱ्या व विविध विषयांवर चर्चा घडवून आणणारे 'फीचर्स' सादर करणाऱ्या स्वतंत्र 'न्यूज चॅनल्स'ची संख्याही वाढतच आहे. बातमी संकलित करण्याची व संपादित करण्याची साधने वगळली तर संघटकास वर्तमानपत्रांसोबत करावे लागणारे काम व आकाशवाणी किंवा दूरदर्शनसोबत करावे लागणारे काम यातील मूलभूत स्वरुपात फार फरक पडत नाही.

या माध्यमात शिरकाव करण्यासाठी संघटकाला बातम्या व फीचर्स अशा जागा असतात. या माध्यमाचा राज्यकर्ते, लोकप्रतिनिधी, नोकरशहा यांच्यावरही अधिक प्रभाव असल्याचे जाणवते. संघटनेचे आंदोलन, मोहीम याची माहिती देणारे प्रसिद्धीपत्रक पुरेसे आधी या माध्यमातील वार्ताहर व संपादकांपर्यंत पोहोचल्यास, त्यांच्याशी चर्चा करून त्यांना सदर बातमीचे महत्त्व पटवून दिल्यास दूरदर्शन व चित्रवाहिन्यांचे प्रतिनिधी बातमी टिपण्यासाठी हजर राहू शकतात. चित्रण दुर्गम भागात करावयाचे झाल्यास या प्रतिनिधींना लागणारी सामग्री लक्षात घेता वाहनाची सोय करावी लागू शकते.

मुलाखती, चर्चा, वृत्तपट, अशा स्वरुपातील फीचर कार्यक्रमांमधून आपले विषय मांडण्याची अधिक संधी असते. कोणत्या वाहिनीवर कोणत्या प्रकारचे कार्यक्रम चालतात, त्यामध्ये कोणत्या प्रकारचे विषय हाताळले जातात, कार्यक्रमाच्या प्रसारणाची वेळ काय असते आदी बाबी लक्षात घेतल्यास संघटक संधी शोधून काढू शकतो. या कार्यक्रमांच्या निर्मात्यांशी संपर्कात राहिल्यास आपणास आपले विषय, वक्ते त्यांना सुचविता येतातच शिवाय तेही अनेकदा आपणाकडे त्यासंदर्भात चौकशी करतात.

आपल्या विषयांतील तज्ज्ञ व मान्यवर व्यक्तींची अद्ययावत यादी तयार करावी. त्यांचे नाव, पत्ते, फोन, इमेल, त्यांच्या सोयीच्या वेळा, अटी, त्यांचे विषय, याची तपशीलवार नोंद असल्यास योग्य वेळी संबंधित प्रसारमाध्यम व त्या व्यक्तीची गाठ घालून देणे सोपे जाते.

संघटकाने अथवा प्रसारमध्यांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या कार्यकर्त्याने वरील तीनही माध्यमांसोबत काम करताना लक्षात ठेवण्याच्या काही बाबी अशा:

- आपण पत्रकार नसून कार्यकर्ता आहोत व आपल्या संघटनेची गरज म्हणून आपणास प्रसारमाध्यमांचे काही कसब काही प्रमाणात अंगी बाणवायचे आहे हे कायम लक्षात ठेवावे.

- मजकूर साध्या, सोप्या, ओघवत्या शैलीत मांडण्याचे, मजकूराचे संपादन करण्याचे कसब साध्य करावे. मजकूराचा आशय अचूक, योग्य, निर्दोष असेल याचीही काळजी घेतली पाहिजे.
- प्रसारमाध्यमे व त्यातली माणसे यांची आवश्यक ती सर्व माहिती (पत्ते, दूरध्वनी क्रमांक, इमेल) अद्ययावत असावी, हाताशी असावी. पत्रकारांच्या नोकऱ्या (वर्तमानपत्रे व वाहिन्या) व विषय यामध्ये वारंवार होणारे बदल नोंद करावेत.
- पत्रकारांना या ना त्या निमित्ताने भेटत राहावे, त्यांच्या व्यक्तीगत आणि सार्वजनिक जीवनात घडणाऱ्या आनंददायक व दुःखद घटनांमध्ये सहभागी व्हावे. त्यांच्या सवयी, त्यांच्या आवडी-निवडीही लक्षात ठेवता आल्यास संबंध वाढविण्यास मदतच होते.
- पत्रकारांना सतत बातम्या हव्या असतात. आपल्या कामाव्यतिरिक्तही अनेक गोष्टी आपण त्यांना सांगू शकतो ज्याचा त्यांना बातम्यांसाठी उपयोग होत असतो. त्या गोष्टी त्यांना वेळोवेळी देत रहाव्यात. व्यसने, पैसा यांचा वापर करण्याचे काहीच कारण नाही. आपले काम हीच आपली ताकद असते. आपली मते, आपल्याकडील माहिती, आपला लोकसंग्रह आणि आपला सार्वजनिक कामातला अनुभव हेच आपले खरे भांडवल असते. ते पत्रकारांना दिले तर पत्रकार आनंदतात, आपणहून आपल्याशी संपर्क करतात, आपल्या कामात मदत करायला तयार होतात.
- मजकूर तयार करताना व वर्तमानपत्रांकडे पाठविताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत वर लिहिलेले आहेच. बातमी छापून आल्यास ज्याप्रमाणे संबंधित वार्ताहर किंवा संपादकाचे आपण आभार मानतो त्याचप्रमाणे ती छापून न आल्यास संबंधित व्यक्तीकडे नम्रपणे चौकशी करावी. जर आपल्या काही उणीवेमुळे बातमी छापून आली नसेल तर आपल्याला ते कळेल, भविष्यात काळजी घेता येईल.
- पाठपुरावा हे एक कौशल्य आहे. बातमीदार, संपादकाला वीट येणार नाही, नकोसे होणार नाही याची काळजी घ्यावी.
- बातमी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सरसकट सर्वांना द्यावी किंवा बातमीचा विषय व वर्तमानपत्राची भूमिका लक्षात घेऊन ती विशिष्ट प्रसारमाध्यमाला वा माध्यमांना द्यावी याचा निर्णय हा डावपेचाचा भाग असू शकतो. प्रसिद्धीपत्रकाद्वारे सरसकट बातमी देत

असतानाही संबंधित प्रसारमाध्यमाची भूमिका लक्षात घेऊन व संबंधित बातमीचे त्या भूमिकेतून महत्त्व वार्ताहरास वा संपादकास सांगितल्यास त्याचा उपयोग होऊ शकतो.

- एखादे आंदोलन वा मोहिमेमध्ये नियोजनपूर्वक काही कृती केली जाणार असल्यास व बातमीपेक्षा तीचे छायाचित्र वा चित्रण महत्त्वाचे ठरणार असल्यास माध्यमांच्या प्रतिनिधींना विश्वासात घेऊन त्यासंबंधात (तपशील, वेळ, ठिकाण, तसेच चित्रण करण्यासाठी योग्य जागा) माहिती द्यावी. प्रभावी छायाचित्र वा चित्रण बातमीचा परिणाम वाढविते.

*******

(समर्थन प्रकाशित ‘प्रसारमाध्यमे’ वर आधारीत)

# जनसंघटनेची उभारणी

श्रमजीवी संघटनेने नुकताच रौप्यमहोत्सव साजरा केला. रौप्यमहोत्सवी वर्षातही संघटना गतिमान आहे व विस्तारत आहे. श्रमजीवी संघटनेची वाटचाल विविध प्रयोग करीत झाली आहे. संघटनेच्या रचनेतही या दरम्यानच्या काळात अनेक बदल घडून आले. संघटनेची ही रचना परिपूर्ण आहे असा दावा नाही. मात्र नव्याने संघटना बांधणाऱ्यांना मार्गदर्शक ठरावी म्हणून ही रचना येथे नमूद केली आहे.

शोषितांना, दुर्बलांना, असंघटितांना, समाजातील वंचित घटकांना विकासातील त्यांचा न्याय्य वाटा आणि त्यांचे अधिकार त्यांनी मागणी केल्याशिवाय व त्यामागे आपले सामर्थ्य उभे केल्याशिवाय कधीही मिळणार नाहीत. श्रद्धेय श्री. एस. एम. जोशींनी आम्हाला सांगितले होते की, ''आपले म्हणणे सत्याचे असून भागत नाही. सत्यामागे संघटनेचे सामर्थ्य उभे केले पाहिजे.'' संघटित सामर्थ्यावरच सत्याचा आग्रह सफल होऊ शकतो. त्यासाठी लोकांची मालकी असलेली, केवळ सभासदांच्या व कष्टकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध असलेली, शोषित-वंचिताना स्वप्ने देणारी व त्या स्वप्नांना वास्तवतेचा स्पर्श देणारी जनसंघटना हेच उपेक्षित भारतीय नागरिकांचे आशास्थान आहे. अशा शेकडो जनसंघटना देशभरात उभ्या राहिल्या तरच संविधानाने पाहिलेले समाजवादी सामाजिक न्यायाचे स्वप्न भारत प्रत्यक्षात उतरवू शकेल.

जनसंघटनेची सुरुवात आणि त्याचा विस्तार लोकांचा विश्वास व त्यांचा सक्रिय सहभाग यावरच अवलंबून राहील. अशा जनसंघटनेची सुरूवात छोटी असू शकेल. श्रमजीवी संघटना सुरू झाली तेव्हा महिलांच्या हाताला धरून विद्युल्लता त्यांना घराबाहेर काढीत असे. आम्हीच सभा घेत, निवेदनही आम्हीच लिहित असू. मोर्चाच्या वेळी लोकांना रांगेत आम्हालाच उभे करावे लागे. भाषणही आम्ही करायचे आणि पोलिसांबरोबर

वाटाघाटीलाही आम्ही जायचे. मोर्चा संपल्यावर लोक घरी गेले की बातमी द्यायलाही मुंबईच्या कार्यालयात रात्री उशिरा का होईना आम्हालाच जावे लागे. तुरुंगात राहून आल्यावर न्यायालयाच्या याचिका दिवस-रात्र जागून टाईपरायटरवर आम्हालाच टाइप कराव्या लागत. असा असतो सुरुवातीचा काळ. तो काळ टाळता येत नाही. अशा काळातून गेल्यावरच जनसंघटनेचे महत्त्व आणि त्यासाठी करावे लागणारे परिश्रम याची प्रचिती येते. छोट्या-छोट्या मुद्द्यांवर लढे देऊन, ते जिंकून, लोकांतील नेतृत्व उभे करीत अवघड प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी राज्याचे धोरण बदलण्याचे कार्य संघटनेने केले आहे. संघटनेने सभासदांचा पाया विस्तारला आहे. जगातील इतर लढ्यांशी नाते जोडले आहे. संघटनेने नवी आव्हाने स्वीकारणे व भौगोलिकदृष्ट्याही विस्तारत राहणे आवश्यक असते. नेतृत्वाच्या अनेक फळ्या सातत्याने घडवित राहाव्या लागतात. नेतृत्वाच्या भूमिका चढत्या क्रमाने हस्तांतरीत कराव्या लागतात.

## संघटनेची नोंदणी

संघटना एका व्यक्तीवर अवलंबून राहू नये यासाठी संघटनेची नोंदणी आवश्यक असते. संघटना बांधणीसाठी अनेक कायद्याद्वारे विविध प्रकार उपलब्ध असले तरी कामगार संघ कायद्याखालील नोंदणी अधिक उपयुक्त ठरते. सभासदांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्याचा उद्देश यात प्रमुख असतो. आम्ही ग्रामीण विकासाचे कार्य करण्यासाठी गावात जायचे ठरविले तेव्हा विधायक संसद ही विश्वस्त संस्था सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्ट व बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट या कायद्यान्वये १९७९ साली धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत केली. १९८२ साली वेठबिगार मुक्तीचा लढा विधायक संसदनेच सुरू केला. अधिकाधिक लोकांना निर्णय प्रक्रियेत सामावून घेणे व कामगारांचे प्रतिनिधित्व न्यायालयात करणे संस्थेला अशक्य आहे हे आमच्या लक्षात आले. म्हणून १९८२ साली कामगार संघ कायदा, १९२६ नुसार आम्ही श्रमजीवी संघटनेची नोंदणी केली.

## संघटनेची रचना

संघटनेची रचना हा संघटनेचा सांगाडा आहे. हाडाच्या सांगाड्यामुळे शरीराला आकार येतो. सांगाडा नसेल तर शरीर मांसाचा लोळागोळा बनेल. शरीरात सांगाडा असावा लागतो पण दिसावा लागत नाही. संघटनेची रचनाही अशीच असावी लागते. निरनिराळ्या स्तरांवरील निर्णय प्रक्रिया, तो निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य अगर मर्यादा, पदाधिकाऱ्यांचे उत्तरदायित्व रचनेवरच ठरते. प्रत्यक्ष कामकाजात ही रचना असावी लागते परंतु दिसली

म्हणजे निकोपतेला बाधा येते. जनसंघटनेत सभासदाला फार महत्त्व आहे. सभासद संघटनेची उद्दिष्टे मान्य करून वार्षिक वर्गणी भरून सदस्यत्व स्वीकारतो, तो संघटनेचा मालक असतो. संघटनेचे उत्तरदायित्व आपल्या सभासदांकडे असते. सभासद विविध स्तरांवरील रचना निर्माण करतात. श्रमजीवी संघटनेने वेळोवेळी बदल करून अशा रचना स्वीकारल्या आहेत.

गाव कमिटीची निवड करण्यासाठी कमीत कमी २० सभासदांची आवश्यकता असते. या गाव कमिटीत दोन प्रमुख असतात. त्यापैकी एक महिला असलीच पाहिजे असे बंधन आहे. काही गाव कमिट्यांमध्ये दोन्हीही प्रमुख महिलाच आहेत. गाव कमिट्या त्यांचे प्रतिनिधी झोन कमिट्यांवर पाठवितात. ८ ते १० गावांचा मिळून झोन बनतो. तालुकास्तरावर तालुका कमिटी असते. तालुका कमिटीवर अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस असे पदाधिकारी असतात. चिटणीस संघटनेचा पूर्ण वेळ सेवक असतो. अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि तालुका आमसभा यांना तो उत्तरदायी असतो. तालुका कमिटीच्या सभा दर महिन्याला होतात. तालुक्यातील सर्व गाव कमिट्यांचे सभासद तालुका आमसभेचे सदस्य असतात. दर तीन महिन्यांनी आमसभेचे आयोजन होत असते.

तालुका कमिटीतून जिल्हा कार्यकारिणी व केंद्रीय कार्यकारिणीसाठी सभासद संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी निवडले जातात. जिल्हास्तरावरील कार्यकारिणी जिल्हाध्यक्षांच्या नियंत्रणाखाली कार्य करते. संघटनेचा अध्यक्ष संघटनेचा मानबिंदू असतो व तो संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा अध्यक्ष असतो. संघटनेचे दैनंदिन कामकाज संघटनेचा सरचिटणीस पाहतो. संघटनेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सर्व पदाधिकारी वार्षिक सर्वसाधारण सभेत निवडले जातात.

या रचनेमुळे विविध प्रश्नांचा परिचय व तो सोडविण्यासाठी प्रयत्न सुलभ होतात. काही प्रश्न अगदी स्थानिक असतात, जे गावाच्या पातळीवरच, गावातील नेतृत्वच सोडवू शकते. काही प्रश्नांची जाणीव स्थानिक पातळीवर झाली तरी त्यांचे स्वरुप व्यापक असू शकते. गावपातळीवरील नेतृत्व विकसित होत होत केंद्रीय कार्यकारिणीपर्यंत टप्प्याटप्प्याने पोहोचते. त्यामुळे नव्या नेतृत्वाला संधी उपलब्ध होत जाते व संघटनेचा पोत तरुण राहण्यास मदत होते. या समित्यांमुळे बोलण्याची कला, सभा चालविण्याची कला, संवादाचे कौशल्य उदयोन्मुख नेतृत्वाला शिकता येते. गाव कमिट्या वर्षभरात संघर्षाशिवाय अनेक उपक्रम राबवितात. उदा. शाळेच्या पहिल्या दिवशी शाळा सजवितात. सर्व विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांचे स्वागत करतात. संघटनेचा वर्धापनदिन साजरा करतात. संघटनेच्या

संस्थापकांचे वाढदिवस सन्मानदिन, सेवादिन म्हणून साजरे केले जातात. त्या निमित्ताने मुलांसाठी विविध कार्यक्रम, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये यांची साफसफाई, रक्तदान, कुपोषित मुलांसाठी पोषण आहाराचे वाटप असे सेवेचे कार्यक्रम घेतले जातात. या सर्व कार्यक्रमांसाठी निधी उभा करणे, त्याचा हिशोब ठेवणे, तो योग्य रीतीने खर्च करणे, हिशोब कमिटीसमोर मांडणे, कार्यक्रमांचे नियोजन व त्याची अंमलबजावणी करणे इत्यादी कामे गाव पातळीवरचे नेतृत्व करते. अशा कार्यक्रमांमुळे व त्यात त्यांनी उचललेल्या जबाबदाऱ्यांमुळे त्यांच्यातील नेतृत्वगुण विकसित होण्यास संधी प्राप्त होते.

संघटनेसाठी पूर्णवेळ देणाऱ्या कार्यकर्त्यांचे व पदाधिकाऱ्यांचे उत्तरदायित्व सभासदांप्रती असावे म्हणून खूप विचारांती तालुका आमसभांची निर्मिती केली गेली. एका तालुक्यात अगदी पहिल्याच आमसभेला संघटनेच्या एका ज्येष्ठ कार्यकर्त्यावर आमसभेतील एका सदस्याने प्रश्नांचा भडिमार केला. त्या ज्येष्ठ कार्यकर्त्यासाठी हे अनपेक्षित होते. त्या ज्येष्ठ कार्यकर्त्याला हा धक्का पचविण्यासाठी काही काळ जावा लागला. लोक प्रश्न विचारणार व आपल्याला त्याची उत्तरे द्यावी लागणार हे पूर्ण वेळ कार्यकर्त्यांना समजू लागले. या घटनेनंतर अन्य पूर्ण वेळ कार्यकर्त्यांना त्यांच्या उत्तरदायित्वाचे भान आले.

**संसाधनांची जुळवाजुळव :**

निधीच्या बळावर जनसंघटना उभारता येत नाहीत हे जरी खरे असले तरी जनसंघटना चालविताना आर्थिक पाठबळ लागतेच. सुरुवातीस छोटी-मोठी कामे करून देणारे मित्र शोधता येतात व तसे मिळतातही. परंतु कामाचा आवाका जसा वाढत जातो तशी आर्थिक निकड जाणवतेच. सभासदांची वार्षिक वर्गणी हा महत्त्वाचा आर्थिक स्त्रोत असतो. त्यासोबतच सभासदाचे काम झाल्यावर त्याने संघटनेला दिलेली देणगी हा सुद्धा महत्त्वाचा स्त्रोत असू शकतो. संघटकाला निधी उभारणी करावीच लागते. त्यासाठी हितचिंतक, मित्रांकडून निधी उभा करता येतो. देणगी देण्यासाठी अनेक जण उत्सुक असतात त्यांना उत्तेजन दिले पाहिजे.

संघटनेकडे जमा होणारा निधी सार्वजनिक असल्याने विश्वस्त भावनेने तो खर्च करणे, त्याचा हिशोब ठेवणे, त्यात पारदर्शकता ठेवणे अत्यावश्यक असते. निधीतील गैरव्यवहार संघटनेच्या मुळावर येऊ शकतात. यासाठी निधीचा वापर कसा करावा याबाबतचे स्पष्ट नियम व हिशोब ठेवणारी यंत्रणा असावीच लागते. काही देणगीदार देणगी देतात, परंतु

पावती नको असे म्हणतात. आर्थिक शिस्तीच्या दृष्टीने असे कधीही करता येत नाही. देणगीदाराला त्याचे नाव जाहीर करावयाचे नसल्यास तो सुचवेल त्या नावाने पावती केली पाहिजे. परंतु पावतीशिवाय कोणताही निधी स्वीकारणे सर्वस्वी गैर आहे.

**नेतृत्वाची नवी पिढी :**

संघटनेचे आयुष्यमान संस्थापकाच्या आयुष्यमानापेक्षा अधिक असावे अशी इच्छा असेल तर संघटनेच्या सुरुवातीपासूनच संघटना पुढे नेणाऱ्या नेतृत्वाचा विकास करावा लागेल. माझ्या जागी दुसरा नेता आला तर माझे महत्त्व कमी होईल या भावनेपोटी वर्षानुवर्षे तेच नेतृत्व त्याच जागी राहते. त्यामुळे ना ते नेतृत्व पुढे जाते ना संघटना. सुरुवातीच्या नेतृत्वाने आपल्या क्षमता आणि क्षितिजे विस्तारत आपल्या भूमिका बदलल्यास व आपली जागा नव्या नेतृत्वाला उपलब्ध करून दिल्यास नव-नवे नेतृत्व उभे राहत जाते. आधीच्या नेतृत्वाच्या अनुभवाचा फायदा नव्या नेतृत्वाला होतो व संघटना अधिक प्रभावीपणे पुढे जात राहते.

काळ बदलतो तसा समाजही बदलत असतो. प्रश्नांचे स्वरुपही बदलत असते. बदललेला समाज व प्रश्नांचे बदललेले स्वरूप यानुसार संघटनेला आपल्या धोरणातही बदल करावे लागतात. श्रमजीवी संघटनेच्या विरोधात कुणबी सेना उभी राहिली. दोन्ही संघटनांनी एकमेकांविरोधात आंदोलने केली. वेठबिगारी व शेतमजुरीच्या प्रश्नावर दोन्ही संघटना एकमेकांच्या विरोधात होत्या. काळ बदलला. शासनाकडून शेतकरी व शेतमजुरांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी दोन्ही संघटना एकमेकांच्या हातात हात घालून शासनाविरोधात उभ्या राहिल्या. त्यामुळे बदलत्या काळाची पावले ओळखून संघटनेला धोरणे बदलावी लागतात.

बदललेल्या काळाचा वेग नवी पिढी अधिक तीव्रतेने घेऊ शकते. नवी पिढी जुन्या पिढीच्या खांद्यावर असल्याने ती अधिक दूरचे पाहू शकते. त्यामुळे नव्या पिढीच्या आशा-आकांक्षा, त्यांच्या समोरची आव्हाने व त्यासाठी त्यांनी शोधलेले उत्तर याचा सन्मान केल्यास दोन पिढ्यांमधील संघर्ष हानिकारक ठरण्याऐवजी विधायक ठरू शकतो. आमचे तेच खरे, आम्ही आमच्या काळी असे केले होते, नव्या पिढीनेही तसेच केले पाहिजे, अशी अपेक्षा केल्यास नव्या पिढीतील नेतृत्वाला वाव मिळणार नाही. ज्येष्ठांनी उदयोन्मुख नव्या नेतृत्वाला वाव देताना त्यांच्या हातून चुका झाल्यास त्या समजून घेऊन त्यांना नव्या चुका करण्याचे स्वातंत्र्यही दिले पाहिजे.

उदयोन्मुख नेतृत्व ज्येष्ठ नेतृत्वासमोर आपल्या मनातील कल्पना सांगण्यास बरेचदा धजावत नाही. ज्येष्ठ नेतृत्वाबद्दल वाटणारी ही भीती नेतृत्व विकासास बाधक ठरते. नव्या नेतृत्वाला त्यांच्या कल्पना मांडून त्या प्रत्यक्षात आणण्यास प्रोत्साहन देणे आवश्यक ठरते. सुरुवातीला त्यांच्या हातून अपेक्षित प्रभावी काम कदाचित होणार नाही. काही चुका होतील. अशा वेळी ज्येष्ठ नेतृत्वाने त्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना बळ दिले तर त्यांचा आत्मविश्वास वाढेल व त्यांची कृतिशीलता विस्तारत जाईल.

अनेकदा अपयशाचे भय मनात असल्याने किंवा पर्यायांचा विचार न केल्याने, नवे नेतृत्व ज्येष्ठ नेतृत्वाला कोणताही निर्णय घेण्यापूर्वी मी काय करू ? किंवा कसे करू ? असे प्रश्न विचारतात. बरेचदा ज्येष्ठ नेतृत्वालाही ते बरे वाटते. परंतु यामुळे नव्या नेतृत्वाला पर्यायांचा विचार करण्याची सवय लागत नाही व त्यांचा नेतृत्व विकास होत नाही. त्याऐवजी तुला काय करावयाचे आहे व कसे करावयाचे आहे ? हे ज्येष्ठ नेतृत्वाने विचारल्यास त्यांना पर्यायांचा विचार करावा लागेल, त्यांची कल्पकता वाढेल आणि यश मिळविण्यासाठीच ते प्रयत्न करतील.

श्रमजीवी संघटनेने नुकताच रौप्यमहोत्सव साजरा केला. २५ वर्षांपूर्वी वेठबिगारीची जी अमानुष प्रथा होती ती नष्ट होऊन दोन दशके उलटली. त्यावेळी आदिवासींवर अन्याय-अत्याचार जसे होत होते तसे आता होत नाहीत. त्यावेळी संघटकांनी ज्या खस्ता खाल्ल्या तशी परिस्थिती आता राहिली नाही. कुमारांची अगर युवकांची जी पिढी आहे त्यांनी अत्याचार भोगलेले नाहीत. इतिहास विसरलो तर पुन्हा ती परिस्थिती निर्माण होऊ शकते. नव्या पिढीतील समर्पण वृत्ती जोपासण्यासाठी त्यांना संघटनेच्या लढ्यांचा इतिहास, संघटित नव्हतो तेव्हाची जुलमाची परिस्थिती याची जाणीव करून देणे आवश्यक ठरते.

ज्यू धर्मातील लोक ईजिप्तमध्ये गुलाम होते. या गुलामीचा इतिहास विसरू नये म्हणून ते 'पास ओव्हर' हा दिवस साजरा करतात. त्या दिवशी ते मुलांना गुलामीचा इतिहास व त्यातून मुक्त होण्यासाठी दिलेल्या लढ्याच्या कहाण्या सांगतात. आपल्या मुलांना इतिहासाचे भान करून देतात.

**जनसंघटना व स्वयंसेवी संस्था :**

संघटनांचा अभ्यास करण्याची संधी मला अनेकदा प्राप्त झाली. माझ्या अनुभवाचा विस्तार त्यामुळे होत गेला. जनसंघटना मात्र मला खूप अपवादाने आढळल्या. संस्थात्मक काम करणाऱ्यांनी संघर्षात सहभागी होऊ नये, असा गैरसमज पसरविण्यात आला आहे.

संघटना करणे आणि अहिंसक संघर्ष करणे संविधानाने त्याज्य ठरविलेले नाही. बहुसंख्य स्वयंसेवी संस्था प्रकल्प राबविताना मी पाहिल्या. अलीकडे स्वयंसेवी संस्था या शब्दाऐवजी बिगरसरकारी संस्था हा शब्दप्रयोग रूढ झाला आहे. अगदी अलीकडे सिव्हिल सोसायटी असेही त्याचे नामकरण झाले आहे.

श्रमजीवी संघटना, विधायक संसद आणि समर्थन या दोन संस्थाच्या सहकार्याने कार्य करते. श्रमजीवी संघटना भौगोलिकदृष्ट्या ज्या कार्यक्षेत्रात कार्य करीत आहे, त्या कार्यक्षेत्रात विधायक संसद ही विश्वस्त संस्था कार्य करते. विधायक संसद संघटनेच्या कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण, कार्यक्षेत्रातील विकासाचे विविध उपक्रम उदा. विटभट्टीवरील मुलांसाठी भोंगा शाळा, शेतकऱ्यांच्या दुबार पिकासाठी प्रशिक्षण व सहाय्य, कातकरी मुलींची निवासी शाळा, कुपोषित मुलांसाठी सकस आहार असे कार्यक्रम राबविते. संस्थेची कार्यकारिणी व संघटनेची कार्यकारिणी परस्पर विश्वासाने कार्य करतात. संघटनेला उपयुक्त असणारे कार्यक्रम संस्था राबविते. संस्था आणि संघटनेची कार्यालये स्वतंत्र आहेत. त्यांचा निधी स्वतंत्र आहे. त्यांचे हिशोब स्वतंत्र आहेत. निर्णय घेण्याच्या प्रक्रिया स्वतंत्र आहेत परंतु दोन्हीमध्ये समन्वय आहे. विधायक संसद, श्रमजीवी संघटनेच्या मार्गदर्शनाने कार्य करते. यासाठी विविध प्रकल्पांना जबाबदार असणारे संस्थेचे प्रमुख आणि संघटनेचे प्रमुख पदाधिकारी यांची अनौपचारिक समन्वय समिती आहे. ही समिती अनौपचारिक असली तरी त्यातील निर्णयाला संस्था, संघटना दोन्हीकडे महत्त्व आहे.

विधायक संसद आणि श्रमजीवी संघटनेने राज्याच्या धोरणाशी संबंधित अनेक प्रश्नांवर सातत्याने काम केले होते. एकाच वेळी जिल्हास्तरावरील प्रशासकीय यंत्रणा, राज्यस्तरावरील प्रशासकीय यंत्रणा, उच्च न्यायालय, विधिमंडळ यांच्याबरोबर कार्य करावे लागत होते. मुंबईच्या नजीक संघटनेचे कार्यक्षेत्र असल्याने या यंत्रणांशी संपर्क साधणे व कार्य करणे शक्य होते. मुंबईहून दूर असलेल्या संघटनांना अथवा जनतेच्या प्रश्नांवर लढणाऱ्या व्यक्तींना या यंत्रणेसोबत काम करणे सुलभ व्हावे या हेतूने १९९३ साली समर्थन या संस्थेची निर्मिती केली गेली. विधायक संसद व श्रमजीवी संघटना यांनी समर्थनची निर्मिती केली असली तरी ती स्वतंत्र विश्वस्त संस्था आहे. राज्यातील उपेक्षितांच्या प्रश्नांसाठी कार्य करणाऱ्यांना ती सहाय्यभूत होते. श्रमजीवी संघटनेने समर्थनसोबत कार्य करून राज्यातील वंचित मुलांसाठीचे शिक्षणाचे धोरण बदलले, ठाणे जिल्ह्यातील ७७०० वनजमिनीवरील वहिवाटदार शेतकऱ्यांना ३० हजार एकर जमीन मिळवून दिली, जैविक इंधनासाठी जेट्रोफा वनस्पतीची लागवड रोजगार हमी योजनेत फळबाग योजनेनुसार करून

द्यावी म्हणून प्रयत्न केले व केवळ ६ महिन्यांत यासंदर्भातले राज्याचे धोरण बदलले. २००६ मध्ये केवळ ठाणे जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातील १० हजार हेक्टर क्षेत्रफळात जेट्रोफाची लागवड झाली.

विधायक संसद, श्रमजीवी संघटना आणि समर्थन वेगवेगळी कार्ये करणाऱ्या, स्वतंत्र अस्तित्व असणाऱ्या, वेगळे स्वरूप असणाऱ्या संस्था/संघटना आहेत. तिघांचेही साध्य एकच आहे. उपेक्षितांना न्याय मिळवून देणे, त्यांना सामर्थ्य देणे, त्यांना सन्मान प्राप्त करून देणे. स्वतंत्र भारतात स्वातंत्र्य त्यांच्या दारात पोहोचेल यासाठी प्रयत्न करणे, त्यांना तिमिरातून तेजाकडे नेणे. त्यांच्या सत्यामागे संघटनेचे सामर्थ्य उभे करणे.

**संघटना आणि सरकार**

लोकांना संघटित करताना अनेक उपक्रम आणि कार्यक्रमांचे आयोजन करावे लागते. ते कार्यक्रम फार विचारपूर्वक आखण्याची आवश्यकता असते. सरकार ही संकल्पना संघटकाने लक्षात घेणे गरजेचे आहे. ज्यांना संघटना उभी करायची आहे त्यांनी सरकारकडे दुर्लक्ष करून चालत नाही. सरकारच्या योजना शक्यतोवर संघटनांनी घेऊ नयेत. उलट सरकारला ते उपक्रम करण्यासाठी, लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी भाग पाडणे हा संघटनेचा उपक्रम असू शकतो. सामाजिक संस्थांनी कितीही प्रयत्न केले तरीही सरकारएवढी साधने सामाजिक संस्थांकडे नसतात. त्यामुळे त्या उपक्रमांची पुनरावृत्ती करीत ते छोट्या प्रमाणावर राबविणे अनेकदा निरर्थक ठरते. याचा अर्थ सरकारी कार्यक्रम संघटनांनी घेऊच नयेत असे मात्र नव्हे.

जे कार्यक्रम शासनाने करणे अपेक्षित आहे ते कार्यक्रम आपण करणे म्हणजे आपण प्रतिसरकार होण्यासारखे असते. आपण लोकांना ताकद निर्माण करून देऊ शकत नाही. शिवाय काही गोष्टी अशा असतात की केवळ सरकारच त्या करू शकते. उदा. अतिक्रमित जमिनी नावावर करून देणे, संस्थांनी कितीही ठरवले तरी ते त्यांना करता येणार नाही. त्यासाठी सरकारलाच ते करावयास भाग पाडणे आवश्यक असते. गुन्हा पोलिसांनाच दाखल करता येतो, जमिनीच्या  कागदपत्रांचे काम तलाठ्याकडूनच करवून घ्यावे लागते. परंतु या यंत्रणा ही कामे करणार नसतील तर त्यांना ते करायला भाग पाडणे हे संघटनेचे काम असते.  त्यामुळे ‘सरकार’ या यंत्रणेकडे दुर्लक्ष न करता सरकारी यंत्रणेकडून काम करून घेण्याचे कसब संघटकास आत्मसात करावे लागते. अनेक ठिकाणी सरकारला विसरून लोक काम करताना दिसतात. मात्र त्या कामांचा परिणाम शून्य असतो.

**प्रशिक्षण कार्यक्रम :**

संघटना बांधणीत संघटकाला विविध पातळीवर नेतृत्व विकसित करावे लागते. प्रत्यक्ष कृतीतून नेतृत्वगुणाचा विकास होतो. तरीही प्रशिक्षण कार्यक्रमांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. अनुभवाचे आदानप्रदान झाल्याने नवे ज्ञान, नवी कौशल्ये यांचा विकास सहज साध्य होतो.

प्रशिक्षणात प्रशिक्षणाच्या जागेला महत्त्व आहे. शांत वातावरण, उल्हासित करणारा परिसर, ऐसपैस जागा, भरपूर सूर्यप्रकाश, खेळती हवा, योग्य व वेळेत भोजनाची व्यवस्था याचे महत्त्व कमी लेखता येत नाही. प्रशिक्षण शिबिराच्या प्रत्यक्ष आखणीच्या वेळी याचे भान ठेवणे आवश्यक आहे.

निवासी शिबिरांना फार महत्त्व असते. औपचारिक प्रशिक्षणापेक्षा अनौपचारिक चर्चेतून, अनुभव प्रदानातून अन्यथा उपलब्ध न होणारे ज्ञान प्राप्त होते. ज्यांच्यासोबत आपण काम करीत असतो त्यांच्याकडे अनुभवाचा प्रचंड साठा असतो. डावपेचांच्या आखणीसाठी त्याचा खूप उपयोग होतो. भीतीपोटी औपचारिकपणे हे अनुभव लोक कथन करीत नाहीत. परंतु मोकळ्या वेळात गप्पा मारताना लोक अनेक कथा सांगतात. या कथनातून गावातील घडामोडी, परस्पर संबंध याचा उलगडा होत जातो. संघटनेने जे जे यशस्वी लढे दिले त्याच्या आखणीसाठी शिबिरातून झालेल्या अनौपचारिक चर्चेतून मिळालेल्या ज्ञानाचा खूप उपयोग झाला आहे. त्या अर्थाने स्वाभाविकपणे शिबिरार्थी हेच प्रशिक्षक असतात. शिबिरात बाहेरील व्यक्तींना प्रशिक्षक म्हणून आणावयाचे झाल्यास ते कोणता विषय घेणार, कसा घेणार याची पूर्वतयारी करावी लागते. अन्यथा सुसंवाद होत नाही. सामान्यत: आपण ज्यांच्यासोबत काम करीत आहोत ते निरक्षर अथवा निमसाक्षर असतील तर व्याख्यान टाळावे लागते व इतर माध्यमांचा वापर करावा लागतो. कायद्यासारखा विषय नाट्याद्वारेही शिकविता येतो. नाट्यीकरण, रोल प्ले, विविध खेळ याद्वारे अवघड विषय शिकविता येऊ शकतात. एका वेळी त्या विषयाचा थोडा भाग घेऊन तो समजत आहे किंवा नाही याविषयी प्रश्न विचारून खात्री करून पुढे जाणे योग्य असते.

संघटनेच्या सुरुवातीच्या काळातील बहुसंख्य कार्यकर्ते निरक्षर होते. परंतु त्यांना ज्ञानसंपादनाची प्रचंड ओढ होती. शिबिरांना येणाऱ्या कोणालाही त्याचे शिक्षण न विचारता आम्ही वही व पेन देत होतो. त्यामुळे ज्यांना लिहिता-वाचता येत नव्हते त्यांना अवघडल्यासारखे वाटे. पोलीस, जमीन आदी विषयांचे मोठ्या अक्षरातील तक्ते भिंतीवर

आम्ही लावत असू. काही महिला व पुरुष कार्यकर्ते रात्र-रात्र जागून हे तक्ते आपल्या वहीत उतरवून घेण्याचा प्रयत्न करीत. ते काय लिहीत आहेत हे त्यांना कळत नसे. एखादे चित्र उतरवावे तसे ते अक्षरे वहीत उतरवीत. यामुळे लिहा-वाचायला शिका हे त्यांना सांगावे लागलेच नाही. निरक्षर असणारा जानू मेघवाले या पद्धतीने शिकून उत्तम गाणी लिहू लागला व संघटनेचा अध्यक्षही झाला. तसेच वेणू मेघवालेचेही झाले. निरक्षर असणारा केशव नानकर वेठबिगारातून मुक्त झाल्यावर संघटनेत दाखल झाला व अशाच शिबिरात शिकला. विधानसभेच्या निवडणुकीत अपक्ष म्हणून उमेदवारही झाला व गेली काही वर्षे संघटनेचा कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत आहे.

प्रशिक्षणाचे माध्यम महत्त्वाचे नाही, ते साध्य नसून साधन आहे. काय शिकवायचे आहे हे महत्त्वाचे असून त्यासाठी साधन कोणते निवडायचे हा दुय्यम भाग आहे. अदृश्य, अमूर्त संकल्पना स्पष्ट करणे सर्वात अवघड आहे. उदा. शोषण ही संकल्पना योग्य साधनाचा वापर केल्यास मूर्तिमंत करता येते. शोषण समजावताना संघटनेने बांडगुळे आणि अमरवेल याचा उपयोग केला. मूळ झाडाच्या फांदीसह बांडगूळ प्रत्यक्ष प्रशिक्षणवर्गात आणले. पुढचे काहीही शिकविण्याची गरजच भासली नाही. मूळ झाडाच्या फांदीत बांडगूळ आपले पाय कसे खेचून घेते, बांडगूळ कसे मोठे बनत जाते व मूळ झाड कसे मृत्युपंथी लागते हे सारे लोक स्वत: सांगू लागतात. अमूर्त कल्पना मूर्त करणे हे प्रशिक्षणाचे मुख्य काम आहे. प्रशिक्षणाचा उद्देश मूर्ताकडून अमूर्ताकडे जाणारा असावा लागतो. म्हणून लोकांना जे ठाऊक आहे तेथून सुरुवात करून टप्प्याटप्प्याने जे ठाऊक नाही तेथे जावे लागते.

गावाची परिस्थिती समजून घेण्यासाठी व लोकांनी ती बदलण्यासाठी तिचे विश्लेषण करावे म्हणून एक माध्यम फार प्रभावी ठरले. शिबिरार्थींच्या गटाला एक मोठा कागद व स्केचपेन देऊन गावाचे चित्र काढावयास सांगितले. त्यातून गावात कुठे काय आहे? याचे त्यांनी विश्लेषण केले. रस्ता, पाणी, वीज, शाळा, दवाखाना, साऱ्या सुविधा, धनिक असलेल्या मुख्य गावात होत्या. पाड्यात काहीच नव्हते. नेहमी पाहत असलेले वास्तव स्वत: काढलेल्या चित्रातून, केलेल्या विश्लेषणातून अधिक प्रकर्षाने त्यांना जाणवले. हे चित्र बदलण्यासाठी त्यांची समर्पित वृत्ती जागी झाली. कायद्यासारखा विषय शिकविताना दोन प्रशिक्षण शिबिरांमधील काळात कृती कार्यक्रमाची जोड प्रशिक्षणातील शिक्षण पक्के करते. उदा. पोलीस विषय शिकवून झाल्यानंतर शिबिरार्थींनी पोलीस स्टेशनला भेट देणे, तेथील अधिकाऱ्यांची नावे लिहून आणणे, त्यांच्याशी परिचय करून घेणे, दरम्यानच्या

काळात गुन्हा घडल्यास त्याची कायद्यानुसार नोंद करून घेणे. जमीन विषयाबाबत तलाठी, तहसीलदाराकडे जाणे, योग्य फी देऊनच ७/१२ मिळविणे इत्यादी कृती कार्यक्रमांद्वारे प्रशिक्षणार्थींचा आत्मविश्वास वाढतो व कृती केल्यामुळे प्राप्त केलेले ज्ञान रूढ होत जाते. प्रशिक्षणाच्या पुढच्या टप्प्यात या कृती कार्यक्रमांचे अनुभव प्रशिक्षणार्थींना अधिक संपन्न करतात. संघटनेतील अनेक निरक्षर महिला आपले हक्क तर मिळवितातच पण इतर शिक्षितांचे हक्कही मिळवून देतात.

प्रशिक्षण स्वतंत्र असू शकत नाही. संघटना बांधणीचा तो अविभाज्य भाग असावा लागतो. एकदा एका भागात प्रशिक्षणाचे मूल्यमापन करण्यासाठी मी गेलो होतो. ग्रामीण गरिबांना संघटित करण्यासाठीच्या केंद्र सरकारच्या योजनेचा तो एक भाग होता. प्रशिक्षण कार्यक्रम ठरल्यानुसार पार पडला होता. प्रशिक्षणात शेतमजुरांच्या किमान वेतन कायद्याची माहिती देण्यात आली होती. मी एका प्रशिक्षणार्थीला भेटलो. प्रशिक्षणात माहिती झाल्यामुळे त्याने आपला हक्क मिळवायचे ठरविले. मालकाकडे किमान वेतनाचा आग्रह धरला. मालकाने किमान वेतन देण्याऐवजी मजुराच्या घरासाठी दिलेले पत्रे काढून नेले. हा मजूर प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण देणाऱ्या संस्थाचालकाकडे गेला तेव्हा संस्थाचालकाने दिलगिरी व्यक्त करून प्रशिक्षणाचा प्रकल्प संपल्याचे त्याला सांगितले. प्रशिक्षणाला कृतीची जोड नसेल तर प्रशिक्षण कुचकामी आहे. प्रशिक्षण 'प्रकल्प' म्हणून न राबविता तो संघटना बांधणीचा एक भाग झाला पाहिजे.

**प्रशिक्षण कोणी द्यावे ?**

ज्याने अनुभवलेले आहे, उत्तम दर्जाचे काम केले आहे त्यानेच त्या विषयाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. संघटना-प्रक्रियेत जे प्रत्यक्ष नाहीत परंतु ज्यांच्याकडून ज्ञान अपेक्षित आहे अशा काही संघटनेबाहेरच्या साधन व्यक्तींना प्रशिक्षणासाठी निमंत्रित करावे लागते. उदा.पोलीस अधिकारी, कायदेतज्ज्ञ, महसूल अधिकारी, पत्रकार इत्यादी मात्र सुसंवाद होण्यासाठी आधी पूर्वतयारी करून घ्यावी लागते. संघटना बांधणीच्या प्रक्रियेचे प्रशिक्षण मात्र सिद्ध संघटकाकडूनच दिले गेले पाहिजे. काही संस्था अगर व्यक्ती संघटना बांधणी न करता थेट प्रशिक्षक बनतात. त्यांना संघटना बांधणीच्या प्रक्रियेचा अनुभव नसल्याने बारकाव्यांची माहिती नसते. त्यामुळे पुस्तकी ज्ञानावर आधारित प्रश्नांची उत्तरे ते देतात, त्याचा उपयोग शून्य असतो. किंबहुना त्यांच्या मार्गदर्शनामुळे फसगत होऊ शकते.

**नेतृत्व प्रशिक्षण :**

संघटना एखाद्या सुंदर बागेसारखी असावी लागते. बागेतील काही फुलझाडे सुगंध देतात, काही फुलझाडे सुगंधी नसतात मात्र विविध रंगांची असतात. काही दिवसा फुलतात, काही रात्री. काहींना फुलेच नसतात परंतु त्यांची पानेच आकर्षक असतात. काटेरी निवडुंगही बागेची शोभा वाढवितो. काही झाडे छोटी तर काही मोठी असतात. कुशल माळी कोणते झाड कोठे लावावे त्याचे स्थान ठरवितो. झाडाला खतपाणी देतो व त्याचबरोबर झाड वेडेवाकडे वाढल्यास त्याची काटछाटही करतो. संघटनेत नेमके हेच करावे लागते. कोणता कार्यकर्ता काय करू शकतो, हे पाहून त्याचे स्थान ठरवावे लागते. खतपाणी घालून, त्याचे नेत्तृत्व गुण विकसित करून सामर्थ्यही वाढवावे लागते. संघटनेला हानीकारक अवगुण विकसित झाल्यास त्या अवगुणांची छाटणीही करावी लागते.

नेता जन्मजात असतो की त्याला विकसित केले जाऊ शकते, या वादात मी पडू इच्छित नाही. ज्या व्यक्तीकडे अन्याय व जुलुमाबद्दल चीड आहे व ती बदलण्यासाठी जो धोका स्वीकारावयाला तयार आहे तो संघटक अगर नेता बनू शकतो. इतर ज्ञान व कौशल्ये त्याला देता येतात किंवा तो प्राप्त करू शकतो. नेतृत्व गुणासाठी आवश्यक असणारी चीड आणि त्यासाठी धोका स्वीकारावयाची तयारी आहे अशा व्यक्ती हेरून त्यांचे नेतृत्व विकसित करता येते.

*******

# ऋणनिर्देश

**ज्यांच्या आशीर्वादाशिवाय व सहकार्याशिवाय मी हे कार्य करूच शकलो नसतो असे माझे कुटुंबिय**

वडील कै. रघुनाथ पंडित (भाई), आई श्रीम. रजनी पंडित, सासरे कै. रमेश मळगावकर, सासुबाई कै. सुनंदा मळगावकर, आई समान कै. विमल रिसबुड, पत्नी श्रीम. विद्युल्लता, दोन्ही मुली श्रीम. स्वप्ना व श्रीम. स्नेहा, मामा व मामी श्री व श्रीम. मोहन जावळे

**संघटनेच्या व माझ्या कायम पाठीशी उभे राहून प्रोत्साहन देणारे :**

श्रद्धेय एस. एम. जोशी (अण्णा), कै. प्रा. सदानंद वर्दे (अनुकाका), कै. प्रा. वसंत बापट, कै. विजय तेंडुलकर, कै. आनंद (आबा) धामणकर, श्रीम. सुधा वर्दे, डॉ. श्रीराम लागू, डॉ. लक्ष्मीधर मिश्रा, श्रीम. कॅथी श्रीधर

**प्रसंगी स्वत:च्या जीवाची पर्वा न करता संघटनेसाठी लढलेले आणि लढणारे कार्यकर्ते**

कै. लहु सापटे, कै. सखाराम सापटे, कै. अनंता वाडु, कै. मनोहर परेड, कै. दशरथ लहांगे, कै. सुकुर वाघ, कै. हरीभाऊ दोडका, कै. देऊबाई किरकिरा, श्रीम. विषया भावे, श्री. विजय भाटी, श्री. व श्रीम. जानू व वेणू मेघवाले, श्री. लोड्या काटेला, श्री. पांडुरंग भोईर, श्री. महादू जाबर, श्री. अशोक कामडी, श्रीम. सोनीबाई धुळे, श्री. विष्णू घाटाळ, श्री. केशव नानकर, श्री. रामभाऊ वारणा, श्री. लक्ष्मण लहांगे, श्री. नाऊ चौधरी, श्री. लहु पासारी

यांच्या शिवाय श्रमजीवी संघटनेचे असंख्य ज्ञात व अज्ञात कार्यकर्ते. आजी व माजी पदाधिकारी. जागेअभावी या असंख्य कार्यकर्त्यांची नावे देणे केवळ अशक्य आहे. तसेच विधायक संसद, समर्थन, मानवी हक्क अभियान, श्रमजीवी कामगार संघटना व अभिव्यक्ती समर्थन मधील माझे सर्व सहकारी

**संपादक व पत्रकार मित्र ज्यांचेमुळे अनेकदा यश सुलभ झाले :**

श्री. माधव गडकरी, श्री. दिनु रणदिवे, कै. भैयासाहेब सहस्त्रबुद्धे, कै. प्रकाश देशमुख, श्री. रामकृष्णन, श्री. रघुनाथा, श्री. श्रीकांत नेर्लेकर, श्री. सोपान बोंगाणे, श्री. मिलिंद कोकजे, श्री. संतोष प्रधान, श्री. सतिश कामत, श्रीम. प्रतिमा जोशी,श्री. संजीव साबडे, श्री. प्रकाश अकोलकर, श्री. विजय वैद्य, श्री. नागेश केसरी, श्री. अरविंद भानुशाली, श्री. सुधीर कोऱ्हाळे, कै. स. पा. जोशी, श्री. मिलिंद बल्लाळ

**न्यायालयीन लढाईमध्ये ज्यांनी मला व संघटनेला साथ दिली ते विधिज्ञ :**

न्या. पी. एन. भगवती, न्या. राजन कोचर, न्या. हेमंत गोखले, ॲड. श्री. नितीन प्रधान, ॲड. श्री. अशोक मुंदरगी, ॲड. श्रीम. मंदाकिनी करंदीकर, ॲड. श्रीम. निलिमा कानेटकर, ॲड. कै. गोविंद मुखोती, कै. डॉ. सत्यरंजन साठे, डॉ. ॲड. वसुधा धागमवार, कै. ॲड. एस. व्ही. देशपांडे, ॲड. श्री. किशोर पाटील

**विधिमंडळातील व त्या त्या वेळच्या सरकारातील आमचे पाठीराखे :**

माजी विरोधी पक्ष नेता (विधान परिषद) प्रा. ग. प्र. प्रधान, माजी मुख्यमंत्री कै. वसंतदादा पाटील, माजी मुख्यमंत्री कै. शंकरराव चव्हाण, माजी मुख्यमंत्री कै. सुधाकरराव नाईक, माजी गृह राज्यमंत्री कै. अरुण मेहता, माजी मुख्यमंत्री श्री. शरद पवार, माजी मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी, उपसभापती (विधान परिषद) श्री. वसंत डावखरे, माजी गृहमंत्री व उप मुख्यमंत्री श्री. गोपीनाथ मुंडे, माजी कृषीमंत्री श्री. गोविंदराव आदिक, माजी विरोधी पक्षनेता (विधान सभा) श्री. मधुकर पिचड, माजी विधान परिषद सदस्य श्री. व्यकंप्पा पत्की, माजी विधान परिषद सदस्य श्री. पी. जी. दस्तूरकर

**पोलीस व प्रशासनातील अधिकारी ज्यांनी संघटनेला बळ दिले :**

शहीद हेमंत करकरे, श्री. भास्करराव पाटील, श्री. गो.बा. पिंगुळकर, डॉ. जॉयस शंकरन, श्री. गौतम चॅटर्जी, श्री. अवधेश प्रसाद सिन्हा, श्री. अजित निंबाळकर, श्री. व्ही. रंगनाथन, श्री. अजय भूषण पांडे, श्री. भास्करराव मिसर, श्री. टी. के. चौधरी, श्री. उल्हास जोशी, श्री. आर. व्ही. रेनगुटवार, श्री. ए. डी. वनिस

**माझे व संघटनेचे मार्गदर्शक व मित्र**

कै. धर्मवीर आंनद दिघे, कॉ. रा. वि. भुस्कुटे, श्री. द. गो. प्रभू, श्री. गजानन प्रभूशेळपकर, श्रीम. शीला शहा, श्री. गौतम सोनी, श्री. प्रभाकर लकेश्री, श्री. प्रविण महाजन, श्री. रमेश किणी, कै. रमेश चौथे, कै. राजू कानिटकर, प्रा. अंजली कानिटकर, श्रीम. संगिता कोपर्डे,

श्री. दशरथ जाधव, श्री. एकनाथ आव्हाड, श्री. सदाशिव राठोड, श्रीम. नीता कोल्हटकर, प्रा. विद्या नानल, श्रीम. प्रज्ञा सावरगावकर, श्री. सुशील शुक्ल

**फिअरलेस माइंडस् या मुळ इंग्रजी पुस्तकासाठी ज्यांनी मला सहकार्य केले :**

श्रीम. पारोमिता गोस्वामी, श्रीम. ॲश्ली बॉईड

**या पुस्तकासाठी मला यांचे सहकार्य लाभले :**

श्री. हरिहर बाबरेकर (मार्गदर्शन), श्रीम. प्रिया खान (संपादन), कु. डॉमिनिका डाबरे, श्रीम. मालती वंजारा, श्री. संजय शिरोडकर, श्री. संजय नाईक, श्री. संदिप पवार, श्री. सुभाष विश्वासराव (श्रुतिलेखन सहाय्य), श्री. दिपक म्हात्रे (मुद्रण तपासणी)

याशिवाय सर्व ज्ञात-अज्ञात व्यक्ती ज्या मी संघटक बनण्यास, संघटक म्हणून विकसित होण्यास, संघटक म्हणून यशस्वी होण्यास सहाय्यभूत ठरल्या.

**या सर्वांच्या ऋणात मी सदैव राहू इच्छितो**

*******